३	कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद	सदस्य
४	उपकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ	सदस्य सचिव

योजनेची प्रसिध्दी/ अंमलबजावणी खर्च :-

ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना मंजुर केलेल्या अटल बांधकाम कामगार आवास योजनेची (ग्रामीण) मंडळामार्फत राज्यस्तरीय, प्रादेशिक व स्थानिक वृत्तपत्रांतून व स्थानिक माध्यमांद्वारे बांधकाम कामगारांनी लाभ घेण्याच्या उद्देशानी व्यापक प्रसिध्दी करण्यात येईल. याकरीता येणारा खर्च हा या योजनेवरील खर्चात दर्शविण्यात येईल.

सदरचा शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २० /२०१८ दिनांक ०१ डिसेबर, २०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०११४१४११०१४८१० असा आहे. तसेच सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Kumar

(राजेश कुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा)
४. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
५. मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.

पृष्ठ ६ पैकी ५

६. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
७. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
८. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
९. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
११. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर
१२. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१३. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१४. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
१५. प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहाय्यक.
१६. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, कामगार विभाग
१७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१८. सर्व अपर कामगार आयुक्त /उपायुक्त कामगार आयुक्त / सहाय्यक कामगार आयुक्त.
१९. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
२०. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२१. निवडनस्ती (कामगार-७).

पाठविण्याची आवश्यकता नाही, अशी धारणा व्यक्त करून ती धारणा पक्की करण्यासाठी मी पत्राद्वारे विनंती केली आहे, असे ते म्हणाले.

मा. अध्यक्ष यांनी असे सांगितले की, मॉनिटरिंग कमिटीच्या सूचना लक्षात घेता हे तातडीने करणे आवश्यक आहे. मंडळ संविधानिक असल्यामुळे मंडळास RFP डॉक्युमेंटनुसार ई-निविदा काढता येईल. तथापि, या RFP डॉक्युमेंटवर आय.टी विभागाचे अभिप्राय घेऊन त्यांचे परिक्षणानंतर ई-निविदा प्रसिध्द करणे योग्य राहील, असे ते म्हणाले.

RFP डॉक्युमेंटबाबत सविस्तर चर्चा होऊन या RFP डॉक्युमेंटवर आय.टी विभागाचे अभिप्राय घेऊन माहिती व तंत्रज्ञान विभागाने सूचविलेल्या बदलासह ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले. तसेच RFP डॉक्युमेंटवर माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर RFP च्या अटी व शर्तीमध्ये आवश्यक बदल करण्याचे संपूर्ण अधिकार मा. अध्यक्ष व मा. कामगार आयुक्त यांना आहेत, असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ४): इतर राज्यांच्या कल्याणकारी योजनांचा आढावा घेऊन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांच्या लाभाच्या रक्कमेबाबत निर्णय घेणे.

सचिव यांनी याबाबत मागील बैठकीत सुचित केल्यानुसार इतर राज्यांच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेबाबत तुलनात्मक तक्ता मंडळासमोर सादर केला. सदर तक्त्याचे अवलोकन करुन आपल्या मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेत वाढ करण्यात यावी असे मा.अध्याक्षांनी सर्व उपस्थितांना सांगीतले. याबाबत सविस्तर चर्चा होउन महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभाच्या रकमेत खालीलप्रमाणे वाढ करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

अ.क्र.	प्रचलित योजना	सुधारित योजना
१.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१०,०००/ (रु. दहा हजार फक्त) व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस नैसर्गिक प्रसुतीसाठी रु. १५,०००/- (रु. पंधरा **हजार फक्त)** व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. **२०,०००/- (रु. वीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य.
२.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रति शैक्षणिक	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रति

	वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणा-या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु. १२००/- (रु. एक हजार दोनशे फक्त) किंवा इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु. २४००/- (दोन हजार चारशे फक्त) एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.	शैक्षणिक वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणा-या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी **रु. २४००/- (रु. दोन हजार चारशे फक्त)** किंवा इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी **रु. ४८००/- (चार हजार आठशे फक्त)** एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.
३.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५० किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु. ५०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५० किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास **रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त)** एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य.
४.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. ५०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढे शैक्षणिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी **रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त)** एवढे शैक्षणिक सहाय्य.
५.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु. १५,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी **रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त)** एवढे शैक्षणिक सहाय्य.
६.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. ३५०००/- (रु. पस्तीस हजार फक्त) एवढे शैक्षणिक अर्थसहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी **रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार फक्त)** एवढे शैक्षणिक अर्थसहाय्य.
७.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनास पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रतिवर्षी रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना, शासनास पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रतिवर्षी **रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य.
८.	एका मुलीच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारच्या त्याच्या पती/पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रु. २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) मुदत बंद ठेव.	एका मुलीच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारच्या त्याच्या पती/पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत **रु. १,००,०००/- (रु. एक लाख फक्त)** मुदत बंद ठेव.
९.	नोंदित लाभार्थी कामगारास ७५ किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु. १,००,०००/- (रु. एक लाख रुपये) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगारास ७५ किंवा काय... अपंगत्व आल्यास त्यास **रु. २,००,०००/-... लाख रूपये)** एवढे आर्थिक सहाय्य
१०.	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत

	नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. ५,०००/- (रु. पाच हजार फक्त) एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत.	नामनिर्देशित केलेल्या वारसास **रु. १०,०००/- (रू. दहा हजार फक्त)** एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत.
११.	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्रीकामगाराचे विधुर पतीस प्रतिवर्षी रु. १२,०००/- (रु. बारा हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्रीकामगाराचे विधुर पतीस प्रतिवर्षी **रु. २४,०००/- (रू. चौवीस हजार फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. (पाच वर्षापर्यंत)
१२.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. २,००,०००/- (रु. दोन लाख) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास **रु. ५,००,०००/- (रू. पाच लाख फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य.
१३.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ रुपये २५,०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) एवढे आर्थिक सहाय्य.	नोंदित लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदित पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ **रु. १,००,०००/- (रु. एक लाख फक्त)** एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त एकदा)
१४.	संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती.	संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदित लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती.
१५.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) अनुदान.	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी **रु. ५०,०००/- (रू. पन्नास हजार फक्त)** अनुदान.

विषय क्र. ५) : आयत्यावेळचे विषय.

१)मंडळाच्या उपकराच्या गुंतवणुकीबाबत –

याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी मंडळांतर्गत जमा उपकराच्या रक्कमेच्या गुंतवणूकीचा तपशील मंडळासमोर सादर केला. गुंतवणूकीची मागील बैठक मा. अध्यक्षांनी सूचित केल्यानुसार दि. २२.१२.२०१५ रोजी पार पडल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामध्ये मंडळाकडे असलेल्या एकूण रू. ८०० रकमेपैकी रुपये ३०० कोटी इतकी रक्कम देना बँकेच्या माटुंगा शाखेत ७.५१% प्रतिवर्ष या दराने गुंतवण्यात आली असून रू. ५०० कोटी इतकी रक्कम सिंडीकेट बँकेच्या कुलाबा शाखेत ७.३१% प्रतिवर्ष या व्याजदराने एका वर्षासाठी गुंतवण्यात आली असल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. या गुंतवणूकीची नोंद मंडळाने घेतली

No. Z-20011/08/2021-BOCW
Government of India
Ministry of Labour and Employment
O/o DGLW
*****

Jaisalmer House, Mansingh Road
New Delhi, dated 22nd March, 2021

Order under Section 60 of BOCW Act, 1996

Subject : Use of Direct Benefit Transfer (DBT) for cash assistance and restriction on distribution of benefits in-kind to the registered BOCW workers by the State Building and Other Construction Workers' Welfare Board – reg.

Read : (1) Section 60 of the Building and Other Construction Workers (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 1996. (BOCW Act, 1996)

(2) O.M.No.1-11-11/145/2015-DBT-Cab.(Pt.) dated 31st March, 2016 of DBT Mission, Cabinet Secretariat, Government of India

Whereas, the BOCW Act, 1996 aims at regulating the safety, health, welfare and other conditions of service of BOCW workers through the Welfare Boards in every State/UT, which are administered by the respective State/UT:

Whereas, Section 22(1) of the said Act comprehensively stipulates the functions of the Welfare Board as under:

a. Provide immediate assistance to a beneficiary in case of an accident;
b. Make payment of pension to the beneficiaries who have completed the age of sixty years;
c. Sanction loans and advances to a beneficiary for construction of a house not exceeding such amount and on such terms and conditions as may be prescribed;
d. Pay such amount in connection with premia for Group Insurance Scheme of the beneficiaries as it may deem fit;
e. Give such financial assistance for the education of children of the beneficiaries as may be prescribed;
f. Meet such medical expenses for treatment of major ailments of a beneficiary or, such dependent, as may be prescribed;
g. Make payment of maternity benefit to the female beneficiaries; and
h. Make provision and improvement of such other welfare measures and facilities as may be prescribed.

Whereas, several instructions have been issued by Ministry of Labour & Employment to State Governments/UTs and respective BOCW Welfare Board to take steps for utilization of the cess fund on account of the above mentioned activities only.

Whereas, Ministry of Labour & Employment has issued Model Welfare Schemes in compliance of the Hon'ble Supreme Court Order dated 19.03.2018 and 04.10.2018 which inter-alia provides detailed guidelines for expenditure of the cess fund on the welfare schemes of the

BOCW workers relating to their life and disability cover, health and maternity cover, education, housing, skill development, awareness programs and pension.

Where It has come to the notice of the Ministry that some State Welfare Boards are incurring expenditure on distribution of lantern, blankets, umbrellas, household items, tool-kits, utensils and similar other articles in-kind, leading to the apprehension of misuse/ leakage of cess fund.

Therefore, keeping in view the above position, following directions are issued to the State/ UT BOCW Welfare Boards under Section 60 of the BOCW Act, 1996:-

(i) The Social security and other coverages stipulated under Section 22(1)(a) to (g) will hold precedence over any other benefit being provided to the registered workers under Section 22 (1)(h) of the Act. After meeting these priority expenses as mentioned in Section 22(1)(a) to (g) of the Act, any balance of cess fund can be utilized by BOCW Boards for giving additional benefits as per mandates given under Section 22 (1)(h) of the Act. The BOCW Boards shall submit an annual Statement to DG, Labour Welfare by 30th April on the expenditure made on items under Section 22(1)(a) to (g) and the money remaining to be spent and actually spent on Section 22(1)(h).

(ii) Any monetary assistance under the welfare schemes are to be provided through Direct Benefit Transfer (DBT) only in the beneficiary's bank account.

(iii) No benefit is to be provided in-kind except in extra-ordinary circumstances such as natural calamities, epidemics, fire, accidents caused due to occupational hazard or similar other crisis, and with prior approval of the State Government and intimation to DG Labour Welfare, Govt Of India.

2. This issues with the approval of Hon'ble Minister of State (IC) for Labour & Employment.

(Rajender Singh Kaushik)
Under Secretary to the Government of India
Tele: 011-23385241
E-mail: Kaushik.rs06@nic.in

To,

The Chief Secretary/Administrators of all States/UTs
All Principal Secretary/Secretary/Commissioner of Labour
All Secretary, BOCW State Welfare Boards

Proforma for sending Annual Report by State/UT BOCW Welfare Boards to Director General, Labour Welfare, Ministry of Labour and Employment, Government of India, 26, Jaisalmer House, Mansingh Road, New Delhi-110011 regarding Expenditure of Cess Fund.

Financial Year	Opening Balance of Cess fund as on 1st April of the Financial Year(Rs)	Cess fund spent on items under Section - 22 (1) (a) to (g)	Details of items under column (c) on which the Cess fund spent	Cess fund spent on items under Section - 22 (1) (h)	Details of items under column (e) on which the Cess fund spent	Receipts in the form of Cess Collection, interest etc. during the year	Closing Balance of Cess fund as on 31st March of the Financial Year (Rs)
(a)	(b)	(c)	(d)	(e)	(f)	(g)	(h)

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.२०.६.२०११ रोजी संपन्न झालेल्या द्वितीय बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची द्वितीय बैठक दिनांक २०.०६.२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

१.	श्री. संजय देशमुख	:-	कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई - अध्यक्ष
२.	श्री. अनिल दत्तात्रय ढवळे	:-	मालक प्रतिनिधी - सदस्य
३.	श्री. रमेश सोहनलाल सारडा	:-	मालक प्रतिनिधी - सदस्य
४.	श्री. शंकर गजानन भोईर	:-	मालक प्रतिनिधी - सदस्य
५.	श्री. संजय गोपाळ जाधव	:-	मालक प्रतिनिधी - सदस्य
६.	श्री. महेश मुद्दा	:-	मालक प्रतिनिधी - सदस्य
७.	श्री. वसंत गणपत सावंत	:-	कामगार प्रतिनिधी - सदस्य
८.	श्री. मुनवर शेख	:-	कामगार प्रतिनिधी - सदस्य
९.	श्री. राजेश फुले	:-	कामगार प्रतिनिधी - सदस्य
१०.	श्री. केदार काळे	:-	कामगार प्रतिनिधी - सदस्य
११.	श्री. प्रकाश मारोतराव देवतळे	:-	कामगार प्रतिनिधी - सदस्य

सर्वप्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली. बैठकीत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. **मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी देणे :-**
दिनांक १८.०५.२०११ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत वाचून दाखविण्यात आले. सदर इतिवृत्तांस सर्व सदस्यांनी मान्यता दिल्याने ते कायम करण्यात आले.

२. **सध्या बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात जमा असलेल्या रकमेची राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये गुंतवणूक करणेबाबत.**
मंडळाकडे सुमारे रु. १६६ कोटी चालू खात्यामध्ये जमा आहेत. हे सर्व पैसे

मंडळाच्या कार्यालयीन कामकाजासाठी रु.५० लाखाची तरतूद करण्यास व ते यासाठी वापरण्यास मंडळाने मंजूरी दिली. मंडळाचा प्रशासकीय खर्च चालविण्यासाठी योजनांवरील खर्चाच्या ५% रक्कम प्रशासकीय खर्च म्हणून अनुज्ञेय आहे. प्रत्यक्ष योजना राबविण्यास काही कालावधी लागणार असल्याने दरम्यानच्या काळात मंडळाचे कामकाज करणे सुकर व्हावे म्हणून रु.५० लाख अग्रीम स्वरुपात देण्यात यावेत असे सदस्य सचीव यानी प्रस्तावीत केले व त्यास सर्वांनी मान्यता दिली.

७. **इमारत व इतर बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्याबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेणे :-**

अपघात १. लाभार्थी कामगारास अपघात झाल्यास त्यास तात्काळ सहाय्य म्हणून रु. १०,०००/- चा धनादेश हॉस्पीटलच्या नांवाने देण्यात यावा. तसेच चोलामंडलम, आय.सी.आय.सी.आय. लोम्बार्ड, एल.आय.सी. या कंपन्यांकडून माहिती मागवून ग्रुप इन्शुरन्स काढण्याबाबत सुचविण्यात आले.

निवृत्ती वेतन २. वयाची साठ वर्षे पूर्ण झालेल्या लाभार्थी कामगारास निवृत्ती वेतन देण्याबाबतचा मुद्दा सध्या स्थगित ठेवण्यात यावा व सदर बाबीचा पुढील बैठकीमध्ये विचार करण्यात यावा.

घर बांधकाम ३. घराच्या बांधकामाकरीता कर्ज वा अग्रिम मंजूर करणेबाबतच्या मुद्दयावर असे ठरले की, की लाभार्थी कामगारांची नोंदणी झाल्यापासून ०५ वर्षानंतर कामगारास रु. २,००,०००/- पर्यंतचे कर्ज मंजूर करण्यात यावे.

४. विमा योजनेचा हप्ता अदा करण्याबाबतच्या मुद्दयावर असे ठरले की, लाभार्थी कामगारांना राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजनेंतर्गत समाविष्ठ करुन घेण्यात यावे.

मुलांच्या शिक्षणाकरिता ५. लाभार्थी मुलांच्या शिक्षणाकरिता सहाय्य करण्याविषयीच्या मुद्दयाबाबत असे ठरले की,

अ) इयत्ता पहिली ते दहावी मधील विद्यार्थ्यांची शाळेत जर ७५%

हजेरी असेल तर त्यास महिनाकाठी रु. १०/- रोख देण्यात यावेत. परंतु, सदरची सवलत ही फक्त मुलीकरीता लागू राहिल.

ब) इयत्ता बारावी नंतर एफ.वाय., एस.वाय., व टी.वाय. च्या प्रवेश व पुस्तके इ.साहीत्यासाठी रु. १५,०००/- व वैद्यकिय व तांत्रिक शिक्षणाच्या प्रवेश व पुस्तके इ.साठी रु. ३५,०००/- सहाय्य देण्यात येईल. सदरची सवलत ही दोन मुलांपुरतीच मर्यादित राहिल. तसेच सदरची रक्कम ही प्रवेशाच्यावेळी रु. २,०००/- सहा महिन्यांनतर रु. ३,०००/- व वर्षअखेर रु. ५,०००/- विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

६. मोठया आजारांच्या शुश्रुषेकरीता वैद्यकिय मदत देण्याबाबतच्या मुद्दयावर असा निर्णय झाला की, टी.बी., कॅन्सर अशा प्रकारच्या आजारांवर उपचार करण्याकरीता प्रत्येकी रु. १०,०००/- वैद्यकिय खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल. यामध्ये पुरुष कामगार असल्यास त्याचे आई-वडील, पत्नी व दोन मुले यांचा समावेश असेल. तसेच सदर मुलांचे वय वर्षे १८ खालील असावे. तसेच कामगाराचा मृत्यू झाल्यास तात्काळ सहाय्य म्हणून रु. ५,०००/- देण्यात येतील.

७. स्त्री लाभार्थी कामगारांना प्रस्तुती लाभ देण्याबाबत असे ठरले की, नॉर्मल डिलीव्हरी झाल्यास रु. ५,०००/- व सिझरींग झाल्यास रु. १०,०००/- इतक्या रकमेची मदत करण्यात येईल. तसेच सदरची सवलत फक्त दोन मुलांकरीता लागू राहिल.

८. अन्य कल्याणकारी योजनांकरिता तरतूद करणे व त्यात सुधारणा करण्याकरिता तरतूद करणयाबाबतच्या मुद्दयावर असे ठरले की, लाभार्थी कामगारांच्या मुलांकरीता वसतीगृह बांधण्यात यावे. त्याकरीता जागा विकत घेऊन १०० मुलांकरीता एक अशा प्रकारे वसतीगृह बांधण्यात यावे. तसेच याबाबत परिपूर्ण अभ्यास करुन पुढील बैठकीमध्ये या विषयावर चर्चा करण्यात यावी.

मा. अध्यक्षांच्या संमतीने आयत्यावेळचे विषय :-

८.

कामगार आयुक्त
महाराष्ट्र शासन, मुंबई.
(वसाना व कार्यालयीन शाखा)
अतितात्काळ
3 MAR 2021
आवक क्रमांक ३८४
कार्यासन क्रमांक BOC

महाराष्ट्र शासन

क्र.इबांका-२०१६/प्र.क्र. ८२/काम-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०१ मार्च, २०२१.

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
आवक क्र. 1089
दि. 15 MAR 2021
आवक लिपिक स्वाक्षरी

विषय :- बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन अपत्याच्या शिक्षणाकरीता अर्थसहाय्य देणे, पदव्युत्तर शिक्षणासाठी अर्थसहाय्य व गंभीर आजारामध्ये सर्व कर्करोगाचा समावेश करणेस मान्यता देणेबाबत.

संदर्भ :- १. शासनाचे समक्रमांक दिनांक १६.०६.२०१६ रोजीचे पत्र.
२.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. इवइबांकाकमं/५२ बैठक-विषय क्र.०३/१५६/मे/२०१९, दिनांक २७.०९.२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांने दिनांक ०४.०९.२०१९ रोजीच्या ५३ व्या बैठकीत नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यास पदव्युत्तर पदवी या पाठयक्रमाचा समावेश करण्यास आणि त्यासाठी प्रतिवर्षी रु. २५,०००/- अर्थसहाय्य देण्याच्या ठरावास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांने मंजूर केलेल्या सर्व शैक्षणिक अर्थसहाय्य योजनेचा लाभ पहिल्या दोन पाल्यांस देण्याच्या ठरावास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

आपला,

(श. मा. साठे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :
कामगार आयुक्त यांना माहितीस्तव अग्रेषित.

C:\Labs Correspondance\BOCW\CR\CR.८२.२०१६ [illegible]

महाराष्ट्र शासन

क्रमांक: इबांका-२०१६/१६८/प्र.क्र.८२/काम-७
उद्योग उर्जा व कामगार विभाग,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ जून, २०१६.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१.

विषय: इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांच्या लाभाच्या रकमेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ: (१) सहायक कामगार अधिकारी तथा सचिव महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.मइवइबाकमं/ठराव-चर्चा/२०१५/३७०, दिनांक ४.२.२०१६.

(२)कामगार आयुक्त यांचे पत्र क्र.का.आ./मइवइबांकम्र/२०१६/११८४, दिनांक २७.५.२०१६.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १८.१.२०१६ रोजीच्या बैठकीत, मंडळाच्या अस्तित्वात असलेल्या योजनांच्या लाभाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबतचा ठराव संमत करण्यात आला होता. त्यानुसार मंडळाच्या विविध योजनांच्या लाभाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत मंडळाने शासन मान्यतेकरिता पाठविलेल्या प्रस्तावास अनुसरुन मंडळाकडील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांकरिता असलेल्या खालील योजना सुधारित स्वरुपात राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास तसेच नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारांच्या पत्नीस दोन जिवित अपत्यांपर्यंत नैसर्गीक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु.२०,०००/- आर्थिक सहाय्य.

२) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या प्रती शैक्षणीक वर्षी शाळेतील किमान ७५% किंवा अधिक उपस्थिती असणाऱ्या दोन पाल्यांस इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु.५०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.

३) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता १० वी व इयत्ता १२ मध्ये किमान ५० टक्के किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु.१०,०००/- एवढे प्रोत्साहनात्मक शैक्षणिक सहाय्य.

४) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.१०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.

५) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.२०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.

६) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी, पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी इत्यादीसाठी- प्रती शैक्षणीक वर्षी वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरिता रु.१,००,०००/- व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरिता रु.६०,०००/- इतके शैक्षणिक अर्थसहाय्य.

७) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना पदविका शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रु.२०,०००/- आणि पदव्युत्तर पदवीका मध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यास प्रती शैक्षणिक वर्षी रु.२५,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

८) एका मुलीच्या जन्मानंतर नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराच्या पती/ पत्नीने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास एका मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रु.१,००,०००/- मुदत बंद ठेव.

९) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारास ७५ टक्के किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु.२,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. तथापि, नोंदीत बांधकाम कामगाराचे विमा संरक्षण असल्यास, विमा रक्कमेची प्रतिपुर्ती अथवा रु.२,००,००० आर्थिक सहाय्य यापैकी कोणताही एकच लाभ अनुज्ञेय राहील.

१०) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु.१०,०००/- एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत.

११) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगारांच्या विधुर पतीस प्रतिवर्षी रु.२४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य (पाच वर्षापर्यंत) .

१२) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

१३) नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग / आजाराच्या उपचारार्थ रुपये १,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य **(एका सदस्यास केवळ एकदाच आणि कुटुंबातील दोन सदस्यांपर्यंत मर्यादित)**. तथापि, आरोग्य विमा योजना लागू नसल्यासच सदर योजनेचा लाभ देण्यात यावा.

१४) संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची प्रतिपूर्ती. तथापि, MS-CIT उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास सदर शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी.

१५) नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु.३०,०००/- अनुदान.

२. सदर योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याकरिता मंडळाने विशिष्ट कार्यप्रणाली निश्चित करुन व संगणक नोंद प्रक्रियेचा अवलंब करुन योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणीकरावी. तसेच अद्ययावत अभिलेख ठेवावेत. त्याचप्रमाणे सदरहू योजनांच्या अंमलबजावणीचा त्रैमासिक अहवाल शासनास स्वतंत्रपणे/नियममितपणे सादर करावा.

आपला,

(प्रशांत पु. राठोड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

(१) सहायक कामगार आयुक्त तथा सचिव इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

(२) निवडनस्ती (कामगार-७)

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ.

विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ११.१०.२०११ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

दिनांक ११.१०.२०११ रोजी दुपारी १०.०० वाजता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१. श्री. संजय देशमुख :- कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. श्री. आर.व्ही. कुळकर्णी :- कामगार उप आयुक्त तथा मुख्याधिकारी, मुंबई.
३. श्री. एस.आर. कदम :- सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई.
४. श्री. अनिल दत्तात्रय ढवळे :- मालक प्रतिनिधी
५. श्री. शंकर गजानन भोईर :- मालक प्रतिनिधी
६. श्री. संजय गोपाळ जाधव :- मालक प्रतिनिधी
७. श्री. राजेश फुले :- कामगार प्रतिनिधी
८. श्री. मुन्वर शेख :- कामगार प्रतिनिधी
९. श्री. वसंत गणपत सावंत : कामगार प्रतिनिधी
१०. श्री. प्रकाश देवतळे :- कामगार प्रतिनिधी

सर्वप्रथम सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली.

१. **मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे :-**

प्रथमतः श्री. कुलकर्णी, कामगार उप आयुक्त यांनी दिनांक १०.०८.२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून दाखविले. त्यात श्री. फुले यांनी असे नमूद केले की, मागील इतिवृत्ताच्या मुद्दा क्र. ४ (१) मध्ये लाभार्थी कामगार हा किमान एक वर्षे मंडळाचा नोंदणीकृत सभासद असेल तरच त्याला सदर योजनेचा लाभ देता येईल, असा उल्लेख केला आहे. त्यावर श्री. फुले, सदस्य यांनी सदरचा कालावधी ०६ महिने असावा अशी चर्चा होऊन निश्चित केल्यावरही एक वर्ष नमूद केले आहे, असे निदर्शनास आणले. त्यावर याची नोंद घेऊन ०६ महिने अशी दुरुस्ती करण्यात येईल, असे अध्यक्ष यांनी सांगितले . त्यास सर्व सदस्यांनी सहमती दिली.

अनुषंगिक खर्च देण्याबाबत सविस्तर निगमाची कार्यिण्यात यावी

सूचक - श्री राजेश फुले, सदस्य

अनुमोदक - श्री संजय गोपाळ जाधव, सदस्य

ठराव सर्वानुमते मंजूर

८. रोख बक्षिस :- ज्या कामगारांच्या पाल्यांना इयत्ता १०वी अथवा १२ वी मध्ये ७५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत, अशा पाल्यांना एकरकमी रु. ५,०००/- प्रोत्साहन निधी म्हणून देण्यात यावेत.

ठराव क्र. ०९ :- ठराव करण्यात येतो की, इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ७५% गुणांच्या वर गुण प्राप्त करणाऱ्या बांधकाम कामगाराच्या पाल्यास रु. ५०००/- प्रोत्साहन निधी देण्यात यावा.

सूचक :- श्री. शंकर गजानन भोईर, सदस्य

अनुमोदक :- श्री. राजेश फुले, सदस्य

ठराव सर्वानुमते मंजूर.

९. **व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परिक्षेकरीता शिकवणीसाठी आर्थिक सहाय्य** :- ज्या कामगारांच्या पाल्यांना इयत्ता १२वी नंतर वैद्यकिय अथवा तांत्रिक शिक्षणासाठी प्रवेश प्राप्त झाला असेल अशा पाल्यांना त्यांच्या शिक्षणाच्या कालावधीमध्ये दरवर्षी रु. ५,०००/- पर्यंत विशेष आर्थिक सहाय्य देण्यात यावे. ही सवलत देत असताना संबंधित विद्यार्थ्यास १२वी मध्ये किमान ५०% गुण असले पाहिजेत. या योजनेचे इतर निकष पुढील बैठकीत सादर करण्यात यावे, असे श्री. अनिल दत्तात्रय ढवळे यांनी सुचविले.

ठराव क्र. १० :- ठराव करण्यात येतो की, इयत्ता १२ वी नंतर वैद्यकीय अथवा तांत्रिक शिक्षणासाठी प्रवेश प्राप्त झाला असल्यास बांधकाम कामगाराच्या पाल्यांना दरवर्षी रु.५०००/- विशेष आर्थिक मदत देण्यात यावे. अशा विद्यार्थ्यास इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% गुण असणे आवश्यक आहे.

सूचक :- श्री. अनिल दत्तात्रय ढवळे

अनुमोदक :- श्री. प्रकाश देवतळे

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ.

विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ११.१०.२०११ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

दिनांक ११.१०.२०११ रोजी दुपारी १०.०० वाजता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

१. श्री. संजय देशमुख :- कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. श्री. आर.व्ही. कुळकर्णी :- कामगार उप आयुक्त तथा मुख्याधिकारी, मुंबई.
३. श्री. एस.आर. कदम :- सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई.
४. श्री. अनिल दत्तात्रय ढवळे :- मालक प्रतिनिधी
५. श्री. शंकर गजानन भोईर :- मालक प्रतिनिधी
६. श्री. संजय गोपाळ जाधव :- मालक प्रतिनिधी
७. श्री. राजेश फुले :- कामगार प्रतिनिधी
८. श्री. मुन्वर शेख :- कामगार प्रतिनिधी
९. श्री. वसंत गणपत सावंत : कामगार प्रतिनिधी
१०. श्री. प्रकाश देवतळे :- कामगार प्रतिनिधी

सर्वप्रथम सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात करण्यात आली.

१. **मागील बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देणे :-**

प्रथमतः श्री. कुलकर्णी, कामगार उप आयुक्त यांनी दिनांक १०.०८.२०११ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून दाखविले. त्यात श्री. फुले यांनी असे नमूद केले की, मागील इतिवृत्ताच्या मुद्दा क्र. ४ (१) मध्ये लाभार्थी कामगार हा किमान एक वर्षे मंडळाचा नोंदणीकृत सभासद असेल तरच त्याला सदर योजनेचा लाभ देता येईल, असा उल्लेख केला आहे. त्यावर श्री. फुले, सदस्य यांनी सदरचा कालावधी ०६ महिने असावा अशी चर्चा होऊन निश्चित केल्यावरही एक वर्ष नमूद केले आहे, असे निदर्शनास आणले. त्यावर याची नोंद घेऊन ०६ महिने अशी दुरुस्ती करण्यात येईल, असे अध्यक्ष यांनी सांगितले . त्यास सर्व सदस्यांनी सहमती दिली.

ठराव क्र. ०६ :- ठराव करण्यात येतो की, बांधकाम कामगाराचा अपघाती किंवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियांना (पती/पत्नी) यास रु. १०००/- मासिक सहाय्य सांत्वन निधी मृत्यू दिनांकापासून ५ वर्षे देण्यात यावा.

सूचक :- श्री. अनिल दत्तात्रय ढवळे, सदस्य

अनुमोदक :- श्री. मुन्चर शेख, सदस्य

ठराव सर्वानुमते मंजूर.

६. **कायमचे अपंगत्व आल्यास आर्थिक सहाय्य** :- एखाद्या कामगारास तो बांधकामावर असताना किंवा नसताना अपघात किंवा इतर कारणामुळे कायमचे अपंगत्व आल्यास व ते ७५% पेक्षा जास्त असल्यास त्यास रु. १,००,०००/- निधी देण्यात यावा. कामगार बांधकामाच्या कामावर असताना अपघात होऊन कायमचे अपंगत्व आले तर Workmen Compensation Act अन्वये नुकसान भरपाई मिळण्याची तरतूद आहे, असे असले तरीही हा निधी त्यांना देण्यात यावा, असे श्री. शंकर गजानन भोईर यांनी सुचविले व त्यास सर्वांनी दुजोरा दिला.

ठराव क्र. ०७ :- ठराव करण्यात येतो की, नोंदीत लाभार्थीस बांधकामावर असताना किंवा नसताना अथवा इतर कारणाने कायमचे अपंगत्व आल्यास व ते अपंगत्व ७५% पेक्षा जास्त असल्यास त्यास रु.१,००,०००/- निधी देण्यात यावा.

सूचक :- श्री. प्रकाश देवतळे, सदस्य

अनुमोदक :- श्री. संजय गोपाळ जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर.

७. **असाध्य रोगांकरीता सहाय्य** :- एखाद्या कामगारास असाध्य रोग अथवा तातडीचा आजार उद्भवल्यास सदरहू आजारांसाठी कामगारास विमा योजनेच्या माध्यमातून लाभ मिळत असला तरीही त्याच्या कुटुंबियांना त्याच्या उपचारासाठी इस्पितळात राहण्यासाठीचा अनुषंगिक खर्च इत्यादी रकमेची आवश्यकता भासते. तथापि, यासंबंधी सविस्तर नियम तयार करण्यात येऊन ते पुढील सभेत सादर करण्यात यावेत.

ठराव क्र. ०८ :- ठराव करण्यात येतो की, बांधकाम कामगारास असाध्य रोग अथवा तातडीचा आजार उद्भवल्यास उपचारासाठी दवाखान्यात भरती होण्यासाठी येणारा

ठराव सर्वानुमते मंजूर.

१०. **प्रसुती लाभ** :- महिला कामगारांना अथव पुरुष कामगाराच्या पत्नीला प्रसुतीसाठी निधी देण्यात यावा, जेणेकरुन सदरहू प्रसुती ही योग्य सोई-सुविधा उपलब्ध असलेल्या हॉस्पीटलमध्ये करता येईल व मातेच्या जीवितास धोका रहाणार नाही, म्हणून असे लाभ देणे आवश्यक आहे, असे म्हणणे श्री. शंकर गजानन भोईर यांनी मांडले. त्यावर श्री. राजेश फुले यांनी नैसर्गिक प्रसुतीकरीता रु. ५,०००/- व शस्त्रक्रिया केल्यास रु. १०,०००/- आर्थिक सहाय्य देण्यात यावे व हे जास्तीत जास्त दोन प्रसुतीच्यावेळी देय ठरतील असे सुचविले. त्यास सर्वांनी सहमती दर्शविली.

बांधकाम कामगाराने एका मुलीनंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास संबंधित मुलीच्या नावे रु. २५,०००/- विशेष सहाय्य देण्यात यावे व ते १८ वर्षांच्या मुदतीकरीता राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये गुंतविण्यात यावेत. तसेच सदरहू मुलगी सज्ञान झाल्यावर तिला व्याजासह ही रक्कम देण्यात यावी.

ठराव क्र. ११ :- ठराव करण्यात येतो की, बांधकाम कामगार महिला अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीला प्रसुतीकरिता रु. ५०००/- व शस्त्रक्रिया झाल्यास रु. १०,०००/- आर्थिक सहाय्य देणे व एका मुलीवर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास अशा मुलीच्या नावे रु. २५,०००/- त्या मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत मुदत ठेव ठेवण्यात यावी.

सूचक :- श्री. राजेश फुले, सदस्य

अनुमोदक :- श्री. अनिल दत्तात्रय ढवळे, सदस्य

ठराव सर्वानुमते मंजूर.

खालील मुद्दयांवर पुढील बैठकीत चर्चा करण्याचे ठरले.

११. गृहकर्जे

१२. पेन्शन योजना

१३. अंत्यविधी सहाय्य

१४. अपघाती मृत्यूकरीता भरपाई

१५. कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणाकरीता आर्थिक सहाय्य

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
कार्यासन 30.

इतिवृत्तांत:-

विषय- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक 22 ऑगस्ट, 2012 रोजी संपन्न झालेल्या 12 व्या बैठकीचे इतिवृत्तांत.

दिनांक 22 ऑगस्ट, 2012 रोजी दुपारी 2.00 वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची 12 वी बैठक कामगार आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह येथे पार पडली. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1	श्री मधुकर बी गायकवाड	:	मा.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई तथा अध्यक्ष
2	श्री. सी.बी.पाटील	:	सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
3	श्री. अनिल दत्तात्रय ढवळे		मालक प्रतिनिधी
4	श्री. रमेश सो. सारडा		मालक प्रतिनिधी
5	श्री. केदार काळे		मालक प्रतिनिधी
6	श्री प्रकाश देवतळे	:	मालक प्रतिनिधी
7	श्री वसंत गणपत सावंत	:	कामगार प्रतिनिधी
8	श्री मुनवर शेख	:	कामगार प्रतिनिधी
9	श्री राजेश फुले	:	कामगार प्रतिनिधी
10	श्री दादाराव डोंगरे	:	कामगार प्रतिनिधी
11	श्रीमती राधिका गायकवाड	:	कामगार प्रतिनिधी
12	श्री र. वि. कुलकर्णी		कामगार उप आयुक्त तथा सचिव
13	श्री सु.मा. कदम		सहायक कामगार आयुक्त, मुंबई

सर्व प्रथम अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीस सुरूवात केली.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष तसेच कामगार प्रतिनिधी श्री फुले, डोंगरे व श्री शेख तसेच मालक प्रतिनिधी श्री सारडा, ढवळे व श्री मुद्दा हे अभ्यास गटात राहतील

जिल्ह्याच्या ठिकाणी 400, कोकण विभागात 500 व मुंबईमध्ये 1000 घरे बांधण्यात यावीत. असे सूचविले गेले. मा. अध्यक्षांनी कामगाराचे महाराष्टातील वास्तव्य 15 वर्ष असावे, तो नोंदीत कामगार असावा व नोंदणी चालू असावी व त्याचे वय 18 ते 60 पर्यंत असावे, असे निकष सूचविले. सदर योजना दोन महिन्यात चालू जावे असे श्री. फुले यांनी सूचविले. उपरोक्त उल्लेखित गटाची बैठक लवकरच घेतली जावून त्यात निकष व कार्यपध्दती बाबत प्रस्ताव केला जाईल, असे ठरले.

ठराव– नोंदीत बांधकाम कामगारांसाठी घरकुल योजना राबविली जाण्याचे एकमताने ठरले.

विषय कमांक 4 बांधकाम कामगारांच्या अपघातीपोटी रू 2 लाखाचे अर्थसहाय मंजूर करणे.

वरील बाबत सांगोपांग चर्चा झाली. सदरील मदत नैसर्गिक मृत्यूपोटीही देण्याचे श्री सावंत यांनी सूचविले. यावर श्री ढवळे यांनी केवळ अपघाती मृत्यू झाल्यास ही मदत देण्यात यावी, असे सूचविले. जे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

ठराव– नोंदीत बांधकाम कामगारांच्या अपघाती मृत्यूपोटी पती अथवा पत्नी अथवा कायदेशीर वारसास रू 2 लाखाचे अर्थ सहाय देण्याचे एकमताने ठरावाद्वारे मंजूर करण्यात आले.

विषय कमांक 5– बांधकाम कामगारांचे नोंदणी अभियान राबविण्यासाठी विभागीय कार्यालयांना प्रत्येकी रू 5 लाख देणे व त्यासाठी विभागीय कार्यालयांना राष्टीयकृत बँकेत खाते उघडयाचे परवानगी देणे.

सदरील बाबत चर्चा होवून विभागीय कार्यालयांना प्रत्येकी रू 3 लाखा ऐवजी रू 5 लाख देण्याचे ठरले. ही रक्कम खालील प्रमाणे खर्च केले जावी

अ. कामगार मेळावे व जाणीव जागृती मोहिम.

ब. लहान प्रमाणातील जाहिराती, उदा. पत्रके, लिफलेट इत्यादी.

क. दूरवरच्या कामावरील क्षेत्रिय भेटी.

महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय :- महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०८.०७.२०१३ रोजी सकाळी ११.४५ वाजता संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

दिनांक ०८.०७.२०१३ रोजी सकाळी ११.४५ वाजता मा. कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपिस्थत होते.

१.	श्री मधुकर गायकवाड	:	मा. कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष
२.	श्री बाळासाहेब कोळसे, सहसचिव (कामगार विभाग, मंत्रालय),मुंबई	:	शासकीय सदस्य
३.	श्री शि. म. म्हात्रे, सहसचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई	:	शासकीय सदस्य
४.	श्रीमती सरोज देशपांडे, कल्याण आयुक्त, नागपूर	:	शासकीय सदस्य
५.	श्री रमेश सारडा	:	मालक प्रतिनिधी सदस्य
६.	श्री अनिल दत्तात्रय ढवळे	:	मालक प्रतिनिधी सदस्य
७.	श्री महेश मुद्दा	:	मालक प्रतिनिधी सदस्य
८.	श्री प्रकश देवतळे	:	मालक प्रतिनिधी सदस्य
९.	श्री केदार काळे	:	मालक प्रतिनिधी सदस्य
१०.	श्री वसंत गणपत सावंत	:	कामगार प्रतिनिधी सदस्य
११.	श्री मुनवर शेख	:	कामगार प्रतिनिधी सदस्य
११.	श्री राजेश फुले	:	कामगार प्रतिनिधी सदस्य
१२.	श्री.दादाराव डोंगरे	:	कामगार प्रतिनिधी सदस्य
१३.	श्रीमती राधिका गायकवाड	:	कामगार प्रतिनिधी सदस्य
१४.	श्री व्हि. के. बुवा, कामगार उप आयुक्त, मुंबई	:	सचिव

सन्माननीय सदस्य श्री.फुले यांनी मोफत शिलाई मशिन देणे योजनेसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे व अर्जासमवेत जोडावयाची कागदपत्रे सूचित केले. मोफत योजनासाठी लाभार्थीकरीता चेकलिस्ट तयार करुन सर्व कामगारांना कळविण्यात येईल. श्री.फुले यांनी सूचित केल्याप्रमाणे नोंदित बांधकाम कामगारांच्या पहीली ते दहावीत शिकत असलेल्या मुलींसाठी रु.६०० रुपये प्रतिवर्षी ही शिष्यवृत्ती योजना त्यांच्या मुलांसाठी देखील लागु करावी, ही बाब सर्वानुमते मान्य झाली.

तसेच श्री.फुले यांनी तांत्रिक शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती देण्यात यावी.. असे सांगीतले.

विषय क्र.४:- नवीन प्रस्तावित योजनांना मान्यता देणे बाबत.

मा.अध्यक्षांनी खालील विषय मंडळ सदस्यांच्या निदर्शनास आणुन दिले.

ठराव :- १) सर्व प्रकारच्या पदविका व पदवीव्युत्तर पदविका यांनाही वार्षिक २००० रुपये स्कॉलरशिप देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

ठराव :- २) मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे सुचनेवरुन खालील दोन योजना मंजूर केल्या

A) इंग्रजी शिक्षणासाठी रु.२०००/- प्रती पाल्य २ मुलांकरीता मर्यादित प्रशिक्षण पावत्या सादर केल्यास देण्यात येईल.

B) कामगारांच्या मुलांना (जास्तीत जास्त दोन) संगणकात प्राविण्य मिळविण्यासाठी एमएससीआयटी परीक्षेसाठी अर्थसहाय्य देणे

ठराव :- ३) नैसर्गिक प्रसुती झालेल्या बांधकाम कामगारांच्या पत्नीस रु.१०,०००/- देण्यात येईल. सिझेरिअन प्रसुती झालेल्या बांधकाम कामगारांच्या पत्नीस रु.१५,०००/- देण्यात येईल.

ठराव :- ४) नोंदीत बांधकाम कामगारांच्या इयत्ता ११ वीतील मुलांकरीता रु.२०००/- शिष्यवृत्ती देण्यात येईल. नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलींसाठी विहीत केलेली रु.६००/- ही योजना मुलांसाठीही लागु करण्याचे सुचविले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे यात वृध्दी करुन इयत्ता पहीली ते सातवी साठी १२०० रुपये व इयत्ता आठवी ते दहावीसाठी २४०० रुपये प्रतिवर्षी अशी सुधारणा सर्वानुमते केली.

ठराव :- ५) सध्याच्या योजनेनुसार कुंटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास नोंदीत कामगारांच्या एकुलत्या एक मुलीच्या नांवे रु.२५०००/-.ज्या मुलीच्या वय १८ वर्षे पुर्ण होईपर्यंत ठेवण्यात येत होती. ती आता दोन मुलींच्या नांवे प्रत्येकी रु.२५,०००/- मुदत ठेव त्यांच्या वयाची १८ वर्षे पुर्ण

योजना क्र.५: नोंदीत लाभार्थी कामगारांच्या २ पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु.१५०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.(या योजनेचा लाभ फक्त चालू शैक्षणिक वर्षासाठी देण्यात येईल.)

योजना क्र.६: नोंदीत लाभार्थी कामगारांच्या २ पाल्यांना अथवा पुरुष कामगाराच्या पत्नीस शासनमान्य वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात किंवा संस्थेत प्रवेशासाठी पुस्तके व शैक्षणिक साहित्यखरेदी इत्यादीसाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु.५०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.(या योजनेचा लाभ फक्त चालू शैक्षणिक वर्षासाठी देण्यात येईल.)

योजना क्र.७: नोंदीत लाभार्थी कामगारांच्या २ पाल्यांना, शासनमान्य पदविकेमध्ये आणि पदव्युत्तर पदविकेमध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यांस प्रतिवर्षी रु.१०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.

योजना क्र.८: दोन मुलींच्या जन्मानंतर नोंदित लाभार्थी बांधकाम कामगार अथवा नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या पती किंवा पत्नी यांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रीया केल्यास दोन मुलींच्या नांवे १८ वर्षापर्यन्त रु. २५,०००/- मुदत बंद ठेव.

योजना क्र.९: नोंदित लाभार्थी कामगारास ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु. १,००,०००/- (रु. एक लाख) एवढे आर्थिक सहाय्य. (मेडिक्लेम योजनेत अंतर्भूत नसल्यास)

योजना क्र.१०: नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु.५,०००/- एवढी रक्कम अत्यंविधीसाठी मदत.

योजना क्र.११: नोंदीत लाभार्थी कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा स्त्री कामगाराचे विधुर पतीस प्रतीवर्षी रु.१२,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. (फक्त पाच वर्षासाठी)

योजना क्र.१२: नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रुपये २,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. (मेडिक्लेम योजनेत अंतर्भूत नसल्यास)

योजना क्र.१३: नोंदीत लाभार्थी स्त्री बांधकाम कामगारास व नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगारास तसेच कुटुंबातील सदस्यांस गंभीर रोग व गंभीर आजाराच्या उपचारार्थ रुपये २५,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य. (मेडिक्लेम योजनेत अंतर्भूत नसल्यास)

योजना क्र.१४: संगणक शिक्षण (फक्त MS-CIT course) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती.

योजना क्र.१५: नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारांच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. १०,०००/- अनुदान.

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

दिनांक ०२.११.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगा कल्याणकारी मंडळाची बैठक कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा (पूर्व), मुंबई ये आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. श्री.ओमप्रकाश यादव	:	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२.	मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई	:	शासकीय प्रतिनिधी
३.	मा.सहसचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई	:	शासकीय प्रतिनिधी
४.	मा.संचालक, (लेखा व कोषागारे), महाराष्ट्र राज्य, मुंबई	:	शासकीय प्रतिनिधी
५.	श्रीम.वेदा धवल आगटे	:	मालक प्रतिनिधी
६.	श्री.सतीश मगर	:	मालक प्रतिनिधी
७.	श्री.अशोक गोविंदराव भुताड	:	कामगार प्रतिनिधी
८.	श्री.श्रीपाद कुटासकर	:	कामगार प्रतिनिधी
९.	श्री.विजय देवरुखकर	:	कामगार प्रतिनिधी

बैठकीच्या सुरुवातीस श्रीम. निलांबरी भोसले, सहायक कामगार आयुक्त तथा सचिव या वैद्यकीय रजेवर असल्यामुळे प्रभारी सचिव श्री. चं.अं. राऊत, सहायक कामगार आयुक्त यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा.अध्यक्ष, शासन प्रतिनिधी,

अध्यक्ष यांनी असे प्रतिपादन केले की, असे केल्यास मंडळांतर्गत योजनांवरील खर्च आधीच कमी आहे. तो पुन्हा कमी होईल. केंद्र शासनाने ५०% पर्यंत मर्यादा ठेवली आहे. तथापि, आपण १००% पर्यंत रक्कम अदा करू शकतो त्यामुळे सदर योजना लागू करण्यासाठी मंडळाकडून १०० % अनुदान देण्यात यावे व ज्यावेळी कामगारांची नोंदणी वाढेल त्यावेळी यावाबतीत फेरविचार करण्यात येईल. यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली. मा.अध्यक्षांनीही याला मान्यता दिली. त्यानुसार मंडळांतर्गत योजना राबविताना कामगारांचे आर्थिक योगदान न घेता संपूर्ण १०० % योगदान मंडळाने करावे. असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषयक क्र. ३) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना लागू करणेबाबत.

विषय क्र. ४) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना लागू करणेबाबत.

याबाबत मा. कामगार आयुक्त यांनी प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना या दोन्ही योजनांची थोडक्यात खालीलप्रमाणे माहिती दिली.

१. **प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना** - याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी सांगितले की, या योजनेकरिता वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे असून लाभार्थींचे बँकेत खाते असावे. रु.३३०/- प्रिमियम भरावा लागेल. लाभार्थिचा कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास रु.२ लाखाचे विमा संरक्षण या योजने अंतर्गत देण्यात येईल. यावर श्री.कुटासकर यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, मंडळाची देखिल रु.२ लाख मृत्यूलाभाची योजना आहे. तेव्हा या दोनपैकी एकाचं योजनेचा लाभ अर्जदारास मिळेल काय ? यावर मा.कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळामध्ये नोंदीत लाभार्थिंना या योजनेचा तसेच मंडळाच्या देखील योजनेचा लाभ घेता येईल.

२. **प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना** – याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी सांगितले की वयोमर्यादा १८ ते ७० वर्षे असून सहभागी बँकांमधील बचत खाते धारक लाभार्थिर

रु.१२/- एवढा प्रिमियम भरावा लागतो. या योजने अंतर्गत लाभार्थ्याला खालीलप्रमाणे लाभ देय असतील.

फायदे :- १. अपघाती मृत्यू झाल्यास रु.२ लाखाचे संरक्षण

२. दोन्ही डोळे अथवा दोन्ही पाय अथवा दोन्ही हात पूर्णपणे गमावल्यास अथवा एक डोळा व एक हात अथवा एक डोळा व एक पाय पूर्णपणे गमावल्यास रु.२ लाखाचे विमा संरक्षण.

३. एक डोळा अथवा एक हात अथवा एक पाय पूर्णपणे गमावल्यास रु.१ लाखाचे विमा संरक्षण.

मा. कामगार आयुक्त यांनी असे सांगितले की, मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, श्री.परदेशी साहेब यांच्याशी चर्चा झाली असता, त्यांनी या दोन्ही योजना कामगारांसाठी लाभदायी आहेत. या दोन्ही योजनांचा प्रिमियम कमीत कमी आहे. त्यामुळे या योजना तात्काळ लागू कराव्यात, असे सूचित केले आहे. त्यानुसार कामगारांची नोंदणी ज्याप्रमाणे होईल, त्यानुसार या योजनेचा लाभ त्या लाभार्थी कामगारांना देण्यात येईल. याबाबत सद्यस्थितीमध्ये नोंदित बांधकाम कामगार संख्या ४,२३,००० एवढी असून त्याचा खर्च खालीलप्रमाणे आहे.

३३० X ४,२३,००० =१३,९५,९०,०००/-

१२ X ४,२३,००० = ५०,७६,०००/-

एकूण रू. १४,४६,६६,०००/-

(रू. चौदा कोटी सेहचाळीस लाख सहासष्ट हजार फक्त)

वरीलप्रमाणे दोन्ही योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र. ५) मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना कौशल्यवृध्दी योजना लागू करण्याबाबत विचारविनिमय करणे.

महाराष्ट्र शासन

क्रमांक: इबांका-२०१६/०६/प्र.क्र.४/काम-७
उद्योग उर्जा व कामगार विभाग,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ जुलै, २०१६.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१.

विषय: इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना लागू करण्याबाबत.

संदर्भ: कामगार आयुक्त तथा अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.का.आ./मइवइबाकमं/योजना/२०१५/६८६, दिनांक ५.५.२०१५.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना लागू करण्यास तसेच मंडळाच्या ठरावानुसार सदर योजनेकरिता विम्याच्या हप्त्याची पूर्ण रक्कम (१००%) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत भरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही/अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(प्रशांत पु. राठोड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत:माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित,

(१) सहायक कामगार आयुक्त तथा सचिव इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.
(२) निवडनस्ती (कामगार-७)

C:\Users\pawan.ugale\Desktop\PIMPLE\CR\2016\Note.doc\Note

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०१.०३.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ५० व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर, मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५० वी बैठक शुक्रवारी दिनांक ०१.०३.२०१९ रोजी दुपारी २.३० वा. सहयाद्री अतिथिगृह, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर	मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण
२.	मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ
३.	मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव	शासकीय प्रतिनिधी
४.	मा. श्री. आर. आर. जाधव, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य	शासकीय प्रतिनिधी
४.	मा. श्री. शशांक साठे, उप सचिव	शासकीय प्रतिनिधी
५.	मा. श्रीमती वेदा आगटे	मालक प्रतिनिधी
६.	मा. श्री. विजय देवरुखकर	कामगार प्रतिनिधी
७.	मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम्	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक २४.०१.२०१९ रोजीच्या मंडळाच्या ४९ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तदुनंतर विषयसूचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. ०४:- मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रम योगी मानधन (PM-SYM) योजना लागु करण्याबाबत.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. प्रधान सचिव यांचे प.क्र: असंका-२०१९/प्र. क्र.२८/काम-७अ दि. २६.०२.२०१९ अन्वये प्रधानमंत्री श्रम योगी मानधन (PM-SYM) योजना लागु करुन या योजनेमध्ये जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी करून योजनेचा लाभ देणेबाबत खालीलप्रमाणे सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१.१२.२००८ रोजी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारित केलेला आहे. त्या अनुषंगाने विविध व्यवसाय गट जसे कि बांधकाम कामगार, माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक, घरेलु कामगार, फेरीवाले, शेतमजुर, गृहउद्योगातील कामगार, माथाडी कामगार, बिडी कामगार, यंत्रमाग कामगार, आशा वर्कर, आंगणवाडी सेविका यासारख्या विविध १२७ व्यवसाय गटातील असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना लागु करण्याबाबतचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे दि. १५.०२.२०१९ पासुन नोंदणी शुभारंभ करण्यात आला आहे. योजनेस दि. १५.०२.२०१९ पासुन सुरूवात करण्यात आली आहे.

शासनाच्या उपरोक्त पत्रान्वये प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी कार्यप्रणालीचे विवरण पत्र सोबतच्या प्रपत्र -१ नुसार कळविण्यात आलेले आहेत.

प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे कळविण्यात आलेली आहे:

अ) **लाभार्थी पात्रता :-**

- असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार
- मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी
- कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसावा

ब) **आवश्यक कागद पत्रे :-**

- आधार कार्ड
- बँक पासबुक (राष्ट्रीय कृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बँक)

- भ्रमणध्वनी (OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा)

क) **योजनेचा लाभ :-**

- वय वर्ष ६० पूर्ण केल्यानंतर दरमहा रु. ३०००/-मानधन
- लाभार्थी कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या वैवाहिक जोडीदारास योजना सुरु ठेवता येणार
- लाभार्थीस स्वेच्छेने योजनेतून बाहेर पडावयाचे झाल्यास जमा केलेल्या अंशदानासह व्याजाची रक्कम परत मिळणार.

केंद्र शासनाचे कामगार व रोजगार मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेत नोंदणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. योजनेमध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार, मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी असणारा व कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसणारा कामगार पात्र आहेत.

२. १८ ते ४० वयोगटातील लाभार्थीने रु.५५ ते २००/- पर्यंत प्रतिमाह (वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत)अंशदान जमा केल्यानंतर लाभार्थीस वयाची ६० वर्ष पुर्ण केल्यानंतर दरमहा किमान ३०००/- रुपये निवृत्तीवेतन देय राहिल.

३. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस नजिकच्या नागरी सुविधा केंद्रास (Common Service Centres) भेट दयावी लागेल.

४. लाभार्थीस नागरी सुविधा केंद्रामध्ये गेल्यानंतर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी खालील कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

क) आधार कार्ड

ख) बॅक पासबुक (राष्ट्रीय कृत बॅक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बॅक)

ग) भ्रमणध्वनी (OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा)

घ) पहिले मासिक अंशदान(वयानुसार, रोख स्वरुपाने)

५. नागरी सुविधा केंद्रामार्फत बँक खात्याचा तपशील, ई-मेल आयडी, वारसदार (पती-पत्नी) व भ्रमणध्वणी क्रमांक याबाबतचा तपशील अद्यावत केला जाईल.

६. लाभार्थीच्या वयानुसार अंशदानाची रक्कमेची गणना ऑनलाईन सिस्टीमद्वारे करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी, पात्र लाभार्थीच्या वयानुसार, पहिल्या मासिक अंशदानाची रक्कम रोखीने अदा करावी लागेल (प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना वय

निहाय मासिक वर्गणीचा तक्ता दर्शविणारे प्रपत्र – २ सोबत जोडले आहे). अंशदानाची रक्कम भरणा केल्याची पावती संबंधीत नागरी सुविधा केंद्राकडून लाभार्थीस देण्यात येईल.

७. दुस-या मासिक अंशदानापासून लाभार्थीचे अंशदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात (auto-debit) करण्यात येईल.

८. लाभार्थीने योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी योजनेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र व छापील सहमती पत्र, स्कॅन करण्यात येऊन सिस्टीमवर अपलोड करण्यात येईल.

९. पहिले मासिक अंशदान जमा केल्यानंतर प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजनेंतर्गत LIC द्वारे पेन्शन खाते क्रमांक जारी करण्यात येईल.

१०. नोंदणीची प्रकिया पुर्ण झाल्यानंतर लाभार्थीस प्रधानमंत्री श्रम योगी मानधन कार्ड व स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र देण्यात येईल.

११. प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना खाते सुरू झाल्यानंतर लाभार्थीस लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात केलेल्या अंशदानाची माहीती एसएमएस द्वारे देण्यात येईल.

१२. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस इतर कोणतेही शुल्क नागरी सुविधा केंद्रास अदा करावे लागणार नाही. त्याबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्रास केंद्र शासनाकडून परस्पर अदा करण्यात येईल.

- केंद्र शासनच्या कामगार विभागामार्फत ३१ मार्च २०१९ अखेर दोन कोटी लाभार्थींचा योजनेमध्ये सहभागी करण्याचा लक्षांक ठेवण्यात आलेला असल्याने महाराष्ट्र राज्यामध्ये ३१ मार्च २०१९ अखेर, राज्यात असणारे सुमारे ४६००० नागरी सुविधा केंद्राकडून,प्रत्येकी किमान १०० या प्रमाणे, लाभार्थींची नोंदणी करणे आवश्यक आहे.
- मंडळाच्या अध्यक्षांनी कामगारांच्या संघटनांबरोबर व कामगारांसोबत बैठकीचे आयोजन करुन मार्गदर्शन करण्यात यावे. आपल्या अधिनस्थ कामगारांना योजनेबाबत माहिती देण्यात यावी व जास्तीत जास्त कामगारांनी सदरचे योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन, जनजागृती करण्यात यावी.
- प्रधान मंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबत दि. २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. कॅबिनेट सेक्रेटरी/केंद्र शासन यांनी आयोजित केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत की, राज्यांच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागांच्या अधिका-यांना सदर योजनेत

अधिकाअधिक नोंदणी करण्याबाबत अवगत करावे तसेच सदर मंडळाद्वारे आपल्या मंडळातील नोंदित कामगारांचे प्रथम वर्षाचे अंशदान भरण्यात यावे असे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

मा. प्रधान सचिव कामगार विभाग यांच्या दि.२६.०२.२०१९ रोजीच्या पत्रातील उपरोक्त निर्देश विचारात घेता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजना लागु करण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

१. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील व उपरोक्त लाभार्थी पात्रता धारण करणाऱ्या बांधकाम कामगारांना सदर योजना लागु करण्यास मान्यता प्रदान करावी.

२. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० वयोगटातील लाभार्थ्यांने भरावयाची रु.५५/- ते २००/- पर्यंत प्रति महा (वयाची ६० वर्षे पुर्ण होईपर्यंत) भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम १ वर्षाची अंशदान मंडळाकडुन भरण्यात यावी व तद्नंतर लाभार्थ्यांच्या बॅक खात्यातून अंशदानाची रक्कम परस्पर कपात करण्यात यावी.

३. ०१ वर्षानंतर लाभार्थ्याच्या बँक खात्यातू दरमहा परस्पर अदा केलेल्या अंशदानाच्या रक्कमेचा परतावा (Reimursement) मंडळाकडून करण्यात यावी.

४. सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त कामगारांनी घ्यावा, योजनेमध्ये सहभागी व्हावे याकरिता व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करून जनजागृती करण्यास व त्यावरील खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करावी.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील पात्र लाभार्थ्यांना सदर योजना लागू करण्यात यावी. पात्र बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी ०१ वर्षाचा अंशदान मंडळाकडून अदा करण्यात यावे. सदर अंशदानाची रक्कम नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करण्यात यावी. सदर योजनेची माहिती नोंदीत बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्यासाठी पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव ५०(४)/२०१९ :- मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी पात्र बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन (PM-SYM) योजना लागू करण्यात यावी. बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम ०१ वर्षाचे अंशदान मंडळाने नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करावे. सदर योजनेची माहिती सर्व बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्याकरीता आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २४.०१.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ४९ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर, ना. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४९ वी बैठक गुरूवार दिनांक २४.०१.२०१९ रोजी सकाळी ११.३० वा. कामगार आयुक्त, यांचे कार्यालय, वांद्रा पूर्व येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर	मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण
२.	श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ
३.	मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव	शासकीय प्रतिनिधी
३.	मा. श्री. शशांक साठे, उप सचिव	शासकीय प्रतिनिधी
४.	मा. श्रीमती वंदा आगरे	मालक प्रतिनिधी
५.	मा. श्री. श्रीपाद कुटासकर	कामगार प्रतिनिधी
६.	मा. श्री. विजय देवरुखकर	कामगार प्रतिनिधी
७.	मा. श्री. अशोक भुताड	कामगार प्रतिनिधी
८.	मा. श्री. धनंजय माळी	संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष (निमंत्रित)
९.	मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम्	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक ३०.१०.२०१८ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्ताचा प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटण करण्यात आली.

तदनंतर विषयसूचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

41

महाराष्ट्र शासन

क्रमांक: इबांका-२०१८/प्र.क्र.१७/काम-७,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०, वांद्रा-कुर्ला संकुल,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याबाबत.

संदर्भ :-१) आपले पत्र क्र. मइवइबांकमं/आरोग्य तपासणी/१८/२०१९, दि. ०६ फेब्रुवारी, २०१९
२) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. S110011/12/2009-CGHS D.II/Hospital Cell(Part I), दि.२८ ऑगस्ट,२०११

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन दिनांक ०६ फेब्रुवारी,२०१९ रोजीचे पत्र कृपया पहावे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामारांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामगारांची आर्थिकस्थिती अत्यंत कमकुवत असल्याने, औषधोपचार वेळीच घेतले जात नाहीत. परिणामी, काही आजार गंभीर स्वरुप धारण करतात. याकरीता बांधकाम कामगारांची वेळीच आरोग्य तपासणी होणे आवश्यक आहे.

३. दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१९ च्या पत्रांन्वये दिलेल्या प्रस्तावा प्रमाणे मंडळामध्ये नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांची प्रति कामगार रु.१९५०/- या दराने आरोग्य तपासणी मे.एमएचएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेमार्फत करण्यास शासन मान्यता देत आहे. याबाबत असेही स्पष्ट करण्यात येते की, मे.एमएचएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेमार्फत Pre Camp, Health Camp व Post Camp Services करीता कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. तसेच, Lung Function Test ही तपासणी निशुल्क करण्यात यावी.

४. ज्या तपासण्या सध्या एनएबीएल मान्यता नसलेल्या प्रयोगशाळेतून करण्यात येत आहेत, त्या प्रयोगशाळांनी एनएबीएलची मान्यता घेतल्यास, संबंधित तपासणीसाठी वाढीव शुल्क आकारता येणार नाही.सदर कराराची मुदत दोन वर्षांची राहिल.

आपला,

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- कामगार आयुक्त, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
निवड नस्ती- कामगार-७

२१-३-१८ बैठक

विषय क्र.०३ :- एचएलएल लाईफ केयअर लिमिटेड (केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम) मार्फत नोंदीत बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करणेबाबत.

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामगारांचे आर्थिक स्थिती अत्यंत कमकुवत असल्याने आजारावरील औषधोपचार वेळीच घेतले जात नाहीत. परिणामी, काही आजार गंभीर स्वरुप धारण करतात असे निदर्शनास आले आहे.

मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०२.०६.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ ओळखपत्राच्या आधारे देण्यात येत आहे. तथापि, काही बांधकाम कामगारांना सदर योजनेबाबत व उपचाराबाबतच्या पध्दतीची सविस्तर माहिती नसल्यामुळे बांधकाम कामगार सदर योजनेचा लाभ घेऊ शकले नाही असे निदर्शनास आले. यास्तव बांधकामाच्या ठिकाणी काम करत असलेल्या कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करून ज्या बांधकाम कामगारांना आजार असल्याचे निदर्शनास आल्यास सदर बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार करणे प्रस्तावित आहे. बांधकाम कामगारांच्या आरोग्याची तपासणी वेळीच होऊन निदर्शनास आलेल्या आजारावर वेळीच उपचार केल्यास बांधकाम कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार नाही. या उद्देशाने बांधकाम कामगारांकरीता बांधकामाच्या ठिकाणी त्यांच्या आरोग्य तपासणी करणे या विषयाबाबत मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत चर्चा करून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंडळामार्फत कॅम्प आयोजित करून सदर कॅम्पमध्ये आरोग्य तपासणी करण्यात यावी. आरोग्य तपासणीत आढळून येणाऱ्या गंभीर आजाराबाबत करावयाची उपाययोजना बाबतचा आराखडा तयार करावा. आरोग्य तपासणीकरीता त्या क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. सदर योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुते घेण्यात आला.

मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरून या क्षेत्रातील काम करणाऱ्या मे.क्लिनिक ऑन साईट प्रा.लि. पुणे या संस्थेकडून मंडळास सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या योजनेचे सादरीकरण मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि.,पुणे यांचेमार्फत दिनांक

२१.०३.२०१८ रोजी च्या बैठकीत करण्यात आले. सदर सादरीकरणानंतर सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सदर आरोग्य तपासणी पथकामध्ये समाविष्ट डॉक्टर संख्या, त्यांचेकडे उपलब्ध तपासणीचे साहित्य,औषधे,तपासणीस लागणारा वेळ, तपासणीचे घटक त्यानुसार कोणत्या आजाराचे निदान होवू शकेल याबाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करावा. बांधकाम कामगारांच्या कामाच्या स्वरुपास अनुसरुन निदर्शनास येणाऱ्या आजारांचा सुक्ष्मनिरीक्षण आरोग्य तपासणीत समावेश करण्यात यावा. सदर योजना प्रथम तीन महिने प्रायोगिक तत्त्वावर एका जिल्ह्यात राबविण्यातयावीत. तद्नंतर आरोग्य तपासणी योजना राज्यातील इतर जिल्ह्यात राबविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि..पुणेया संस्थेने सुधारित प्रस्ताव मंडळास सादर केला व मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि..पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी आरोग्य तपासणीबाबत मंडळाच्या दि. २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत सादरीकरण केले. सदर सादरीकरणाअंती मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटाचकर यांनी एकाच वेळी महाराष्ट्रात किती ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करु शकता अशी विचारणा केली. मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि..पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी त्यांच्याकडे सध्या १० टीम तयार असल्याचे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

४६(१२)/२०१८ ठराव: नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणीबाबत मे. क्लिनिक ऑन साईट प्रा.लि. पुणेया संस्थेने केलेल्या सादरीकरणाच्या प्रस्तावास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर योजनेचे RFP Document e-Gov Consultant मे. केपीएमजी यांच्याकडुन करुन घेण्यात यावे व योजना मंजूरीचा प्रस्ताव व RFP Document शासन मान्यतेस सादर करण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सध्यानच्या कालावधीत मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेने मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीत आरोग्य तपासणीकरीता दि.११.०१.२०१९ रोजी मंडळ कार्यालयात प्रस्ताव सादर केलेला आहे, सदर प्रस्तावातील ठळक बाबी खालीलप्रमाणे :-

१. मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड ही संस्था केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण अंतर्गत केंद्र शासनाचे एंटरप्राईज आहे.

२. महाराष्ट्रामध्ये मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेच्या सर्व सोयी सुविधायुक्त ९३ प्रयोगशाळा "HINDLABS" या नावाने कार्यरत आहे. (प्रत्यक्ष लिंकद्वारे ०३ ते ०४)

३. सदर संस्थेच्या १३ प्रयोगशाळेमार्फत महाराष्ट्र राज्यातील आरोग्य विभागांतर्गत २३०१ ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य संस्थांमधील रुग्णांना आरोग्य तपासणीची सेवा पुरविण्यात येत आहे.

४. सदर संस्थेकडे आरोग्य तपासणी करीता आवश्यक डॉक्टर, पॅरामेडिकल स्टाफ व हेल्थ वर्कर्सची स्वतंत्र टीम उपलब्ध आहे.

५. मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांचे कामाच्या ठिकाणी किंवा जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेमध्ये तपासणी करणे प्रस्तावित आहे.

6. सर्व साधारण कामगारांकरीता खालीलप्रमाणे आरोग्य तपासणी प्रस्तावित आहे.

1. Physical Examination (Head to Bottom)
2. CBC
3. Blood Sugar
4. Liver Function Test
5. Renal Function Test
6. Lipid Profile
7. Malaria Parasite
8. ESR
9. Urine Test
10. Occupational History
11. Social History
12. Family History
13. Lung Function Test
14. Audio Screening Test
15. Vision Screening
16. Snellen General Employees
17. Fit for employment Certificates
18. Individual Reports
19. Excutive Company Reports
20. Baseline Medicals-2 X Audio Test
21. General medicals is done by- Occupational Health Nurse
22. Medicals is reviewed by- Occupational health Practitioner

७. संस्थेने आरोग्य तपासणी फी सध्या घेत असलेला प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

Category	Package	Cost/Individual + Taxes
1.	General workers- Employees working on the ground not higher than 1.5	Rs.1500/-
2.	Working on Heights Medical Examination-	Rs 1500/

	Employees working higher than 1.5 m	
3.	Drivers, Operators and PDP Medicals	Rs. 1500/-

मे. एचएलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेची महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत रुग्णालयातील रुग्णांची आरोग्य तपासणी करण्याकरीता नेमणूक करण्यात आली आहे. सदर संस्थेचे ९३ ठिकाणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत. २३०१ आरोग्य संस्थेतील रुग्णांची तपासणी करण्यात येत आहे. संस्थेकडे आरोग्य तपासणीबाबतची अद्यावत संगणक प्रणाली उपलब्ध आहे. सदर प्रणालीद्वारे तपासणीचा अहवाल ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करण्याची सुविधा संस्थेकडे उपलब्ध आहे. उपरोक्त प्रस्तावासंदर्भात संस्थेच्या प्रतिनिधीमार्फत प्रस्तावाचे सादरीकरण करण्यात आले.

सदर सादरीकरणानंतर चर्चेत सहभागी होताना मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की, आरोग्याची तपासणी बाबतचा प्रस्ताव योग्य आहे. तथापि, सदर तपासणी बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास आल्यास त्या बांधकाम कामगारांवर उपचार होणे आवश्यक आहे. या संदर्भात मा. प्रधान सचिव यांनी मत व्यक्त केले की, आरोग्य तपासणी व आजारावरील उपचार या दोन्ही भिन्न बाबी आहेत. बांधकाम कामगारांच्या आजारावरील उपचाराकरीता मंडळामार्फत महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर चर्चेत सहभागी होताना मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी निर्देश दिले की, आरोग्य तपासणी करीता नेमावयाच्या संस्थेने आरोग्य तपासणीत जे बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास येईल अशा बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचाराकरीता जवळच्या रुग्णालयात भरती करावे व सदर योजनेंतर्गत नियुक्त आरोग्य मित्र यांचेमार्फत सदर बांधकाम कामगारांना संपूर्ण उपचार होऊन तो बरा होईल तोपर्यंत पाठपुरावा करावा. या संदर्भात मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड या संस्थेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त करावा.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ४२(३)/२०१९: नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणीकरीता मे. एचएलएल लाईफकेअर लि. यांनी प्रस्तावित केलेल्या आरोग्य तपासणीच्या कार्यवाही शिवाय सदर संस्थेने बांधकामाच्या ठिकाणी कॅम्प आयोजित करून नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करावी. बांधकामाच्या ठिकाणी आयोजित कॅम्पमध्ये उपस्थित ज्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली नाही त्या बांधकाम कामगारांचे

नोंदणीकरीता आवश्यक कार्यवाही करावी. सदर आरोग्य तपासणीत जे बांधकाम कामगार आजारी असल्याचे निदर्शनास येईल अशा बांधकाम कामगारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नियुक्त केलेल्या आरोग्य मित्रा मार्फत जवळच्या रुग्णालयात भरती करून त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेवर सोपविण्यात यावी, याबाबतची कार्यवाही, आरोग्य तपासणीच्या अतिरिक्त बाबी, कॅम्पपूर्व व कॅम्पपश्चातची कार्यवाही त्यानुसार आरोग्य तपासणीचे दर याबाबतचा सुधारित प्रस्ताव मे. एचएलएल लाईफकेअर लि.मा संस्थेकडून मागविण्यात यावा, सदर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २८.०२.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर	मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण.
२.	श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ.
३.	श्री. यशवंत केरुरे	मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी)
४.	श्री. स.अ.मु. नकवी	मा. संचालक व लेखा कोषागारे
५.	श्रीमती श्वेता सिंघल	मा.उपसचिव (कामगार)
५.	श्रीमती वेदा आगटे	मालक प्रतिनिधी
६.	श्री. सतीश मगर	मालक प्रतिनिधी
७.	श्री. अशोक भुताड	कामगार प्रतिनिधी
८.	श्री. श्रीपाद कुटासकर	कामगार प्रतिनिधी
९.	श्री. विजय देवरुखकर	कामगार प्रतिनिधी

होताच बदलणे आवश्यक असते. तीं जबाबदारी कोण घेणार असा मुद्या उपस्थित केला. याबाबत सविस्तर चर्चे अंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव: नोंदित बांधकाम कामगारांना Primary Health Kit बाबतचा प्रस्ताव सध्या स्थगित ठेवण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

११. **बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत.**

सदर मुद्याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणुन दिले की. उत्तर प्रदेशात उत्तर प्रदेश इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व रेल्वे कॅन्टीन व्यवस्थापन यांच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम कामगारांसाठी बांधकामाच्या ठिकाणी मध्यान्ह भोजन पुर्रविण्याची योजना राबवत असल्याचे समजते. तथापि. याबाबत अधिनियमामध्ये तरतुद आढळुन येत नाही अथवा तशा कोणत्याही सूचना केंद्र शासन वा राज्य शासन यांचे मार्फत प्राप्त झालेल्या नाहीत.

"बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत" ही योजना चांगली आहे असे मा. मंत्री महोदय यांनी नमूद केले. मा. अध्यक्ष यांनी सर्व नामांकित संस्थांकडून प्रस्ताव मागवून योग्य त्या संस्थेची निवड करण्याचे सुचविले. त्यावर मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांनी सदर योजनेसाठी बचत गट नेमण्यात यावे, असे

		सुचविले. त्यावर मा. मंत्री महोदय यांनी सदर योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे, असे निदेश दिले. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. **ठराव: बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**
१२.	**केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशाबाबत ठराव घेणे. मंडळातील नोंदीत बांधकाम**	याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी असे स्पष्ट केले की, केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार सदर योजनेअंतर्गत

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २८.०२.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर	मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण.
२.	श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ.
३.	श्री. यशवंत केरुरे	मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी)
४.	श्री. स.अ.मु. नकवी	मा. संचालक व लेखा कोषागारे
५.	श्रीमती श्वेता सिंघल	मा.उपसचिव (कामगार)
५.	श्रीमती वेदा आगटे	मालक प्रतिनिधी
६.	श्री. सतीश मगर	मालक प्रतिनिधी
७.	श्री. अशोक भुताड	कामगार प्रतिनिधी
८.	श्री. श्रीपाद कुटासकर	कामगार प्रतिनिधी
९.	श्री. विजय देवरुखकर	कामगार प्रतिनिधी

		केले. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. **ठराव: मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMGया IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**
३.	**नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत.**	याबाबत बोलताना सहाय्यक कामगार आयुक्त, श्री चंद्रकांत राऊत यांनी असे नमूद केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०९.२०१६ च्या बैठकीमध्ये व मा.मंत्री (कामगार) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये

कौशल्य वृध्दीकरण योजनेबाबत सविस्तर चर्चा होऊन Recognition of Prior Learning (RPL) for Construction workers या केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी करण्याबाबत मंडळाची मंजुरी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने दि.२७.०९.२०१६ रोजी च्या पत्रान्वये शासन मंजुरीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने पत्र दि. २७.०२.२०१७ अन्वये सदर योजनेची अंमल बजावणी करण्यासाठी मान्यता प्रदान केली आहे. त्यानुसार केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या खाली नमूद प्रशिक्षण संस्थांना तसेच प्रशिक्षणाची नियतकालीक तपासणी करण्यासाठी केंद्र शासनाने एमपॅनल केलेल्या तपासणी संस्थापैकी (ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडीज) खालील संस्थांना महसुल विभाग निहाय नियुक्ती करण्यात येणार आहे.

अ.क्र.	विभागाचे नांव	ट्रेनिंग प्रोव्हायडर्स	असेसींग बॉडीज
१	कोकण विभाग	लेबरनेट सर्विसेस इंडिया प्रा.लि., बंगलोर	इंडिया स्किल्स न्यु दिल्ली.
२.	पुणे विभाग	आय एल अॅन्ड एफ एस	इंडिया स्किल्स, न्यु

		स्किल्स, नांदेड	दिल्ली
३.	नाशिक विभाग	जी अॅन्ड जी स्किल्स डेव्हलपर्स प्रा.लि., पंचकुला	एकेजी, चंदीगड
४.	नागपूर विभाग	सुशिल बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर	शिक्षा भारती न्यु दिल्ली
५.	औरंगाबाद विभाग	भास्कर फाऊंडेशन, दिल्ली	वर्च्युअल एज्युकेशन ट्रस्ट

तसेच उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकपणे करण्यासाठी सद्यस्थितीत मंडळाकडे स्वतंत्र असे मनुष्यबळ नसल्यामुळे सदर प्रशिक्षणाच्या कामकाजाचे प्रमाणीकरण करणे, तसेच ट्रेनिंग प्रोव्हायडर आस्थापनांकडून दैनंदिन आढावा घेणे, विविध अभिलेख तयार करणे व संबंधित संस्थांबरोबर कामाचा आढावा घेऊन एकत्रित कार्यपुर्ती अहवाल मंडळास सादर करणे, इत्यादी कामासाठी अशा क्षेत्रात अनुभव असलेल्या एल, अॅन्ड टी, पनवेल, क्रेडाई, पुणे अशा पैकी एका नामांकित संस्थेची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत या योजनेची देखरेख करुन योजना राबवावी असे प्रस्तावीत करण्यात येत आहे. असे श्री राऊत म्हणाले.

यावर मा. मंत्री महोदय यांनी असे निदेश दिले की, केंद्र शासनाकडून आलेल्या परिपत्रकानुसार ज्या पाच नामांकित संस्थांची शासनाने निवड केली आहे, त्या प्रत्येक संस्थेला विभाग वाटून देवून संबंधित कंपनीशी Agreement करून त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत व त्यांच्यामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच सदर संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र संस्थेच्या नेमणूकीस असहमती दर्शवून ते काम मंडळामार्फत करण्यात यावे असे, मा. मंत्री महोदय यांनी स्पष्ट केले.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत ट्रेनिंग प्रोव्हायडर्स (Training Providers) यांचेशी करारनामा करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत तसेच नियुक्ती करण्यात आलेल्या एजन्सीला कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेअंतर्गत जास्तीत जास्त लक्षांक देण्यात येऊन लक्षांक पुर्ती करून घेण्यात यावी, तसेच Assesment चे सुध्दा कामकाज संबंधित संस्थेकडून करून घेण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात

		आला.
४.	**योजनांची अंमलबजावणी करणेसाठी बाह्य यंत्रणेची/ सल्लागार कंपनीची (Consultant) नियुक्ती करणेबाबत.**	सदर मुद्याबाबत बोलताना मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निर्दशनास आणुन दिले की, शासन असाधारण अधिसूचना क्र. इमारत-2013:प्र.क्र.104/कामगार-7 अ. दिनांक ११.१०.२०१३ अन्वये नोंदित बांधकाम कामगारांकरिता राबवावयाच्या विविध कल्याणकारी योजना अधिसूचित करण्यात आल्या आहेत. तसेच शासन पत्र दि. १६.०६.२०१६ अन्वये सदर कल्याणकारी योजनांच्या रक्कमेत वाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मंडळाच्या ठरावानूसार व शासन मान्यतेने सदर कल्याणकारी योजनांमध्ये वेळोवेळी वाढ होत असते. त्याअनुषंगाने नोंदित बांधकाम कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी मंडळाकडून करण्यात येते. कायद्यांतर्गत नोंदणी झालेल्या लाभार्थ्यांला योजनेचा लाभ मिळण्यासाठी नोंदणी प्राधिका-यांकडे विहित नमुन्यात आवेदन सादर करणे आवश्यक असते. मंडळ दाव्यांना मंजूरी दिल्यानंतर वित्तीय सहाय्याचे वाटप २०१५ पासून DBT पध्दतीने करण्यात येते. मंडळाअंतर्गत डिसेंबर २०१६ अखेर ५,७५,६२८ इतक्या बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असुन त्यापैकी ३०२०९७ कामगारांची नोंदणी जिवित आहे.लाभार्थ्यांना

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या
दिनांक २२.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २२.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर	मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण.
२.	श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ.
३.	श्री. यशवंत केरुरे	मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी)
४.	श्री. मु. अ. नकवी	मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी)
५.	श्रीमती वेदा आगटे	मा. मालक प्रतिनिधी
६.	श्री. श्रीपाद कुटासकर	मा. कामगार प्रतिनिधी
७.	श्री. विजय देवरुखकर	मा. कामगार प्रतिनिधी
८.	श्री. अशोक भुताड	मा. कामगार प्रतिनिधी

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

		याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. **ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी किमान ३० पाल्य उपलब्ध होवू शकतील अशा बांधकामाच्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर ५० ठिकाणी मोबाईल डे केअर युनिट स्थापना करण्यात यावी. सदर योजना सुरुवातीस मुंबई, MMR क्षेत्रात, पुणे व नागपूर या तीन ठीकाणी राबवावी. यासाठी मंडळाचे Consultant मे. KPMG यांनी सादरीकरण केलेल्या RFP Document ची प्रत ई-मेल द्वारे सर्व मंडळ सदस्यांना पाठवावी. मंडळ सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. तसेच पाल्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोबाईल-डे- केअर युनिट मध्ये CCTV बसविण्यात यावे व मंडळ सदस्यांनी सुचविलेल्या बदलासह प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**
४.	**नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सोयीसाठी सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविणेबाबत**	याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) केंद्रीय नियम १९९८ मधील नियम क्र. ४२, ४६, ५४ व ९२ नूसार व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ मधील नियम क्र. ६१ ते ८१ नूसार बांधकाम कामगारास सुरक्षासंच (उदा. हेल्मेट, जॅकेट, सेफ्टी बेल्ट, शूज, ग्लोब्ज् इ.) पुरविणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे कंत्राटदाराने बांधकाम कामगारांना सुरक्षा संच उपलब्ध करुन दिला पाहिजे. याकरिता मंडळाच्या अधिकाऱ्यांनी

		बांधकामाच्या जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली पाहिजे व त्यात त्रृटी आढळल्यास, संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची तरतूद अधिनियमात आहे. मंडळाच्या दि.२४.१०.२०१६ रोजी व दि.०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविणेबाबत विषय सादर करण्यात आला होता व चर्चेअंती सुरक्षा संच पुरविण्याबाबत मंडळ सदस्यांनी इतर राज्यामध्ये करण्यात आलेल्या कारवाई सादर केल्यानंतर मंडळाच्या पुढील बैठकीत सदर विषय चर्चेला घेण्यात यावा असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. या संदर्भात इतर राज्याची माहिती घेतली असता सुरक्षा संच पुरविणेबाबतची योजना ओडीसा राज्यात राबविण्यात येत असल्याचे दिसून येते. ओडिसा राज्यामार्फत सुरक्षा संचाच्या खरेदीकरीता बांधकाम कामगारास रू.१०००/- इतके अर्थसहाय्य दिले जाते. या संदर्भात मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. यांच्या दि.०६.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव (कामगार) यांना बांधकाम कामगारांसाठी सुरक्षा संच पुरवठयाबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे. उपरोक्त प्रस्तावात खालील सुरक्षा विषयक बाबींचा समावेश आहे. 1. Protective Shoes 2. Respiratory Protection

3. Heraing Protection
4. Safety helmet
5. Safety Harness
6. Reflactive Jacket
7. Safety Goggle

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मंडळाच्या दि.१३.०९.२०१७ च्या पत्रान्वये संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांना अभिप्राय देणेबाबत विनंती करण्यात आली होती. संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावातील सुरक्षा साधनांच्या तांत्रिक बाबी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा विचारात घेवून प्रस्तावातील अनुक्रमणिके प्रमाणे खालील सुरक्षा साधने बांधकाम कामगारांना पुरविणे संदर्भात अभिप्राय नमूद केले आहेत.

अ.क्र.	सुरक्षा साधने	प्रस्तावातील अनुक्रमांक
1.	Protective Shoes (Safety Shoes)	०१
2.	Dust Mass (Respiratory Protection)	०५
3.	Heraing Protection (Ear Plug)	०७
4.	Safety helmet	१३

5.	Safety Handgloves	१६
6.	Safety Harness	१७
7.	Reflactive Jacket	१९

वरील सुरक्षा साधनाशिवाय पुरूष व महिला कामगारांना घट्ट आवरणाचे कपडे दिल्यास बांधकामाच्या जागेवर काम करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने मदत होईल असे अभिप्राय उपरोक्त दि.१९.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेले आहे. मे. टेलेस्टो कॉमेंट प्रा.लि. या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावात एका संचाची अंदाजित रक्कम रू. ५०००/- (पॅकिंगसह) + वस्तू सेवा कर असून मंडळाकडील ३.१० लक्ष नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या विचारात घेता वस्तू सेवा करासह अंदाजित रू.१६० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय नव्याने नोंदणी होणाऱ्या बांधकाम कामगारांना नोंदणीच्यावेळी सुरक्षा संच देणे प्रस्तावित आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ चे कलम २२ मध्ये मंडळाने करावयाची कार्ये नमूद केले आहे. त्यातील कलम २२ (ह) नुसार बांधकाम कामगारांसाठी अन्य कल्याणकारी योजना राबविण्याची तसेच सदर कल्याणकारी योजना सुधारित करण्याची तरतूद आहे.

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेअंती उपरोक्त तपशीलासह योजना मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येईल. शासन मान्यतेनंतर ई-

		निविदा पध्दतीने अनुभवी संस्थेची नियुक्ती करून पुढील कार्यवाही करणे प्रस्तावित आहे. त्यावर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७ मधील नियम क्र. ६१ ते ८१ नूसार बांधकाम कामगारास सुरक्षासंच (उदा. हेल्मेट, जॅकेट, सेफ्टी बेल्ट, शूज, ग्लोब्ज् इ.) पुरविणे ही संबंधित कंत्राटदाराची जबाबदारी आहे. त्यामुळे कंत्राटदाराने बांधकाम कामगारांना सुरक्षा संच उपलब्ध करुन दिला पाहिजे, अशी तरतूद आहे. त्यामुळे मंडळाने सुरक्षा संच खरेदी करणे योग्य वाटत नाही. मंडळाकडून सुरक्षा संच (सेफ्टी किट) कामगारांना पुरवठा न झाल्यास परिणामी एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याचीं जबाबदारी मंडळावर येईल. सबब, याबाबत पुर्नविचार करावा, असे मत मा. कामगार आयुक्त यांनी व्यक्त केले. त्यावर मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी असे स्पष्ट केले की, जरी अधिनियमाच्या तरतूदीमध्ये कंत्रादाराकडून सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविण्यात यावी असे नमुद असले तरी, कंत्राटदार कामगारांना सुरक्षा संच (सेफ्टी किट) चा पुरवठा करत नाहीत. त्यामुळे मंडळाकडून कामगारांच्या सुरक्षततेच्या दृष्टीने सुरक्षा संच (सेफ्टी किट) देण्यात यावी. मा. अध्यक्ष यांचे मतास मा. कामगार प्रतिनिधी श्री. भुताड यांनी दुजोरा दिला. त्यावर मा. मंत्री महादेय (कामगार) यांनी मंडळामार्फत कामगारांना सुरक्षा संच (सेफ्टी किट) देण्यास काहीही हरकत नाही, असे मत व्यक्त केले.

		त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. **ठराव: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना त्यांच्या सुरक्षततेसाठी सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरविण्यात यावे, सुरक्षा संच (सेफ्टी किट) पुरवठ्याकरीता संचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचनालय यांनी त्यांच्या दि.१९.०९.२०१७ च्या पत्रान्वये सुरक्षा साधनांच्या तांत्रिक बाबी तसेच बांधकाम कामगारांची सुरक्षा विचारात घेवून प्रस्तावातील केलेली सुरक्षा साधने बांधकाम कामगारांना पुरविण्यात यावे. तसेच सुरक्षा संच पुरवठयासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चित करावी. त्याकरीता आवश्यक RFP Document मंडळाचे e-Goverance Consultant मे. KPMG यांच्या कडून तयार करून घेण्यात यावे व योजनेच्या अटी शर्ती, अंदाजित खर्च व त्यानुसार तयार केलेले RFP Document शासन मान्यतेस सादर करावे. शासन मान्यतेनुसार पूढील कार्यवाही करावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**
५.	**नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांसाठी Essentional Kit**	याबाबत मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, शासनाकडून मंडळातील बांधकाम कामगारांना Essential Kit पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळास प्राप्त झालेला आहे. इमारत व इतर बांधकाम (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ४० व ६२ अन्वये राज्य शासन मंडळास योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत आदेश देऊ शकते.

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या
दिनांक २२.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २२.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर	मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण.
२.	श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ.
३.	श्री. यशवंत केरुरे	मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी)
४.	श्री. मु. अ. नकवी	मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी)
५.	श्रीमती वेदा आगटे	मा. मालक प्रतिनिधी
६.	श्री. श्रीपाद कुटासकर	मा. कामगार प्रतिनिधी
७.	श्री. विजय देवरुखकर	मा. कामगार प्रतिनिधी
८.	श्री. अशोक भुताड	मा. कामगार प्रतिनिधी

४३ वी ठक दिनांक २२.०९.२०१७

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

		वार्षिक आराखडा तयार करून शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.
७.	**गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तवित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांस्ाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" या योजनेच्या अंमलबजावणीबाबत मंडळाचे अभिप्राय शासनास सादर करणे**	याबाबत मंडळ सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या असे निदर्शनास आणून दिले की, देशातील सर्व बेघरांना पक्की घरे उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यातआलेली आहे. शासन निर्णय गृहनिर्माण विभाग दि.०९.१२.२०१५ अन्वये सदर योजना नागरी समूहांत खालील ०४ घटकांतर्गत राबविण्यात येते. १. जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करून त्यावरील झोपडपटटयांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे. (ISSR) २. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (CLSS) ३. खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे (AHP) ४. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्याद्वारे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधण्यासाठी अनुदान (BLC) उपरोक्त घटक क्र.०१ साठी केंद्र व राज्य सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके असून घटक क्र.०३ व ०४ साठी केंद्र सरकारचे अनुदान प्रती लाभार्थी रू.१.५० लक्ष इतके तर राज्य शासनाचे अनुदान घटक क्र.०१,०३ व ०४ करीता प्रती लाभार्थी रू.१.०० लक्ष इतके आहे. निरनिराळया घटकांतर्गत कर्ज संलग्न अनुदान वगळता केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाचा हिस्सा ४० टक्के, ४० टक्के आणि २० टक्के अशा ०३

शहरी आवास योजना

	हप्त्यात मुक्त करण्यात येणार आहे. तर घटक क्र.०२ साठी विवक्षित बँका/ गृहनिर्माण वित्तीय कंपन्या व इतर संस्था त्यांच्याकडून १५ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. प्रधानमंत्री आवास योजना ही राज्यामध्ये प्रभावीपणे राबविता यावी यासाठी राज्य शासनाकडून खालील सवलती देण्यात आलेल्या आहेत. १. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांसाठीच्या मंजूर गृहनिर्माण प्रकल्पांसाठी अंमलबजावणी यंत्रणा (म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर शासकीय व निमशासकीय संस्था) यांना आवश्यक असलेली आणि निर्बाध्यरित्या वाटपासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन संबंधित जिल्हाधिकारी यांनी रू.१/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने कब्जेहक्काची किंमत वसूल करून संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेस भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी प्रदान/ हस्तांतरीत करावयाची आहे. २. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घटक क्र.०१, ०३ व ०४ खालील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांकरीता बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पास मोजणी शुल्कामध्ये ५० % इतकी सवलत देण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे यांनी दि.०३.०८.२०१६ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

३. योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना/ लाभार्थींना वाटप करण्यात येणाऱ्या ३० चौ.मी. क्षेत्राच्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून रू.१०००/- इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

४. प्रधानमंत्री आवस योजनेतील प्रकल्पांना विकास शुल्कातून सूट (नपा/मनपा अधिनियम मध्ये नगरविकास विभागाकडे सुधारणा प्रस्तावित) देण्याबाबत मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झालेली आहे.

➢ **प्रंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्पांना खालील सवलती देण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे.**

१. प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रकल्पांना २.५ इतके चटई क्षेत्रफळ निर्देशांक (FSI) अनुज्ञेय करण्याची विनंती नगरविकास विभागास करण्यात आलेली आहे.

२. कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून (CLSS) बांधण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पांना मोजणी शुल्क तसेच मुद्रांक शुल्कातून सूट देण्याची विनंती महसूल व वन विभागास करण्यात येत आहे.

➢ <u>महाकामगार आवास योजना</u>

या योजनेनुसार एखाद्या शहरात १० पेक्षा अधिक कामगार कार्यरत असलेल्या बांधकाम विकासकास अशा सर्व कामगारांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे बांधून देणे बंधनकारक असले. यासाठी एकापेक्षा अधिक विकासक एकत्र येवून सदरची योजना राबवू शकतील. योजनेंतर्गत बांधण्यात येणारी घरकुले पंतप्रधान

		आवास योजनेच्या कर्ज संलग्न व्याज अनुदान (CLSS) या घटकाच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावयाची असून सदर घरकुले MHADA, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आणि संबंधित विकासक यांच्यामध्ये होणाऱ्या संयुक्त भागीदारी करारानुसार बांधण्यात येतील. त्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाकामगार आवास योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांकरीता परवडणारी घरे निर्माण करण्याच्या धोरणास मंत्री मंडळाची मान्यता घेण्याची बाब गृहनिर्माण विभागाकडून प्रस्तावित आहे. ➢ सदर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत बांधकाम कामगारांकरीता असेल. ➢ सदर योजनेंतर्गत घरकुलांची निर्मिती करण्यासाठी व्याज अनुदान वगळता खर्चाचा ८०% भार मंडळ उचलणार असून २० % कर्जाची प्रतिपूर्ती लाभार्थ्यांकडून करण्यात येणार आहे. ➢ त्या अनुषंगाने मान्यता/ अभिप्राय देण्याची विनंती कामगार विभागास करण्यात आलेली आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०९.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर मुद्याबाबत मंडळाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार मंडळाचे अभिप्रायासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

याबाबत बांधकाम कामांरांच्या घराकरीता मंडळाने मंजूर केलेल्या योजनांना शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे काय अशी विचारणा मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटास्कर यांनी केली.

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाड्याची घरे देणे, म्हाडाकडील तयार घरे खरेदी करणे, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्ग पात्र बांधकाम कामगारांना राज्य शासनाकडून द्यायावयाचे अर्थसहाय्य रु. १ लक्ष राज्य शासनाऐवजी मंडळाकडून देणेबाबत शासन मान्यतेस प्रस्ताव सादर केलेला आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न दिनांक २८.०६.२०१७ रोजीच्या बैठकीत म्हाडाकडून घर खरेदी करणे या प्रस्तावास असहमती दर्शवून नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडयाची घरे उपलब्ध करून देण्यासाठी सचिव स्तरीय समिती गठीत करणे व प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांना केंद्र शासनाकडील रु. १.५० लक्ष व राज्य शासनाचे रु. १ लक्ष याशिवाय मंडळाकडून रु. १ लक्ष एवढे अनुदान देण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला.

याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचित केले की, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांना केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाशिवाय मंडळाकडून रु. १ लक्ष ऐवजी रु. २ लक्ष अर्थसहाय्य देण्यासही हरकत नाही.

गृहनिर्माण विभागाकडून बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या

		"महाकामगारआवास योजना" च्या अटी शर्ती, घरांची किंमत, मंडळाचा व लाभार्थ्यांचा हिस्सा, दरमहा अदा करावयाचा हफ्ता या विविध मुद्यांवर मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. नोंदित बांधकाम कामगाराने दरवर्षी कमीत कमी ९० दिवस काम करण्याची अट पुर्ण न केल्यास सदर कामगाराची नोंदणी संपुष्टात येते. अशा सर्व बाबींवर विचारविनिमय करण्यात आला. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. **ठराव: गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तावित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" ऐवजी मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांच्या घराकरीता मंजूर केलेल्या विविध ठरावानुसार सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावात बदल करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांकरीता केंद्रशासन व राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान रु. २.५ लक्ष शिवाय मंडळाकडून रु.२ लक्ष अनुदान देण्यात यावे. तसा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव** सर्वानुमते घेण्यात आला.
८.	**नोंदित बांधकाम कामगारांच्या**	याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना त्यांनी घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा.मंत्री (कामगार) महो य यांचे उपस्थितीत दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३४ वी बैठक समिती कक्ष, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. श्री. ओमप्रकाश यादव	:	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२.	मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
३.	मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
४.	श्रीम. वंदा धवल आगटे	:	मालक प्रतिनिधी
५.	श्री. अशोक गोविंदराव भुताड	:	कामगार प्रतिनिधी
६.	श्री. श्रीपाद कुटासकर	:	कामगार प्रतिनिधी
७.	कक्ष अधिकारी, कामगार-७, मंत्रालय, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
८.	श्री.चंद्रकांत राऊत	:	सहायक कामगार आयुक्त, कार्यासन-३०, मुंबई.
९.	श्री. अशोक ताबे	:	लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

बैठकीच्या सुरुवातीस मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

केले तसेच मंडळाच्या सचिव यांनी मंडळाचे अध्यक्ष यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांसंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरित करण्यात आला.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी बैठकीचे कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन बैठकीस सुरूवात करण्याची परवानगी दिली.

मंडळाच्या सचिव यांनी सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा करण्यात येत असल्याचे सांगितले.

बैठकीची विषयसूची

अ. क्र.	विषय	घेण्यात आलेले निर्णय
१.	दि.१६.०६.२०१६ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या ३२ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे.	मा. अध्यक्षांच्या परवानगीने मागील बैठकीच्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
२.	मंडळातील नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुंटुबियांसाठी राज्य शासनाची "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" लागू करणेबाबत.	याबाबत बोलतांना मंडळाचे सचिव यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना खाजगी विमा ब्रोकर कंपनीमार्फत आरोग्य विमा योजना लागू करणे प्रस्तावित होते. त्यासाठी मंडळामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक २३.०६.२०१६ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु करावयाच्या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या रुग्णालयाची अधिकची संख्या आणि मिळणाऱ्या आरोग्य सुविधांचा दर्जा हा खाजगी विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणाऱ्या आरोग्य योजनांपेक्षा चांगला असल्यामुळे, तसेच बांधकाम कामगारांची संख्या पाहता विमा हफ्त्यापोटी करावा लागणारा खर्चही खाजगी विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांपेक्षा फारच

कर्मी असल्याने सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत एक स्वतंत्र गट म्हणून बांधकाम कामगारांचा समावेश करण्यात यावा. यासाठी कामगार विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाने बांधकाम कामगारांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यासाठी संयुक्तरित्या कार्यपध्दती तयार करावी. तसेच बांधकाम कामगारांचा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रस्तावित योजनेत समावेश करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये बांधकाम कामगारांचे नोंदणी प्रमाणपत्र / ओळखपत्र हा पुरावा म्हणून पुरेसा समजण्यात यावा. त्यासाठी इतर कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता राहणार नाही, अशी तरतूद "महात्मा फुले जन आरोग्य विमा योजना" अंतर्गत करण्यात यावी, असेही निदेश मा. मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, असे मंडळाच्या सचिव यांनी सर्व उपस्थितांना सांगितले.

दि.२७.०६.२०१६ रोजी मा. कामगार आयुक्त, मंडळाचे सचिव, कामगार उप आयुक्त, श्री. काकतकर व मंडळाचे लेखाधिकारी यांची मा. आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना आरोग्य विमा योजना लागू करणेबाबत त्यांचे पात्रता व निकष यावर चर्चा केली. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी कामगारांचे ओळखपत्र व कुटूंबियांसाठी नाते संबंधाचा पुरावा म्हणून रेशनकार्ड व त्यांचे फोटो आयडी घेण्याबाबतही ठरविण्यात आले. त्या अनुषंगाने दि.२७.०६.२०१६ रोजी मा. आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.

तद्नंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२२.०७.२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरून सदर योजना बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांना लागू करण्याकरीता निर्गमित करावयाच्या शासन निर्णयाचे प्रारूप शासनास दि.२९.०७.२०१६ रोजी सादर करण्यात आलेले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१६ रोजी निर्गमित शासन निर्णयान्वये सदरची योजना दि.०२.१०.२०१६ पासून संपूर्ण महाराष्ट्रात

		लागू होणार आहे. मा.मंत्री (कामगार) महोदय यांनी असे सूचविले की, कामगारांना सदर योजनेची माहिती व्हावी या दृष्टिकोनातून सदर योजनेची प्रसिध्दी होण्यासाठी संपूर्ण राज्यामध्ये विविध ठिकाणी सदर योजनेबाबत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, जेणेकरुन, जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. यावर मा. कामगार आयुक्त यांनी त्याबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्याच्या सूचना मंडळाच्या सचिव यांना दिल्या. याबाबत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. ठराव : **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महात्मा फुले जन आरोग्य विमा योजनेची कामगारांना माहिती व्हावी या दृष्टीकोनातून सदर योजनेबाबत राज्यस्तरावर तसेच सर्व विभागीय स्तरांवर कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत सर्वानुमते ठराव घेण्यात आला.**
३.	**मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्य यंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत.**	मंडळाच्या सचिव यांनी सांगितले की, मंडळाच्या दि. ३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि. ०१.१०.२०१५ रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये बांधकाम कामगार नोदणीसाठी आवश्यक माहिती/कागदपत्रे जमा करण्यासाठी बाहय यंत्रणेची नियुक्ती करण्याचा ठराव घेण्यात आला. तसेच मंडळाच्या दि. ०२.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने RFP Document तयार करण्यासाठी मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल.पी.पी. या कंपनीच्या Consultant ची नियुक्ती करण्यात आली.

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे उपस्थितीत दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३४ वी बैठक समिती कक्ष, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. श्री. ओमप्रकाश यादव	:	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२.	मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
३.	मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
४.	श्रीम. वंदा धवल आगटे	:	मालक प्रतिनिधी
५.	श्री. अशोक गोविंदराव भुताड	:	कामगार प्रतिनिधी
६.	श्री. श्रीपाद कुटासकर	:	कामगार प्रतिनिधी
७.	कक्ष अधिकारी, कामगार-७, मंत्रालय, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
८.	श्री.चंद्रकांत राऊत	:	सहायक कामगार आयुक्त, कार्यासन-३०, मुंबई.
९.	श्री. अशोक तांबे	:	लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

बैठकीच्या सुरुवातीस मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०३.०९.२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे उपस्थितीत दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दु. ३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३४ वी बैठक समिती कक्ष, कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. श्री. ओमप्रकाश यादव	:	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२.	मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
३.	मा. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
४.	श्रीम. वंदा धवल आगरे	:	मालक प्रतिनिधी
५.	श्री. अशोक गोविंदराव भुताड	:	कामगार प्रतिनिधी
६.	श्री. श्रीपाद कुटासकर	:	कामगार प्रतिनिधी
७.	कक्ष अधिकारी, कामगार-७, मंत्रालय, मुंबई.	:	शासकीय प्रतिनिधी
८.	श्री.चंद्रकांत राऊत	:	सहायक कामगार आयुक्त, कार्यासन-३०, मुंबई.
९.	श्री. अशोक ताबे	:	लेखा अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

बैठकीच्या सुरुवातीस मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा.मंत्री (कामगार) महोदय यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत

		अर्ज क्र.१ प्रसुती जर शस्त्रक्रियेद्वारे झाली असेल तर त्याचा संपूर्ण खर्चाच्या पावत्या मागण्यात येऊ नये. केवळ प्रसूतिबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व बाळाचे जन्म प्रमाणपत्र घेण्यात यावे. **अर्ज क्र.२** * बोनाफाईड सर्टिफिकेट असल्यानंतर पुन्हा शाळेचा दाखला घेणे अपेक्षित नाही. * कामगाराच्या पाल्याच्या शैक्षणिक आर्थिक सहाय्यासाठी पत्नीच्या आधार कार्ड / मतदान कार्ड / पॅन कार्ड इ. ची आवश्यकता नाही. **अर्ज क्र.४** ११ वी १२ वी शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याचा पुरावा असा उल्लेख करावा प्रवेश पावती अपेक्षित नसावी. **अर्ज क्र.१३** गंभीर आजारी व्यक्तीच्या वयाबाबतच्या पुराव्याची आवश्यकता नसावी. - याबाबत सविस्तर चर्चेअंती खालील ठराव घेण्यात आला. **ठराव :** **कामगार प्रतिनिधी श्री कुटासकर यांनी सुचविलेल्या उपरोक्त सुधारणांसह मंडळाच्या योजनांचे अर्जांचे नमूने व सोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या यादीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर अर्जाचे नमुने व कागदपत्रांची यादी सर्व जिल्हा कार्यालयांना उपलब्ध करून देऊन यापुढे लाभार्थ्यांना त्याप्रमाणे अर्ज करण्याबाबत कळविण्यात यावे, असेही सर्वानुमते ठरले.**
५.	मंडळातील नोंदीत बांधकाम	सदर विषयाबाबत चर्चा करतांना सचिव असे म्हणाल्या की, दि.०८.१०.२०१५

	कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्यास आर्थिक सहाय्य देणेबाबत ठराव घेणे.	रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाने बांधकाम कामगारांच्या नैसर्गिक मृत्यूकरीता प्रधान मंत्री जीवन ज्योती बीमा योजनेअंतर्गत लाभ देण्याबाबत आदेशीत केलेले आहे. मंडळामार्फत प्रधान मंत्री जीवन ज्योती बीमा योजना राबविण्याबाबतची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. तथापि, मंडळाकडील नोंदणी ही सतत/रोजच होणारी प्रक्रिया असल्याने काही नोंदीत कामगारांचे प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजनेंतर्गत समावेश होण्याआधीच त्यांचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास आर्थिक सहाय्य मिळावे या हेतूने रू.२ लाख इतका लाभ देणेबाबत ठराव घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. **याबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.** ठराव : **बांधकाम कामगाराचा कामावर असतांना किंवा नसतांना कोणत्याही ठिकाणी नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु.२ लाख इतके अर्थसहाय्य देण्याबाबत ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. सदर ठरावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर योजना राबविण्यात यावी व पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना किंवा मंडळाची सदरची योजना यापैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ संबंधित कामगाराच्या वारसास घेता येईल, असेही सर्वानुमते ठरले.**
६./ ११.	विषय ६ : i) केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशाबाबत ठराव घेणे.	सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले की, केंद्र शासनाच्या दि.०९.०९.२०१५ रोजीच्या आदेशान्वये मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. केवळ सोशल सिक्युरिटी

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या
दिनांक २२.०९.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची दिनांक २२.०९.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हील, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी पाटील निलंगेकर	मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण.
२.	श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ.
३.	श्री. यशवंत केरुरे	मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी)
४.	श्री. मु. अ. नकवी	मा. संचालक व लेखा कोषागारे (शासकीय प्रतिनिधी)
५.	श्रीमती वेदा आगटे	मा. मालक प्रतिनिधी
६.	श्री. श्रीपाद कुटासकर	मा. कामगार प्रतिनिधी
७.	श्री. विजय देवरुखकर	मा. कामगार प्रतिनिधी
८.	श्री. अशोक भुताड	मा. कामगार प्रतिनिधी

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

		"महाकामगारआवास योजना" च्या अटी शर्ती, घरांची किंमत, मंडळाचा व लाभार्थ्यांचा हिस्सा, दरमहा अदा करावयाचा हफ्ता या विविध मुद्यांवर मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. नोंदित बांधकाम कामगाराने दरवर्षी कमीत कमी ९० दिवस काम करण्याची अट पुर्ण न केल्यास सदर कामगाराची नोंदणी संपुष्टात येते. अशा सर्व बाबींवर विचारविनिमय करण्यात आला. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. **ठराव: गृहनिर्माण विभागामार्फत प्रस्तावित इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "महाकामगारआवास योजना" ऐवजी मंडळाने नोंदित बांधकाम कामगारांच्या घराकरीता मंजूर केलेल्या विविध ठरावानुसार सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त करावी. तसेच मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या ठरावात बदल करून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र नोंदित बांधकाम कामगारांकरीता केंद्रशासन व राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान रु. २.५ लक्ष शिवाय मंडळाकडून रु.२ लक्ष अनुदान देण्यात यावे. तसा सुधारित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**
८.	**नोंदित बांधकाम कामगारांच्या**	याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना त्यांनी घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम

	घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत.	मंडळामार्फत देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर योजना कर्नाटक, हरियाणा व राजस्थान या राज्यांमध्ये राबविण्यात येत त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	कर्नाटक	हरियाणा	राजस्थान
योजनेचे नाव	घरखरेदीबाबत आर्थिक सहाय्य	अधिनियमाच्या नियम ५३ अन्वये घर खरेदी/ घर बांधणे करीता कर्ज	बांधकाम कामगारांकरीता सुलभ गृहनिर्माण योजना
योजनेचा तपशील	अ) पात्रता १. बांधकाम कामगारांची नोंदणी कमीत कमी ०५ वर्षे जिवीत असली पाहिजे. २. कामगाराने निवृत्ती वेतन सेवेची १५ वर्षे पूर्ण केलेली असली पाहिजे. ३. घर कामगाराच्या किंवा त्याच्या जोडीदाराच्या नावे असणे बंधनकारक	अ) पात्रता १. ०५ वर्षे नोंदणी जिवीत असणे बंधनकारक २. कामगार फक्त एकदाच लाभ घेऊ शकतो. ३. सर्व बांधकाम कामगारांना लागू ४. कामागराच्या मृत्यू लागू राहणार नाही.	अ) पात्रता १. कामगाराची मागील एक वर्षात नोंदणी झालेली असणे बंधनकारक २. जर घर स्वता:च्या जमिनीवर बांधले असेल तर सदर प्लॉटवर स्वत: किंवा पत्नी/ पती यांची मालकी बंधनकारक ३. सदर मालमत्तेवर कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद असू नये.

			आहे.		४. बँकेकडून / वित्तीय संस्थेकडून कर्जा व्यतिरिक्त स्वत:च्या बचतीचा सहभाग असावा ५. बांधकाम जागेचे तसेच आराखडयाचे परवाने महानगरपालिकेकडून मंजूर करून घेणे बंधनकारक ६. बांधकामाची जागा कायदेशीर वारसाच्या नावे असणे बंधनकारक. ७. कामगाराच्या नावे स्वताचे घर असल्यास तो सदर योजनेत लाभ घेऊ शकणारी नाही. ८. सदर घराची पती पत्नीच्या नावे संयुक्त मालकी असावी.
			ब) लाभ १. सदर योजनेत नोंदीत	ब) लाभ १. ०५ वर्षे नोंदणी जिवीत	ब) लाभ १. केंद्र शासन व राज्य शासनाच्या

			बांधकाम कामागरांना अर्ज करून लाभ घेता येणे शक्य २. बांधकाम कामगारांच्या नावे घराचे खरेदीखत,मंजूर आराखडा इ. चा तपशील सादर करावा लागेल . ३. मंडळामार्फत घर खरेदी, घरबांधकाम व त्यावरील कर्जाच्या प्रस्तावाचे छाननी करण्यात येईल. ४. सदर योजनेचा अर्ज नाकारताना अर्जदारास सदर योजनेत राहिलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संधी दिली जाते.	असणे बंधनकारक आणि २. अर्जदाराचे वय कमीत कमी ५२ वर्षेपेक्षा जास्त असू नये सदर योजनेचे कर्जाची परतपेड पुढील ०८ वर्षात करता यावी. ३. सदर योजनेचा लाभ फक्त एकदाच घेणे शक्य	विविध योजनांमध्ये पात्र ठरल्यास रू.१.५० लक्ष पर्यंत अनुदान देय राहील. २. स्वताच्या प्लॉटवर घर बांधण्यासाठी आलेल्या खर्चाच्या २५% (बांधकाम खर्चाची मर्यादा रू. ५ लक्ष) अनुदान देय राहील.
			क) रक्कम १. रू.५०,०००/- पर्यंत अनुदान (Subsidy) अनुदान बँक/	क) लाभ रक्कम रू. २ लक्ष	क) प्राधान्यक्रम १. दारिद्रयरेषेखालील कामगार पिवळे २. मागासवर्गीय कामगार ३. विशेष पात्रता

			वित्तीय संस्थाना अदा करण्यात येईल. २. अर्जदाराचे कर्ज रू.२ लाखापेक्षा कमी असू नये . सदर कर्जाची रू.५०००० /- अनुदान (Subsidy) वगळता उर्वरित रक्कम रू. १.५ लक्ष रक्कमेवरील ०५% पेक्षा जास्त दराने येणाऱ्या व्याजाची रक्कम मंडळामार्फत अदा करण्यात येईल. ३. अर्जदाराने घरबांधणीच्या पूर्णत्वाचा दाखला		४. फक्त दोन मुली असलेले कामागार ५. एका वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता (२,३ किंवा ४ वर्षे) नोंदीत बांधकाम कामगार

	व घरखरेदीच्या करारनाम्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.		
		ड) बांधकाम कामागरांना घरखरेदी/ बांधकामाकरीता रू.२ लक्ष पर्यंत बिन व्याजी कर्ज	

उक्त तक्त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबवावयाच्या योजनेचा प्रस्तावित तपशील खालीलप्रमाणे

मंडळाचे नाव	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई
योजनेचे नाव	नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रू. ६ लक्ष च्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत
योजनेचा तपशील	पात्रता १. मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदीत बांधकाम कामगार २. कामगाराचे वय १८ ते ५२ वर्षे या दरम्यान असावे. ३. घरबांधणीकरीता कर्ज घेताना स्वत:च्या मालकीची जागा, सक्षम

		प्राधिकाऱ्याने मंजूर केलेला आराखडा सादर करणे आवश्यक राहील. ४. घरखरेदी करताना घरखरेदीकरीता विकासकासोबत केलेला नोंदणीकृत करारनामा . ५. कर्ज घेतलेल्या घराची पती पत्नीची संयुक्त मालकी असावी. ६. सदर मालमत्तेवर कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद (Dispute) असू नये. ७. घरखरेदी किंवा घर बांधणी करीता घेतलेल्या कर्जाबाबत बँकेचे कर्जमंजूरीचे आदेश. ८. सदर योजनेचा लाभ एकाच घरासाठी (एकदाच) देय रहील.
	योजनेचा लाभ	१. पात्रता धारण करीत असलेल्या बांधकाम कामागरास बँकेने मंजूर केलेल्या कर्जापैकी रू. ६ लक्ष पर्यंतच्या कर्जावरील संपूर्ण व्याज मंडळाकडून देण्यात येईल. २. व्याजाची संपूर्ण रक्कम बांधकाम कामगाराच्या बँकेतील कर्ज खात्यात थेट जमा करण्यात येईल. ३. पात्र बांधकाम कामागरांना देय व्याजाची रक्कम बँकेच्या मासिक विवरणानुसार देय राहील.

नोंदीत बांधकाम कामगाराच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रू. ६ लक्ष च्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत व प्रस्तावित अटी शर्तीमध्ये योग्य तो बदल करून योजना मंजूरीबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

अध्यक्ष

		मंडळाच्या मान्यतेअंती मंजूर अटी शर्तीसह योजनामंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला. **ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या रु. ६ लक्ष रक्कमेच्या मर्यादेत गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देण्यात यावी. मंडळामार्फत द्यावयाची गृहकर्जावरील व्याजाची रक्कम बांधकाम कामगाराच्या बँकेच्या कर्ज खात्यात जमा करताना खालील अटींचे पालन करावे:** १. बांधकाम कामगार मंडळाकडे सलग तीन वर्षे नोंदीत असावा. २. बांधकाम कामगाराचे वय १८ ते ५२ वर्षे या दरम्यान असावे. ३. बांधकाम कामगाराने घरबांधणीकरीता कर्ज घेताना स्वत:च्या मालकीची जागा, सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेला आराखडा सादर करणे आवश्यक राहील. ४. घरखरेदी करताना विकासकासोबत केलेला नोंदणीकृत करारनामा सादर करणे अनिवार्य राहिल. ५. बांधकाम कामगाराने कर्ज घेतलेल्या घराची मालकी पती-पत्नीची संयुक्त असावी. ६. सदर मालमत्तेवर बांधकाम कामगाराचा पूर्ण हक्क असावा. सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद (Dispute) असू नये. ७. घरखरेदी किंवा घर बांधणी करीता घेतलेल्या कर्जाबाबत बँकेचे कर्जमंजूरीचे आदेश आवश्यक राहतील. ८. सदर योजनेचा लाभ कूटुंबाच्या एकाच घरासाठी (एकदाच) देय रहील.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ३०/१०/२०१८ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४८ वी बैठक मंगळवार दिनांक ३०/१०/२०१८ रोजी दुपारी २.३० वा. सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

१.	मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर	मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण.
२.	श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव	अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ
३.	मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव	शासकीय प्रतिनिधी
३.	मा. श्री. शशांक साठे, उप सचिव	शासकीय प्रतिनिधी
४.	मा. श्री. सतिश मगर,	मालक प्रतिनिधी
३.	मा. श्रीमती वेदा आगटे	मालक प्रतिनिधी
४.	मा. श्री. श्रीपाद कुटासकर	कामगार प्रतिनिधी
५.	मा. श्री. विजय देवरुखकर	कामगार प्रतिनिधी
६.	मा. श्री. अशोक भुताड	कामगार प्रतिनिधी
७.	मा. श्री. धनंजय माळी	संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष (निमंत्रित)
८.	मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम्	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक १८/०७/२०१८

विषय क्र.०३ :- प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधकाम कामगारांना ग्रामीण भागाकरीता अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत.

मंडळ सचिवांनी सादर केले की, राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी शहरी भागाकरीता प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्याकरीतेचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कामगार विभागाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच, गृहनिर्माण विभागाच्या दि.०३.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती, व सदर योजनेकरीता बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटी मंडळ व कामगार विभागाने निश्चित करणेबाबत आदेशात नमूद करण्यात आले होते. त्यानुसार, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २९.१०.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शहरी भागातील बांधकाम कामगार आवास योजनेतील पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे. (प्रत संलग्न)

मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास शासनाने दि.१७.०१.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांना पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भागातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता लागू करणेबाबत क्षेत्रीय स्तरावर होत असलेली मागणी विचारात घेऊन सदर योजनेच्या अंमबजावणीकरीता योजनेच्या अटी, शर्ती व लाभाची रक्कम निश्चित करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला, उप संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई व प्रकल्प संचालक डीआरडीए यांना दि.२३.०८.२०१८ रोजी बैठकीकरीता आमंत्रित करण्यात आली होती.

सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेल्या आहेत.

योजनेचे नाव:- नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणे.

लाभार्थीची पात्रता :-

१. मंडळाकडे नोंदीत व सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सदर अर्थसहाय्य देय राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांचे स्वत:च्या नावे महाराष्ट्र राज्यात पक्के घर (सिमेंट व वाळूने बांधलेले घर) नसावे.

३. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत योजनेच्या अनुदानाव्यतिरिक्त रू.८०,०००/- एवढा अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील.

४. ग्रामीण घरकुल योजनेस पात्र परंतु घरकुल बांधण्यासाठी स्वत:ची जागा नसलेल्या बांधकाम कामगार, पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभास पात्र राहील.

५. प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनेस लागू असणारे पात्रतेचे सर्व निकष सदरील लाभ घेण्यासाठी लागू राहतील.

६. घरकुलास पात्र लाभार्थीच्या कुटूंबातील कोणताही सदस्य नोंदीत बांधकाम कामगार असल्यास सदर लाभार्थी रू.८०,०००/- अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहील. तसेच कुटूंबातील केवळ एकाच व्यक्तीस सदर अर्थसहाय्य देय राहील.

७. एकदा लाभ घेतल्यानंतर बांधकाम कामगार पुनश्च: लाभास पात्र राहणार नाही. तसेच सदर घरकुल पुढील ०५ वर्ष हस्तांतरीत/ विक्री करता येणार नाही तसे रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र (Affidavit) सादर करावे लागेल.

अर्थसहाय्य मिळविण्याची पध्दत:-

१. राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग, नवी मुंबई ही संस्था सदर योजनेकरीता समन्वय संस्था (Nodel Agency) म्हणून कार्यरत राहील.

२. नोंदीत बांधकाम कामगारांची जिल्हानिहाय यादी मंडळाकडून उपलब्ध करून देण्यात येईल.

३. नोंदीत बांधकाम कामगार प्रस्तावित योजनेकरीता पात्र ठरविल्यानंतर मंडळाकडून मंजूर अर्थसहाय्याची रक्कम राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण विभाग या संस्थेकडे वर्ग करण्यात येईल.

४. घराच्या बांधकामाच्या प्रगतीनुसार राज्य व्यवस्थापन कक्षाकडून टप्पानिहाय अनुदान बांधकाम कामगारांच्या खात्यावर PFAMS प्रणालीद्वारे वर्ग करण्यात येईल.

५. सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी मंडळामार्फत केली जाईल व सदर प्रचार प्रसिध्दीचा खर्च अटल विश्वकर्मा सन्मान योजनेवर खर्ची टाकण्यात येईल.

यथाप्रस्तावित नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेंतर्गत अर्थसहाय्य देणेबाबत लाभाची पात्रता, आवश्यक कागदपत्रे व अर्थसहाय्य वाटपाची रक्कम यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी. मंडळाने मान्यता प्रदान केल्यानंतर शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असा प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजनेनुसार पात्र लाभ धारकाला अर्थसहाय्य कसे मिळेल यांची माहिती दिली. त्यावर श्री. मगर यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांना सदर योजनेमध्ये समन्वय सस्था म्हणून न नेमता सदर योजनेची रक्कम कामगाराच्या बँक खात्यामध्ये थेट वर्ग करण्यात यावी असे नमुद केले. यावर मा. अध्यक्ष यांनी श्री. मगर यांनी नमुद केलेल्या प्रस्तावावर विचार करावा असे सांगितले. त्या नंतर मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा. अध्यक्ष यांना कामगारांना योजनेचे रु. २ लाख कामगारांना कसे मिळतील याबाबतची प्रस्तावित कार्यपध्दती विषद केली.

बैठीस उपस्थित संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी त्यांच्या मार्फत सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाकडून मंजूर झालेल्या व सद्यस्थितीत कक्षामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. मंडळाची प्रधानमंत्री आवास योजना व त्यांची योजना एकत्रित कशा राबविता येवू शकतील याबाबत मा. अध्यक्षांनी विचारणा केली. त्यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी मंडळाने आपल्या नोंदीत सक्रीय (जिवित) कामगारांची यादी कक्षास द्यावी आणि राज्य व्यवस्थान कक्ष आपल्याकडील यादीशी ताळमेळ घेवून त्यांच्याकडील यादीत असलेले व पात्र बांधकाम कामगारांची यादी मंडळाला

पाठवतील व मंडळ स्तरावरुन निधी कक्षाकडे वर्ग करावा लागेल याबाबत स्पष्ट करतांना संचालकांनी खुलासा केला की, आमच्या कक्षामध्ये आगामी तीन ते चार वर्षात वितरीत करावयाच्या अंदाजे १२ लक्ष लार्भार्थ्यांची यादी निवडण्यात आली आहे. तथापी सदर निवडलेल्या यादीत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगार असल्यास सदर बांधकाम कामगारांना योजनेचा लाभ देता येईल अन्यथा लाभ मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागेल. अशी प्रतिक्षा करणे बाबत सर्व मंडळ सदस्यांनी विरोध दर्शविला, मंडळाकडे निधी उपलब्ध असतांना पात्र लाभार्थ्यांना त्वरीत लाभ मिळावा असे मत व्यक्त केले. या संदर्भात सविसतर चर्चेअंती मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, मंडळाचे सचिव व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष यांनी एकत्र बैठक घेवून आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल योजनेचा अभ्यास करावा व त्याच धर्तीवर नोंदीत बांधकमा कामगारांसाठी स्वतंत्र योजना तयारी करावी व ग्राम विकास विभागाच्या सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनेअंतर्गत रु. २.५० लक्ष एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे असे प्रतिपादन केले.

योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मंडळस्तरावर एक कार्यकारी अभियंता व एम उप अभियंता नेमण्यात यावा व आणखी काय करता येईल हे बघावे असे सांगितले. त्यावर संचालक राज्य व्यवस्थान कक्ष यांनी असे नमुद केले की, सदर योजनेचे उदिष्ट लवकरात लवकर सफल होण्यासाठी ग्रामिण भागामध्ये ग्रामसेवकांना प्रोत्साहन देता येवू शकेल.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते खालील ठरात घेण्यात आला.

ठराव क्र. ४८(३)/२०१८: प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता आदिवासी विकास विभागाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रमाई घरकुल **योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना तयार करावी ग्रामीण भागाकरीता प्रती लाभार्थी रु. २.५० लक्ष ऐवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. सदर योजना ग्रामविकास विभागाच्या** सहमतीने राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत राबविण्यात यावी. सदर योजनेच्या

कार्यन्वयाकरीता मंडळ स्तरावर सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या संवर्गातील एक पद निर्माण करावे. सदर पद मंडळामार्फत थेट नियुक्तीने अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात यावे. सदर योजनेच्या लाभार्थी निवडीच्या अटी शर्ती, योजना राबविण्याची पध्दती, अनुदान वितरणाची पध्दत निश्चित करुन योजना मंजूरीचा प्रस्ताव लवकरात लवकर शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

गृह निर्माण विभागामार्फत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणा-या शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील पात्रता निश्चीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन

उद्योग,उर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक: इबांका २०१७/प्र.क्र. ३६०/कामगार ७

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक: २९ ऑक्टोबर, २०१८.

वाचा-

शासन निर्णय गृहनिर्माण विभाग क्र.प्रआयो-२०१५/प्र.क्र.१०८/गृनिधो-२, दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८.

प्रस्तावना:-

देशातील प्रत्येक कुटुंबाला हक्काचे घर उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने केंद्र सरकारने जून, २०१५ मध्ये सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन गृह निर्माण विभागामार्फत दिनांक ०९ डिसेंबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यात प्रधानमंत्री आवास योजना कार्यन्वित करण्यात आली आहे. सदर योजनेची व्याप्ती वाढवून त्यात राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील बांधकाम कामगारांचा समावेश करुन दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये शहरी भागासाठी महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना जाहीर करण्यात आली आहे. त्यात लाभार्थी म्हणून पात्र होण्यासाठी खालील अटी व शर्ती निश्चीत करण्यात आलेल्या आहेत.

अ) महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेंर्तगत लाभास पात्र असणारा गृहनिर्माण प्रकल्प महारेरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नोंदणीकृत असावा.

ब) लाभार्थी कामगार हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत व योजनेंतर्गत पात्र असावा.

क) वरील ब) प्रमाणे पात्र कामगार, अट व क्रमांक अ) प्रमाणे नोंदणीकृत कोणत्याही प्रकल्पातील घरकुल योजनेत सहभागी झाल्यास महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेंर्तगत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून देय प्रती लाभार्थी रु.२ लक्ष इतके अनुदानास पात्र राहील.

२. दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये बांधकाम कामगाराची पात्रता निश्चित करण्यासंदर्भात संबधीत मंडळ व कामगार विभाग यांच्यावर जबाबदारी सोपवलेली आहे. त्यास अनुलक्षून शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील सदनिकेसाठी अर्ज करण्यासाठी बांधकाम कामगाराची पात्रता खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

अ. योजनेच्या अंमलबजावणीसाठी निवडलेले कार्यक्षेत्र व अर्ज करण्या-या नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारास अर्ज करावयाचे कार्यक्षेत्र.

(१) दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेस मान्यता देण्यात आली असून सदर योजनेची अंमलबजावणी ही संचालक, राज्य अभियान संचालनालय (सुकाणू अभिकरण) यांचे मार्फत करण्यात आलेली असून ही सुकाणू अभिकरण हे शहरी भागात कार्यरत आहे.

(२) सदर योजनेंर्तगत शहरी भागातील निवडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पातील सदनिकेसाठी त्याच जिल्ह्यातील नोंदणीकृत (सक्रिय) असलेले बांधकाम कामगार मागणी करु शकतील. मात्र मुंबई, नवी मुंबई व ठाणे क्षेत्रातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील परिघामधील प्रकल्पांमध्ये उपलब्ध असलेल्या सदनिकेसाठी मागणी करु शकतील.

ब. सदनिका उपलब्ध असणा-या प्रकल्पाची माहिती, पात्रता तपासणी व लाभार्थी निवड

(१) महारेरा अधिनियम २०१६ अन्वये नोंदणीकृत असलेल्या विकासकास प्रधानमंत्री आवास योजनेतील मंजूर गृहनिर्माण प्रकल्पासाठी शासनाच्या वेगवेगळ्या विभागामार्फत सूट व सवलती देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुलक्षुन महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेंर्तगत शहरी भागातील प्रकल्पातील सदनिकेची किंमत, सदनिकेचे क्षेत्रफळ प्रमाणीत करणे, तसेच गृहनिर्माण प्रकल्पाचे स्थळ निश्चीत करुन त्याची यादी गृह निर्माण विभाग, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करेल. या यादीतील सदनिकेसाठी इच्छुक व पात्र होणा-या बांधकाम कामगारांची नावे, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी संचालक, राज्य अभियान संचालनालयाकडे (सुकाणू अभिकरणास)सादर करावीत.

(२) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पातील सदनिकांसाठी संचालक, राज्य अभियान संचालनालयाकडे (सुकाणू अभिकरणास) प्राप्त झालेल्या अर्जापैकी नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांचे अर्ज, सदर अर्जांची पात्रता तपासण्यासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे वर्ग करण्याची कार्यवाही संचालक, राज्य अभियान संचालनालय (सुकाणू अभिकरणास)यांनी करावी.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने संचालक, राज्य अभियान संचालनालय यांचेकडे (सुकाणू अभिकरणास)सादर केलेल्या यादीतील नावातून लाभार्थी म्हणून निवड करण्याचे अधिकार व त्यासाठी आवश्यक प्रक्रिया राबविण्याचे अधिकार सुकाणू अभिकरणास राहतील. सुकाणू अभिकरणाने सदनिका वाटपाकरिता अंतिम केलेला नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगार लाभार्थी म्हणून मंडळाच्या अनुदानास पात्र राहील.

क. अर्ज करण्यासाठी बांधकाम कामगाराची पात्रता

दिनांक ०३ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केलेल्या शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेतील सदनिकेसाठी अर्ज करण्यासाठी बांधकाम कामगारांची पात्रता खालील प्रमाणे राहील.

(१) शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगार हा नोंदणीकृत (सक्रिय) असावा तथापि तो महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सलग एक वर्षापेक्षा अधिक, बांधकाम कामगार म्हणून नोंदणीकृत असावा.

(२) शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेअंतर्गत लाभार्थी म्हणुन निवडलेला बांधकाम कामगार हा महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील रु.२ लक्ष अनुदानास पात्र आहे. मात्र सदर अनुदान संचालक, राज्य अभियान संचालनालय यांच्या अधिनस्त असलेल्या राज्य अभियान संचालनालयाकडे जमा करण्यात येईल.

(३) बांधकाम कामगारांच्या नावे अथवा त्यांच्या पती/पत्नीच्या नावे स्वत:ची सदनिका नसेल असेच बांधकाम कामगार, शहरी भागातील महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील. तसे त्यांनी रु. १०० च्या मुद्रांकावर (Stamp Paper) लेख प्रमाणक (Notary) करुन देणे अनिवार्य राहील.

(४) सदनिका प्राप्त झाल्यापासून पुढील पाच वर्षापर्यंत कोणत्याही प्रकारे बांधकाम कामगारास सदनिका हस्तांतरीत करता येणार नाही.

२. सदरचे शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८१०२९१२३८३६५६१० असा आहे. तसेच सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2018.10.29 12:42:10 +05'30'

(श. मा. साठे)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
४. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
६. मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे स्वीय सहायक.

७. मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा) यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
९. सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१०. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
११. समितीचे इतर सर्व सदस्य (व्दारा कामगार आयुक्त)
१२. कामगार आयुक्त, मुंबई / अतिरिक्त कामगार आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर.
१३. उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
१४. सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
१५. महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१६. महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८. निवडनस्ती (कामगार-७).

महाराष्ट्र शासन

इबांका -२०१७/प्र.क्र.४७४/काम ७,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक:- १७ जानेवारी,२०१८

प्रति,

कामगार आयुक्त,
"कामगार भवन",
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई -५१.

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतरबांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत पात्र बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबत.

संदर्भ:- १.आपला दिनांक २७ ऑक्टोबर २०१७ रोजीचा प्रस्ताव.
२.शासनपत्र समक्रमांक दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७.
३.आपले दिनांक ३० नोव्हेंबर,२०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

महाराष्ट्र इमारत व इतरबांधकाम कामगार कल्याण मंडळातील नोंदीतपात्र बांधकाम कामगारांच्या घरखरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृह कर्जावरील व्याजाची रक्कम मंडळामार्फत देणेबाबतच्या योजनेच्या अंमलबजावणीस खालील नमूद अटी/शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

I. राष्ट्रीयीकृत बँकेने मंडळाकडील नोंदणीकृत पात्र बांधकाम कामगारास रु.६ लक्ष अथवा त्यावरील कर्ज महत्तम १० वर्षाच्या कालावधीत परतफेड करण्याच्या करारावर मंजूर केले असेल तर महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ केवळ रु.६ लक्ष भांडवलावर आकारलेले वर्षनिहाय व्याज बँकेस अदा करेल. तथापि मंडळाकडून प्रत्येक वर्षी बांधकाम कामगाराची पात्रता तपासणे अनिवार्य राहील.

II. योजनेअंतर्गत मंडळामार्फत बांधकाम कामगाराच्या गृहकर्जावरील द्यावयाच्या व्याज अनुदानाची महत्तम मर्यादा रु.२ लक्ष राहील. तसेच कर्ज मंजुरीसोबत बांधकाम कामगारांच्या कर्जाचा विमा काढणे अनिवार्य राहील.

iii. सदर योजनेचा लाभ वय वर्ष १८ ते ५० वयोगटातील नोंदणी पात्र बांधकाम कामगार घेण्यास पात्र राहतील.

iv. नोंदीत पात्र बांधकाम कामगार यांच्या स्वत:च्या अथवा पती/पत्नीच्या नावे घर नसेल अस्तेच बांधकाम कामगार या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतील व त्या आशयाचे हमीपत्र बांधकाम कामगारांकडून घेण्यात यावे.

v. सदर योजनेतून लाभ घेताना घर पती- पत्नीच्या संयुक्त नावे नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. तथापि, त्यातून अविवाहीत /विधवा/विधूर/ परितत्क्या बांधकाम कामगारांस वगळण्यात यावे.

आपला,

(द. य.डांगे)

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रत-

१) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई, यांस माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,

२) निवडनस्ती, कामगार-७



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ,मुंबई.
एमएमटीसी हाऊस, तळमजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई, बान्द्रा कुर्ला संकुल,
बांन्द्रा पूर्व, मुंबई ४०० ०५१

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळाच्या ५२ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

****

बैठक स्थळ :- सहपादी अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई
दिनांक :- ०४.०९.२०१९
वेळ :- सकाळी ११.०० वा.

विषय क्र.०२ :- मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहासाठी रु. ५१०००/- अर्थसहाय्य देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेनंतर मंडळाच्या विविध बैठकांमध्ये नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे संदर्भात ठराव पारित करण्यात आले आहेत. मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार योजना मंजूरीचे प्रस्ताव वेळोवेळी शासनास सादर करून शासन मान्यतेअंती योजनेचा लाभ नोंदीत बांधकाम कामगारांना देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत मंडळस्तरावरून नोंदीत बांधकाम कामगारांसाठी एकूण २९ विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सदर योजनांमध्ये नोंदीत बांधकाम कामगारांच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रू.३०,०००/- इतके अर्थसहाय्य मंडळामार्फत दिले जाते. माहे मार्च २०१९ पर्यंत सदर योजनेंतर्गत १७५३ बांधकाम कामगारांना लाभ अदा करण्यात आलेले आहे.

नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता शैक्षणिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, मुलांच्या विवाहकरीता कोणतीही योजना राबविली जात नाही. नोंदीत बांधकाम कामगार, लोकप्रतिनिधी व कामगार संघटनांकडून मंडळास सादर निवेदनामध्ये बांधकाम कामगाराला मिळणारे अल्प वेतनामधून दैनंदिन खर्च भागवून मुलीचे विवाह करताना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. ही बाब विचारात घेता नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य मंडळातर्फे देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. मंडळामार्फत आयोजित विविध कल्याणकारी योजनांच्या वर्धा, अकोला येथील लाभ वाटप कार्यक्रमामध्ये सुध्दा यासंदर्भात मागणी नोंदविण्यात आलेली आहे.

मंडळामार्फत सन २०१८ मध्ये राजस्थान या राज्यातील इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला भेट दिली असता सदर भेटीमध्ये मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली असता राजस्थान या राज्यात नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

नोंदीत बांधकाम कामगार, लोकप्रतिनधी, कामगार संघटना इत्यादींकडून प्राप्त विनंतीस अनुसरून खालीलप्रमाणे योजना मंजूरीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला होता.

योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले होते.

अ. क्र.	योजना व योजनेच्या अटीशर्ती	सादर करावयाचे कागदपत्रे
१.	नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या लग्नाकरीता अर्थसहाय्य	
२.	नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार असावा.	ओळखपत्र/नुतनीकरण
३.	एका मुलीच्या विवाहखर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देय राहील.	ओळखपत्रातील कुटूंबाच्या तपशीलामध्ये मुलीच्या नावाची नोंद असावी.
४.	मुलीचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे.	ओळखपत्रामध्ये जन्म तारखेची नोंद असावी.
५.	मुलीचे शिक्षण कमीत कमी १० वी पर्यंत असावे	१० वी उत्तीर्ण प्रमाणपत्र
६.	मुलीचा विवाह संपन्न झाल्याचा पुरावा सादर करावा.	लग्नपत्रिका/ लग्नाचे फोटो/ विवाह नोंदणी प्रमाणपत्र

उक्त बाबींच्या अनुषंगाने प्रस्तावित मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहखर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. ५१०००/- अर्थसहाय्य देणेबाबतची योजना मान्यतेकरीता सादर करण्यात आली होती.

सदर बैठकीत मा. मंत्री महोदय कामगार विभाग यांनी असे सूचित केले की, प्रस्तावित योजनेच्या अटी शर्तीमधून शिक्षणाची अट वगळण्यात यावी तसेच मुलीचा विवाह संपन्न झाल्याचा पुरावा म्हणून विवाह नोंदणी प्रमाणपत्र घेण्यात यावे. सदर सुचनेस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला

ठराव क्रं. ५२(२)/२०१९ :- नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य मंडळातर्फे देण्याबाबतच्या योजनेस मान्यता प्रदान

करण्यात येत आहे. सदर योजनेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरीता रू.५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देण्यात यावे.
२. मुलीचा विवाह संपन्न झाल्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.
३. नोंदीत बांधकाम कामगाराच्या ओळखपत्रातील कुटूंबाच्या तपशीलात मुलीच्या नावाची नोंद असावी.
४. लग्न झालेल्या मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असू नये. याबाबत वयाचा पुरावा (ओळखपत्रातील नोंद/ जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/ बोनाफाईड सर्टिफिकेट/) सादर करावा.

सदर निर्णयानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल बांन्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५७ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

****

बैठक स्थळ :- सहयाद्री अतिथिगृह, मलबार हिल, मुंबई
दिनांक :- ०२.०३.२०२१ (मंगळवार)
वेळ :- दुपारी ०४.०० वाजता

विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजी संपन्न ५६ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५६ वी बैठक दिनांक २७.१०.२०२० रोजी दुपारी १.०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा.अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. सदर इतिवृत्तातांत काही बदल असल्यास सुचवावा अशी विनंती मंडळ सचिवांनी केली. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५७(१)/२०२१:- मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजीच्या ५६ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

विषय क्र.०२ :- मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येत असणाऱ्या विविध कल्याणकारी योजनामध्ये सुधारणा करणे व नवीन योजना लागू करणेबाबत विचार विनिमय करणे.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली, मा. प्रधान सचिव (कामगार विभाग) व मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत दि.०४.०१.२०२१ रोजी देशातील अन्य ०६ राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांच्या तुलनात्मक सादरीकरणाबाबत संपन्न बैठकीत महाराष्ट्र राज्यातील विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारणा/बदल व नवीन योजना राबविणेबाबत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील ०५ जिल्हा कार्यालयाचे अभिप्राय मंडळास प्राप्त झालेले आहेत. सदर बैठकीतील निर्णय व जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त अभिप्राय विचारात घेऊन मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांमधील बदल/ सुधारणा, नवीन योजना राबविणे प्रस्तावित आहे. तसेच, केंद्र शासनाचे निर्देश व कामगार संघटनांनी उच्च न्यायालयात सादर केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने इमारत व इतर बांधकामावर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता आवश्यक ९० दिवस काम केल्याचे स्वयं साक्षांकित (Self certificate) प्रमाणपत्र घेणेबाबत विचारविनिमयाकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यानुसार सोबतच्या

विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजना, प्रस्तावित सुधारणा/ बदल/ नवीन प्रस्तावित योजना व बांधकाम कामगाराने ९० दिवस काम केल्याचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र याबाबतचा तपशील सादर करण्यात आला होता. सदर तपशीलाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

ठराव क्र.५७(२)/२०२१ :-

१. **मंडळाकडील नोंदित जिवित (सक्रीय) बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनामध्ये सोबतच्या सहपत्रात नमूद केल्याप्रमाणे सुधारणा/ बदल करणे, योजना बंद करणे, प्रस्तावित नवीन ०२ योजना कार्यन्वित करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा.**

२. **सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे बहुतांश कालावधीत शाळा/ महाविद्यालये बंद होती अथवा ऑनलाईन पध्दतीने कार्यरत होती अशा स्थितीत दि.०१.०४.२०२० ते दि.३१.०३.२०२१ या कालावधीत शैक्षणिक सहाय्याच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी शाळा/ महाविद्यालयातील उपस्थितीची अट शिथील करण्यात येत आहे.**

३. **कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत दि.३१.०३.२०२० पर्यंत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना दोन टप्प्यात रू.५०००/- अर्थसहाय्य वाटपाची कार्यवाही दि.३१.०३.२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.**

४. **मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती बांधकाम कामगार, लोकप्रतिनिधी, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था, संबंधित कार्यालये व अन्य संबंधित संस्था व व्यक्ती पर्यंत पोहचविण्यासाठी माहिती पुस्तिका तयार करून सदर माहितीपुस्तिकेचे वाटप करण्यात यावे.**

५. **बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याबाबत स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self Certificate) बाबत अन्य राज्यांकडून माहिती प्राप्त करून मंडळाच्या आगामी बैठकीत विचारविनिमयाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा,**

असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

ब. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित योजनांबाबत मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णयाचा तपशील

अ. क्र.	योजनेचे नाव	मिळणारा लाभ	आवश्यक कागदपत्रे	मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीतील निर्णय
१.	नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराचा अपघात/ नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याचे शव मूळ गावी पाठविण्यास अर्थसहाय्य	बांधकाम कामगाराने नोंदणी करताना घोषित केलेल्या मूळ प्रति कि.मी. रू.२०/- अथवा एस.टी. महामंडळाच्या आगारप्रमुखाने प्रमाणित केलेल्या अंतरासाठी प्रति कि.मी. रू.२०/- प्रमाणे	१. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला २. नामनिर्देशित व्यक्ती उपलब्ध नसल्यास उत्तराधिकारी प्रमाणपत्र ३. अर्जदाराचे आधारकार्ड व बँकेचा तपशील ४. सर्व सत्यप्रतीवर वारसदाराची स्वाक्षरी असावी.	नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगाराचा अपघाती/ नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याचे शव नोंदणी करताना घोषित केलेल्या मूळ गावी पाठविण्यासाठी एस.टी. महामंडळाच्या आगारप्रमुखाने प्रमाणित केलेल्या अंतरासाठी प्रति कि.मी. रू.२०/- प्रमाणे शव वाहतूकीची रक्कम आगाऊ स्वरूपात त्यांच्या वारसास देण्यात यावी.
२.	नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा अपघात होऊन हात किंवा पाय निकामी झाल्यास कृत्रिम हात किंवा पाय बसविण्यासाठी अर्थसहाय्य देणे.	प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे	१. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी हात अथवा पाय निकामी झाल्याचे प्रमाणित करणे. २. कृत्रिम हात किंवा पाय बसविणेबाबत सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचे शिफारस पत्र ३. Artificial Limb Manufacuring Corporation of India कडून कृत्रिम हात किंवा पाय बसविल्याचे प्रमाणपत्र	नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचा अपघात होऊन हात किंवा पाय निकामी झाल्यास बांधकाम कामगाराने कृत्रीम हात/ पाय Artificial Limb Manufacuring Corporation of India, Kanpur (Regional office Navi Mumbai) या संस्थेकडून बसवावा. त्यासाठीचा खर्च Artificial Limb Manufacuring Corporation of India, Kanpur या संस्थेने प्रमाणित केल्याप्रमाणे अदा करण्यात यावा.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई – ४०० ०३२.
दूरध्वनी- ०२२- २२७९३८५५ E-mail ID:- ashok.mande@nic.in

क्र. इबांका २०२१/प्र.क्र.७८/कामगार-७ दि. ०१ फेब्रुवारी, २०२२.

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला,
ई ब्लॉक, सी-२२, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पू.) मुंबई ५१

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांकरिता नविन कल्याणकारी योजना राबविणेबाबत

संदर्भ:- १. आपले पत्र क्र. मइवइबाकमं/मुलीच्या विवाहाकरिता/१५५/२०१९, दि २६.०९.२०१९
२. आपले पत्र क्र. मइवइबाकमं/मंछध्ह बैठक विषय क्र.२/३८/२०२१, दि.४.५.२०२१

महोदय,

विषयाधीन प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये मंडळाने शासनास पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मला आपणांस असे कळविण्याचे निर्देश आहेत की, खाली नमूद केलेल्या तीन योजनांना शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनांची व्याप्ती, नियमावली, लाभार्थ्यांचे निकष इ. बाबी अंतिम करुन योजनांची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व त्याबाबतचा कार्यपालन अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

१. अपघाती नैसर्गिक मृत्यू झालेल्या नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचे शव शववाहिनीद्वारे मूळ गावी पाठविण्यासाठी एस. टी. महामंडळाच्या आगार प्रमुखाने प्रति किलोमीटर अंतरासाठी प्रमाणित केलेल्या दराप्रमाणे अर्थसहाय्य देणे.
२. नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचा अपघातात हात किंवा पाय निकामी झाल्यास कृत्रिम अंग जोडण्यासाठी अर्थसहाय्य देणे.
३. नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरिता रु. ५१,०००/- एवढे अर्थसहाय्य देणे.

आपली,

(शिल्पा चौधरी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

निवड नस्ती

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना घरबांधणीनंतर घरापोटी खरेदी केलेली जमीन व तदअनुषंगिक बाबींसाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी अर्थसहाय्य देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. :- इबांक २०१८/प्र.क्र.२०८/काम ७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०१९

वाचा: शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/ कामगार-७, दिनांक १४ जानेवारी, २०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना ग्रामीण भागात स्वत:च्या जागेवर नवीन घर बांधण्यासाठी किंवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) मंडळामार्फत राबविण्यास आणि त्यासाठी रु. १,५०,०००/- इतके अर्थसहाय्य देण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १४ जानेवारी,२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) या योजनेत लाभार्थ्याकडे जमिन असणे आवश्यक आहे. सदर लाभार्थ्याने खरेदी केलेल्या जमीन व इतर तदनुषंगिक बाबींसाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाची विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांनी अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) चा लाभ घेऊन घराचे बांधकाम पूर्ण करुन घरबांधणीच्या पूर्णत्वाचा दाखला सादर केला आहे, असे बांधकाम कामगार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून अर्थसहाय्य मिळण्यास पात्र राहतील.

अटल बांधकाम कामगार आवास योजनेचा (ग्रामीण) लाभ घेऊन घराचे बांधकाम पूर्ण करुन घर बांधणीच्या पूर्णत्वाचा दाखला देऊन अर्ज केलेला आहे अशा लाभार्थ्यास जमीन खरेदी व घरबांधणीच्या अनुषंगीक बाबीसाठी केलेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून रु.५०,०००/- पर्यंतचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात येत आहे. हे मंजूर अर्थसहाय्य थेट लाभार्थ्यांच्या बँक बचत खात्यात जमा करण्यात येईल.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०२०७१०२७०३८२१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Digitally signed by Shashank M. Sathe
Date: 2019.02.07 10:29:07 +05'30'

(श.मा.साठे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३) मा.विरोधी पक्ष नेता (विधानपरिषद /विधानसभा)
४) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य
५) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव.
६) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
७) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
८) मा. अध्यक्ष, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
९) महालेखापाल-१ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
१०) महालेखापाल-२ महाराष्ट्र (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता), नागपूर
११) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१२) सर्व अ.मु.स /प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग.
१३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक.
१४) प्रधान सचिव (ग्राम विकास) यांचे स्वीय सहाय्यक.
१५) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी कामगार विभाग
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
१७) सर्व अपर कामगार आयुक्त /उपायुक्त कामगार आयुक्त / सहाय्यक कामगार आयुक्त.
१८) उप कामगार आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद.
१९) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२०) निवडनस्ती (कामगार-७).

राज्यातील इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील बांधकाम कामगारांसाठीच्या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटींबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.:-इबांका २०२१/प्र.क्र.९/काम ७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ एप्रिल, २०२१

संदर्भ:
१. गृहनिर्माण विभाग,शासन निर्णय,क्र.प्रआयो/२०१७/प्र.क्र.१०८/गृनिधो-२, दिनांक ०३.०२.२०१८
२. उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय,क्र : इबांका २०१७/ प्र.क्र.३६०/काम ७, दिनांक २९.१०.२०१८
३. उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/काम ७, दिनांक १४ जानेवारी,२०१९.
४. उद्योग,उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक: इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/ काम ७, दिनांक ०४.०७.२०१९
५. उद्योग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. इबांका २०१८/ प्र.क्र. २०८/काम ७, दिनांक ०७.१२.२०२०.
६. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. मइवइबांकाकमं/ शहरी-ग्रामीण आवास योजना/०६/२०२१ दिनांक १३.०१.२०२१.
७. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. मइवइबांकाकमं / शहरी-ग्रामीण आवास योजना/३३/२०२१, दिनांक ३०.०३.२०२१.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या शहरी व ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांना आवास योजनेस अनुक्रमे संदर्भ क्र. १ व ३ येथील शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेली आहे. या दोन्ही शासन निर्णयांमध्ये बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या अटी नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०१९ व दिनांक ०७.१२.२०२० अन्वये अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे अर्ज दाखल करण्याच्या

कालमर्यादेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर दोन्ही योजनेचा लाभ घेण्यासाठी निश्चित केलेल्या अटी शर्तींपैकी बांधकाम कामगारांच्या पात्रतेच्या कालावधीबाबतच्या अटींमुळे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये अडचणी येत आहेत. सदर अटीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे अर्ज करण्याच्या कालमर्यादेबाबतचे संदर्भ क्र. ४ व ५ येथील अनुक्रमे दिनांक ०४.०७.२०१९ व दिनांक ०७.१२.२०२० चे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम आवास योजना (ग्रामीण), या दोन्ही योजनांबाबतच्या अनुक्रमे दिनांक २९.१०.२०१८ व दिनांक १४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयात बांधकाम कामगारांच्या पात्रतेबाबत, **"योजनेचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगार हा नोंदणीकृत (सक्रिय) असावा. तथापि, अर्ज करतांना तो महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे सलग एक वर्षापेक्षा अधिक, बांधकाम कामगार म्हणून नोंदीत असावा,"** अशी अट नमूद केलेली आहे. या दोन्ही शासन निर्णयातील सदर अट खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

> **"प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महाराष्ट्र बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) व अटल बांधकाम आवास योजना (ग्रामीण) या दोन्ही योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्व नोंदित सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार पात्र राहतील."**

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०२१०४०८१६३७५२५०१० असा आहे. तसेच सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DR. SHRIKANT LAXAMANRAO PULKUNDWAR

Digitally signed by DR. SHRIKANT LAXAMANRAO PULKUNDWAR
167	Sindhudurg	Kudal	Citiz Corner Kudal Pan Bazar Near Sai Samarth Clinic	416520
168	Sindhudurg	Dodamarg	At_ Kalmarn, Kankavali, Tokilej Chitra Mandir Near Chitra Mandir	416512
169	Sindhudurg	Kankavli	Shop No 116,117,118 1St Floor Pamaj City Center Opp Laxmi Multiplex Achara Road Kalmath Tal Kankavli Dist Sindhudurg	416602
170	Sindhudurg	Devgad	Anusaya Complex A/P Devgad, Near Alankar Hotel	416613
171	Sindhudurg	Sawantwadi	Sadananda Plaza, Opposite Tahsildar Office, Sawantwadi, In Front Of Tahsildar Office	426510
172	Sindhudurg	Malwan	Hotel Simon King Beside Uco Bank Bharad Bhat Malvan. Sindhudurg	416606
173	Thane	Thane	D-10, Plot No.52, Virangula Chs, Mhada Colony Veer Savarkar Nagar Near Pranjali Hospital	400606
174	Thane	Bhiwandi	Shop No. 4, Ground Floor, Shubham Appt, Kasar Ali Kombadpada, Bhiwandi	421308
175	Pune	Indapur	Chaitanya Megha Market 1 Wing, Shriram Chouk Old Akluj Naka, Near Indapur Baramati Road, Shende Mala	413106
176	Pune	Shirur	Shop No 2, Opposite Muncipal School No 5, Mumbai Bazar, Pune	412210
177	Pune	Purandar	Sharad Bhawan, MU Post Saswad Market Yard, Taluka Purandar, District Pune	412301
178	Pune	Daund	Opp. Mayureshwar Rural Hospital Shirur- Satara Road Kedgaon Tal- Daund Dist- Pune	412203
179	Pune	Junnar	Shivratna Building Near Pradyan Acadamy , Mahajan Ali, Junnar Tal-Junnar, Dist - Pune	410502
180	Pune	Maval	Aishwarya Laxmi Patsantha, Vijay Nagar, Near Old Mumbai Pune Highway, Near Tehsil Office, Maval, Dist - Pune	412106
181	Pune	Bhor	Near Shivaji Chowk, In fornt of Police Station Vasti Gruh, Tal - Bhor, Dist - Pune	412213
182	Pune	Baramati	Kale Prestige, Sr No 6/3+6/3F Opposite Central Bus Depo, Tal-Baramati Dist- Pune	413102
183	Pune	Pune City	S No 347 Private Road, Near Saibaba Temple, Inaam Nagar, Tadiwala Road, Pune	411001
184	Pune	Ambegaon	Mukum Post, Ghodegaon Paranda Road, Junnar Phata, Ambegoan	412408
185	Pune	Mulshi	Chinmay Building, Near Old Tehsil Office,Paud,Taluka - Mulshi, District - Pune	412108
186	Pune	Khed	Chhatrapati Shivaji Maharaj Market Yard, Near Bus Stop Taluka - Khed, Pune	410505
187	Bhandara	Bhandara	Rajiv Gandhi Square, Near Samruddhi Nursing Home , Tution Galli Bhandara	441904
188	Bhandara	Lakhandur	Behind Tahshil Office, Near Z. P. School (Plot 2) , Ward No. 8 Taluka Lakhandur Dist.Bhandara	441803
189	Bhandara	Lakhani	Rokade Vyapar Sankulan Lakhni	441804
190	Bhandara	Mohadi	Near Bus Stand, Tilak Ward, Mohadi, Tah-Mohadi, Dist-Bhandara	441909
191	Bhandara	Pauni	Near Police Station, Bazar Chowk Pauni, Taluka Pauni Dist .Bhandara	441910
192	Bhandara	Sakoli	Omkar Hatwar, Rahandale College, Shendurwafa Sakoli	441802
193	Bhandara	Tumsar	Ramtek Road, Near Grampanchayat Khapa, In Front Of Sarswati Vidhyalaya Khapa	441912
194	Chandrapur	Ballarpur	Somani Complex Allapalli Road, Bamni indian Bank ballarpur chandrapur	442701
195	Chandrapur	Bhadrawti	Nalamwar Building Guru Nager Ward Behind Shinde Petrol Pump Bhadravtiin Front Of Post Office Bhadravti bhadrawti chandrapur	442902
196	Chandrapur	Bramhapuri	Kaniram Niwas Dutt Kripa Row House Datta Nagari, Delanwadi Ward Bramhapuri Taluka Bramhapuri District Chandrapu Dutt Kripa Row House bramhapuri chandrapur	441206
197	Chandrapur	Chimur	Rajkumar Badki Shelar Heights Near Medha Bus Stop chimur chandrapur	442903
198	Chandrapur	Gondpipari	Sunil Abhyralawar Complex Wrad No. 7 Beshid Ram Mandir Gate Ram Temple gondpipari chandrapur	442702

Sr.No	District Name	Taluka	Address	Pin Code
199	Chandrapur	Jiwati	Dyanand Shop Shanti Nagar Ward No. 12, Jiwsati Mscb Office jiwati chandrapur	442908
200	Chandrapur	Korpana	Vinayak Mohitkar Satish Medical Ward No-2, Main Road, 442916 Panchayat Samiti Korpana Chandrapur	442916
201	Chandrapur	Mul	Gogulwar Shop Near Bus Stand Old Mount Convent Mul Chandrapur	441224
202	Chandrapur	Nagbhid	Nanda Chilbule Tarvekar Layout, Ward No. 1, Mukkam, V.R Mart Nagbhid Chandrapur	441205
203	Chandrapur	Pombhurna	Gedam Complex Buddh E School, Ambedkar Chowk, Mul Road Ambedkar Statute Pombhurna Chandrapur	442918
204	Chandrapur	Rajura	Tiwari Complex Near Bhd Kidzee School, Rajura, Chandrapur Bhd Kidzeee School Rajura Chandrapur	442905
205	Chandrapur	Sawli	Rakesh Dandamwar Shop New Bus Stand Chowk, Sawali Bus Stand Sawli,Chandrapur	441225
206	Chandrapur	Sindewahi	Bhim Vidya Complex Lonwahi, Railway Station Road Police Station Sindewahi Chandrapur	441222
207	Chandrapur	Waror	Jamde Shop Malvi Ward Railway Station Road Nr. Bus Stand Waror Chandrapur	442907
208	Gadchiroli	Aheri	Kodelwar Complex Rajwada Road Nr. Govt. Hospital Rajwada Road Aheri Gadchiroli	442705
209	Gadchiroli	Armori	Snehal Lawn In Frount Of Tashil Office, Kadatgota Road, Panchwati Colony Armori Tashil Office Armori Gadchiroli	441208
210	Gadchiroli	Bhamragad	Rural Hospital Bhamragad Gadchiroli	442710
211	Gadchiroli	Chamorshi	Gadchiroli Road ChamorshiGadchiroli	442603
212	Gadchiroli	Desaiganj	Mohd Ali Complex Shop No. 5, Shivaji Ward, Opp Jama Masjid desaiganj Gadchiroli	441207
213	Gadchiroli	Dhanora	Mansey Hidko Nr Crp Camp Dhorna ,Dhanora Gadchiroli	442606
214	Gadchiroli	Etapalli	Alapalli Road, Etapalli Gadchiroli	442704
215	Gadchiroli	Gadchiroli	In Front Of Govt. Sceince College, Chamorshi Road, Sahu Nagar, Ward No. 21, Gadchiroli	442605
216	Gadchiroli	Korchi	Near Fish Market Korchi Bus Standkorchi Gadchiroli	441209
217	Gadchiroli	Kurkheda	Plot No1, Near New Bus Stand , Main Road, Kurkheda	441209
218	Gadchiroli	Mulchera	At Post Sironcha , Market Area Mulchera Gadchiroli	442703
219	Gadchiroli	Sironcha	C/O 4 Vishwanath Nagar Main Road Mulchera Sironcha Gadchiroli	442504
220	Gondia	Deori	Ward Number 1 Near Hp Petrol Pump Ranidurgawati Chowk Deori	441901
221	Gondia	Amgaon	Near Tahsil Office Deori Road Amgaon	441902
222	Gondia	Gondia	Katre Bhavan Hadditoli Balaghat Road	441601
223	Gondia	Goregaon	Near Ganesh Mandir, Ward No1, Goregoan, Gondia	441801
224	Gondia	Arjuni Morgaon	Near Railway Station, Birsa Muda Chowk, Arjuni Moregoan	441701
225	Gondia	Tirora	Chandrabhaga Naka New Civil Colony Tirora	441911
226	Gondia	Salekasa	Sharda Nagar Single Toli Salekasa	441916
227	Gondia	Sadak-Arjuni	Near Old Bus Stand Gondia Road Sadak Arjuni	441807
228	Nagpur	Bhiwapur	At Post Bhiwapur, 871, Shivaji Layout,Near Garden,Bhiwapur, Nagpur	441201
229	Nagpur	Hingna	Near Shiksha Sahakari Bank, Suraj Nagar, Raipur, Hingna	441110
230	Nagpur	Kalmeshwar	Near St Bus Stand , In Front Of Hero Show Room, Katol Road, Kalmeshwar, Nagpur	441501
231	Nagpur	Kamptee	Hanuman Nagar Prekipura In Front Of Tehsil Office Jn Road Kamptee Nagpur	441002
232	Nagpur	Katol	Shop No 47, Near Bus Stand , Orange Plaza,Katol	441302
233	Nagpur	Kuhi	Plot No 06, Ward No 14 Near Ramdeo Baba Patanjali Shop Kuhi Nagpur	441202
234	Nagpur	Mauda	Shivaji Nagar, Ramtek Road, Near Shirdi Sai Convent, Mauda, Nagpur	441104
235	Nagpur	Nagpur	Plot No 10, Unit C, Sadachar Society, Dutt Wadi , Nagpur	440023
236	Nagpur	Nagpur (Urban)	Plot No-8, Swagat Nagar, New Narsala Road, Oppo Chandrabhaga Hardware, Nagpur	440034
237	Nagpur	Narkhed	Ward No 16, In Front Of Sbi Bank, Railway Station Road , Narkhed, Nagpur	441304
238	Nagpur	Parseoni	C/O Sudhakar Menghar Shrikrishnarpan Complex, Saoner Road, Parseoni, Dist Nagpur	441105

Sr.No	District Name	Taluka	Address	Pin Code
239	Nagpur	Ramtek	Near Kumarika Bahuli, Rajaji Ward Ramtek, Maharashtra	441106
240	Nagpur	Saoner	Behind St Bus Stand ,Near Satva Mata Mandir, Ward No 6, Saoner, Nagpur	441107
241	Nagpur	Umred	Shop No 4, Jairam Patel Complex, Oppo Itankar Petrol Pump, Mauza Khedi Gram Panchayat Navegaon Sadhu Umred Nagpur	441203
242	Wardha	Ashti	Talhande Building Gurdev Colony Ashti Dist - Wardha Nr. Old Bus Standashti Wardha	442202
243	Wardha	Seloo	Raut Building Bhd Bus Stand	442104
244	Wardha	Deoli	Nagrale Mansion Nr. Ner Bus Stand Kedar Lay-Out Deoli Bus Stand Deoli Wardha	442101
245	Wardha	Arvi	Thakre Mansion Shilaram Mangal Karyalay	442305
246	Wardha	Samudrapur	Shashikala Nivas Nr. Bsnl	442001
247	Wardha	Wardha	Bhaskar Bhange Indra Gandhi Garden	442001
248	Wardha	Karanja	Tmc 1, Front Side Of Maratha Wine Bar, Pragati Nagar Karanja Maratha Wine Barkaranja Washim	444105
249	Wardha	Hinganghat	Sanjay Medical Stores Near Bus Stand Nagpur Travels Point Bus Stand Hinganghat Wardha	442301
250	Nanded	Kandhar	Sagar Niwas, Malhar Nagar, Nava Modha, Kandhar, Nanded	431714
251	Nanded	Dharmabad	In Frount Of Zp Girls High School, Nr. Panchayat Samiti, Dharmabad, Nanded	431809
252	Nanded	Degloor	Shakuntala Kunt, Nr. Saritrabai Fule School, Rampur Road, Nr. Atkalikar Engineer House, Degloor, Nanded	431717
253	Nanded	Umari	Kamble Niwas, Vip Road, Beside Umari, Court Umari, Nanded	431807
254	Nanded	Nanded	Sambhan Niwas, Datta Nagar Hadko Hd 42 P1, Maharshi Shamrao Kadam, Medical College	431601
255	Nanded	Naigaon	Chavan Complex, Naigaon Bazar, Gramin Hospital, Naigaon	431709
256	Nanded	Bhokar	Anubhav Sathe Chowk, Bhargao Road, Near Shahu Vidyalay, Bhokar, Nanded	431801
257	Nanded	Kinwat	Krishna Complex, Opp. Msrtc Bus Stand, Near Axis Bank, Kinwat, Nanded	431804
258	Nanded	Mahore	Pawar Complex, Shri Datta Plaza, Nr. Sbi Bank, Main Raod, Mahore, Nanded	431721
259	Nanded	Mudkhed	Kendriya Vidyalay, Umari Road, Mudkhed, Opposite Umari Road, Mudkhed	431806
260	Nanded	Ardhapur	Dhondiba Langade Complex, Near Dhanmudra Credit Co-Op Bank, Taluka - Ardhapur, Dist - Pune	431704
261	Nanded	Biloli	Rukmini Complex, New Bus Opp, Nagar Parishad, Biloli, Pincode	431710
262	Nanded	Mukhed	New Mondha Shivaji Nagar, Near Dcc Bank, Mukhed, Dist - Nanded	431715
263	Osmanabad	Osmanabad	Jagadale Complex, Waruda Road, Opp. Old Bsnl Office, Osmanabad	413501
264	Osmanabad	Omerga	Yash Complex, Bhd Nagarparishad, Omerga	413606
265	Osmanabad	Washi	Bhagwant Complex, Clg Road, Washi	413503
266	Osmanabad	Paranda	Bawchi Chowk, Shinde Complex, Paranda	413502
267	Osmanabad	Lohara	Mashalakar Complex, Bhd Bus Stand, Lohara	413608
268	Osmanabad	Bhoom	Swami Samarath Complex, Nr. Nagarparishad, Nagoba Chowk, Bhoom	413504
269	Osmanabad	Kalamb	City Complex,Dhoki Road, Kalamb	413507
270	Osmanabad	Tuljapur	Bj Complex, Ambedkar Chauk, Tahshil Road,Tuljapur	413601
271	Parbhani	Jintur	Opposite Shakuntalabai Bordikar College, Shivaji Nagar, Jintur, Jintur, Parbhani	431509
272	Parbhani	Sonpeth	B.M Khole Complex, Mankarnika Nagar Parli Road, Sonpeth, Parbhani	431516
273	Parbhani	Palam	Samarth Niwas, Ram-Lakshman Nagar, Gangakhed, Palam, Parbhani	431720
274	Parbhani	Parbhani	Waghmode Nivas, Somnath Nagar, Nr. Ughda Mahadev Mandir, Parbhani	431401
275	Parbhani	Manwath	Filter Tank Near Honda Showroom pathri road Manwath, Prabhani	431505
276	Parbhani	Gangakhed	Annabi Complex, Chandtara Chowk, Near Gangakhed Police Station, Gangakhed, Parbhani	431514
277	Parbhani	Pathri	Mambhanje complex Majalgaon, Nr. Bajar Samiti, Pathri, Parbhani	431506
278	Parbhani	Selu	Mangal Niwas, Bansilal Nagar, Nr. Baheti Mangal Karyalay, Selu, Parbhani	431503
279	Parbhani	Purna	Raje chatrapati Sambhaji Chouk Agrawal Complex, above hdfc bank Purna, Parbhani	431511

Sr.No	District Name	Taluka	Address	Pin Code
280	Ichalkaranji	Hatkalangale	Sangli-kolhapur road,Infront of hatkangale Panchayat samiti , near Bharat petrol pump, Hatkanagle Tal - Hatkangale Dist - kolhpur	416109
281	Ichalkaranji	Shirol	Rohidas Nagar, Shirol-Narsobawadi road, Near shirol civil hospital, shirol, Tal - Shirol Dist - kolhapur	416103
282	Kolhapur	Gaganbawada	Nagavkar Building Gaganbawada Kolhapur Main Road Panchayat Samiti in front of Gaganbawada	416206
283	Kolhapur	Bhudargad	Ashirwad Building Ashirwad Building, Patgav Road, Wani Galli, Bajarpeth, Bhudargad (Gargoti)	416209
284	Kolhapur	Gadhinglaj	Shivganga Complex, Near Bank Of Baroda,Tilak Path, Gadhinglaj	416502
285	Kolhapur	Radhanagari	Pawar Bulding Pawar Bulding, Parvati- Datt Niwas, Near Bus Stand, Phonda Road, Radhanagar	416212
286	Kolhapur	Ajara	Harer Chambers, Next to Bus Stand, Ajara - Amboli Road, Ajara,	416505
287	Kolhapur	Kagal	Shop No 04- Samarth Pratibha Residency , Cts No 317 B, 318 B , Koshti Galli, St Stand Back Side Kagal	416216
288	Kolhapur	Karvir	2637/A/1 , Bhairav Heights Busment Gala, Sathmari Road, Near Gokhale College, Mangalwar Peth, Kolhapur	416012
289	Kolhapur	Chandgad	Kutre Complex ,Kutre Complex, Opp.Rbm College, Main Road, Chandgad	416509
290	Kolhapur	Panhala	Kore Building, Near Union Bank And Post Office, Main Road, Panhala	416201
291	Kolhapur	Shahuwadi	Bajarang Warang Near Panchayat Samiti, Main Road, Shahuwadi	416215
292	Sangli	Atpadi	Opposite Sangola Arban Bank, Diganchi Road, Atpadi Sangola Arban Bank	415301
293	Sangli	Jat	Nadaf M.B.C, Satara Road,Near Janawar Bazar, Jath	416404
294	Sangli	Palus	Pvdp High School Neighbor, Paranjape Colony, Paloos	416310
295	Sangli	Kadegaon	Chhatrapati Sambhaji Maharaj Chowk, Main Road, Kadegaon	415304
296	Sangli	Walwa	Ring Road Yashodhannagar Urun Islampur Tal-Walwa Dist-Sangli Ring Road	415409
297	Sangli	Shirala	Opposite Administrative Building Shirala Administrative Building	415408
298	Sangli	Miraj	Shrivandhan Banglow, Opposite More Photo Studio, Bhramanpuri, Miraj	416410
299	Sangli	Kavthemahankal	Mahankali Complex B3 Near Masoba Mandir , Opposite Hdfc Bank, Kavathe Mahankal	416405
300	Sangli	Tasgaov	Survey No 127, Plot No-62, Amruteshwar Nagar, Tasgaon	416312
301	Sangli	Khanapur-Vita	S/N 588/1A, Plot No. 1, Tasgaon Road, Opp Meena Petrol Pump, Gandji Nagar, Vita (Khanapur)	415311
302	Satara	Khandala	Samarth Vishv Building, Gala No. 21, Sambhaji Chouk, Khandala	412802
303	Satara	Phaltan	J D Ratna Building, Near Rajlaxmi Karyalaya, Bhadkamkar Road, Phaltan	415523
304	Satara	Khatav	Ingale Complex, Vakeshwsr Road, Behind Bus Stand, Vaduj (Khatav)	415505
305	Satara	Patan	K. D Construction Chapoli Road, Near Icici Bank. Patan, Dist- Satara	415206
306	Satara	Man	Avghade Complex, Mayani Road, Maharashtra Bank Samor Gala No.5	415508
307	Satara	Jaoli	Tukaram Bhavan, Near Bank Of Maharashtra, Near Venna Chowk, Medha-Mahabaleshwar Road, Medha	415012
308	Satara	Satara	City Court Building, Molacha Odha, Satara	415002
309	Satara	Wai	Shri Saidham Apartment1242, Ground Floor, Ramdoh , Wai	412803
310	Satara	Mahabaleshwar	Plot No 33, Hanuman Road, Near Dr Pathan Hospital, Near St Stand, Panchgani (Mahabaleshwar)	412805
311	Satara	Koregaon	Utkarsh Gurudev Nagar, Behind Saraswati Highschool, Koregaon	415501
312	Satara	Karad	M R Complex Gala No. 2, M R Complex, Shanivaar Peth, Karad	415110
313	Solapur	Mohol	Near Mohol Bus Stand,Near Vijay Prabha Hospital, Pandharpur Road, Mohol	413213
314	Solapur	Malshiras	Good night building, Akluj Rood, Malshiras	413107
315	Solapur	South Solapur	West Mangalwar Peth, Near Shivganga Mandir, Solapur	413002

Sr.No	District Name	Taluka	Address	Pin Code
316	Solapur	North Solapur	Plot No 108, Rajiv Nagar, Behind Sut Mill, Solapur	413006
317	Solapur	Akkalkot	Old Adat Bazar, Futane Gali, Akkalkot	413216
318	Solapur	Barshi	Shelake Niwas, Mandge Chal, Near Janseva High School, Dharashiv Road, Barshi	413401
319	Solapur	Karmala	Kai Deshbhakt Nammdevrao Jagtap Shopping Centre, Shop No 41, Jeen Maidan Puna Road, Karamala	413203
320	Solapur	Sangola	Miraj Road, Gauri Petrol Pumpachya Samor, Phule Arcade Building, Sangola	413307
321	Solapur	Pandharpur	Old Kasegaon Road Plot No.15, Sangola Road, Pandharpur	413304
322	Solapur	Madha	Shriram Nagar Madha, Tal.Madha Dist. Solapur	413209
323	Solapur	Mangalwedha	Jadhav Nivas, In Front Of Hotel Rajkiran, Homnal Naka, Mangalwedha	413305
324	Ahmednagar	Pathardi	Garje Complex, Near New Bus Stand, Near Hp Gas Agency, Pathardi	414102
325	Ahmednagar	Shevgaon	Tisgaon Nagar Road, Dhuda Maharaj Vastigraha, Opposite RS Complex, Shevgaon	414502
326	Ahmednagar	Akole	Mehtre Building, Akole Shekewadi,K G Road Akole, Mauli Petrol Pump, Akole	422601
327	Ahmednagar	Newasa	Balaji Shopping Complex, Newasa Phata Road, Near H.P. Petrol Pump	414603
328	Ahmednagar	Jamkhed	Jamkhed Center Complex, Nagar-Jamkhed Road, Opp Panchayat Samiti, Near Raosaheb Patwardhan Patsanstha	413201
329	Ahmednagar	Shrigonda	Siddhi Platinum And Baldota Tower, Gat No 2480/2, Shrigonda, Tal - Shrigonda Dist - Ahmednagar	413701
330	Ahmednagar	Shrirampur	Hawkers Building, Shop No.Mkt 75., Near Court and Shrirampur Nagar Parishad, Tal - Shrirampur, Dist - Ahmadnagar	413709
331	Ahmednagar	Sangamner	Harsha Creator (Corner) Akole By-Pass Road, Rahane Mala Road, Near Suprime Hotel, Sangamner, Taluka - Sangamner	422605
332	Ahmednagar	Rahuri	Swami Samarth Building, Taklimiya Rasta, Bharat Nagar, Rahuri	413705
333	Ahmednagar	Karjat	Bansidhar, Karjat Rashin Road	414402
334	Ahmednagar	Ahmednagar	Shop No. 206, State Bank Chowk, Chatrapati Shivaji Maharaj Sankul, Grand Darbar	414001
335	Ahmednagar	Rahata	Khadkewake Taluka Rahta District Ahamad Nagar, Khadkewake	423107
336	Ahmednagar	Kopergaon	Saikuber Tower, Saikuber City Yeola Road,Kopergaon, Saikuber Tower	423601
337	Ahmednagar	Parner	2598/36, Bhairavi Apartment, Hind Chowk Parner, Ta - Parner Dist - Ahmednagar	414302
338	Dhule	Shindkheda	Kalash Tower, Vijay Palace, Near Sbi Bank, Shirpur Road, Shindkheda, Near Gramin Rugnalay, Sindhkheda	425406
339	Dhule	Shirpur	Pappaji Shopping Complex, Krushi Utapanna Market, Shirpur, BSNL Office, Dhule	425405
340	Dhule	Sakri	Vimal Tower, Plot No 5, Shop No 12 & 13, Near Chandrakant Mangal Karyalay, Sakri	424304
341	Dhule	Dhule	Plot No 39, Biladi Road, Near 12 Phooti Hanuman Mandir, Devpur, Dhule	424005
342	Jalgaon	Bhadgaon	P G Patil Complex, Kothardi Road, Shree Ram Mangal Karyalay	424105
343	Jalgaon	Bodwad	Riddhi Siddhi Complex,Main Road Bodwad, Near Ambedkar Putla, Bodwad	425310
344	Jalgaon	Chopda	Krushna Kamal Building, Plot No 5,Om Nagar, Gorgaule Road, Om Nagar	425107
345	Jalgaon	Dharangaon	Chandrakant Building Chopada-Amalner Road, Near Court, Dharangaon	425105
346	Jalgaon	Amalner	Shop No - 2214, Dhule Road, Cotton Market, Dhanya Market Javal, Amalner Dist - Jalgaon	432401
347	Jalgaon	Chalisgaon	Yogeshwar Complex, Yashodeep building, Kharjai Road, Shastri Nagar, Near Nirmal Petrol Pump	424101
348	Jalgaon	Jamner	Ujwalram Building, Shop No 5, Pachora-Jamner Road, Near Harsh Traders, Chikhali Bank, Jamner	424206
349	Jalgaon	Parola	Patangrao Shiv Colony, Unirkheda Road, Krushi Bazar	425111
350	Ratnagiri	Sangameshwar	Gadkari Appartment Devrukh Chatrapati Shivaji Choke, Tal- Sangmeshwer Dist - Ratnagiri Bazarpeth sangameshwar ratnagiri	415611

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी:०२२ २२८५००१९
विस्तार क्र:२२७९-३०१९
ई मेल: amit.pataskar@nic.in

क्रमांक: संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१८८/काम-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२३.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कामगार भवन, सी-२०, ई-ब्लॉक,
बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

विषय -: क्षेत्रिय कार्यालयाच्या कामकाजासंदर्भात लोकप्रतिनिधी, कामगार संघटना व व्यक्ती/संस्थांकडून प्राप्त तक्रारींची तपासणी करण्यासाठी तपासणी पथक स्थापन करण्याबाबत.

संदर्भ:- १. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.काआ/गोवि/तक्रार/२२/२०२०/ कार्या- १/१९९, दिनांक २२.०२.२०२१
२. आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.काआ/गोवि/तक्रार/२२/२०२०/ कार्या- १/१०६२, दिनांक २७.०८.२०२१

महोदय ,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे संदर्भात लोकप्रतिनिधी, विविध कामगार संघटना, संस्था अथवा व्यक्तींकडून शासन, कामगार आयुक्तालय व मंडळ स्तरावर वारंवार प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत कामगार आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील विभागीय स्तरावर चौकशी समिती गठीत करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. त्यास अनुसरुन प्रत्येक विभागासाठी विभागीय प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे विभागीय स्तरावर चौकशी पथक गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	विभागाचे नाव	चौकशी समितीची रचना	चौकशी समितीचे कार्यक्षेत्र (विभाग)
१.	कोकण	१) अपर कामगार आयुक्त - अध्यक्ष २) सहाय्यक कामगार आयुक्त - सदस्य ३) सरकारी कामगार अधिकारी -सदस्य ४) लेखा अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई-सदस्य	नाशिक

२.	पुणे	१) अपर कामगार आयुक्त - अध्यक्ष २) सहाय्यक कामगार आयुक्त - सदस्य ३) सरकारी कामगार अधिकारी -सदस्य ४) लेखा अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई-सदस्य	कोकण
३.	नाशिक	१) कामगार उप आयुक्त - अध्यक्ष २) सहाय्यक कामगार आयुक्त - सदस्य ३) सरकारी कामगार अधिकारी -सदस्य ४) लेखा अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई-सदस्य	पुणे
४.	औरंगाबाद	१) कामगार उप आयुक्त - अध्यक्ष २) सहाय्यक कामगार आयुक्त - सदस्य ३) सरकारी कामगार अधिकारी -सदस्य ४) लेखा अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई-सदस्य	अमरावती
५.	अमरावती	१) कामगार उप आयुक्त - अध्यक्ष २) सहाय्यक कामगार आयुक्त - सदस्य ३) सरकारी कामगार अधिकारी -सदस्य ४) लेखा अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई-सदस्य	नागपूर
६.	नागपूर	१) अपर कामगार आयुक्त - अध्यक्ष २) सहाय्यक कामगार आयुक्त - सदस्य ३) सरकारी कामगार अधिकारी -सदस्य ४) लेखा अधिकारी, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई-सदस्य	औरंगाबाद

३. सदर समितीने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाबाबत क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेसंदर्भात लोकप्रतिनिधी, विविध कामगार संघटना, संस्था अथवा व्यक्तींकडून शासन, कामगार आयुक्तालय व मंडळ स्तरावर प्राप्त होणाऱ्या विविध तक्रारींची तपासणी करावी.

४. शासन व कामगार आयुक्त यांच्या स्तरावरुन मंडळाकडे प्राप्त झालेल्या तसेच मंडळ स्तरावर प्राप्त झालेल्या तक्रारी, चौकशीसाठी विभागीय स्तरावरील चौकशी समितीकडे पाठविण्याची कार्यवाही सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्यामार्फत करण्यात येईल.

सदर विभागीय स्तरावरील चौकशी समिती महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कामकाजासंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करुन मंडळास चौकशी अहवाल सादर करेल. त्यानंतर मंडळ आपल्या अभिप्रायासह कामगार आयुक्त कार्यालयास अहवाल सादर करेल. कामगार आयुक्त कार्यालय प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार सदर अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करतील.

आपला,

(दादासाहेब खताळ)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रत माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव:

(१) अपर कामगार आयुक्त, कोकण विभाग/पुणे विभाग/नागपूर विभाग.
(२) कामगार उपायुक्त, नाशिक, औरंगाबाद, अमरावती.
(३) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
(४) निवडनस्ती (कामगार-७)

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पाचवा मजला, एमएमटीसी हाऊस ई ब्लॉक , सी २२,वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र. १६८ /२०२४
माअधि-२०२४/प्र.क्र.४३३/समन्वय -०१

दिनांक : 28 AUG 2024

कार्यालयीन आदेश

विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत राज्य जन माहिती अधिकारी पदनिर्देशित बाबत..

उपरोक्त संदर्भिय कार्यालयीन आदेश क्र.१८२० दि.११.१०.२०२३ नुसार जन माहिती अधिकारी म्हणून एक पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०७.११.२०२३ मधील विवरणपत्र "अ" अन्वये कामकाजाची कार्यासन निहाय विभागणी करण्यात आलेली आहे. मंडळाकडील माहिती अधिकार प्रकरणाचा वाढता व्याप लक्षात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोर अंमलबजावणी होण्यासाठी मा.अ.अधि. २००५ मधील कलम ५ (१) नुसार कार्यालयीन आदेश दिनांक ०७/११/२०२३ केलेल्या कामाच्या विभागणी केलेल्या स्वतंत्र विषयानुसार ०२ जन माहिती अधिकारी नेमणे आवश्यक आहे. त्यानुसार खालील मंडळाकडील अधिकारी / कर्मचारी यांना जन माहिती अधिकारी तसेच समन्वयक व कार्यासन प्रमुख हे पदनिर्देशित करण्यास येत आहे. सदर कार्यालयात आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अमंलात येईल.

कार्यासन प्रमुख	समन्वयकाचे नाव	जन माहिती अधिकारी यांची नाव व बाब/विषय
कार्या आदेश दि. ०७/११/२०२३ मधील विवरणपत्र ब नुसार नियुक्त सर्व कार्यासन प्रमुख	श्री. राजेंद्र कौरते, सेवानिवृत्त अधिकारी	१.देवीलाल मा. राजपूत, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक लेखा अधिकारी (कार्याआदेश दि.०७.११.२०२३ मधील विवरणपत्र 'अ' नुसार कार्यासननिहाय कामकाजाची विषयसुची)
		२. रविंद्र गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा

		उपलेखापाल (कार्याआदेश दि.०७.११.२०२३ मधील विवरणपत्र 'अ' नुसार कार्यासननिहाय कामकाजाची विषयसुची)

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.

प्रति :-

१. श्री. देविलाल मा.राजपूत, जन माहिती अधिकारी तथा सहायक लेखाअधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
२. श्री. रविंद्रनाथ गायकवाड, जन माहिती अधिकारी तथा उपलेखापाल, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
३. श्री. राजेंद्र कौरते,समन्वयक तथा सेवानिवृत्त अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
४. कार्यालयीन आदेश दि.०७.११.२०२३ मधील सर्व कार्यासन प्रमुख
५. प्रथम अपिलीय अधिकारी यांस



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ,मुंबई.
एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक ई - , वांद्रे- कुर्ला संकुल बांन्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१ .

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळाच्या ५९ व्या बैठकीचे इतिवृत्तांत
****

बैठक स्थळ :- मा. मंत्री, (कामगार) यांचे दालन क्र.११६, ०१ ला मजला, मंत्रालय, मुंबई
दिनांक :- १२.१२.२०२२ (सोमवार)
वेळ :- दुपारी १२.०० ते १.००

अ.क्र.	बैठकीचा विषय
१	मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार, नाका बांधकाम कामगार व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याच्या योजनेस मुदतवाढीस मंजूरी देणे तसेच भोजन वितरीत करताना भोजन वितरण प्रणाली (RF- Based Card) द्वारे कार्यवाही करण्याबाबत धोरण निश्चिती करणे.
२	मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण प्रशिक्षणाचा लक्ष्यांक निश्चिती व बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणे.
३	मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना म्हाडा, सार्वजनिक खाजगी भागीदारी, बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मितीद्वारे राबविण्यास धोरण निश्चितीस मंजूरी देणे.
४	मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी प्रसार प्रसिध्दीच्या माध्यम आराखडा रू.३० कोटी वरून रू.१०० कोटी करण्याच्या सुधारित प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडयास मंजूरी देणे व सन २०२३-२४ चा नवीन प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडा तयार करण्यास मंजूरी देणे.
५	राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात शेड उभारणेस योजना राबविणेबाबत मंजूरी देणे.
६	मंडळातील मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेचे कामास मंजूरी देणे.
७	मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा राज्यस्तरीय ०१ व विभाग स्तरावर ०६ ठिकाणी कार्यन्वित करण्याच्या धोरण निश्चितीस मंजूरी देणे.
८	बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण शुल्काची रक्कम रू.०१/- इतकी ठेवणे, नोंदणी/ नुतनीकरणाचा अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून वैधता ०१ वर्ष ठेवणे, लॉग इन आयडी वाढवून देणे व IWBMS संगणक प्रणाली लॉगिन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करणे इत्यादी धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे.

अ.क्र.	बैठकीचा विषय
९	मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांचेकरीता वाहन खरेदीस मंजूरी देणे व मा.मंत्री कार्यालय (कामगार) यांचेकरीता दोन वाहने भाडयाने घेणेबाबत, मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यकतेनुसार वाहने भाडयाने घेण्यास मुदतवाढ देणे.
१०	मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी मंत्रालय परिसरात कार्यालयीन जागा भाडयाने घेण्याबाबत, मंडळ मुख्यालयासाठी कायमस्वरूपी कार्यालयीन जागा व इमारत बांधकामास मंजूरी देणे.
११	मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे लाभ वाटपासाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यास मंजूरी देणे.
१२	मंत्रालयीन व मंडळाकडील संगणक विषयक कामकाजाकरीता संगणक तांत्रिक सल्लागारांच्या (ग्रॅन्ट थॉर्न्टन) नियुक्तीस मुदतवाढ देणे.
१३	लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेण्याकरीता अभ्यास दौरा आयोजित करणे
१४	बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण, लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणे.
१५	मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजूरी देणे.
१६	मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवणूक करण्यासाठी मंजूरी देणे.
१७	मा. उच्च न्यायालय मुबई याचिका क्र. २७६९६/२०२१, रिट याचिका क्र.७७०१/२०२२, मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि.व मे. आयटी आय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेला खर्च वसूली प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेणे.
१८	शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित पध्दतीने कामाकरीता नियुक्त करण्यास मंजूरी देणे.
१९	उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणे
२०	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळाच्या अंतर्गत करणेस मंजूरी देणे.
२१	मंडळ मुख्यालयाच्या व क्षेत्रिय कार्यालयाच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देणे.
२२	मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराची अचूक पडताळणी होण्यासाठी व उपकर संकलात वाढ होण्याच्या उपाययोजनेकरीता सनदी लेखापाल (CA)/ तांत्रिक सल्लागार संस्थेची (Agency) नियुक्ती करण्यास मंजूरी देणे.

अ.क्र.	बैठकीचा विषय
२३	मंडळाचे सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता घेणे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेस मंजूरी देणे.
२४	मंडळाकडील बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरविणाऱ्या योजनेचा आढावा घेणे व दि.०१.०४.२०२२ रोजी नंतर नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप करणे तसेच, निर्धारित लक्षांकानुसार शिल्लक संच वाटपाचे मागणीनुसार जिल्हयांना लक्षांक निर्धारण करणे व योजनेस मुदतवाढ देण्याच्या धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे.
२५	मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या ५९ व्या बैठकीचे इतिवृत्त

मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५९ वी बैठक सोमवार दिनांक १२.१२.२०२२ रोजी दुपारी १२.०० वा. मा. मंत्री, (कामगार) यांचे दालन क्र.११६, ०१ ला मजला, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१	मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार)	मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई
२	श्रीमती विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार	शासकीय प्रतिनिधी
३	श्री. सुरेश जाधव, कामगार आयुक्त	शासकीय प्रतिनिधी
४	श्री. दादासाहेब खताळ, उप सचिव कामगार - ७	शासकीय प्रतिनिधी
५	श्री. विवेक शंकर कुंभार	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाचे सचिव यांनी श्री. विवेक कुंभार यांनी मा. ना. श्री. सुरेश (भाऊ) दगडू खाडे, मंत्री (कामगार), श्रीमती विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव, कामगार, श्री. सुरेश जाधव, कामगार आयुक्त व श्री. दादासाहेब खताळ, उप सचिव कामगार - ७ या उपस्थितांचे स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संचाच्या प्रती सर्व उपस्थितांना वाटप करण्यात आल्या.तद्नंतर विषयसूचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

विषय क्र.०१ :- मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार, नाका बांधकाम कामगार व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याच्या योजनेस मुदतवाढीस मंजूरी देणे तसेच भोजन वितरीत करताना भोजन वितरण प्रणाली (RF- Based Card) द्वारे कार्यवाही करण्याबाबत धोरण निश्चिती करणे.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की,मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या मध्यान्ह भोजन योजना शासन मान्यतेने विशेष सूचना व सवलतीसह वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आल्या आहेत.

२. कोविड-१९ विषाणूचा प्रदुर्भाव कमी होऊन राज्य शासनाने निर्बंध शिथील केल्याने सद्यस्थितीत मध्यान्ह भोजन योजना सदर योजनेच्या सर्व अटी शर्तीसह केवळ नोंदीत बांधकाम कामगारांना राबविणे, बांधकाम कामगार हिश्याची रू.०५/- रक्कम वसूल करणे व योजनेच्या अंमलबजाणीबाबत कोविड कालावधीतील सर्व सवलती दिनांक १५.०५.२०२२ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्रस्ताव सादर केला होता. शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, शासनाने दिनांक १७.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १५.०८.२०२२ पर्यंत नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांसह नाका कामगारांना देण्यात येत असलेल्या सवलतींसह मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन देण्यात यावे अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत जिल्हा कार्यालयांना अवगत करण्यात आले होते.

३. मंडळ सचिव यांनी सादर केले की, लोकप्रतिनिधी व क्षेत्रिय कार्यालयांची मागणी व पुरग्रस्त परिस्थिती विचारात घेवून, नोंदीत बांधकाम कामगार, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन सवलतीसह पावसाळा संपेपर्यंत दिनांक ३०.०९.२०२२२ पर्यंत सुरू ठेवण्याबाबत मंडळाच्या सचिवांनी दिनांक १२.०८.२०२२ अन्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, शासनाच्या दिनांक ०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १५.०८.२०२२ पासून दिनांक ३०.११.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, सर्व सवलतींसह मध्यान्ह व रात्रीचे भोजन देण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच दिनांक ०१.१२.२०२२ पासून फक्त नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्रीच्या भोजनाचा लाभ दयावा असे कळविले आहे. त्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक ०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करणेबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

४. मंडळ सचिव यांनी सादर केले की, बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण प्रक्रिया निरंतर स्वरूपाची असली तरी मागील ०४ महिन्यात नोंदणी व नुतनीकरणामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. तथापि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असूनही बांधकाम कामगारांची अल्प नोंदणी झाली आहे.तसेच, महाराष्ट्रातील

अन्य जिल्ह्यामध्येही बांधकाम कामगारांची नोंदणी करणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे.महाराष्ट्रातील काही ठीकाणी नाका बांधकाम कामगार, अनोंदित बांधकाम कामगार यांची अल्प नोंदणी व नुतनीकरणाचे प्रमाण लक्षात घेता अनोंदित बांधकाम कामगारांच्या नोंदणीची प्रक्रिया पुढील ०६ महिने सुरू राहण्याची शक्याता आहे. मध्यान्ह भोजन योजना नोंदीत बांधकाम कामगारांसह अनोंदीत बांधकाम कामगारांना सुरू ठेवणेबाबत मा. लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार व प्रलंबित नोंदणी व नुतनीकरणात वाढ होईपर्यंत मध्यान्ह भोजन योजनेच्या लाभापासून बांधकाम कामगार वंचित राहू नये याकरीता नोंदीत बांधकाम कामगार, नाका बांधकाम कामगार व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना सवलतीसह पुढील आदेशापर्यंत सुरू ठेवणेबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस दिनांक ३०.११.२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

५. मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासनाच्या दिनांक २२.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मध्यान्ह भोजन योजनेमध्ये भोजन वितरण कार्ड प्रणालीमार्फत नोंदी घेताना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन भोजन वितरण करताना किमान तीन महिने बायोमॅट्रीक पध्दतीने नोंद घेण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना अहवाल सादर करणेबाबत मंडळाच्या दिनांक २९.०६.२०२२ अन्वये कळविण्यात आले होते. मंडळाचे सदस्य व मा.अध्यक्ष यांच्या विचारविनिमयाने, मा. अध्यक्ष यांनी भोजन वितरण करताना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे वितरीत करावे. सदरचे RF- Based कार्ड सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना दि.३१.०३.२०२३ पर्यंत वितरीत करावे व दिनांक ०१.०४.२०२३ पासून भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे वितरीत करण्यात यावे असेही निर्देश मा.अध्यक्ष यांनी सदर बैठकीत दिले.

६. मा. कामगार आयुक्त तथा शासकीय प्रतिनिधी यांनी मध्यान्ह भोजन योजनेबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा विचार करण्याबाबत मत मांडले. सदर प्राप्त तक्रारीमध्ये मध्यान्ह भोजन योजनेच्या जेवणाची गुणवत्ता बाबत मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. त्याबाबत मा. अध्यक्ष यांनी मंडळ सचिव यांना सर्व जिल्हयांकडून स्वयंपाकगृहाचे तसेच, ज्या जिल्हयात भोजन वाटप केले जाते त्यांचेकडून अन्न प्रशासन औषध विभागाचे जेवणाच्या गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करण्याबाबत निर्देश दिले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९(१)/२०२१ :-

(अ) लोकप्रतिनिधी व क्षेत्रिय कार्यालयांची मागणी व पुरग्रस्त परिस्थिती विचारात घेवून, नोंदीत बांधकाम कामगार, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन सवलतीसह पावसाळा संपेपर्यंत दिनांक ३०.०९.२०२२२ पर्यंत सुरू ठेवण्याबाबत

मंडळाच्या सचिवांनी दिनांक १२.०८.२०२२ अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

(ब) राज्यातील लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार तसेच, प्रलंबित नोंदणी व नुतनीकरणात वाढ होईपर्यंत नोंदीत बांधकाम कामगार, अनोंदीत बांधकाम कामगार व नाका बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजना सवलतीसह पुढील आदेशापर्यंत सुरू ठेवणेबाबतचा मंडळाकडील दि.३०.११.२०२२ अन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

(क) भोजन वितरण करताना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे वितरीत करण्याची व्यवस्था करण्यात यावी. सदर RF- Based कार्ड सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना दि.३१.०३.२०२३ पर्यंत वितरीत करावे व दि.०१.०४.२०२३ पासून भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) द्वारे भोजन वितरीत करण्यात यावे.

(ड) मध्यान्ह भोजन योजनेबाबत जेवणाच्या गुणवत्तेबाबत अन्न प्रशासन औषध विभागाचे जेवणाच्या गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात यावे.

उपरोक्त ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.०२ :- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण प्रशिक्षणाचा लक्ष्यांक निश्चिती व बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणे.

मंडळ सचिवांनी असे सादर केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य वृध्दीकरण योजनेच्या प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या १४ संस्थांना दि.२७.९.२०२२ रोजी मा. मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत नियुक्त संस्थांनी त्यांचेकडील प्रशिक्षण, संस्थाचा या पूर्वीच्या प्रशिक्षणातील अनुभव, उपलब्ध मनुष्यबळ व साधन सामुग्री, प्रशिक्षण साहित्य व अनुषंगिक बाबींकरीता सादरीकरण केले. संबंधित संस्थांनी सादर केलेल्या सादरीकरणावरून नियुक्त संस्थांना बांधकाम कामगारांना दयावयाच्या प्रशिक्षणाचा लक्ष्यांक सादरीकरणातील निर्देशानुसार खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	विभाग	जिल्हा सुविधा केंद्राचे नाव	जिल्ह्याचे लक्ष्यांक	संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक	अभिप्राय
१.	मे. इंडस एड्यु ट्रेन प्रा. लि	औरंगाबाद	औरंगाबाद	१६,३१४	५४,३२५	गुणांकनामध्ये प्रथम तीन असलेल्या संस्थामध्ये प्रथम दोन तृतीयांश लक्ष्यांकाचे वाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. यामध्ये चार विभागांचा समावेश करण्यात आला आहे. यामधील
			जालना	८,००४		
			नांदेड	६,२५४		
			परभणी	५,९३०		
			बीड	५,२७०		
			हिंगोली	२,६४९		
			लातूर	२,२८१		
			उस्मानाबाद	६९०		
		नाशिक	जळगाव	३,६९१		
			धुळे	३,२४२		
२.	टाईम्स सेंटर फॉर लर्निंग लि.	पुणे	कोल्हापूर	३९,३८४	५४,०८८	
			इचलकरंजी	५,६४७		
			सातारा	२,५३०		
		नाशिक	अहमदनगर	६,५२७		
		पुणे	सांगली	१३,६६७	५३,९२५	
			पुणे	१३,२००		
			सोलापूर	९,६६१		

अ.क्र.	संस्थेचे नाव	विभाग	जिल्हा सुविधा केंद्राचे नाव	जिल्ह्याचे लक्ष्यांक	संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक	अभिप्राय
३.	स्कील ट्री कन्सटिंग प्रा. लि.	नागपूर	वर्धा	६,७७५		क्षेत्रफळाने मोठा असलेल्या औरंगाबाद पुर्ण विभाग व नाशिक विभागामधील दोन जिल्हा सुविधा केंद्रे प्रथम क्रमांकाच्या संस्थेस प्रस्तावित. द्वितीय क्रमांकावर असलेल्या संस्थेस पुणे विभागातील तीन जिल्हा सुविधा केंद्रे व नाशिक विभागातील एक जिल्हा सुविधा केंद्र प्रस्तावित केले आहे.तसेच, तृतीय क्रमांकावर असलेल्या संस्थेस पुणे व
			नागपूर	४,३५९		
			भंडारा	३,२४५		
		नाशिक	नाशिक	३,०१८		

अ.क्र.	संस्थेचे नाव	विभाग	जिल्हा सुविधा केंद्राचे नाव	जिल्ह्याचे लक्ष्यांक	संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक	अभिप्राय
९.	भावसार फाऊंडेशन	कोकण	मुंबई उपनगर पश्चिम	१,४२३	१,४२३	क्रमवारीनुसार प्रस्तावित
१०	युगशक्ती सैक्षणिक एवम सामाजिक विकास संस्था	कोकण	ठाणे	१,२२२	१,२२२	
११	ब्रॉडकास्ट इंजनिअरींग कन्सल्टंट इंडीया लि.	कोकण	पालघर	१,१७४	१,१७४	
१२	जे.आय.टी.एम. स्कील प्रा.लि.	कोकण	मुंबई उपनगर पूर्व	१,०४४	१,०४४	
१३	एसटेक	कोकण	कल्याण	९९३	९९३	
१४	व्हॅल्युअर फॅबटेक	कोकण	रत्नागिरी	८०१	८०१	
एकूण				२,०९,८०६	२,०९,८०६	

२. महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांच्या दिनांक १८.११.२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्य, व्यवसाय प्रशिक्षण परिषद यांचेकडील सूचीबध्द संस्थांची (Empanelled Assesmet agency) यादी तसेच सूचिबध्द संस्थापैकी ज्या संस्थांना बांधकाम क्षेत्रातील प्रशिक्षणाच्या मूल्यमापनाचा अनुभव आहे अशा संस्थांची यादी सादर केली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ यांनी मंडळाकडील नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांच्या कौशल्य वृध्दीकरण प्रशिक्षणांअती कौशल्य चाचणी करीता महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाची नियुक्ती करण्याबाबत विनंती केली होती.

३. मंडळाच्या दिनांक २१.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कौशल्य विकास योजनेंतर्गत बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता केंद्र शासनाच्या CSDCI कडे एकूण २८ सूचीबध्द संस्था व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांच्याकडे एकूण ०६ संस्था सूचीबध्द संस्थामधून ई- निविदा पध्दतीने /अभिव्यक्ती स्वारस्य पध्दतीने संस्थेची निवड करणे अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचेकडील ०६ पैकी किती संस्थांना बांधकाम कामगारांना दिलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षणाचे मूल्यमापन करण्याकरीता नियुक्त करण्यात यावे असा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

४. वरीलप्रमाणे मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण च्या प्रशिक्षणाच्या लक्ष्यांक निश्चिती, बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणेबाबत मंडळस्तरावरून करण्यात आलेली कार्यवाहीस मंडळाने मान्यता प्रदान केली असून सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

ठराव क्र.५९(२)/२०२२ :-

(अ) मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य विकास वृध्दीकरण च्या प्रशिक्षणाच्या लक्ष्यांक निश्चितीबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

(ब) बांधकाम कामगारांच्या प्रशिक्षणाअंती मूल्यमापनाकरीता संस्था नियुक्ती करणेबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

अ.क्र.	संस्थेचे नाव	विभाग	जिल्हा सुविधा केंद्राचे नाव	जिल्ह्याचे लक्ष्यांक	संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक	अभिप्राय
						नागपूर विभागातील प्रत्येकी तीन व नाशिक विभागातील एक जिल्हा सुविधा केंद्र प्रस्तावित केले आहे. तसेच, लक्ष्यांक हे उतरत्या क्रमाने ठेवण्यात आले आहे.
४.	पिपल ट्रि व्हेन्चर प्रा.लि.	अमरावती	बुलढाणा	१०,४१५	१७,६८४	तृतीय क्रमांकाशी समान गुण धारण करीता असल्याने अमरावती विभागातील जास्त लक्ष्यांक असलेली दोन जिल्हा सुविधा केंद्रे प्रस्तावित
			अमरावती	७,२६९		
५.	सिमॅसेस लर्निंग एलएलपी	अमरावती	यवतमाळ	६,३८२	११,६४०	पाचव्या क्रमांकाच्या संस्थेस
			अकोला	४,२४५		
			वाशिम	१,०१३		

अ.क्र.	संस्थेचे नाव	विभाग	जिल्हा सुविधा केंद्राचे नाव	जिल्ह्याचे लक्ष्यांक	संस्थेचे प्रस्तावित एकूण लक्ष्यांक	अभिप्राय
						अमरावती विभागातील उर्वरीत कमी लक्ष्यांक असलेली तीन जिल्हा सुविधा केंद्रे प्रस्तावित
६.	लेबरनेट सर्व्हिसेस इंडीया प्रा.लि.	नागपूर	चंद्रपूर	१,८८७	५,४१२	सहाव्या क्रमांकाच्या संस्थेस नागपूर विभागातील उर्वरीत कमी लक्ष्यांक असलेली तीन जिल्हा सुविधा केंद्रे व नाशिक जिल्ह्यातील उर्वरीत एक जिल्हा सुविधा केंद्र प्रस्तावित
			गडचिरोली	१,८४८		
			गोंदिया	१,१५५		
		नाशिक	नंदुरबार	५२२		
७.	मोसॅक वर्कस्किल प्रा.लि.	कोकण	मुंबई शहर	२,४७५	४,३९८	उर्वरीत आठ संस्थांना कोकण विभागातील जिल्हा सुविधा केंद्रे
		कोकण	पनवेल	१,९२३		
८.	पॅलेर्डीअम कन्सिल्टींग इंडीया प्रा. लि.	कोकण	सिंधुदूर्ग	१,६७७	१,६७७	

विषय क्र.०३ :- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना म्हाडा, सार्वजनिक खाजगी भागीदारी, बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मितीद्वारे राबविण्यास धोरण निश्चितीस मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळामार्फत बांधकाम कामगारांकरीता अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) व अटल बांधकाम कामगार आवास योजना (शहरी) अशा दोन योजनांची अंमलबजावणी केली जाते.

२. वरीलप्रमाणे योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्याकरीता व अधिकाधिक बांधकाम कामगारांना स्वत:च्या हक्काच्या घरकुलाचा लाभ मिळावा याकरीता बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना खालील तीन प्रकारे राबविण्याचे विकल्प मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय कामगार विभाग यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते.

अ.	**म्हाडाकडे उपलब्ध असलेली घरे**
i)	संबंधित जिल्हयात म्हाडाकडे किती घरे प्रधानमंत्री आवास योजनेतर्गत तयार आहेत याबाबतची माहिती मिळविणे
ii)	म्हाडाकडून घरे उपलब्ध झाल्यास रू.२.५ लक्ष प्रधानमंत्री आवास योजनेतर्गत रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य मंडळाकडून व रू.५०,०००/- इतकी रक्कम बांधकाम कामगार स्वत: जमा करेल याप्रमाणे रू.५ लक्ष इतकी रक्कम सदर घरांकरीता म्हाडाकडे जमा करण्यात येईल.
iii)	सदर योजनेकरीता इच्छुक बांधकाम कामगार जिल्हा कार्यालयांकडे अर्ज करेल व अर्जासोबत संबंधित कागदपत्रे जमा करेल. सदर कागदपत्रांमध्ये बँकेकडून कर्ज मंजूर झाल्याच्या पत्राचाही समावेश असेल
iv)	सदर अर्जाची छाननी संबंधित जिल्हयाचे सरकारी कामगार अधिकारी/ सहाय्यक कामगार आयुक्त करतील व सदर लाभार्थी पात्र झाल्यास जिल्हा कार्यालयाचे अधिकारी त्याबाबत संबंधित बांधकाम कामगारास अवगत करेल व तद्नंतर संबंधित बांधकम कामगार रू.५०,०००/- मंडळ खाती जमा करेल. त्यानंतर संबंधित जिल्हा कार्यालय अधिकारी सदर अर्ज प्रमाणपत्र व शिफारशीसह मंडळ मुख्यालयाकडे पाठवतील
v)	सदर यादीस मान्यता देऊन मंडळाचे प्रति लाभार्थी रू.२.०० लक्ष अर्थसहाय्य व कामगारांनी जमा केलेले रू.५०,०००/- या प्रमाणे प्रति लाभार्थी रू.२.५ लक्ष प्रमाणे रक्कम म्हाडा कार्यालयाकडे जमा करेल. म्हाडाकडे जमा करावयाच्या उर्वरित रक्कमेकरीता बांधकाम कामगारांस बँकेकडून कर्ज उपलब्ध करून दयावा लागेल
vi)	म्हाडा कार्यालयाने लाभार्थ्यांची यादी प्रदर्शित केल्यावर संबंधित जिल्हयाचे सहाय्यक कामगार आयुक्त व बांधकाम कामगार यांचे संयुक्त प्रमाणपत्र बँकेकडे जमा

	केल्यावर लाभार्थ्यांच्या बँकेकडून रक्कम म्हाडा कार्यालयाच्या खात्यावर जमा करण्यात येईल व तद्नंतर लाभार्थ्यांला घराचा ताबा देण्यात येईल.
ब.	**सार्वजनिक -खाजगी भागीदारी-**
i)	याबाबत गृहनिर्माण विभागाच्या दि.११.०१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यवाही अपेक्षित
ii)	सदर योजना महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळामार्फत राबविण्यात येईल, सबब प्रकल्पांचे अंदाजित मूल्य व रक्कम भागीदारी याबाबत तसेच कार्यपध्दती बाबत धोरण निश्चित करावे लागेल
क.	**बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मिती सदर योजना दोन प्रकारे राबविता येईल**
i)	या मध्ये बांधकाम कामगारा वैयक्तिकरित्या स्वत: घर बांधेल व त्याकरीत मंडळाकडून निश्चित अर्थसहाय्य देण्यात येईल.
ii)	बांधकाम कामगारांचा समूह एकत्र येऊन गृहनिर्माण सोसायटी नोंदीत करतील त्याअंतर्गत भूखंड खरेदी करून जागेच्या किंमतीसह घर बांधणीचा खर्च निश्चित करतील. स्वत:कडील रक्कमेने सदर जागेवर घराचे बांधकाम करायला सुरूवात करतील ५०% घराचे बांधकाम झाल्यावर उर्वरित ५०% रक्कम मिळण्याकरीता जिल्हा कार्यालयामार्फत मंडळाकडे प्रस्ताव सादर करतील

३. वरीलप्रमाणे मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांना सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करून सदरचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, कामगार यांचेमार्फत सादर करण्याचे निर्देश दिले होते त्या अनुषंगाने दिनांक २१.११.२०२२ अन्वये प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

४. सदर विषयाबाबत चर्चा करताना मा.कामगार आयुक्त यांनी अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातीकरीता घरे उपलब्ध होत असून त्याबाबत मंडळाकडून कार्यवाही करावी असे मत व्यक्त केले. मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी बांधकाम कामगारांची संगणक प्रणालीमध्ये अशा पद्धतीची वर्गवारी आहे का हे तपासून, अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातीकरीता निहाय तपशिल सादर करण्याच्या सूचना केल्या.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९(३)/२०२२ :- मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता घरकुल योजना म्हाडा, सार्वजनिक खाजगी भागीदारी, बांधकाम कामगारांच्या समूहामार्फत सोसायटीची निर्मितीद्वारे राबविण्याच्या धोरण निश्चितीबाबत मंडळाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.०४ :- मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी प्रसार प्रसिध्दीच्या माध्यम आराखडा रू.३० कोटी वरून रू.१०० कोटी करण्याच्या सुधारित प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडयास मंजूरी देणे व सन २०२३-२४ चा नवीन प्रसार प्रसिध्दी माध्यम आराखडा तयार करण्यास मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृती प्रसिध्दी आराखडा या खर्च बाबीकरीता सन २०२२ -२०२३ चे मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रू ३०.०० कोटी मध्ये वाढ करून रू. १००.०० कोटी इतका सुधारीत तरतुदीस मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी मंजूरी प्रदान केली होती त्या अनुषंगाने सुधारित आराखडा शासन मान्यतेस खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे.

अ.क्र.	मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृतीची माध्यमे	सन २०२२-२०२३ मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद (रु.कोटी)	सन २०२२-२३ चे सुधारीत तरतूद (रु.कोटी)
१	२	३	४
१	MSRTC Panels	३.००	१०.००
२	Hoardings- All types	६.००	१०.००
३	Bus Queue Shelters (in Mumbai)	२.००	३.००
४	MSRTC announcements at Bus Stands	२.००	१०.००
५	Documentary Production	०.१०	४.००
६	Radio Spot & jingle Production	०.१६	१.००
७	Mobile LED Van for Promotion	२.००	१०.००
८	Print	४.००	१.००
९	TV Media	३.५०	१.००
१०	Electronic Sing Board	२.५४	५.००

अ.क्र.	मंडळाकडील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दि व जनजागृतीची माध्यमे	सन २०२२-२०२३ मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद (रु.कोटी)	सन २०२२-२३ चे सुधारीत तरतूद (रु.कोटी)
११	Social Media	०.१०	१०.००
१२	Radio	१.००	१.००
१३	TV Creative Production	०.६०	६.००
१४	Best/TMC/NMMC/other Muncipal Corporation Panells	३.००	३.००
१५.	Campaigns (Registration and Schemes) कलापथक, पथनाट्य, चित्ररथ	--	१०.००
१६	Mobile Kiosks	--	६.००
१७	Cable Advertising	--	९.००
एकूण		३०.००	१००.००

२. तसेच, सदर बैठकीत मंडळाच्या सन २०२३- २०२४ करीता रक्कम रू.१०० कोटीचा आराखडा तयार करण्याच्या विचार-विनमिया करीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

३. सदर विषयाबाबत मा मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी केबल जाहिरात प्रसारण माध्यमाच्या बाबतीत तरतूद कमी करून आराखडा सुधारित करण्याबाबत निर्देश दिले.सदर आराखडयात सुधारणा केल्यानंतर सुधारित आराखडा मान्यतेस सादर करावा असे निर्देश दिले. सदर प्रचार व प्रसिध्दीच्या आराखडयात सुधारणा करण्याचे सर्व अधिकार मा मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांना सर्वानुमते प्रदान करण्यात आले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९ (४)/२०२२

बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृती बाबत शासन मान्यतेस सादर करण्यात आलेल्या आराखडयात सुधारणा असल्याने मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांच्या निर्देशान्वये सुधारणा करण्यात यावे व सुधारणा झाल्यानंतर प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. तसेच, बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचा प्रसार, प्रसिध्दी व जनजागृती च्या सन २०२२-२०२३ करीता रू.१०० कोटीच्या खर्चास

मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली. मंडळाच्या सन २०२३-२४ करीता रक्कम रू.१०० कोटीचा आराखडा तयार करण्यास मान्यता प्रदान केली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.०५ :- राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणे योजना राबविणेबाबत मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार यांच्या अध्यक्षतेखालील दि.१३.०९.२०२२ रोजी झालेल्या आढावा बैठकीत बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाबाबत आढावा घेताना मा. मंत्री महोदय यांनी नाक्यावरील बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत तसेच, सदर नाक्यावरील बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता नाक्याच्या ठिकाणी बांधकाम कामगारांचे ऊन-पाऊस यांच्यापासून संरक्षणाकरीता शेड बांधण्यात यावी व त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने जिल्हयातील कार्यक्षेत्रातील नाक्याच्या ठिकाणे, तेथील अंदाजित बांधकाम कामगारांची संख्या याची माहिती सादर करणेबाबत जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

२. मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी दि.२७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सर्व जिल्हा कार्यालयांनी जिल्हयातील संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाशी संपर्क साधून नाक्याच्या ठिकाणी शेड बांधण्याकरीता जागा उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करून, जागा उपलब्धतेबाबतचा अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी यांना एक महिन्याच्या कालावधीत पाठविण्याबातचे निर्देश कामगार आयुक्त यांच्या स्तरावरून क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात यावेत. त्यानंतर, जागांच्या उपलब्धतेबाबतचा एकत्रित अहवाल सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनास सादर करावा अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत मंडळाच्या दि.१०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे. त्याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, जिल्हा कार्यालयामार्फत माहिती प्राप्त होताच अहवाल सादर करण्यात येईल.

३. महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांच्याकडून जागेचा तपशील प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यास मंडळाने मान्यता प्रदान केली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९(५)/२०२२ :-

राज्यातील महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात शेड उभारणे या योजनेस मंडळाने तत्वत: मान्यता प्रदान केली असून, महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांच्याकडून जागेचा तपशील प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.०६ :- मंडळातील मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेचे कामास मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा.आ.श्री.भरतशेठ गोगावले (विधानसभा सदस्य) यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या पत्रानुसार मा. मंत्री (कामगार)यांनी दिलेल्या निर्देशान्वये राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख अस्ताव्यस्त अवस्थेत आहेत, तरी ते सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्यात यावे, असे नमूद आहे.

२. राज्यातील कामगार विभागाच्या कार्यालयातील अभिलेख अस्ताव्यस्त अवस्थेत आहेत, तरी ते सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्याबाबत प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. मुख्यालय स्तरावर, विभागीय व जिल्हा कार्यालय स्तरावर जतन करून ठेवण्यात आलेले अभिलेख स्कॅनिंग करून डिजीटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्यातबाबत ई- निविदा पध्दतीने कार्यवाही करणेबाबतच्या प्रस्तावास मा मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

३. मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांना तांत्रिक मान्यता व माहिती मिळणेबाबत मंडळाच्या दिनांक १८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांनी त्यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे.

४. स्थानापन्न संचालक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांच्या दिनांक १९.११.२०२२ रोजीच्या पत्रात कळविलेल्या निकषाच्या अनुषंगाने, जिल्हा सुविधा केंद्रात अभिलेख कक्ष अद्यावतीकरणास उपलब्ध जागेत कॉपेक्टर स्टोअरेज व स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करण्याबाबत कार्यालय निहाय उपलब्ध अभिलेख कक्षाची जागा व अभिलेख व्याप्ती लक्षात घेऊन कॉम्पेक्टरची संख्या निश्चित करावी व या कार्यालयास मागणी तात्काळ कळविण्याबाबत सर्व जिल्हा कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

५. याबाबत मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष व मा. प्रधान सचिव, कामगार यांनी मुख्यालय व जिल्हा कार्यालयातील अभिलेख सुस्थितीत स्कॅनिंग करून डिजिटल कॉपेक्टरमध्ये जतन करून ठेवण्याबाबत आवश्यक असल्याचे मत नोंदविले त्यास मंडळाने मान्यता प्रदान केली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९(६)/२०२१ :-

मंडळातील मुख्यालय व अधिनस्त जिल्हा कार्यालयाच्या अभिलेख कक्षाचे अद्यावतीकरणांतर्गत कॉपेक्टर स्टोरेज व अभिलेख स्कॅनिंग ॲण्ड डिजिटायझेशन करून घेणेबाबतच्या मंडळाच्या योजनेस मान्यता प्रदान करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.०७ :- मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा राज्यस्तरावर ०१ व विभाग स्तरावर ०६ ठिकाणी कार्यन्वित करण्याच्या धोरण निश्चितीस मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १३.०७.२०२० रोजी संपन्न मंडळाच्या ५५ व्या बैठकीत कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भाव कालावधीत करावयाच्या नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाच्या कार्यपध्दतीबाबत सादर विषयावर सविस्तर चर्चेअंती सदर कालावधीत बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण/ लाभ वाटपाकरीता कार्यालयामध्ये गर्दी होऊन विषाणूचा प्रसार अधिक वेगाने होऊ नये याकरीता ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाची कार्यवाही करण्याचा निर्णय मंडळ बैठकीत घेण्यात आला होता.

२. बांधकाम कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा कार्यन्वित करणेबाबत मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली असून शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

३. सदर विषयाबाबत मा. कामगार आयुक्त यांनी असे मत मांडले की, मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एकच क्रमांक घेण्यात यावा त्याकरीता वेगळया वेगळया लाईन्स घेण्यात याव्यात असे प्रस्तावित केले. त्यास मंडळाने मान्यता प्रदान केली.

ठराव क्र.५९ (७)/२०२२ :-

मंडळातील बांधकाम कामगारांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा करीता एकच क्रमांक घेण्यात यावा व त्याकरीता वेगळया वेगळया लाईन्स घेण्यात याव्यात असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.०८ :- बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण शुल्काची रक्कम रू.०१/- इतकी ठेवणे, नोंदणी/ नुतनीकरणाचा अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून वैधता ०१ वर्ष ठेवणे, लॉगइन आयडी वाढवून देणे व IWBMS संगणक प्रणाली लॉगिन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करणे इत्यादी धोरणात्मक निर्णयास मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक १३.०९.२०२२ व दिनांक २७.०९.२०२२ रोजीच्या बैठकीत बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणेबाबत निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी व नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

i)	इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम १२ (३) मध्ये नोंदणी शुल्काबाबतची तरतूद आहे. बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण करण्याच्या शुल्काच्या सद्यस्थितीतील रक्कमेत बदल करून सदर शुल्काची रू.०१/- इतकी ठेवावी.
ii)	बांधकाम कामगाराचा नोंदणी/ नुतनीकरण अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून नोंदणी/ नुतनीकरणाची वैधता एका वर्षाची ठेवण्यात यावी.
iii)	नोंदणी अधिकाऱ्याच्या कार्यालयातील लिपीकांना आवश्यकतेनुसार लॉग इन आयडी वाढवून देण्याची कार्यवाही सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने करण्यात यावी.
iv)	IWBMS संगणक प्रणालीमधील लॉग इन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करण्यात यावी.
v)	बांधकाम कामगाराच्या नोंदणी/ नुतनीकरणासाठीच्या अर्जासोबत सादर केलेल्या माहितीबाबत स्पष्टीकरणाकरीता (Clarification) बांधकाम कामगाराकडे परत पाठविण्यात आलेल्या अर्जाच्या बाबतीत संबंधित बांधकाम कामगाराने ०७ दिवसात स्पष्टीकरण सादर करावे. बांधकाम कामगारांकडून विहीत मुदतीत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्यास सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा. याबाबत संबधित कामगारास मोबाईलवर एस.एम.एस. पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी.
vi)	बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणासाठी जिल्हा सुविधा केंद्र निहाय आवश्यक मनुष्यबळ पुरविणेबाबत मे. आय.टी. आय. प्रा.लि. व मे. आरसीएस इन्फो

	प्रा.लि. या संस्थांना कळविण्यात यावे. परंतु, या कामासाठी सदर संस्थेसोबत केलेल्या करारामध्ये नमूद केलेल्या मनुष्यबळापेक्षा अतिरिक्त मनुष्यबळ लावावे लागत असल्यास त्याबाबत कोणताही अतिरिक्त आर्थिक भार मंडळावर येणार नाही, याची दक्षत घ्यावी.
vii)	बांधकाम कामगारांचे प्रलंबित नोंदणी/ नुतनीकरणाबाबतचे अर्ज दि.१५ डिसेंबर, २०२२ पर्यंत तातडीने निकाली काढण्याबाबत सर्व नोंदणी अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात.

२. वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत मंडळाच्या दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालये व मे. आर.सी.एस. इन्फो प्रा.लि व मे. आयटीआय लिमिटेड प्रा.लि. यांना कळविण्यात आलेले आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

ठराव क्र.५९(८)/२०२२ :-

बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण शुल्काची रक्कम रू.०१/- इतकी ठेवणे, नोंदणी/ नुतनीकरणाचा अर्ज ज्या दिनांकास मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून वैधता ०१ वर्ष ठेवणे, लॉगइन आयडी वाढवून देणे व IWBMS संगणक प्रणाली लॉगिन आयडी मध्ये एकावेळी ५० अर्ज दिसतील अशी सुधारणा करणे व इतर उपाययोजनाबाबत मंडळामार्फत केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.०९ :- मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांचेकरीता वाहन खरेदीस मंजूरी देणे व मा.मंत्री कार्यालय (कामगार) यांचेकरीता दोन वाहने भाडयाने घेणेबाबत, मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यकतेनुसार वाहने भाडयाने घेण्यास मुदतवाढ देणे.

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की,

(अ) मा. मंत्री (कामगार) हे महाराष्ट्र इमारत इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई या मंडळाचे अध्यक्ष आहेत. मंडळाचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर असल्यामुळे मंडळाचे अध्यक्ष यांना कामकाजाचा आढावा व अनुषंगिक कार्यक्रमाकरीता विविध जिल्हयांना भेटी व लांब पल्यांचे दौरे/ प्रवास करणे क्रमप्राप्त असल्यामुळे मा. अध्यक्षांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन वाहन खरेदी आवश्यक आहे. त्यासाठी MG Gloster हे अत्याधुनिक वाहन खरेदी करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

२. मा. मंत्री (कामगार) यांचेकडील इनोव्हा क्रिस्टा हे वाहन सन २०१५ मध्ये मंडळामार्फत खरेदी करण्यात आले असून सदरचे वाहन वारंवार नादुरूस्त होत आहे.

३. वरील बाबींच्या अनुषंगाने मे. क्रिशीव ऑटो एजन्सीज प्रा.लि. यांनी MG GLOSTER SAVVY ६ SEATER BS६ ४X४ करीता दराचा तपशील सादर केला असून ते पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वाहनाचे नाव मेक मॉडेल	तपशील	रक्कम रू.
१.	MG GLOSTER SAVVY ६ SEATER BS६, ४X४	Invoice	४०,७७,८००
		१% TCS	४०,७७८
		Registration- Company	८,३६,८५१
		Insurance Elite	१,७९,४५०
		Essential Kit	१२,७२०
		Fast Tag	५,००
		On Road Price Rs.	**५१,४८,०९९/-**

४. मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार यांच्या मान्यतेनुसार MG GLOSTER SAVVY ६ SEATER BS६ ४X४ हे वाहन रू.५१,४८,०९९/- मर्यादेत मंडळाच्या उपकर निधीमधून वाहन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव विशेष बाब म्हणून शासन मान्यतेस्तव दिनांक १७.१०.२०२२ रोजी सादर करण्यात आलेला आहे.

(ब) मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचे कार्यालयातील प्रशासकीय कामकाजाकरीता मा.मंत्री कार्यालयाकडील दि. ०२.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये १ इनोव्हा

कार आणि १ स्विफ्ट कार अशी २ वाहने उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार दोन वाहने भाडे तत्त्वावर घेणे आवश्यक आहे.

२. मंडळ मुख्यालयातील प्रशासकीय दौरे,मंत्रालयीन कामकाज इ. साठी एक मारुती एर्टिगा कार हे वाहन शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १०.०८.२०२० मधील पुरवठादाराचे नामिका (Panel)वरील शासनमान्य पुरवठादार मे.संजय ट्रॅव्हल्स,मुंबई या खाजगी पुरवठादाराकडून करारनाम्याद्वारे मंजूरी देण्यात आली असून त्यानुसार मंडळ मुख्यालयातील कार्यालयीन कामकाजाकरिता एक मारुती एर्टिगा अथवा तत्सम प्रकारचे वाहन मासिक भाडेतत्त्वावर घेण्यासाठी दिनांक ०१.११.२०२२ पासून पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी मंजूरी देणे आवश्यक आहे.

३. मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणी व प्रसार प्रसिध्दीकरीता विभाग आणि जिल्हा क्षेत्रिय कार्यालयांना वाहन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने मंडळाच्या दिनांक ०४.०९.२०१९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र ५२(०९)/२०१९, अन्वये कामगार आयुक्त कार्यालयाअंतर्गत ४४ विभाग/ जिल्हा कार्यालयांपैकी ज्या विभाग/ जिल्हा कार्यालयातील अधिका-यांची पदे भरलेली आहेत त्या अधिका-यांना मंडळाच्या कामकाजासाठी बोलेरो/ स्कॉर्पियो अथवा तत्सम प्रकारचे वाहन मासिक भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळाचे पत्र दिनांक २७.०९.२०१९ अन्वये संबंधित विभाग/ जिल्हा कार्यालयांतील अधिका-यांना वाहने भाडेतत्त्वावर घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

४. विभाग/जिल्हानिहाय वाहन-प्रकारामध्ये एकवाक्यता येणेचे व मंडळाचे खर्चामध्ये काटकसर होणेचे दृष्टीने यापुढे मंडळाचे दिनांक 04.09.2019 चे बैठकीतील ठराव क्र .52(9) /2019 नुसार बोलेरो /स्कॉर्पियो हि वाहने अथवा तत्सम वाहने यामध्ये सुधारणा करून त्याऐवजी वाहन-प्रकारामध्ये बोलेरो/ स्विफ्ट -डिझायर/ मारूती एर्टिगा यापैकी एक वाहन जिल्ह्याचे भौगोलिक परिस्थितीचा विचार करून वाहन भाडेतत्वावर घ्यावे.

५. सद्या ज्या विभाग /जिल्हा कार्यालयांकडे वाहन उपलब्ध नाही अशा नव्याने वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची मागणी करणा-या प्रस्तावांना वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेल्या वाहनापैकी स्पर्धात्मक दराद्वारे विहीत खरेदी प्रक्रियेचा अवलंब करून किफायतशीर दराने संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परीवहन प्राधिकरणाने (RTA) यांनी निश्चित केलेल्या दराचे मर्यादेत १ वर्षाचे कालावधीकरीता आणि लॉग-बुक नोंदी प्रमाणिकरण करणेचे अटींना अधिन राहून मान्यता मिळणे आवश्यक आहे.

६. तसेच, ज्या कार्यालयांनी त्यांचेकडील भाडेतत्त्वावर घेतलेल्या वाहन करारनाम्याची मुदत संपल्याने मुदतवाढीची मागणी केली आहे अशा कार्यालयांना वरील नमूद अटी शर्थींना अधीन राहून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

७. मंडळ सदस्य मा. कामगार आयुक्त यांनी मंडळाचे सदस्य असलेले मा.प्रधान सचिव (कामगार) आणि इतर शासकीय सदस्य यांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा

आढावा व अनुषंगिक कामकाजचे लांब पल्ल्याच्या दौ-यांसाठी कार्यालयीन कामकाजाकरीता भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याची मागणी केली.सदर मागणीस मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५९(९)/२०२२:-

(अ) मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचेकरीता वाहन खरेदीबाबत मंडळामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता.

(ब) मा.मंत्री कार्यालय (कामगार) यांचेकरीता दोन वाहने भाडयाने घेणे, मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांसाठी आवश्यकतेनुसार १ वर्षाकरीता वाहने भाडयाने घेण्यास मंडळाची मान्यता.

(क) मंडळाच्या शासकीय सदस्य यांना लांब पल्ल्याच्या दौ-यांसाठी तसेच, कार्यालयीन कामकाजाकरीता भाडेतत्त्वावर वाहन उपलब्ध करून देण्यास मंडळाची मान्यता.

उपरोक्त ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१० :- मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी मंत्रालय परिसरात कार्यालयीन जागा भाडयाने घेण्याबाबत, मंडळ मुख्यालयासाठी कायमस्वरूपी कार्यालयीन जागा व इमारत बांधकामास मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. प्रधान सचिव (कामगार) व कामगार विभागाचे मंत्रालयीन अधिकारी यांचेसमवेत मा. मंत्री (कामगार) यांच्या निर्देशानुसार बैठका आयोजित केल्या जातात. त्या अनुषंगाने मंत्रालयाच्या जवळपास मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून घेण्याबाबत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने, सर्वात कमी दर असलेल्या जॉली मेकर ०१ प्रिमायसेस कॉ. हॉ. सोसायटी लि. ०८ वा मजला नरीमन भवन प्रिमायसेस येथे कार्यालयीन जागा भाडयाने घेण्यास मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली. सदर मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. शासन मान्यतेअंती पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे. जॉली मेकर, ०१ प्रिमायसेस कॉ. ऑप. हॉसिंग सोसायटी लिमिटेड येथील क्षेत्रफळ १५६० चौ. फूट २४०+ GST बाबत वाजवी दर प्रमाणपत्र मिळण्याबाबत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदरचे वाजवी दर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

२. सदर विषयाबाबत मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी जॉली मेकर, ०१ प्रिमायसेस कॉ. ऑप. हॉसिंग सोसायटी लिमिटेड येथील क्षेत्रफळ १५६० चौ. फूट २४०+ GST बाबत वाजवी दर प्रमाणपत्र त्वरीत प्राप्त करण्यात यावे व सदर जागामालकासोबत करारनामा करून कार्यालय स्थापनेची कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

३. मंडळ मुख्यालयातील भाडे खर्चाचे प्रमाण पाहता मंडळाचे मुख्यालयाकरीता स्वत:ची जागा घेऊन इमारत बांधण्याबाबत मंडळ सचिवांनी मत व्यक्त केले. त्याबाबत मा. कामगार आयुक्त, यांनी सिडकोचा एक प्लॉट खरेदी करून मंडळ मुख्यालयाची इमारत उभारण्याबाबत विचारविनिमय व्हावा असे प्रस्तावित केले. सदर प्रस्तावास मंडळाने मान्यता प्रदान केली आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९ (१०)/२०२२ :-

(अ) मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचेकरीता मंडळाच्या बैठका आयोजित करण्यासाठी मंत्रालय परिसरात कार्यालयीन जागा भाडयाने घेण्याबाबत शासनास सदर करण्यात आलेल्या प्रस्तावास मंडळाची मान्यता.

(ब) मंडळ मुख्यालयाकरीता सिडकोद्वारे सुयोग्य ठिकाणी प्लॉट खरेदी करून मंडळ मुख्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.

उपरोक्त ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.११ :- मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे लाभ वाटपासाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यास मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या उपकराचे व इतर बाबींचे जमेकरीता बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया, या बँका मध्ये खाते उघडण्यात आलेले आहेत तसेच सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया मधील खाते क्र 3722416269 हे मंडळाच्या खर्च विषयक आर्थिक व्यवहाराकरीता वापरण्यात येत आहे.

२. सेंट्रल बँकेच्या खातेवरून मंडळाकडील नोंदीत (सक्रीय (बांधकाम कामगारांना ऑनलाईन पध्दतीने विविध कल्याणकारी योजनांतर्गंत (DIRECT BENEFIT TRANSFER) थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने लाभ वाटप करण्यात येत आहे सदर लाभ . वाटपानंतर बँकेमार्फत प्राप्त अहवालामध्ये अनेक तांत्रिक त्रुटी आढळून येत आहेत तसेच सदर प्राप्त अहवालामध्ये योजनेचा लाभ त्यांच्या बँक खात्यामध्ये यशस्वीपणे जमा झाला आहे किंवा नाही याचे अहवाल वेळेवर प्राप्त होत नाहीत, लाभार्थींच्या खात्यात विलंबाने रक्कम जमा करणे, त्रुटीपूर्ण व विसंगत अहवाल सादर करणे इत्यादी कारणांमुळे मंडळाच्या लेखांकन कामकाजात दैनंदिन अडचणी येत आहेत. याबाबत वारंवार सूचना व पाठपुरवठा करूनही सेंन्ट्रल बँक ऑफ इंडिया यांचेकडून सुधारणा झाली नाही.

३. मंडळाकडील नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांना ऑनलाईन पध्दतीने विविध कल्याणकारी योजनांतर्गंत (DIRECT BENEFIT TRANSFER) थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने लाभ वाटपाच्या कार्यपध्दतीबाबत दि. ०५.०८.२०२२ रोजी विविध राष्ट्रीयकृत बॅका व खाजगी बँकांना उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने बॅक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक व एच. डी. एफ. सी. बॅक, कॅनरा बँक, बँक ऑफ इंडिया, ॲक्सीस बँक इत्यादी बँकांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यास अनुसरून संबंधित बँकांना सादरीकरण करण्यासाठी कळविले होते. त्यानुसार बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया यांना Test & Trail Base साठीच्या कार्यवाही करिता डेटा पुरविण्यात आला होता व संबंधित बँकांनी आपले यशस्वी प्रदाने व इतर प्रदानाबाबत अयशस्वी प्रदान होणेबाबतची कारणे नमूद करून सविस्तर अहवाल मंडळास सादर केला होता.याबाबत बँक निहाय प्राप्त प्रस्तावांचे अवलोकन होऊन मे. एच.डी.एफ.सी. बँकेचा DBT द्वारे होणाऱ्या अनुदान वितरणाचा चाचणी अहवाल समाधानकारक सादर केला असून, मे. एचडीएफसी च्या बँक खात्यातून मंडळाचा आर्थिक व्यवहार टप्प्याटप्प्याने सुरू करण्याबाबत व मे. एचडीएफसी बँकेच्या स्वखर्चाने web portal / MIS managment आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आवश्यक राहील याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.

४. मंडळाकडील नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांना ऑनलाईन पध्दतीने विविध कल्याणकारी योजनांतर्गंत (DIRECT BENEFIT TRANSFER) थेट लाभ हस्तांतरण

पध्दतीने लाभ वाटपाच्या कार्यपध्दतीत सुलभता येण्यासाठी तसेच, आवश्यक ते अहवाल प्राप्त होण्यासाठी सॉफ्टवेअर सोल्यूशन व बॅकिग सेवा, तसेच Real Time Dash Board विकसित करण्याचे मान्य केलेले आहे. त्यानुसार मंडळाच्या बॅक खात्यावरील कोणत्याही व्यवहारामध्ये (Bank Transaction) बॅकेकडून परंस्पर हस्तक्षेप होणार नाही तसेच मंडळाच्या पूर्व परवानगी शिवाय कोणतेही व्यवहार (Transaction) होणार नाहीत आणि प्रस्तावित MIS Protal/Dash Board व विविध अहवाल इत्यादी. संगणकीय प्रणाली विकसित करताना RBI आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने वेळोवळी निर्गत केलेल्या सुरक्षा उपाय योजना आणि मार्गदर्शन सुचनाचा अवलंब करण्याबाबत आणि त्या अनुषंगाने बॅकेत प्रस्तावित केलेले MIS Protal विकसित करण्यासाठीचे मे. एच.डी.एफ.सी. बॅकेस दि. ०८.१२.२०२२ अन्वये कळविण्यात आले आहे. मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे लाभ वाटपासाठी मे. एच.डी.एफ.सी. बॅकेत स्वतंत्र बँक खाते उघडण्याबाबत मंडळामार्फत कार्यवाही करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५९(११)/२०२२:-

(अ) **मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे लाभ वाटपासाठी व इतर आर्थिक** व्यवहाराकरीता मे. एच.डी.एफ.सी. बॅकेत **स्वतंत्र बँक खाते उघडण्यास मान्यता.**

(ब) **DBT द्वारे लाभ वाटपाच्या कार्यपध्दतीत सुलभता येण्यासाठी तसेच आवश्यक ते अहवाल प्राप्त होण्यासाठी सॉफ्टवेअर सोल्यूशन व बॅकिग सेवा, तसेच Real Time Dash Board इत्यादीद्वारे MIS Protal मे. एच.डी.एफ.सी. बॅकेने स्वखर्चाने विकसित करण्याचे कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१२ :- मंत्रालयीन व मंडळाकडील संगणक विषयक कामकाजाकरीता संगणक तांत्रिक सल्लागारांच्या (ग्रॅन्ट थॉर्न्टन) नियुक्तीस मुदतवाढ देणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या दि. २७.१०.२०२० रोजी संपन्न बैठकीतील ठराव क्र. ५६/(७)/२०२० नुसार मंडळाचे पत्र दिनांक १२.११.२०२० नुसार मंडळाच्या निविदा/अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) तयार करणे व अनुषंगिक कामाकरीता दिनांक २७.११.२०२० ते दिनांक २६.०५.२०२१ या कालावधीकरीता २ मॅनेजिंग कन्सल्टंट व २ सिनियर कन्सल्टंट यांची ०६ महीनेकरीता नियुक्ती करण्यात आली होती.

२. मंडळाच्या दिनांक २५.०५.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर कंत्राटास दिनांक २७.०५.२०२१ ते दिनांक २६.११.२०२१ या ६ महिन्यांच्या कालावधीकरीता पहीली मुदतवाढ देण्यात आली होती. नियुक्त ४ सल्लागार (मे. ग्रँन्ट थॉर्न्टन) यांची विहीत कार्यपद्धतीचा अवलंब करुन मंडळ व कामगार विभाग, मंत्रालय येथील कामकाजाकरिता सल्लागार म्हणून दिनांक ०३.१२.२०२१ रोजीच्या शासनाचे कार्यादेशान्वये व मंडळाच्या दिनांक १५.१२.२०२१ रोजीच्या कार्यादेशान्वये दिनांक २७.११.२०२१ ते दिनांक २६.११.२०२२ पर्यंत ०१ वर्षापर्यंत दुसरी मुदतवाढ देण्यात आली होती.

३. शासनाच्या दिनांक १५.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, मे.ग्रॅन्ट थॉर्न्टन इंडिया एल. एल. पी. यांच्या ४ सल्लागारांना दि.२७.११.२०२२ पासुन पुढील १ वर्ष मुदतवाढ देण्यात यावी व त्याप्रमाणे मंडळाच्या बैठकीमध्ये याबाबत मान्यता घेण्यात यावी असे नमुद केले आहे. त्या अनुषंगाने दि.२८.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

ठराव क्र.५९ (१२)/२०२२ :-

मंत्रालयीन व मंडळाकडील संगणक विषयक कामकाजाकरीता संगणक तांत्रिक सल्लागारांच्या नियुक्तीस शासन निर्देशानुसार ०१ वर्ष मुदतवाढीबाबत मंडळाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१३ :- लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेण्याकरीता अभ्यास दौरा आयोजित करणे

मंडळ सचिवांनी सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत मंडळाकडे जमा होणारा उपकर वाढविण्याबाबत कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

२. वरील बाबींच्या अनुषंगाने लखनऊ (उत्तरप्रदेश) येथे जमा होणाऱ्या उपकराची कार्यपध्दती व इतर बाबींचा अभ्यास करणेबाबत दौरा आयोजित करणे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने मा. मंत्री महोदय कार्यालयातील प्रतिनिधी, मा. प्रधान सचिव तसेच मंडळ मुख्यालयातील अधिकारी यांचा दौरा आयोजित करण्याबाबत मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

३. सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लखनऊ (उत्तर प्रदेश) येथील उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणेबाबत निर्देशित केले आहे.

४. मा. अध्यक्ष यांनी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर प्रकरणी उपकर संकलन कार्यपध्दतीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याबाबत मंडळ सचिव यांनी लखनऊ (उत्तर प्रदेश) येथील अभ्यास दौऱ्याचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९(१३)/२०२२ :-

मा. अध्यक्ष तथा मंत्री महोदय, कामगार यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे उपकर संकलन कार्यपध्दतीचा आढावा घेण्याकरीता अभ्यास दौऱ्याबाबत मंडळाने केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१४:- बांधकाम कामगारांची नोंदणी,नुतनीकरण,लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनातर्गंत लाभ वाटपचा (DBT) तपशील खालीलप्रमाणे:-

अ.क्र.	महिना	नव्याने झालेली नोंदणी	नव्याने झालेले नूतनीकरण	एकूण झालेले लाभ वाटप
१	एप्रिल - २०२२	६६,४०५	१५६०५	२६८२९
२	मे - २०२२	५२,१३४	१३६२५	२२०४५
३	जुन - २०२२	६३२९८	१३६२८	१७४६०
४	जुलै-२०२२	६२७३१	११४५७	१३५९३
५	ऑगस्ट-२०२२	५५८२६	१०८८४	६०३४
६	सप्टेंबर-२०२२	८२८००	१८२४७	७६४९
७	ऑक्टोबर-२०२२	७७९१०	१८८७६	१४६६३
८	नोव्हेंबर-२०२२	२४१३०४	१९८३९	१४९४३
	एकूण	७,०२,४०८	१,२२,१६१	१,२३,२१६

उपरोक्त तपशील मंडळाच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

ठराव क्र. ५९(१४)/२०२२ :-

माहे एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर,२०२२ अखेर मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर बांधकाम कामगारांची नोंदणी ७,०२,४०८ व नुतनीकरण १,२२,१६१ आणि विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटप संख्या १,२३,२१६ याबाबत मंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या माहितीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१५:- मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की,इमारत व इतर बांधकाम कामगार यांचे संदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य,कल्याण विषयक व इतर संबंधित बाबीसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन)अधिनियम,१९९६ या केंद्रीय अधिनियमांतील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने इमारत व इतर बांधकाम नियम २००७ तयार केलेले आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम ,१९९६ च्या कलम ३(१)अनुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र.एसओ २८९९, दि.२६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार मंडळाकडील बँक खात्यामध्ये उपकर जमा होत आहे. तसेच नोंदीत,सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी मंडळाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो.

२. सद्यस्थितीत सन २०२२-२३ मध्ये, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाने माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर केलेल्या जमा उपकर व योजनानिहाय खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई									
सन २०२२-२०२३							(रक्कम रु. कोटीत)		
अ.क्र	महिना	जमा	योजनानिहाय खर्च						
		उपकर	मध्यान्ह भोजन	अत्यावश्यक संच	सुरक्षा संच	आरोग्य तपासणी	ऑनलाइन पद्धतीने लाभ वाटप (DBT)	प्रशासकीय खर्च	एकूण
१	एप्रिल - २०२२	261.5	63.26	13.59	13.61	0	11.18	7.8	109.44
२	मे - २०२२	159.29	168.56	44.06	43.64	9.02	29.4	7.96	302.64
३	जुन - २०२२	160.88	221.59	26.37	26.01	8.16	21.17	8.15	311.45
४	जुलै-२०२२	214.98	291.36	28.27	28.02	4.62	21.54	5.04	378.85
५	ऑगस्ट-२०२२	251.93	233.37	28.7	28.46	2.23	23.03	3.87	319.66
६	सप्टेंबर-२०२२	137.00	269.24	25.15	24.89	8.5	17.82	3.38	348.98
७	ऑक्टोबर-२०२२	185.13	220.62	32.88	32.6	6.67	17.98	7.24	317.99
८	नोव्हेंबर-२०२२	242.44	176.57	14.44	14.26	1.26	20.34	5.69	232.56
	एकूण	1613.15	1644.57	213.46	211.49	40.46	162.46	49.13	2321.57

उपरोक्त विषयाची सर्व मंडळ संदस्यांनी नोंद घेतली. मा. कामगार आयुक्त यांनी जमेपेक्षा जास्त खर्च दिसून येत असल्याने उपकर वाढीबाबत मंडळाकडून उपाययोजना करणे आवश्यक आहे असे मत नोंदविले. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव खालीलप्रमाणे

ठराव क्र. ५९(१५)/२०२२ :-

सन २०२२-२३ मध्ये, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाने माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर केलेल्या जमा उपकर व योजनानिहाय खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१६:- मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणूक करण्यासाठी मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष, गुंतवणुक उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुदत ठेव गुंतवणुक उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर बैठकीत गुंतवणुक उपसमितीतील खालील सन्माननीय सदस्य आहेत.

अ.क्र.	सदस्याचे नाव	पद
१.	मा. मंत्री महोदय, कामगार विभाग	अध्यक्ष
२.	मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
३.	उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
४.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई	सदस्य

२. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ व दिनांक १३.०३.२०२० रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार मंडळाकडील जमा उपकर निधीपैकी अतिरिक्त निधीची गुंतवणुक विविध राष्ट्रीयकृत बँकांमध्ये एका वर्षाकरीता करण्यात आलेली आहे, मुदत ठेव गुंतवणुकीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	बँकेचे नाव	शाखेचे नाव	गुंतवणूक दिनांक	गुंतवणुक रक्कम (रू.कोटीत)	व्याजदर द.सा.द. शे	परिपक्व रक्कम (रू. कोटीत)
१.	युनियन बँक ऑफ इंडिया	घाटकोपर (पुर्व), मुंबई	दि.१४.०१.२०२२	१४००	४.३०%	१४६१.१७
२.	युनियन बँक ऑफ इंडिया	घाटकोपर (पुर्व), मुंबई	दि.२७.०१.२०२२	१२००	४.३७%	१२५३.३०
३.	कॅनरा बँक,	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	दि.१६.०४.२०२२	१०५०	५.००%	११०३.४९
४.	कॅनरा बँक,	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	दि.११.०५.२०२२	८००	५.१५%	८४२.००
५.	कॅनरा बँक,	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	दि.१८.०५.२०२२	११५०	५.२०%	१२१०.९७

अ. क्र.	बँकेचे नाव	शाखेचे नाव	गुंतवणूक दिनांक	गुंतवणुक रक्कम (रू.कोटीत)	व्याजदर द.सा.द. शे	परिपक्व रक्कम (रू. कोटीत)
६.	कॅनरा बँक,	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	दि.२५.०५.२०२२	१६५०	५.४३%	१७३९.५९
७.	कॅनरा बँक,	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	दि.०८.०७.२०२२	६७०	६.७६%	७१६
८.	स्टेट बँक ऑफ इंडिया	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	दि.०६.०९.२०२२	१२५०	७.०५%	१३३८.१२
९.	युनियन बँक ऑफ इंडिया.	घाटकोपर (पुर्व), मुंबई	दि.१२.१०.२०२२	१२५०	७.३२%	१६६६.६१
एकूण				१०७२०		११३३१.१५

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र.५९ (१६)/२०२१ :- उपरोक्त मंडळाकडील अतिरिक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयकृत बँकेत करण्यात आली असून, त्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मंडळाने मान्यता प्रदान केली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१७ :- मा. उच्च न्यायालय मुंबई याचिका क्र. २७६९६/२०२१, रिट याचिका क्र.७७०१/२०२२, मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि.व मे. आयटी आय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेला खर्च वसूली प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेणे.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भाव काळात वितरीत करण्यात आलेल्या रू.२०००/-, रू.३०००/- व रू.१५००/- अर्थसहाय्याबाबत मे. आय.टी.आय. लिमिटेड व मे. आरसीएस प्रा.लि. या संस्थाचे देयकांची अदायगी रोखण्याबाबत शासनामार्फत निर्देश प्राप्त झाले होते.

२. शासनाच्या दिनांक १७.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पुरवठा संस्थांकडून प्राप्त झालेल्या देयकांपैकी ५०% रक्कम अदा करण्यात यावी व देय असलेल्या रक्कमेतून ५०% एवढी रक्कम ही वसूल करावयाच्या रू.११.५३ कोटी रककमेच्या वसूल प्रित्यर्थ कापून घेण्यात यावी. संस्थेकडून वसूल करावयाची रू.११.५३ कोटी रक्कम ही दि.३१.०३.२०२३ पर्यंत देय होणाऱ्या रक्कमांमधून वसूल करण्यात यावी तसेच, वसूलीसंदर्भात ०७ दिवसात संमतीपत्र मागविण्यात यावे. सदर संमतीपत्र न दिल्यास उपरोक्त रक्कमेसह इतर कोणतीही रक्कम संबंधितांना अदा न करता करावयाची वसुली ही बँक गॅरंटीतून करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले होते. तद्नंतर मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी मा. उच्च न्यायालयात मंडळ यांचे विरूध्द याचिका क्र.२७६९६/२०२१ सादर केल्याचे त्यांच्या विधी सल्लागारांनी दिनांक २७.११.२०२१ रोजी मंडळास कळविले. सदर याचिकेसंदर्भात दिनांक २९.११.२०२१, दिनांक २०.१२.२०२१ व दिनांक १२.०१.२०२२ रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीमध्ये संस्थेने मंडळाकडे जमा केलेल्या बँक गॅरंटीमधून वसुलीस स्थगिती देण्यात आली. सदर याचिकेसंदर्भात मा. अध्यक्ष महोदयांच्या अनुमतीने मंडळाचे शपथपत्र दिनांक १०.०१.२०२२ रोजी मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात आले होते.

३. सदर याचिकामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिनांक ०१.०७.२०२२ रोजी मा. श्री. नरेश पाटील सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तद्नंतर मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांच्या विरूध्दच्या लवाद प्रकरणाच्या स्थितीबाबत मा. श्री. नरेश पाटील, सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश यांचेकडील दि. १५.०७.२०२२ रोजीच्या ई-मेल द्वारे वादी आणि प्रतिवादी यांची प्राथमिक बैठक दिनांक १६.०७.२०२२ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आली होती. सदर प्रकरणी संबंधित संस्थेने केलेली मागणी फेटाळून, मंडळाच्या वतीने शपथपत्र दिनांक ३०.०७.२०२२ रोजी मा. लवादासमोर दाखल करून भूमिका मांडली होती.

४. मा. न्यायमूर्ती श्री. नरेश पाटील, सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश मा. उच्च न्यायालय लवाद यांचे दिनांक २६.०९.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्देशाच्या अनुषंगाने दिनांक २१.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दाव्याच्या विधानावर परिच्छेदनिहाय अभिप्राय शासनास

सादर करण्यात आले होते. सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक ०७.११.२०२२ रोजी असल्याने संबंधित संस्थेने केलेली मागणी फेटाळून सुधारित परिच्छेद निहाय अभिप्राय शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. तसेच, **मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. व मे. आयटी आय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेला खर्च वसूली प्रकरणी मंडळाची भूमिका शासनास वेळोवेळी अवगत करण्यात आली आहे.**

५. दरम्यानच्या कालावधीत सदर याचिकेची सुनावणी दिनांक ०८.११.२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती परंतु, सदर सुनावणी पुढे ढकलण्यात आली असल्याबाबत मा. श्री. नरेश पाटील, सेवानिवृत्त मुख्य न्यायाधीश मा. उच्च न्यायालय यांनी कळवले होते. तद्नंतर मे. आरसीएस इन्फोटेक यांच्या दिनांक ०३.११.२०२२ रोजी ई-मेल द्वारे सदर लवादाप्रकरणी वाटाघाटी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सादर प्रस्तावाच्या अनुषंगाने मंडळाच्या दिनांक २२.११.२०२२ रोजीच्या ई-मेल अन्वये दिनांक २४.११.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठकीस उपस्थित राहणेबाबत संस्थेस कळविण्यात आले होते. सदर बैठकीत मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी खालीलप्रमाणे रक्कम वसूली करण्याबाबत प्रस्ताव दिला होता.

Sr. No.	Particulars	Amount in Rs.
१.	Invoice Amount withheld (A)	१३,६१,५५,९६५
२.	DBT Transaction Amount (B)	४,५३,५२,४७०
३.	GST Amount (C)	२,०७,६९,५५४
४.	Total Amount claimed by MSP (D=A-(B+C)	७,००,३३,९४१
५.	Total amount to be Recovered by MBOCWW Board (E=A-D)	६,६१,२२,०२४

६. सदर बैठकीत खालील मुद्यांबाबत चर्चा करण्यात आली.

- कोविड-१९ अर्थसहाय्याच्या रू.२०००/- अर्थसहाय्याच्या प्रदानासाठी वापरण्यात आलेला लाभार्थी तपशील हा रू.३०००/- अर्थसहाय्य प्रदानाच्या लाभाकरीता वापरण्यात आलेला असल्याने रू.३०००/- च्या लाभाकरीता झालेला खर्च अनुज्ञेय नसल्याचे मंडळाचे तत्कालीन सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दिनांक ०५.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये संस्थेस कळविले होते.
- रू. १५००/- अर्थसहाय्याच्या प्रदानाकरीता वापरण्यात आलेला लाभार्थी तपशील हा जवळपास रू.२०००/- अर्थसहाय्य प्रदानाच्या लाभार्थी तपशीलाच्या एकसारखाच आहे.
- तसेच, पुरवठादार संस्थेकडून झालेल्या वस्तू व सेवाकरील खर्चाची मंडळाकडून प्रतिपूर्ती मान्य होणार नाही.

- वरील नमूद बाबींवर विचार करून सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित पुरवठादार संस्थेला सूचित केले होते.

७. वरील मुद्यांच्या अनुषंगाने दिनांक २५.११.२०२२ वाजता सकाळी ११.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी खालीलप्रमाणे सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

- पुरवठादार संस्थेने कोविड अर्थसहाय्य रू.३०००/- च्या प्रदानाकरीता झालेला खर्चासाठी दावा करणार नसल्याचे मान्य केले.
- पुरवठादार संस्थेने रू. १५००/- अर्थसहाय्याच्या प्रदानाकरीता वापरण्यात आलेला लाभार्थी तपशील हा जवळपास रू.२०००/- अर्थसहाय्य प्रदानाच्या लाभार्थी तपशीलाच्या एकसारखाच असल्याने रू.१५००/- अर्थसहाय्य प्रदानावरील खर्च सारखाच असल्याचे मंडळाची भूमिका मान्य नसल्याचे नमूद केले. त्यानुसार सुधारित प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केला आहे.

Sr. No.	Particulars	Amount in Rs.
१	Amount Paid to MSP towards this two covid claims (A)	१३,६१,५५,९६४/-
२	DBT Transaction Amount (B)	३,०४,९८,६१५/-
३	GST Amount on B (C)	५४,८९,७५१/-
४	**Total Amount to be recovered by MBOCWW Board (D=A-(B+C))**	**१०,०१,६७,५९९/-**

- सदर बैठकीत मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी वस्तू व सेवाकराच्या रक्कमेबाबत व वजावटीबाबत पुरवठादार संस्थेची सहमती असल्याचे सांगितले.
- दि.०१.०१.२०२३ पासून मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी वसूलीची रक्कम करार संपुष्टात येईपर्यंत दरमहा समान हफ्त्यात वसूल करण्याबाबत मागणी केली आहे.
- पुरवठादार संस्थेचे राखून ठेवलेले देयकांची अदायगी लवादाचे प्रकरण मागे घेतलेल्या दिनांकपासून ०७ दिवसात अदा करण्याबाबत मागणी केली आहे.
- पुरवठादार संस्थेने मोबीलायझेशन ॲडव्हान्स ची किंमत जेवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे तेवढी रक्कम कमी करण्याबाबत मागणी केली आहे.
- पुरवठादार संस्थेने मंडळाकडून सुरक्षा अनामत रक्कम कंत्राट रक्कमेच्या ०३% करण्याबाबत मागणी केली आहे.
- पुरवठादार संस्थेने भविष्यात अशा प्रकारचे प्रदान करावयाचे झाल्यास रू. १५/- प्रति लाभ अधिक वस्तू व सेवाकर अशी आकारणी करण्याबाबत मागणी केली.

- वरीलप्रमाणे सादर प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा. **अध्यक्ष** यांच्या मान्यतेने शासन मान्यतेस सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

८. वरीलप्रमाणे दिनांक २४.११.२०२२ व दिनांक २५.११.२०२२ अन्वये या बैठकीचे इतिवृत्तांत मा.मंत्री (कामगार) तथा मा. **अध्यक्ष** यांना मंजूरीस्तव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास .मंत्री (कामगार) तथा मा. **अध्यक्ष** यांनी मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने प्रस्ताव दिनांक ०८.१२.२०२२ रोजी शासन मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

ठराव क्र.५९(१७)/२०२२ :-

मा. उच्च न्यायालय मुबई याचिका क्र. २७६९६/२०२१, रिट याचिका क्र.७७०१/२०२२, मे. आरसीएस इन्फोटेक प्रा.लि. व मे. आयटीआय लिमिटेड लवाद प्रकरणी कोविड विषाणू प्रादुर्भाव कालावधीत देण्यात आलेल्या अर्थसहाय्यापोटी झालेल्या खर्चाबाबतच्या प्रस्तावावर उपरोक्तप्रमाणे मंडळाने केलेली कार्यवाहीस मान्यता देण्याचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मंडळ, मुंबई

विषय क्र.१८ :- शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित पध्दतीने कामाकरीता नियुक्त करण्यास मंजूरी देणे.

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर २०१६ नुसार तरतुद करण्यात आली आहे. या शासन निर्णयातील मुद्दा क्रं. अ मधील तरतुदी नुसार करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पध्दतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासुचीत नियुक्त करावयाच्या एकुण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरूप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करून नामिकासुची नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी असे नमुद केले आहे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आर्थिक वर्षाचे लेखे, वार्षिक अर्थसंकल्प, वस्तु व सेवाकर व आयकर विषयक कामकाज, गुंतवणुक व ठेवी, अंतर्गत लेखापरिक्षण, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदित बांधकाम कामगारांचे नूतनीकरण आणि नोंदित बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांच्या लाभाचे वाटप करणेकरीता संबंधित कामे करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही.

३. सबब, नव्याने करार पध्दतीने कर्मचारी वर्ग व महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून गट "अ" व "ब" मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची मंडळ मुख्यालयात नियुक्तीसाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सेवानिवृत्त अवर सचिव व कक्ष अधिकारी, कामगार विभागातील कामगार उपायुक्त, सहायक कामगार आयुक्त, व सरकारी कामगार अधिकारी तसेच वित्त विभागातील (संचालनालय,लेखा व कोषागारे) ,लेखा अधिकारी,सहायक लेखा अधिकारी या पदावर प्रशासन/वित्त व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची मंडळाच्या आस्थापनेवर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजाकरीता शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्तीची कार्यवाही करणेबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांना मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली होती.

४. सदर विषयाबाबत मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांनी ०६ महसूली विभागात ०६ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील अधिकचा असलेला अधिकारी / कर्मचारी महाराष्ट्र इमारत व इतर

बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकरीता वापरता येईल का हे तपासण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ठराव क्र.५९ (१८)/२०२२ :-

सेवानिवृत्त अवर सचिव व कक्ष अधिकारी, कामगार विभागातील कामगार उपायुक्त, सहायक कामगार आयुक्त, व सरकारी कामगार अधिकारी तसेच वित्त विभागातील (संचालनालय,लेखा व कोषागारे) ,लेखा अधिकारी,सहायक लेखा अधिकारी या पदावर प्रशासन/वित्त व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची मंडळाच्या आस्थापनेवर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजाकरीता शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत मंडळाने मान्यता प्रदान केली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याण मडळ, मुंबई

विषय क्र. १९ :- उपकर परतावा प्रकरणांना मान्यता तथा मंजूरी देणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील नियम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे. मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१८ मधील ठराव क्र ४७(१२)/२०१८ अन्वये, मंडळाच्या दिनांक १६.०६.२०१८ रोजीच्या बैठकीच्या ठरावानुसार उपकर परतावा करताना सदर प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयाकडून छाननी करून विभागीय कार्यालयांमार्फत परताव्याची शिफारस प्राप्त झाल्यावर मंडळ स्तरावर छाननी अंती प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार मंडळ स्तरावरून परताव्याची कार्यवाही करण्यात यावी अशी असा ठराव मंजूर आहे.

२. त्यानुसार, मंडळाचे दिनांक ०२.०३.२०२१ रोजी झालेल्या ५७ व्या बैठकीपासून आज अखेर, मंडळाच्या ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात अनावधानाने/नजरचुकीने उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या एकूण २२(बावीस) प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून उपकराच्या रकमेच्या परताव्याची मागणी करण्यात आलेली होती. सदर २२ (बावीस) प्रकरणांपैकी पुढील नमुद ११ (अकरा) परतावा प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयाकडून छाननी करून विभागीय कार्यालयांमार्फत परताव्याची शिफारस प्राप्त झाल्यावर मंडळ स्तरावर छाननी अंती मा.मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने RTGS प्रणालीद्वारे संबंधितांना परतावा अदा करण्यात आला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	आस्थापनाचे नाव	उपकर परतावा मागणी रक्कम (रु)	आरटीजीद्वारे परतावा अदा तपशिल
१	मे.पुरोहितअॅन्ड असोसिएटस, मुंबई	१५,३८,००५/-	RTGS दि.१२.८.२०२१
२	सुरेश पांडुरंग शिरभाते	७७,९५९/-	RTGS दि.०९.०७.२०२१
३	पंकज माधवराव पाटील	१,०५,६५०/-	RTGS दि.५.०८.२०२१

अ.क्र.	आस्थापनाचे नाव	उपकर परतावा मागणी रक्कम (रु)	आरटीजीद्वारे परतावा अदा तपशिल
४	दिपक पिंगळे, नंदुरबार	१५,६५५/-	RTGS दि. ०६.०४.२०२१

५	मेट्रो रेल कॉ.लि.	५०,३५,७०१/-	RTGS दि. १४.६.२०२१
६	कोलंबिया पेट्रो केम प्रा.लि	१,६८,१३,५८९/-	RTGS दि. २.०४.२०२१
७	मे. शुभम बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स, पनवेल	८,५४,७९३/-	RTGS दि. १५.०६.२०२२
८	नागपूर मुंबई सुपर कमर्शियल एक्सप्रेस लि	६,९४,४७,५४०/-	RTGS दि. १६.२.२०२२
९	राजाराम बुधा पाटील, धुळे	१९,१९७/-	RTGS दि. ०७.०१.२०२२
१०	श्री रेणुकामाता सार्वजनिक विश्वस्त निधी मंडळ	२३,०६,०८७/	RTGS दि.२८.०९.२०२२
११	श्रीराम एन्ट्रप्राईजेस, फलटण तर्फे श्री.रामचंद्र ज्ञानेश्वर नाईक-निंबाळकर	६,०५,८०४/-	RTGS दि. ०८.१२.२०२२
एकूण रक्कम (रू.)		**९,६८,१९,९८०/-**	

३. सद्यस्थितीत मंडळाकडे ११ (अकरा)परतावा प्रकरणे प्राप्त झालेली असून विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांजकडून नजर चुकीने/ अनावधाने मंडळाच्या उपकर खाती भरणा करण्यात आलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ. क्र.	प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव	उपकर परतावाच्याचे कारण	उपकर परतावाच्या मागणी (रु.)
१	पंकज तुळशीराम नाईक,ता.भिवंडी,जि.ठाणे	श्री. पंकज तुळशीराम नाईक यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडून मौजे सरवली येथे सिमेंट काँक्रीट बंधार बांधण्याकरिता मंजुरी घेण्यात आली होती बंधाऱ्याच्या तिरावरील व स्थानिक शेतकऱ्यांनी बंधारा बांधण्यास मनाई केली व कामास हरकत घेतल्याने सदरचे काम रद्द करण्यात आले आहे. दि.२५.०६.२०२१ रोजी उपकराची रक्कम रु.८,०००/- मंडळाच्या बँक ऑफ इंडिया खात्यामध्ये जमा	रु.८,०००/-

अ. क्र.	प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव	उपकर परताव्याचे कारण	उपकर परताव्याच्या मागणी (रु.)
		केली आहे. अर्जदाराने उपकराची परतावा करण्यास विनंती करण्यात आली आहे.	
२	ग्रामीण पाणी पुरवठा बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पुणे	कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा बांधकाम विभाग, जिल्हा परिषद पुणे कार्यालयामार्फत मौजे शिरोली ता.खेड येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे देयक दि.१९.१०.२०२२ रोजी अदा करतेवेळी देयकातील ठेकेदार मे.आकांक्षा एंटरप्राईजेस यांना अदा करावयाची निव्वळ रक्कम रु.१,४८,१३,८७५/-ठेकेदाराच्या खात्यावर जमा करण्याऐवजी नजरचुकीने मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इडिया खाते क्रं ३६७११७८५९१ मध्ये दि.१९.१०.२०२२ रोजी जमा करण्यात आली आहे मंडळास परतावा करण्यास विनंती करण्यात आली आहे	रु.१,४८,१३,८७५/-
३	रविंद्र रामेकर, यवतमाळ	श्री. रविंद्र मधुकराव रामेकर यांनी बांधकाम करण्याकरिता परवानगी यवतमाळ नगरपरिषद कार्यालयाकडे फाईल दाखल केली होती . उपकर रक्कम रु.१६,४६२/- भरणा करण्याऐवजी नजरचुकीने रु.५०,५२२/- उपकराची रक्कम मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया खात्यात जमा केली आहे. अतिरिक्त भरणा केलेली रक्कम रु.३४,२६०/- मंडळास परतावा करण्यास विनंती करण्यात आली आहे.	रु. ३४,२६०/-
४	लोकेश अफताफ मुल्ला, सातारा	डबेवाडी ग्रामपंचायतीत परवाना मिळण्यासाठी अर्ज केला होता. ग्रामपंचायत मधील ग्रामसेविकाची बदली झाल्याकारणाने नव्याने नियुक्ती न झाल्यामुळे, ग्रामपंचायतीचा कोणताही परवाना न घेता अर्जदारांनी स्वत:च्या नावे बँकेतून रक्कम रु.२०,२०३/- मंडळाच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया खात्यात	रु. २०,२०३/-

अ. क्र.	प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव	उपकर परताव्याचे कारण	उपकर परताव्याच्या मागणी (रु.)
		जमा केली आहे. ग्रामपंचायती ऐवजी उपविभागीय अधिकारी, सातारा येथून मंजुरी घेऊन उपकराची रेक्कम रु २०,६४८/- एकाच कामासाठी दुबार बांधकाम उपकर भरणा केलेला आहे. पुर्वीचा भरणा करण्यात आलेली धनाकर्षची रक्कम रु.२०,२०३/- परत करण्यासाठी मंडळाला विनंती केली आहे.	
५	विजय विनायक दाते,पंढरपूर	विजय विनायक दाते यांनी बांधकाम परवानगीसाठी पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर येथे फाईल दिली होती. त्यानुसार पंढरपूर नगरपरिषद यांनी बांधकाम कामगार कल्याण उपकर याची गणना (Calculation) करुन रक्कम रु.६१,३८०/- भरणा करण्यासाठी चलन देण्यात आले होते. परंतु भरणा करण्यात आलेले चलन नजर चुकीने व कामगार कल्याण उपकर चुकीची गणना केल्यामुळे ज्यादा भरणा करण्यात आले आहे.सुधारित उपकर यांची गणना करुन उपकराची भरणा रक्कम रु.१०,९८३/- इतका होत आहे. अतिरिक्त भरणा केलेली रक्कम(६१,३८० - १०,९८३= ५०,३९७)रक्कम रु.५०,३९७/- इतक्या उपकर परताव्याची श्री. विजय विनायक दाते यांनी विनंती केली आहे.	रु.५०,३९७/-
६	सुरज भोजराम फंदे, ता.भंडारा, जि.भंडारा	श्री सुरज भोजराम फंदे यांनी परसोडी गट क्रं. २७७/अ/१/५,२५८ येथील प्लॉट क्रं.३, क्षेत्र ३६७.०८ चौ.मी. वर इमारत परवानगी मिळण्याकरिता ग्रामपंचायत कार्यालय , परसोडी येथे अर्ज करण्यात आला होता. ३०० चौ.मी. पेक्षा अधिक असल्याचे ग्रामपंचायतीला लक्षात आले, मंजुरी दिलेल्या	रु. २६,६६४/-

अ. क्र.	प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव	उपकर परताव्याचे कारण	उपकर परताव्याच्या मागणी (रु.)
		बांधकाम परवानगी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंडळाच्या खात्यात जमा करण्यात आलेली उपकर रक्कम रु.२६,६६४/- सुरज भोजराम फंदे यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट काढून तसे ग्रामपंचायत कार्यालय परसोडी यांना कळविण्यात यावे अशी मंडळाला विनंती करण्यात आली आहे.	
७	सौ. प्रिती फुलजी कोकणी, नंदुरबार	श्रीमती फुलजी प्रिती कोकणी यांनी मौजे खामगांव तालुका जि.नंदुरबार येथे बांधकाम परवानगी अर्ज सादर केला होता . उपकर रक्कम रु.३०,२७९/- इतका उपकर भरणा करण्याऐवजी नजरचुकीने मंडळाच्या खात्यात उपकर रक्कम रु.४१,३१४/- इतका भरणा करण्यात आला आहे. जादा भरणा करण्यात आलेली उपकराची रक्कम रु.११,०६२/- - परत करण्यास मंडळास विनंती करण्यात आलेली आहे.	रु. ३०,२७९/-
८	आदर्श शिक्षण मंडळ, ता.मिरज, जि.सांगली	आदर्श शिक्षण **मंडळ**, मिरज यांनी बांधकाम परवानगीसाठी **जिल्हाधिकारी कार्यालय , सांगली** यांना परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे . **सांगली** यांनी बांधकाम कामगार कल्याण उपकर याची गणना **(Calculation)** करुन उपकर रक्कम रु.७,९८,३७४/- मंडळाच्या बँक खात्यात जमा करण्यास कळविले होते.तसेच बांधकाम विकास शुल्क रक्कम रु.२,३९,०१६/- तसेच अतिरिक्त बांधकाम क्षेत्र अधिमुल्य रक्कम रु.५,७१,३२०/- स्टेट बँक ऑफ इंडिया येथील खाते क्रं.०२१७०१६१०१ मध्ये जमा करण्यास कळविले होते. परंतु नजरचुकीने संबधित संस्थेने मंडळाचे खाते क्रं ३६७११७८५९१ जमा केला असल्याचे अर्जदाराने कळविले आहे.अर्जदाराने	रु.८,१०,३३६/-

अ. क्र.	प्राधिकरण/ संस्था/व्यक्ति चे नांव	उपकर परताव्याचे कारण	उपकर परताव्याच्या मागणी (रु.)
		नजरचुकीने मंडळाकडे भरणा केलेली रक्कम रु.२,३९,०१६+५,७१,३२०=८,१०,३३६ मंडळाकडे परताव्यची मागणी केली आहे.	
९	**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ,नागपूर**	**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ , नागपूर** यांनी दि. **२०.०७.२०२२** रोजी अर्ज सादर केला होता. यांना अधिनस्त कार्यरत वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांचे माहे जून २०२०, डिसेंबर २०२० आणि जून २०२१ या कालावधीचा अर्धवार्षिक कामगार निधीची वर्गणी रक्कम रु. ८,८३४/- कामगार कल्याण खात्यात भरणा करण्याऐवजी नजरचुकीने मंडळाच्या उपकर भरणा केला आहे . मंडळाकडे परताव्यची मागणी केली आहे.	रु. ८,८३४/-
१०	मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद,	मुख्याधिकारी, संगमनेर नगरपरिषद, संगमनेर यांचे दिनांक १४.०६.२०२२ रोजी अर्ज सादर केला होता. सप्टेंबर २०२१ मध्ये ठेकेदारांच्या बिलातुन वसूल करण्यात आलेली उपकर रक्कम रु.२,२६,९९९/- संगमनेर नगरपरिषद, संगमनेर मार्फत सेंट्रल बँक ऑफ इंडिया खात्यामध्ये दि.२५.१०.२०२१ रोजी भरणा करण्यात आली आहे. ठेकेदाराच्या बिलातून श्री. एन.के.गाडे यांची कपात करण्यात आलेली रक्कम रु.२,१५,७२१/- संगमनेर नगरपरिषदेने दि.२८.०९.२०२१ रोजी नजरचुकीने दुबार उपकर रक्कम मंडळाच्या खात्यात जमा केल्याचे कळविण्यात आले आहे.	रु.२,१५,७२१/-
११	मे. ओरिएन्टल यीस्ट इंडिया	मे. ओरिएन्टल यीस्ट इंडिया प्रा.लि.यांचे दि.०१.१२.२०२० रोजी अर्ज सादर केला होता. मे ओरिएन्टल यीस्ट इंडिया प्रा.लि. यांनी त्यांच्या MIDC केसुर्डी सातारा	रु.२०,१३,१७६/-

१	उपकर	३४१४.००	विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च	३८७८.५६
२	बँकेतील मुदतठेवीवरील व्याज	७०८.४०	प्रस्तावित योजना	०.००
३	नोंदणी फी	०.१९	प्रशासकिय खर्च	६९.८७
४	मासिक वर्गणी	०.०३	उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद	०.०७
५	मध्यान्ह भोजन लाभ शुल्क	०.००	नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा	४.००
६	इतर जमा	०.०२	इतर खर्च	६६.६३
	एकूण जमा	**४१२२.६४**	**एकूण खर्च**	**४०१९.१२**

ठराव क्र. ६० (१६)/२०२४ :-

मंडळाच्या सन २०२२-२३ चे रू. ३१८१.७९ कोटी जमा व रू. ३८०९.५२ कोटी खर्चाचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने शासन मान्यतेस सादर केलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी तसेच, मंडळाच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे रू. ४१२२.६४ कोटी जमा व रू. ४०१९.१२ कोटी खर्चाचे रक्कमेच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१७ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास (Annual Account) मंडळाची मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (१) अन्वये मंडळाचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे लेखे तयार करणेबाबत तरतूद आहे. अधिनियमाच्या कलम २७ (२ ते ५) मंडळाच्या मान्यतेने, मा. महालेखापालांच्या लेखापरीक्षणानंतर वार्षिक अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याची तरतूद आहे. सन २००७-०८ पासून ते सन २०२०-२१ मंडळाचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. सन २०२०-२१ चे लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) होवून उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन मंडळाकडून सादर केले आहेत. मा महालेखापाल कार्यालयाकडून लेख्यांना मंजुरी प्राप्त होताच अंतिम लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येत आहेत. सध्या मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे लेखे सनदी लेखापाल यांचेकडून प्रमाणित करून घेण्यात आलेले आहेत.

२. मंडळाच्या वार्षिक लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश असतो. अशाप्रकारचे सन २००७-०८ पासून ते सन २०२०-२१ मंडळाचे वार्षिक लेखे सनदी लेखापालांकडून तयार करून त्यास मंडळाची वेळोवेळी मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार सद्या मंडळाचे आर्थिक वर्ष २०२१-२२ या वर्षाचे जमा व खर्चाचे लेखे मंडळाने नियुक्त केलेल्या सनदी लेखापाल (CA) मे. के. एस. संघवी आणि कंपनी, मुंबई यांचेकडून लेखे प्रमाणित करून मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदरहू लेखे मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहेत. सदर लेख्यांमध्ये, उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income & Expenditure Accouts), ताळेबंद (Balance Sheet), जमा व खर्चाची परिशिष्ठे (Shedules), जमा व खर्चाचे विवरणपत्र (Receipt & Payament Accounts) इ.चा समावेश आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

सन २०२१-२२ वार्षिक लेखे जमा व खर्चाचा गोषवारा (रू कोटीत)

अ.क्र.	जमेची बाब	जमा रक्कम	खर्चाची बाब	खर्च रक्कम
१	उपकर	२२६६.३९	विविध कल्याणाकारी योजनांवरील खर्च	१७३६.०३
२	नोंदणी शुल्क	३.५४	प्रशासकीय खर्च	६७.११
३	बँकेतील मुदत ठेवीवरील व्याज	४१३.९३	घसारा	०.१६
४	इतर जमा	४.१४	इतर खर्च	०.००
	एकूण जमा	**२६८८.००**	**एकूण खर्च**	**१८०३.३०**

मंडळाचे मान्यतेनंतर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे मा. नियंत्रक व महालेखापरीक्षक कार्यालयास सादर करण्याच्या कार्यवाहीस मान्यतेस्तव सादर. मा. महालेखापाल कार्यालयाने संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) मध्ये काही आक्षेप उपस्थित केलेस त्यांचे अनुपालन करून परीपूर्ण लेखे इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२ ते ५) अन्वये मंडळाच्या मान्यतेने, वार्षिक मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्याचा" (Annual Account) अहवाल शासनमार्फत विधीमंडळासमोर सादर करण्याच्या कार्यवाहीस मंडळाच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव क्र. ६० (१७)/२०२४ :-

मंडळाचे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या "वार्षिक जमा खर्चाच्या लेख्यास" (Annual Account) मंडळाची मान्यता देण्यात येत आहे व तदनंतर सदर लेखे राज्य शासन व महालेखापाल कार्यालयास सादर करणेबाबत मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१८ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सन २०२२-२३ व२०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेखाविषयक कामकाजासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर व आयकर विषयक कामकाजासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ (१) नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्या सल्ल्याने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये मंडळाचे अचूक लेखे व इतर अभिलेख जतन केले जातील आणि मंडळाच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र (Annual Statement of Accounts) तयार केले जाईल अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ मधील कलम ४४ नुसार, मंडळ त्याच्या आर्थिक वर्षाचे लेखे संबंधित आर्थिक वर्ष संपल्यानंतर प्रत्येक वर्षी १ एप्रिल नंतर आणि कमाल ३१ ऑक्टोंबर अखेर संबंधित वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालाच्या प्रती सह केंद्र व राज्य शासनास सादर करेल अशी तरतूद आहे.सन २००७-०८ ते सन २०२१-२२ या आर्थिक वर्षांच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करताना लेखांकनाची विहीत पध्दती आणि अचूकता यामध्ये वाढ होणे आणि मा. महालेखापाल कार्यालयास विहित वेळेत वार्षिक लेखे सादर होण्याच्या दृष्टीने सन २००७-०८ या वर्षांपासून मंडळाचे लेखे तयार करण्यासाठी सनदी लेखापालांची नियुक्ती करण्यात येते. त्यानुसार मंडळाचे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

२. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ (१) नुसार, तयार करण्यात येत असलेल्या मंडळ लेख्यांचे वार्षिक विवरणपत्रामध्ये जमा व खर्चाच्या बाबी अंतर्गत बांधकाम कामगार उपकर नोंदणी नुतनीकरण शुल्क व इतर महसुली जमा तसेच मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना आणि प्रशासकीय खर्च यांचा समावेश असतो. सन २००७-०८ पासून मंडळाकडील बांधकाम कामगार नोंदणी, नुतनीकरण आणि कल्याणकारी योजनांच्या खर्चामध्ये लक्षनीय वाढ झाल्यामुळे मागील तीन वर्षामध्ये मंडळाच्या अंदाजपत्रक जमा व खर्च रक्कमेमध्येही मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे मंडळाच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करताना लेखांकनाची विहीत पध्दती आणि अचूकता वाढण्यासाठी सन २००७-०८ पासून ते सन २०२१-२२ अखेर सनदी लेखापालांकडून तयार करून घेण्यात आले आहेत तदनंतर सदर

लेख्यांचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून Transaction Audit होवून उपस्थित केलेल्या आक्षेपांचे अनुपालन करून मा. महालेखापाल कार्यालयाने मंजुरी दिलेल्या सन २०१९-२० अखेरचे वार्षिक लेख्यांचे विवरणपत्र शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्यात आले आहेत. अशा प्रकारे मंडळाचे वार्षिक लेख्यांचे विवरणपत्र तयार करण्यासाठी घेण्यात येत असलेल्या सनदी लेखापालांच्या सेवा समाधानकारक व उपयुक्त असल्याने सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचेही लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार मंडळाचे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे तयार करण्यासाठी आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक एकत्रित कामकाजासाठी एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्याच्या पुढील प्रक्रीयेस मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र. ६० (१८)/२०२४ :-

मंडळाचे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षाचे लेखे आणि सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वस्तू व सेवाकर, आयकर विषयक कामकाजासाठी कार्यालयीन स्तरावर खरेदी समिती गठीत करून दरपत्रकाने खरेदी प्रक्रीया राबवून एका सनदी लेखापाल संस्थेची नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सन २०२३-२४ चे सुधारित अर्थसंकल्पास व सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पास मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षांचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मंडळाने आर्थिक वर्षनिहाय मुळ व सुधारीत अंदाजपत्रके तयार करून त्यास वेळोवेळी मंडळाची मान्यता घेतली आहे. सन २०२३-२४ च्या सुधारीत व सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रक मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने शासनास सादर करण्याची कार्यवाही केली आहे.

अ. मंडळाचे सन २०२३-२४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार, माहे जाने/ फेब्रु, २०२३ मध्ये मंडळाचे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षांचे रु. ४१२२६४.२० लाख जमेचे व रु. ४०१९१२.७० लाख एवढया खर्चाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. तत्पुर्वी दि. १२.१२.२०२३ रोजी मंडळ बैठक पार पडल्याने सदर मुळ अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता घेता आली नसल्याने सदर मुळ अंदाजपत्रक मा. अध्यक्ष,म.इ.वइ.बां.का.क.मं.,मुंबई तथा मा. मंत्री, कामगार यांच्या मान्यतेनंतर मंडळ पत्र दि. १७.०३.२०२३ अन्वये शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते. शासनास सादर करण्यात आलेल्या सन २०२३-२४ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने माहे नोव्हें.,२०२३ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा व खर्चावर आधारीत उर्वरीत चारमाही करीता संभाव्य जमा व खर्चाच्या आधारे सन २०२३-२४ चे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रत संलग्न सन २०२३-२४ चे सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

सुधारित अंदाजपत्रक जमेचा गोषवारा

(रु. लाखात)

अ.क्र.	बाब (जमा)	मूळ अंदाजपत्रक सन २०२३-२४ (BE)	माहे एप्रिल ते नोव्हें., २०२३ अखेर आठमाही प्रत्यक्ष जमा	माहे डिसें. २०२३ ते मार्च २०२४ या चारमाही करीता संभाव्य अंदाजित जमा	सन २०२३-२४ मधील जमेचे सुधारित अंदाज (RE)
१	२	३	४	५	६(४+५)
१	उपकर	३४१४००.००	२०१९६२.५८	१०४७८६.९६	३०६७४९.५४
२	बँकेतील बचत व मुदत ठेवीवरील व्याज	७०८४०.००	५०६३३.९६	१८६१७.८१	६९२५१.७७
३	बांधकाम कामगार नोंदणी फी	१८.८०	७.६२	६.८१	१४.४३
४	बांधकाम कामगार मासिक वर्गणी	३.४०	२.३५	१.००	३.३५
५	इतर जमा	२.००	०.००७५	०.००२५	०.०१
	एकूण जमा	**४१२२६४.२०**	**२५२६०६.५१**	**१२३४१२.५९**	**३७६०१९.१०**

सुधारित अंदाजपत्रक खर्चाचा गोषवारा

(रु. लाखात)

अ.क्र.	बाब (खर्च)	मूळ अंदाजपत्रक सन २०२३-२४ (BE)	माहे एप्रिल ते नोव्हें., २०२३ अखेर आठमाही प्रत्यक्ष खर्च	माहे डिसें. २०२३ ते मार्च २०२४ या चारमाही करीता संभाव्य अंदाजित खर्च	सन २०२२३-२४ मधील खर्चाचे सुधारित अंदाज खर्च (RE)
१	विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च	३८८१५६.४४	३२१५८९.०२	९३३२२.९४	४१४९११.९६
२	प्रस्तावित योजना	०.००	०.००	२.००	२.००
३	प्रशासकिय खर्च	६९८६.८१	३१२९.१८	२१३७.०९	५२६६.२७
४	उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद	७.००	७.६०	१६.४५	२४.०५
५	नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा	४००.००	३०.८९	१०४९.६८	१०८०.५७
६	इतर प्रशासकीय खर्च	६३६२.४५	१४१२९.१४	१०५५२.९०	२४६८२.०४
	एकूण खर्च	**४०१९१२.७०**	**३३८८८५.८३**	**१०७०८१.०६**	**४४५९६६.८९**

पान क्र. ५५ पैकी १०१

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये जमेची मुळ तरतूद रू ४१२२६४.२० लाख आठमाही प्रत्यक्ष जमेच्या प्रमाणानुसार सुधारीत करून रू. ३७६०१९.१० लाख इतकी अंदाजित केली आहे. तसेच खर्चाची मुळ तरतूद रू. ४०१९१२.७० लाख आठमाही प्रत्यक्ष खर्चाची आकडेवारी आणि उर्वरीत चारमाही कालावधीमध्ये सुरू होणा-या संभाव्य नवीन कल्याणकारी योजना (गृहपयोगी वस्तु संच वाटप, सर्वसमावेशक माहितीपुस्तिका छपाई, तपासणी ते उपचार आरोग्य योजना इ.) करीता सुधारीत करून रू. ४४५९६६.८९ लाख इतकी अंदाजित केली आहे. अशा प्रकारे रू. ६९९४७.७९ लाख इतक्या महसुली जमेपेक्षा अधिक्याच्या खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिक्याचा खर्च रू. ६९९४७.७९ लाख सन २०२३-२४ मधील मंडळाच्या राष्ट्रीयकृत बँकांच्या मुदतठेव पावत्यांमध्ये (FDR) केलेल्या गुंतवणूक रक्कम रू. ९,०५,००० लाख मधून भागविणे प्रस्तावित आहे.

ब. सन २०२४-२५ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक-

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नुसार,सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे अंतिम खर्चाची आकडेवारी एफ एम जी आणि सन २०२३-२४ या चालू वर्षाचे सुधारीत अंदाज या आधारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे रु. ४४७२२१.६२ लाख जमा व रु. ५९७१९८.९५ लाख खर्चाचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रत संलग्न सन २०२४-२५ चे मूळ अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे-

सन २०२४-२५ मधील जमा व खर्चाचा गोषवारा (रूपये लाखात)

अ.क्र	महसूली जमा	मुळ तरतुद (BE)	महसूली खर्च	मुळ तरतुद (BE)
१	उपकर	३७०००.००	विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च	४३१५५६.०५
२	बँकेतील मुदतठेवीवरील व्याज	७७२००.००	प्रस्तावित योजना	०.००
३	नोंदणी फी	१६.००	प्रशासकिय खर्च	६१८०.५०
४	मासिक वर्गणी	५.६०	इतर खर्च- प्रशासकिय खर्च	८७३७.४६
५	इतर जमा	०.०२	नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा	५००.००
			उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद	३०.००
	एकूण जमा	**४४७२२१.६२**	**एकूण खर्च**	**४४७००४.०१**

सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे अंतिम जमेची आकडेवारी (FMG) आणि सन २०२३-२४ या चालू वर्षाचे सुधारीत जमेचे अंदाज व त्याप्रमाणात

विविध महसुली जमेच्या बाबींवरील सरासरी वाढ तसेच प्रस्तावित मंडळ सेस पोर्टलचे विकसन इ. आधारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये जमेची मुळ तरतूद रू ४४७२२१.६२ लाख अंदाजित केली आहे. सन २०२३-२४ च्या सुधारीत जमेच्या अंदाजाच्या तुलनेत सदर मुळ तरतूद १८% टक्कयांनी वाढीव आहे. तसेच, सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांचे अंतिम खर्चाची आकडेवारी (FMG) आणि सन २०२३-२४ या चालू वर्षाचे सुधारीत खर्चाचे अंदाज व त्याप्रमाणात विविध महसुली खर्चाच्या बाबींवरील सरासरी वाढ तसेच प्रस्तावित नवीन कल्याणकारी योजना (तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र (TBWFC) स्थापन करणे, इमारत बांधकाम कामगारांसाठी शेड (कामगार नाका) बांधणे, मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा कार्यान्वित करणे.) इ. आधारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये खर्चाची मुळ तरतूद रू ४४७००४.०१ लाख अंदाजित केली आहे. सन २०२३-२४ च्या सुधारीत खर्चाच्या अंदाजाच्या तुलनेत सदर मुळ तरतूद ०.२३% टक्कयांनी वाढीव आहे.अशा प्रकारे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता रू. २१७.६१ लाख इतक्या महसुली अधिक्याचे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव क्र. ६० (१९)/२०२४ :-

मंडळाच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये सुधारीत जमा तरतुद रू. ३,७६,०१९.१० लाख आणि सुधारीत खर्च तरतुद रू. ४,४५,९६६.८९ लाख इतक्या रक्कमेच्या सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात यावी तसेच, मंडळाच्या सन २०२४-२५ या आगामी आर्थिक वर्षाच्या मुळ जमा तरतुद रू. ४,४७,२२१.६२ लाख आणि मुळ खर्च तरतुद रू. ५,९७,१९८.९५ लाख इतक्या रक्कमेच्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.२०:- स्थानिक स्वराज्य संस्थांनी मंडळाचा बांधकाम उपकर वसूल करुन मंडळाकडे भरणा केल्यापोटी मागील ३ वर्षात विनामागणी (Unclaimed) उपकर वसूली शुल्क मंडळाचे जमेस घेणे आणि चालू दायित्वातून कमी करणेस मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३/१ अनुसार केंद्रशासनाने अधिसुचना क्र. एसओ २८९९, दिनांक २६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहे. या अनुषगांने स्थानिक स्वराज्य संस्था प्राधिकरण यांच्या कडून उपकर मंडळाच्या बँक खात्यामध्ये जमा केले जातो.बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ कलम ३(३) व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम, १९९८ कलम ५(२) मध्ये स्थानिक संस्थानी गोळा केलेली उपकराची रक्कम गोळा करण्यासाठी झालेली प्रत्यक्ष खर्चाची रक्कम जी १% पेक्षा जास्त नसणार कमी करून मंडळाकडे भरणे आवश्यक असणेबाबत तरतूद आहे.

२. मा. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे लेखा आक्षेप क्र.२ दिनांक २०-०२-२०२३ अन्वये २०२०-२०२१ व त्यापुढील कालावधीत परतावा दायित्व म्हणून दर्शविण्यात आलेल्या व मागणी करण्या न आलेले उपकर वसूली चार्जेस (Unclaimed) आर्थिक वर्ष २०१२-२०१३ ते २०२०-२०२१ रू. ४२,७४,५३,८९६/- संबंधित संस्था कडून मागणी प्राप्त न झाल्यामुळे क्षेत्रिय कार्यालयाकडून परतावा देण्याबाबत शिफारशी प्राप्त न झाल्यामुळे पुढील वार्षिक लेख्यात दायित्व कमी करून ती रक्कम उपकर जमा लेखा शिर्षामध्ये (Retained Back To Income) दर्शविण्याबाबत लेखा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

अ.क्र.	वित्तीय वर्ष	१% प्रशासकीय खर्च दर्शविण्यात आलेले उपकर दायित्व
१	२०१२-२०१३	९३९१०/-
२	२०१३-२०१४	६४७८६/-
३	२०१४-२०१५	४९४४५/-
४	२०१५-२०१६	११३११६/-
५	२०१६-२०१७	१०४७९०/-
६	२०१७-२०१८	१५९९५९/-
७	२०१८-२०१९	१३५८०३३९६/-
८	२०१९-२०२०	१५०८८२९५९/-
९	२०२०-२०२१	१४०१८१५३५/-
	एकूण	**४२,७४,५३,८९६/-**

पान क्र. ५८ पैकी १०१

लेखा आक्षेपामध्ये नमूदप्रमाणे संबंधित आस्थापनांचा मागणी न करण्यात आलेल्या रक्कमेबाबत संबंधित आस्थापनेस याबाबत खुलासा करण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला होता. सदर पत्रव्यवहारानंतर विहित मुदतीत संबंधित आस्थापनांकडुन कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने आगामी मंडळ बैठकीमध्ये विषयांकीत प्रकरणे चर्चेस ठेवून ठरावाद्वारे रक्कमा व्यपगत करून मंडळाच्या वार्षिक लेख्यात जमा बाजूस अंर्तभूत करण्याबाबत निर्णय घेणे प्रस्तावित आहे.

ठराव क्र. ६० (२०)/२०२४ :-

सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ मध्ये उपकर दायित्व म्हणून दर्शविण्यात आलेल्या वरील प्रमाणे एकूण रक्कमा रू.४२,७४,५३,८९६/- मंडळाचे पुढील वार्षिक लेखे तयार करताना उपकर जमा शिर्षाखाली जमा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र. २१:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीबाबत.

अ. नोंदित जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्याकरीता स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासाकरीता अर्थसहाय्य निश्चित करणेबाबत विचार विनिमय करणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत इयत्ता ०१ ते पदव्युत्तर पदवीपर्यंत शैक्षणिक सहाय देण्यात येते तसेच वैद्यकीय व अभियांत्रीकी शिक्षणाकरीता प्रतिवर्ष अनुक्रमे रू.१.०० लक्ष व रू.६० हजार इतके अर्थसहाय देण्यात येते. तथापि, बहुतांश विद्यार्थी केंद्र व राज्य व शासनामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परिक्षांचाही अभ्यास करत असतात अशा विद्यार्थ्यांना सहाय्य पुरविण्याची बाब मंडळाच्या विचाराधीन होती.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या बहुतांश स्पर्धा परीक्षांमध्ये पुर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत या टप्यांचा समावेश होतो. सदर परीक्षांकरीता लागणाऱ्या अभ्यास साहित्य व अनुषंगीक खर्चाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे अशा परिक्षामध्ये सहभागी होण्यास इच्छूक विद्यार्थ्यांना सहाय्य पुरविणे प्रस्तावित आहे.

३. तसेच मंडळ बैठकीमध्ये इयत्ता ९, १०, ११ व १२ वी पास व स्पर्धा परीक्षा करणारे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांना संगणकीय टॅब वितरीत करण्याचा प्रस्ताव मंडळाने प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

ठराव क्र. ६० (२१-अ)/२०२४ :-

इयत्ता १०, ११, १२ वी पास व उच्चशिक्षण घेणाऱ्या (पदवी व पदव्युत्तर) तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या पाल्यांना संगणकीय टॅब वितरीत करण्याचा प्रस्ताव मंडळाने शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

ब. नोंदणी / नुतनीकरणासाठी बांधकाम कामगारांना अर्ज केल्यावर नोंदणी / नुतनीकरण अर्ज मंजूर होण्यापूर्वीच्या किंवा अर्जातील त्रुटीची पुर्तता करण्यापूर्वीच्या कालावधीत संबंधित कामगाराचा मृत्यु झाल्यास मंडळामार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळामार्फत नोंदीत सक्रीय बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास २ लक्ष, अंत्यविधी सहाय्य रू.१००००/- व रू .२४०००/- प्रति वर्ष याप्रमाणे पाच वर्षाकरीता देण्यात येते.

मंडळाकडे नोंदणी/नुतणीकरण अर्ज प्राप्त झाल्यावर कागदपत्रांच्या तपासणीअंती नोंदणी अधिकाऱ्यामार्फत नोंदणी मंजुर करण्यात येते. बहुतांश वेळी नोंदणी अधिकाऱ्याकडील प्राप्त अर्जांचे प्रमाण अधिक असल्याने व नोंदणी अधिकाऱ्यांची संख्या मर्यादीत असल्याने बांधकाम कामगारांच्या नोंदणी अर्जावर कार्यवाही करण्यास विलंब होत असल्याची बाब निदर्शनास येते अशा वेळी एखाद्या बांधकाम कामगाराने नोंदणी/नुतणीकरण अर्ज केल्यावर सदर अर्ज मंजुर होण्यापुर्वीच्या कालावधीत बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास संबंधित बांधकाम कामगाराच्या वारसास कोणतेही अर्थसहाय मिळत नाही. अशा प्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत मंडळास मार्गदर्शनपर संदर्भ जिल्हा कार्यालय व संघटनामार्फत प्राप्त होत आहेत त्यामुळे अशा प्रकरणाबाबत मंडळ बैठकीत विचार विनीमय करण्यात आला.

ठराव क्र. ६० (२१-ब)/२०२४ :-

नोंदणी/नुतनीकरणासाठी बांधकाम कामगारांना अर्ज केल्यावर नोंदणी /नुतनीकरण अर्ज मंजूर होण्यापूर्वीच्या कालावधीत संबंधित कामगाराचा मृत्यु झाल्यास संबधित बांधकाम कामगारास लाभ वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

क. क्षेत्रीय कार्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने प्राप्त मृत्यु लाभाच्या प्रलंबित अर्जावर करावयाच्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, माहे जुलै २०२० पासून मंडळामार्फत बांधकाम कामगारांची नोंदणी/नुतणीकरण व लाभ वाटप ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. तथापि, त्यापुर्वी मंडळामार्फत ऑफलाईन पध्दतीने प्राप्त अर्जावर कार्यवाही करण्यात येत होती मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत लाभाचे अर्ज बांधकाम कामगार/त्यांच्या वारसांमार्फत क्षेत्रीय कार्यालयाकडे जमा करण्यात येत होते व त्यावर जिल्हा कार्यालयामार्फत कार्यवाही करण्यात येत होती.

माहे जुलै २०२० पासून ऑनलाईन पध्दतीने कामकाज सुरू झाल्यावर बहुतांश ऑफलाईन पध्दतीने क्षेत्रीय कार्यालयाकडे उपलब्ध अर्ज संगणक प्रणालीवर घेण्यात आले तथापि, तदनंतरही बहुतांश ऑफलाईन अर्ज जिल्हा कार्यालयाकडे प्रलंबित असलयाची बाब निदर्शनास आली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयाकडून त्यांच्याकडील प्रलंबित नैसर्गिक मृत्यूबाबतच्या ऑफलाईन अर्जाची संख्या मंडळास सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. त्यांचेकडील प्राप्त माहिती खालीलप्रमाणे -

अ .क्र.	जिल्हा	ऑफलाईन प्रलंबित लाभाचे अर्जांची संख्या	प्रलंबित लाभाचे अर्जावर येणारा अंदाजित खर्च (DBT) (रू.)
१	वर्धा	०	०
२	औरंगाबाद	१८८	७८८५०००
३	बुलढाणा	०	०
४	जळगाव	०	०
५	लातूर	५६००	९२७१२०००
६	ठाणे	०	०
७	कल्याण	०	०
८	अकोला	०	०
९	परभणी	११७७	७८५३०००
१०	अहमदनगर	१०	२९००००
११	पालघर	०	०
१२	जालना	१४७८	३७६५४०००
१३	नाशिक	०	०
१४	भिवंडी	०	०
१५	मालेगांव	८३५	१०१३००००
१६	भंडारा	४९२७३	३७५३४१०००
१७	इचलकंरजी	७४२६	६०७०६०००
१८	हिंगोली	४२३	८३३२०००
१९	वाशिम	५५६	५४८००००

पान क्र. ६२ पैकी १०१

अ .क्र.	जिल्हा	ऑफलाईन प्रलंबित लाभाचे अर्जांची संख्या	प्रलंबित लाभाचे अर्जांवर येणारा अंदाजित खर्च (DBT) (रू.)
२०	धुळे	३२५	६६४९०००
२१	सातारा	८७	२०२००००
२२	गडचिरोली	२८३९	३२९५००००
२३	मुंबई शहर	४६	८९००००
२४	मुंबई पूर्व	०	०
२५	मुंबई पश्चिम	०	०
२६	चंद्रपुर	२९९०७	२७९७२६०००
२७	यवतमाळ	१२२८४	१५९४३५०००
२८	गोंदिया	०	०
२९	सिंधुदूर्ग	५८३०	५६८२१०००
३०	सोलापूर	९८५५	१७५७७९०००
३१	पुणे	०	०
३२	नंदुरबार	३१८	३४६००००
३३	बीड	३१११	१९३४५०००
३४	उस्मानाबाद	१६३९	२७५५१०००
३५	अमरावती	११३५	२८२५३०००
३६	नांदेड	०	०
३७	रत्नागिरी	०	०
३८	रायगड	०	०
एकूण		१,३४,३४२	१,३९,९२,६२,०००

ठराव क्र. ६० (२१-क)/२०२४ :-

क्षेत्रीय कार्यालयाकडे ऑफलाईन पध्दतीने प्राप्त लाभापैकी मृत्युचा लाभ अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र. २२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे प्राप्त उपकर परतावा प्रकरणांना मान्यता देणेबाबत

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ मधील कलम ३(१) व भारत सरकार यांचे दि. २६.०९.१९९६ चे परिपत्रक तसेच महाराष्ट्र दि. २१.०४.२००८ च्या परिपत्रकानूसार बांधकामावरील खर्चाच्या १ टक्यापेक्षा कमी नाही एवढा (जमीनीची किंमत वगळून) उपकर मंडळाकडे जमा करण्याची तरतूद आहे. त्यानुसार, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांच्याकडून मंडळाच्या बँक खात्यात उपकर भरणा केला जातो.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील नियम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे.

२. मंडळाचे दि.१२.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या ५९ व्या बैठकीत ठराव क्र. ५९(१९)/२०२२ नुसार मंडळाच्या खात्यात अनावधानाने/नजरचुकीने/उपकराची जास्तीची रक्कम भरणा केलेल्या प्रकरणांची दायित्व तपासून उर्वरीत परतावा रक्कम मंत्री (कामगार) तथा मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने अदा करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आला होता. त्यानुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाच्या पडताळणी अहवालानंतर मंडळ स्तरावर छाननी होऊन मा. मंत्री (कामगार) यांच्या मान्यतेने सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील परतावा प्रकरणाच्या रक्कमा संबंधितास अदा केल्या आहेत.

अ.क्र.	अस्थापनाचे नाव	उपकर परतावा रक्कम (रु.)
१	रेणुका माता मंडळ	२३,०६,०८७
२	शुभम बिल्डरर्स अॅण्ड डेव्हलपर्स	८,५४,७९६
३	शुभम आधे	१०,०००
४	शिवम अॅड. को.	१,५०,०००
५	श्रीराम एंटरप्राईजेस	६,०५,८०४
६	श्री. काशिफ खान	४५,०००
७.	मे. गोखले इन्फ्राडेव्हलपर्स प्रा. लि.	रु. २,६५,८९०/-
८.	मे. ओरिएन्टल यीस्ट इंडिया प्रा.लि.	रु. २०,१३,१७६/-
९.	आदर्श शिक्षण मंडळ, मिरज.	रु. ८,१०,३३६/-
१०.	जीईटी अॅण्ड डी इंडिया लिमिटेड	रु. ३,३६,१३,१३५/-
११.	मे. कल्पतरु प्रोजेक्ट इंटरनॅशनल लि.	रु. ५,३९,०८,३८३/-
१२.	मे. अॅक्सिस बँक लि., नाशिक.	रु. ६,४१,९८०/-

ठराव क्र. ६० (२२)/२०२४ :-

सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सदर १२ प्रकरणांमध्ये परतावा प्रकरणाच्या रकमा संबंधितास अदा केल्या आहेत. अशा परतावा प्रकरणी केलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.२३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयांना मंडळ कामकाजाकरीता वाहन एक वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर घेण्यास मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळातील विभागीय व जिल्हा स्तरावरील कामकाज कामगार कार्यालयाअंतर्गत अधिकारी व कर्मचारी करत असून बांधकाम कामगारांच्या ऑनलाईन पध्दतीने नोंदणी व नुतनीकरणात दिवसेदिवस वाढ होत आहे. मंडळाचे कामकाज जिल्हयाच्या शहरी भागापासून ग्रामिण भागापर्यंत पसरलेले असून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांना तालुका व गाव पातळीवरील कामगारांच्या तपासणीसाठी जावे लागते त्यामुळे मंडळाचे कामकाज सुलभरीत्या पार पाडणेकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांना वाहनाची आवश्यकता असल्याने मंडळाच्या वेळोवेळी संपन्न झालेल्या बैठकीत कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत कार्यरत विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालयाकीता बोलेरो/स्कॉर्पीओ अथवा तत्सम प्रकारचे वाहन जिल्हा कार्यालय प्रमुखांनी संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी (R.T.O)यांनी निश्चीत केलेल्या दराने अथवा संबंधित विभागाच्या अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त यांच्या मान्यतेने मासीक भाडयाचे दर व धाव निश्चीत करून प्रथम एक वर्षाकरीता वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून घेण्यास प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार मंडळ पत्र दि.०२.०२.२०२४अन्वये संबंधित विभाग/जिल्हा कार्यालयातील अधिकाऱ्यांना वाहने भाडेतत्वावरील घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच सदर भाडेतत्वावरील वाहनास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. ज्या विभाग /जिल्हा कार्यालयांकडे वाहन उपलब्ध नाही अशा नव्याने वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याची मागणी करणा-या प्रस्तावांना प्रस्तावित केलेल्या वाहनापैकी स्पर्धात्मक दराद्वारे विहीत खरेदी प्रक्रियेचा अवलंब करून किफायतशीर दराने संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परीवहन प्राधिकरणाने (RTA) यांनी निश्चित केलेल्या दराचे मर्यादेत १ वर्षाचे कालावधीकरीता आणि लॉग-बुक नोंदी प्रमाणिकरण करणेचे अटींना अधिन राहून मान्यता मिळणे आवश्यक आहे. तसेच, ज्या कार्यालयांनी त्यांचेकडील भाडेतत्त्वावर घेतलेल्या वाहन करारनाम्याची मुदत संपल्याने मुदतवाढीची मागणी केली आहे अशा कार्यालयांना वरील नमूद अटी शर्थींच्या अधीन राहून मुदतवाढ देणे आवश्यक आहे.दि.१२.१२.२०२२ रोजीच्या बैठकीतील पारीत ठरावाच्या अनुषंगाने संबंधित विभाग/जिल्हा कार्यालयातील अधिकाऱ्यांना वाहने भाडेतत्वावरील घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. सद्यस्थितीत क्षेत्रीय कार्यालयाचा वाहने भाडयाने घेण्याचा कालावधी ०१ वर्षाचा असल्याने सदर कालावधी संपत आलेला आहे. ज्या जिल्हा कार्यालयांकडे कामगार विभागाचे वाहन उपलब्ध नाही अशा जिल्हा कार्यालयांसाठी संबंधित विभागाच्या अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त यांच्या मान्यतेनुसार Hundai Xcent/ Swift Dezire/Honda Amaze/Toyota Etios/Mahendra Bolero यापैकी एक वाहन जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार सदर भाडेतत्वावरील वाहनास मुदतवाढ देणे व मा. मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, कामगार विभाग मंत्रालय, कामगार आयुक्त कार्यालय व मंडळ मुख्यालय यांच्याकरीता प्रत्येकी ०१ इनोव्हा क्रिस्टा अथवा तत्सम प्रकारचे वाहन घेण्यास मुदतवाढ आवश्यक असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव मा. मंत्री महोदय (कामगार) तथा अध्यक्ष यांनी मान्यता प्रदान केली आहे.

ठराव क्र. ६० (२३)/२०२४ :-

१. **ज्या जिल्हा कार्यालयाकडे कामगार विभागाचे वाहन उपलब्ध नाही अशा जिल्हा कार्यालयासाठी जिल्हयाच्या भौगोलिक परिस्थतीनुसार दि.३१.१२.२०२४ पर्यंत वाहन भाडेतत्वावर घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

२. **मा. मंत्री (कामगार), कामगार विभाग, मंत्रालय, कामगार आयुक्त कार्यालय व मंडळ मुख्यालय यांच्याकरीता कार्यालयीन कामकाजासाठी प्रत्येकी एक वाहन भाडेतत्वावर घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.२४:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विविध निर्णय घेणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मागील दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या ५९ व्या बैठकीतील ठरावानुसार दिनांक ०१.०४.२०२३ पासून बांधकाम कामगारांना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) व्दारे वितरीत करण्याबाबत शासन मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक ०४.०५.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले होते.

२. भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) कार्यान्वित होईपर्यंत कारारनाम्यातील तरतुदीनुसार नोंदवहया ठेवणे व कार्ड वितरण प्रणालीच्या खर्च मर्यादेत देयक अदा करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २८.०४.२०२३ रोजी शासनास सादर करण्यात आला होता. तसेच अनोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करण्यात येणार भोजन केवळ नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक २६.०६.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तदनंतर दिनांक ०१.०७.२०२३ पासून मध्यान्ह भोजन योजना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) कार्डच्या सहाय्याने केवळ नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत करण्याचे निर्देश होते तथापि, RF-Based Card सर्व नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरीत न झाल्याने व बांधकाम कामगारा मध्यान्ह भोजन व रात्रीच्या भोजनापासून वंचित राहू नये याकरीता RF-Based Card वितरणाकरीता दिनांक ३१.०७.२०२३ पर्यंत मुदतवाढीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता त्यास दिनांक ३०.०६.२०२३ च्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याची मंडळाची धारणा पक्की करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक २१.०८.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.दरम्यानच्या कालावधीत मंडळ स्तरावर बाहय यंत्रणेव्दारे मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेची मुदत संपुष्टात आल्याने कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात आल्या आहेत व नवनियुक्त संस्थेव्दारे नविन कर्मचाऱ्यांची नियुक्ती व काही कर्मचारी सेवा सोडून गेल्याने नोंदीत बांधकाम कामगारांना भोजन वितरण प्रणाली (RF-Based Card) चे वितरण कमी प्रमाणात झाल्याचे निर्देशनास आले होते राज्यभरात सुमारे १२.३३ लक्ष नोंदीत बांधकाम कामगारांना भोजन वितरण कार्ड प्रणालीचे वाटप प्रलंबित असल्याने मंडळातर्गत नोंदीत बांधकाम कामगार सदर योजनेपासून वंचित राहू नये याकरीता भोजन वितरण कार्ड वितरणाकरीता दिनांक ०१.०८.२०२३ ते दिनांक ३१.०८.२०२३ पर्यंत मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास दिनांक १८०९.२०२३ च्या पत्रान्वये मान्यता

पान क्र. ६८ पैकी १०१

प्रदान करण्यात आली आहे. तदनंतर दिनांक २३.१०.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये "दिनांक १९.०३.२०१८ अन्वये राबविलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील Request for Proposal (RFP) मधील तरतुदीस तीन वर्षाचा झालेला कालावधी तसेच वित्तीय व प्रशासकीय बाबी विचारात घेता, सदर मध्यान्ह भोजन योजना दिनांक ०१.११.२०२३ पासून बंद करण्यात यावी" असे निर्देश प्राप्त झाल्याने सदर योजनेची अंमलबजावणी दिनांक ०१.११.२०२३ पासून बंद करण्याबाबत मंडळाच्या दिनांक २५.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

ठराव क्र. ६० (२४)/२०२४ :-

१. **दिनांक ०१.०४.२०२३ पासून भोजन वितरण प्रणाली RF-Based Card व्दारे करण्याबाबत शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता सदर प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत करारनाम्यातील तरतुदीनुसार नोंदवहया ठेवणे व कार्ड वितरण प्रणालीच्या खर्च मर्यादेत देयक अदा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

२. **भोजन केवळ नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांना वितरीत करण्याबाबत करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

३. **बांधकाम कामगार मध्यान्ह भोजन व रात्रीच्या भोजनापासून वंचित राहू नये याकरीता RF-Based Card वितरणाकरीता दिनांक ३१.०७.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

४. **नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह व रात्रीचे भोजन विनाशुल्क पुरविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

५. **बांधकाम कामगार मध्यान्ह भोजन व रात्रीच्या भोजनापासून वंचित राहू नये याकरीता RF-Based Card वितरणाकरीता दिनांक ०१.०८.२०२३ ते दिनांक ३१.१०.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

६. **सदरची योजना दिनांक ०१.११.२०२३ पासून सदर योजना बंद करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई

विषय क्र.२५:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा. अध्यक्ष, मा. सदस्य व मा.सदस्य सचिव यांना विमान प्रवास अनुज्ञेय करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.प्रवास १०१०/प्र.क्र.०२/सेवा-०५ यांच्या दिनांक ०३.०३.२०१० रोजीच्या शासन निर्णयात मुद्दा क्र.४.१ विमान प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम,१९५९ मधील नियम ४१७-ब आणि ४९०) नमूद केल्याप्रमाणे विमान प्रवासासंबंधी तरतूदी आहेत तथापि, अभ्यासदौरे, बैठका व विधानमंडळ कामकाज यासाठी मंडळाचे अध्यक्ष व इतर शासकीय सदस्यांना विमान प्रवास गरजेचा राहतो.

२. विधीमंडळ कामकाज अथवा विविध अभ्यासदौरे अन्य काही महत्वाच्या मंडळ बैठकांकरीता मा.अध्यक्ष, शासकीय सदस्य (मा.प्रधान सचिव, कामगार, मा.कामगार आयुक्त व मा. उप सचिव, कामगार) सदस्य सचिव यांना विमान प्रवास करावा लागतो. सबब, अशा प्रकरणी विमान प्रवास अनुज्ञेय करणे आवश्यक वाटते.

ठराव क्र. ६० (२५)/२०२४:-

मा.अध्यक्ष व शासकीय सदस्य मा.प्रधान सचिव (कामगार), यांना व्यापारी वर्ग (Business Class) तसेच, अन्य शासकीय सदस्य व सदस्य सचिव यांना आर्थिक वर्ग (Economy Class) विमान प्रवास अनुज्ञेय करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.२६:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर मंडळ कामकाजासाठी सुधारीत आकृतीबंधास मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०३.१०.२०१२ अन्वये, मंडळाच्या मुंबई मुख्यालयाकरीता १८ पदे आणि जिल्हास्तरावर ३८ पदे अशा एकूण ५६ पदांची निर्मिती मंडळस्तरावर करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे.शासन अधिसुचना उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग दिनांक ०१.०६.२०१९ नुसार लिपिक-टंकलेखक, अधीक्षक, लघुटंकलेखक (इंग्रजी / मराठी) यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले आहेत. तसेच, दिनांक ०७.०६.२०१९ रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार चाहनचालक, दफ्तरी व शिपाई यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले. दिनांक २०.०८.२०२० रोजीच्या शासन अधिसूचनेनुसार जिल्हा कार्यकारी अधिकारी व उप जिल्हा कार्यकारी अधिकारी यांचे सेवाप्रवेश नियम करण्यात आले.

२. मंडळाने दिनांक ०५.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये १८३ पदे भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नंतर दिनांक २५.११.२०१९ अन्वये ४२२ पद भरतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही. सद्यस्थितीत ११६१ पदांचा सुधारीत आकृतीबंध प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर आकृतीबंधास मा.मंत्री महोदय (कामगार) यांनी कामगार आयुक्तांच्या शिफारशीनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

अ.क्र.	पदनाम	संवर्ग	मुख्यालय	प्रादेशिक सुविधा केंद्र	जिल्हा सुविधा केंद्र	एकूण पदे
१	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी	गट-अ	१	०	०	१
२	अपर मुख्य कार्यकारी	गट-अ	१	०	०	१

पान क्र. ७१ पैकी १०१

	अधिकारी					
३	मुख्य लेखा व वित्त अधिकारी (उपसंचालक संवर्ग)	गट-अ	१	०	०	१
४	प्रादेशिक कार्यकारी अधिकारी	गट-अ	०	६	०	६
५	विधी सल्लागार	गट-अ	१	०	०	१
६	जिल्हा कार्यकारी अधिकारी	गट-अ	३	१२	३६	५१
७	जनसंपर्क अधिकारी (जिल्हा माहिती अधिकारी)	गट-अ	१	०	०	१
८	सहायक संचालक (लेखापरीक्षण)	गट-अ	१	०	०	१
गट-अ एकूण पदे			**०९**	**१८**	**३६**	**६३**
९	उप जिल्हा कार्यकारी अधिकारी	गट-ब	७	१२	७२	९१
१०	लेखाधिकारी	गट-ब	३	६	०	०९
११	सहायक लेखाधिकारी	गट-ब	७	०	३६	४३
गट-ब एकूण पदे			**१७**	**१८**	**१०८**	**१४३**
१२	नोंदणी अधिकारी	गट-क	०	०	१४४	१४४
१३	माहिती सहायक	गट-क	१	०	०	१
१४	लघु-टंकलेखक (उच्चश्रेणी)	गट-क	१	०	०	१
१५	लघु-टंकलेखक (निम्नश्रेणी)	गट-क	१	६	०	७
१६	अधीक्षक	गट-क	५	६	३६	४७
१७	वरिष्ठ लिपिक	गट-क	१९	२४	७२	११५

१८	लिपिक-टंकलेखक	गट-क	३६	४८	१४४	२२८
गट-क एकूण पदे			**६३**	**८४**	**३९६**	**५४३**
१९	वाहनचालक	गट- ड	८	०	०	८
२०	दप्तरी	गट-ड	३	०	०	३
२१	शिपाई	गट-ड	११	६	३६	५३
गट-ड एकूण पदे			**२२**	**६**	**३६**	**६४**
एकूण पदे			**१११**	**१२६**	**५७६**	**८१३**

इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ च्या कलम (२४ (३) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे - "No Board shall, in any financial year, incur expenses towards salaries, allowances and other remuneration to its members, officers and other employees and for meeting the other administrative expenses exceeding five per cent of its total expenses during that financial year". त्यानुसार उपरोक्त पदांकरिता होणारा खर्च वार्षिक खर्चाच्या ५% च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.सध्या मंडळाच्या आस्थापनेवर मंडळ मुख्यालयात, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी -०१ पद व मुख्य लेखा व वित्त अधिकारी -०१ पद आणि लेखा अधिकारी -०१ पद असे केवळ ०३ शासकीय अधिकारी पुर्णवेळ कार्यरत आहेत व जिल्हा कार्यकारी अधिकारी हे पद अतिरीक्त कार्यभाराने कार्यरत आहे. याशिवाय ०१ उपलेखापाल प्रतिनियुक्तीने, ०१ वरिष्ठ लिपिक (अतिरिक्त कार्यभाराने) व ०२ लिपिक-टंकलेखक (उसनवारीने) कार्यरत आहेत.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचे व्याप्ती संपुर्ण महाराष्ट्रभर असून मंडळाकडे जास्तीत जास्त नोंदणी,नुतनीकरण व योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि पुढील महत्त्वाचे कामे पार पाडणेसाठी मुख्यालय,प्रादेशिक कार्यालय,जिल्हा कार्यालय येथे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

(अ)	मंडळाकडे सध्या विविध बँकामध्ये गुंतवणुकीच्या स्वरूपात शिल्लक असलेले रक्कम रू.९,०५० कोटी, दरवर्षी उप कराच्या माध्यमामधून जमा होणारे सर्वसाधारण रक्कम रु. ३१०० कोटी व विविध योजनांवर दरवर्षी खर्च होणारे रू. ३५०० कोटी या आर्थिक बाबींचे सुयोग्य लेखांकन,लेखापरिक्षण व नियोजन करणे.
(ब)	उपकर संकलनाकरीता प्रभावी यंत्रणा तयार करणे.
(क)	बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटप करणे.
(ड)	मंडळाकडील अस्तित्वातील योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे.

(इ)	अधिनियमातील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांच्या हिताचे संरक्षणार्थ अन्य उपाययोजना करणे. याकरीता, मंडळाची प्रशासकीय यंत्रणा सक्षम करणे अत्यावश्यक बाब आहे.

सविस्तर चर्चेअंती सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे योजनाविषयक कार्य व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रशासन व नोंदणी, नुतणीकरण कार्य सोपविण्याचे ठरले तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी व प्रादेशिक कार्यकारी अधिकारी ही पदे वगळण्यात यावीत तसेच बाहयस्त्रोताव्दारे प्रस्तावित करण्यात आलेली डाटा एन्ट्री ऑपरेटर, वाहनचालक व शिपाई इ. पदे कमी करण्यात यावीत.

ठराव क्र. ६० (२६)/२०२४ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर मंडळ कामकाजासाठी ८१३ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे. सदरची पद भरतीबाबतचे सेवाप्रवेश नियम तयार करून शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.२७ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुख्यालयातील कामकाजाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या मुदतवाढीस मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील विविध पदांच्या सुधारीत आकृतीबंध मंजुरीची प्रक्रिया अद्याप पुर्ण झाली नसल्याने सदर पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित आहे. सबब, मंडळाकडील विवक्षीत कामकाजाकरीता आवश्यकतेनुसार सदर रिक्त पदांच्या प्रमाणात शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अन्वये तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळाकडील विवक्षीत कामकाजाकरीता शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा घेण्यात येतात व त्यांना गरजेनुसार वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येते.

२. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्दा क्रं. (अ) मधील तरतुदीनुसार करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पध्दतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिका-यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासुचीत नियुक्त करावयाच्या एकुण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरूप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करून नामिकासुची नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी असे नमुद केले आहे.महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या आर्थिक वर्षाचे लेखे, वार्षिक अर्थसंकल्प, वस्तु व सेवाकर व आयकर विषयक कामकाज, गुंतवणुक व ठेवी, अंतर्गत लेखापरिक्षण, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदित बांधकाम कामगारांचे नूतनीकरण आणि नोंदित बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांच्या लाभाचे वाटप करणेकरीता संबंधित कामे करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही.सबब, नव्याने करार पध्दतीने कर्मचारी वर्ग व महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून गट "अ" व "ब" मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची मंडळ मुख्यालयात नियुक्तीसाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील सेवानिवृत्त अवर सचिव व कक्ष अधिकारी, कामगार विभागातील कामगार उपायुक्त, सहायक कामगार आयुक्त, व सरकारी कामगार अधिकारी तसेच वित्त विभागातील (संचालनालय, लेखा व कोषागारे) ,लेखा अधिकारी,सहायक लेखा अधिकारी या पदावर प्रशासन/वित्त व लेखा विषयक कामकाजाचा अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची मंडळाच्या आस्थापनेवर सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजाकरीता शैक्षणिक पात्रता व अनुभव असणाऱ्या सेवानिवृत्त अधिका-यांची नियुक्ती करण्याबाबत मंडळाच्या दिनांक १२.१२.२०२२ रोजीच्या ५९ व्या संपन्न बैठकीमध्ये ठराव पारीत करण्यात

आला होता. त्यानुसार मंडळ मुख्यालयात व क्षेत्रीय कार्यालयात खालील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची ११ महिन्याच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती.

अ.क्र.	सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव	अ.क्र.	सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे नाव
१	श्री. पांडुरंग वाघमारे	५	श्रीम.सोनाली रेडकर
२	श्री. राजेंद्र कौरते	६	श्री. सिध्दार्थ मस्के मस्के
३	श्री. नितीन वागळे	७	श्री.अशोक मोरे
४	श्री. विवेक राणे	८	श्री. अरविंद तेलवाडकर

उपरोक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्याची कालावधी संपत आला असल्याने तसेच सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या सेवेची मंडळास आवश्यकता असल्याने त्यांना मंडळाच्या दिनांक १५.०३.२०२४ रोजीच्या कार्योदेशान्वये दिनांक ३०.११.२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

ठराव क्र. ६० (२७)/२०२४ :-

मंडळ कामकाजाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या ०८ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करारास दिनांक ३०.११.२०२४ अखेर दिलेल्या मुदतवाढीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.२८ :- दिनांक ३१.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे दिनांक ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्त सूचीबद्ध संस्थांकडून मनुष्यबळ नियुक्ती करणेबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आल्याने मंडळ व क्षेत्रिय कार्यालयातील कामकाजासाठी मनुष्यबळ नियुक्तीकरीता संस्था निश्चीत करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाकडील विविध पदांच्या सुधारीत आकृतीबंध मंजुरीची प्रक्रिया अद्याप पुर्ण झाली नसल्याने सदर पदांची भरती प्रक्रिया प्रलंबित आहे. सबब, मंडळाकडील कामकाजाच्या आवश्यकतेनुसार सदर रिक्त पदांच्या सेवा शासन धोरणानुसार बाहयस्त्रोत यंत्रणेकडून घेण्यात येतात.

२. शासन पत्र उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दिनांक १८.०१.२०२३ अन्वये मे. ब्रिस्क इंडिया प्रा. लि. यांची मुदतवाढ संपुष्टात आल्याने मंडळ पत्र दिनांक १८.०७.२०२३ अन्वये संबंधित संस्थेस त्यांचेकडील सदर सेवा पुरवठा कामकाज समाप्तीबाबत कळविण्यात आले. तदनंतर वेळोवेळी निर्गत झालेल्या शासन निर्णय दिनांक १४.०३.२०२३, दिनांक ०५.०४.२०२३, दिनांक ०९.०५.२०२३ आणि दिनांक ०६.०९.२०२३ अन्वये बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्यासाठी ०९ सेवापुरवठादारांच्या पॅनलला मनुष्यबळाच्या वर्गवारीनुसार मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी देण्यात आलेल्या शासन मान्यतेनुसार मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील कामकाजाकरीता मा. मंत्री (कामगार) मा. अध्यक्ष, मंडळ यांचे मान्यतेने मंडळ मुख्यालयात एकुण ४८ व ४० जिल्हा सुविधा केंद्राकरीता प्रत्येकी ०८ या प्रमाणे ३२० पदे अशी एकुण ३६८ पदे उपरोक्त नमूद शासन निर्णयातील ०९ सेवापुरवठादारांच्या पॅनलपैकी मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या संस्थेशी मंडळाने दिनांक ११.०७.२०२३ रोजी करारनामा करून मंडळ कार्यादेश दिनांक १८.०७.२०२३ पासून मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यात आल्या आहेत.

३. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये शासन निर्णय दिनांक ०६.०९.२०२३ मधील तरतुदी रद्द करण्यात आल्याने उपरोक्त नमूद शासन नियुक्त ९ पॅनलवरील एजन्सीकडून दिनांक २१.१०.२०२३ पासून मनुष्यबळाच्या सेवा घेता येणार नाहीत. संबंधित विभाग/कार्यालयाने दिनांक २१.१०.२०२३ पासून नऊ महिन्याच्या आत मनुष्यबळाच्या सेवा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होणार नाही अशा रितीने संपूष्टात आणाव्यात असे निर्देश आहेत. तथापि, कामगार विभागाकडून बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवा करणाऱ्या संस्थाची पॅनल नियुक्ती अथवा पर्यायी व्यवस्था झाली नसल्याने मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने कामगार विभागाकडून बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवा करणाऱ्या संस्थाची पॅनल नियुक्ती होईपर्यंतच्या कालावधीकरीता तत्कालीन

पॅनलवरील नियुक्त संस्था मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. यांचेकडून वैध करारनामा कालावधीस अधिन राहून मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यात आल्या आहेत.सद्या कामगार विभागाअंतर्गत मा. कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खरेदी समितीमार्फत बाहयस्त्रोत यंत्रणेकडून मनुष्यबळ पुरवठा सेवांकरीता संस्थाची पॅनल नियुक्ती प्रक्रिया सुरू आहे. सदर प्रक्रिया पुर्ण होऊन नियुक्त होणाऱ्या संस्थेकडून मंडळाच्या आवश्यकतेनुसार मा. अध्यक्ष, मंडळ यांच्या मान्यतेने मनुष्यबळ सेवा घेणे प्रस्तावित आहे.

ठराव क्र. ६० (२८)/२०२४ :-

मंडळ मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयातील लिपिक व गट-ड वर्गीय रिक्त पदांच्या अनुषंगाने शासन धोरणानुसार बाहयस्त्रोत यंत्रणेकडून घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवा शासन निर्णय दिनांक ३१.१०.२०२३ अन्वये दिनांक ०६.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. या पॅनलवरील एजन्सी नियुक्तीचा शासन निर्णय रद्द झाल्याने, सदर सेवांकरीता स्वतंत्रपणे प्रक्रिया न राबविता कामगार विभागाकडून नव्याने सुरू असलेल्या बाहयस्त्रोत मनुष्यबळ पुरवठा संस्था पॅनल नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीकरीता, तत्कालीन पॅनलवरील नियुक्त संस्था मे. एस. टु. इन्फोटेक इंटरनॅशनल लि. यांचेकडून वैध करारनामा कालावधीकरीता मनुष्यबळ पुरवठा सेवा घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.२९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना लाभाचे अर्ज (DBT) सादर करण्यासाठी प्रत्यक्ष जिल्हा सुविधा केंद्रावर उपस्थित राहून अर्ज सादर करण्याबाबत नवीन कार्यपध्दतीचा निश्चित करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, केंद्र शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्ती), १९९६ मधील कलम (१८) नुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तित्वात आले व त्यानुसार, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. मंडळाकडून बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कामगारांची नोंदणी, तीचे नुतनीकरण आणि विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वितरीत करण्यात येतात. सुरवातीस सदर प्रक्रिया छापील हस्तलिखीत अर्ज (ऑफलाईन) प्रकाराने राबविण्यात येत होती त्यामध्ये सुधारणा करून माहे जुलै २०२० पासून मंडळाने विकसीत केलेल्या एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) व्दारे ऑनलाईन प्रकाराने नोंदणी/नुतणीकरण/लाभ वाटपाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. लाभ वाटपाचे अर्ज प्रक्रियेतील तांत्रीक अडचणी कमी करून सदर प्रक्रिया अधिक कार्यक्षम होण्यासाठी नवीन कार्यपध्दती राबविणे आवश्यक होते. तसेच नोंदणी व नुतनीकरण प्रक्रियेतीलही तांत्रीक अडचणी कमी करून त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने नवीन कार्यपध्दती राबविणे आवश्यक आहे.

२. माहे जुलै, २०२० पासून मंडळाने विकसीत केलेल्या एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) व्दारे राबविण्यात येणाऱ्या नोंदणी/नुतणीकरण/लाभ वाटप प्रक्रियेमध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर काही ठराविक अर्ज शोधून (Search) त्यावर कार्यवाही करणे, एकाच मोबाईल नंबरवर (Master Mobile OTP) अनेक अर्जाच्या नोंदी होणे, Filter ची सुविधा वापरून ठराविक योजनांच्या अर्जावर कार्यवाही करणे अशा अनेक प्रकारच्या बाबी घडत असल्याचे मंडळाच्या निदर्शनास आले तसेच याबाबत विविध लोकप्रतिनिधी, बांधकाम कामगार संघटना, क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी सुचविण्यात आलेल्या सुधारणा यानुषंगाने दिनांक २६.०३.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास अनुसरून दिनांक १२.०९.२०२३ अन्वये शासनाकडून निर्देश प्राप्त झाले होते. त्यानुसार सदर प्रणाली अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी बांधकाम कामगारांचे प्राप्त होणारे लाभ वाटपाचे ऑनलाईन अर्ज हे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीव्दारे प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) निकाली काढणे आवश्यक होते. या सर्व बाबींचा विचार करून, शासनाच्या उपरोक्त पत्रातील निर्देश विचारात घेऊन, लाभ वाटपाची नविन कार्यपध्दती निश्चीत करण्यात आली

पान क्र. ७९ पैकी १०१

सदर नविन कार्यपध्दतीमध्ये लाभाचे अर्ज सादर करणे, लाभ वाटप लिपीक लॉग इन आयडी, तालुका नोंदणी अधिकारी लॉग इन आयडी, प्रलंबित लाभ वाटप अर्जावर करावयाची कार्यवाही, मंडळ स्तरावरील समन्वय कक्ष, लाभ अर्जाकरीता योजनानिहाय आवश्यक कागदपत्रांचा तपशिल (प्रपत्र-ड), लाभाचे अर्ज प्रक्रिया (प्रपत्र-इ) आणि रबर स्टॅम्प नमुना (प्रपत्र-ई) यांचा समावेश आहे. सदर कार्यपध्दतीच्या अनुषंगाने मंडळ पत्र दिनांक दिनांक २०.१०.२०२३ व दिनांक २२.११.२०२३ अन्वये सर्व विभाग व क्षेत्रीय कार्यालयांना सर्वकष सुचना देण्यात आल्या आहेत. माहे जुलै, २०२० पासून मंडळाने विकसीत केलेल्या एकात्मीक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) व्दारे राबविण्यात येणाऱ्या नोंदणी व नुतणीकरण प्रक्रियेमध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर काही ठराविक अर्ज शोधून (Search) त्यावर कार्यवाही करणे, एकाच मोबाईल नंबरवर (Master Mobile OTP) अनेक अर्जाच्या नोंदी होणे, Filter ची सुविधा वापरून ठराविक योजनांच्या अर्जावर कार्यवाही करणे अशा अनेक प्रकारच्या बाबी घडत होत्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतणीकरणातील तांत्रीक अडचणी कमी करून नोंदणी व नुतनीकरणामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने दिनांक ०९.११.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले होते. याबाबत विविध लोकप्रतिनिधी, बांधकाम कामगार संघटना, क्षेत्रिय अधिकारी यांच्याकडून सुधारणा सुचविणत आल्या होत्या. त्यानुषंगाने दिनांक २६.०३.२०२३ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यास अनुसरून दिनांक १२.०९.२०२३ अन्वये शासनाकडून निर्देश प्राप्त झाले होते. त्यानुसार सदर प्रणाली अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी बांधकाम कामगारांचे प्राप्त होणारे ऑनलाईन अर्ज हे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीव्दारे प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) निकाली काढणे आवश्यक आहे. त्यासाठी नविन कार्यपध्दती विकसीत करणे आवश्यक आहे.

ठराव क्र. ६० (२९)/२०२४ :-

मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांना लाभाचे अर्ज (DBT) सादर करण्यासाठी प्रत्यक्ष जिल्हा सुविधा केंद्रावर उपस्थित राहून अर्ज सादर करण्याबाबत राबविण्यात आलेल्या नवीन कार्यपध्दतीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,

विषय क्र.३० :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या पटलावर ठेवणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येते.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती खालीलप्रमाणे -

अ. क्र.	विभाग	जिल्हा	एकूण नोंदणीकृत कामगार संख्या	एकूण नूतनीकरण संख्या	२६ जून २०२४ रोजी सक्रिय कामगार संख्या	लाभ वाटप
१	अमरावती	अकोला	७५,५४४	२९,३८२	३५,९१५	१४,३३५
२		अमरावती	१५०,०३६	३०,९०१	५२,७५१	७,२००
३		बुलढाणा	१५४,८४२	८५,७४२	५८,३२१	७७,०९९
४		वाशिम	१६,८७६	७,६९१	५,०१५	३,७४५
५		यवतमाळ	१५६,३१७	३४,३२१	७९,६४७	२५,६५९
६	औरंगाबाद	औरंगाबाद	२७०,९४७	८२,८३२	१६०,२०२	२३,८६७
७		बीड	९०,२९८	४७,०३७	३४,१६५	२७,५५३
८		हिंगोली	५४,५९२	१६,८६७	३०,८२५	२२,०५३
९		जालना	१४४,३५२	५१,८६२	८५,८७३	३०,०९८
१०		लातूर	६०,५७७	१४,३०८	२८,८६७	२०,१४६
११		नांदेड	९९,९६०	३२,२१६	३९,१०९	३६,६१०
१२		उस्मानाबाद	१०,१०६	२,६४३	४,५१५	१४,५०३
१३		परभणी	११६,२१५	५९,६४१	७१,५२०	५३,५६८
१४	मुंबई	मुंबई शहर	३८,०९२	२,५६७	११,०००	१,५४३
१५		मुंबई उपनगर पूर्व	१८,६५०	१,२३७	६,८०३	८१२
१६		मुंबई उपनगर पश्चिम	२४,४७५	२,७३७	७,२७९	१,२८२
१७	नागपूर	भंडारा	५५,१६७	१३,१९५	२२,६४६	२१,३६४
१८		चंद्रपूर	४७,२५०	२०,२३८	१०,१०८	१,३५१
१९		गडचिरोली	४०,४१३	१७,४४८	८,९९२	८,६८६
२०	नागपूर	गोंदिया	२३,४५८	१२,६९६	११,७९१	१२,८७०
२१		नागपूर	७७,२७०	२४,१८३	४०,४८६	२६,५८८
२२		वर्धा	१००,२३०	१००,४९८	६७,५६४	५४,१७०
२३		अहमदनगर	१११,६४०	३७,८२१	५२,२१४	८३,३०२
२४		धुळे	७०,३२५	५,६४०	३२,८१०	३,०१४

अ. क्र.	विभाग	जिल्हा	एकूण नोंदणीकृत कामगार संख्या	एकूण नूतनीकरण संख्या	२६ जून २०२४ रोजी सक्रिय कामगार संख्या	लाभ वाटप
२५	नाशिक	जळगाव	११९,९२१	५,१३४	६८,५५९	४,६३७
२६		नंदुरबार	३७,९१६	६४५	२३,८७८	१,६११
२७		नाशिक	७४,८३७	६,९१२	३५,८०४	४,४०५
२८	पुणे	इचलकरंजी	५६,१२१	२४,०२५	१८,९६०	१४,८४२
२९		कोल्हापूर	३३९,५९८	१७३,२२०	१३२,३६६	१०१,१८६
३०		पुणे	२२९,११३	२५,३३१	१०२,०५६	२४,४४४
३१		सांगली	२१०,९७८	५०,७५१	९३,०६०	१४०,९८६
३२		सातारा	६२,७८५	२२,७३०	३७,७९७	१४,४१९
३३		सोलापूर	१५२,०२७	५१,९३०	७८,४९५	२७,४९१
३४	कोकण	भिवंडी	०	१	०	०
३५		कल्याण	२२,०७५	२,१२४	७,८६९	१,०५५
३६		पालघर	१९,२८७	३,८६४	७,०९०	२,७५६
३७		पनवेल	३३,८२५	२,७७८	१२,६७३	८०२
३८		रत्नागिरी	१९,१७३	५,६८५	१४,४९६	६,४८७
३९		सिंधुदुर्ग	१२,०६३	२३,०६४	११,४५५	१३,३६४
४०		ठाणे	२४,७१५	२,२२३	१०,५८५	१,८७८
४१	एकूण		**३,४२२,०६६**	**१,१३४,१२०**	**१,६१३,५६१**	**९३१,७८१**

ठराव क्र. ६० (३०)/२०२४ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गतच्या बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटपाबाबतची माहिती अवलोकन होऊन केलेल्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.३१ :- दिनांक ०१.११.२०२० ते दिनांक ३१.०१.२०२२ या कालावधीत मा. महालेखापाल कार्यालयाकडून झालेल्या निरीक्षण लेखापरिक्षणात (Inspection Audit) उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत तसेच, सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीतील कार्यक्षमता लेखापरिक्षण (Performance Audit) मध्ये उपस्थित परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section १९ (२) नुसार महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अभिलेख्यांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) लेखापरीक्षण मा महालेखापाल कार्यालयाकडून करण्णत येते. त्यानुसार सन २००७-०८ ते ३१.१०.२०२० अखेर वेळोवेळी करण्यात आलेल्या लेखापरीक्षणानुसार निरीक्षण अहवाल (Inspection Report) मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदर अहवालात उपस्थित केलेल्या परिच्छेदांचे अनुपालन वेळोवेळी करण्यात आले आहे. सद्या मंडळाचे दि, ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील अभिलेखांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) करण्यात आले असून सदर अहवालामध्ये उपस्थित ९ परीच्छेदां तयार केलेल्या अनुपालनास मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२) अन्वये इमारत आणि महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून लेखापरीक्षण करण्यात येते. Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section २३ नुसार CAG कडील Auditee चे कामकाजामध्ये कार्यक्षमता येण्यासाठी कार्यक्षमता लेखापरीक्षाण करण्यात येते. त्यानुसार, मंडळाच्या सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षाच्या कालावधीतील कार्यक्षमता लेखा परीक्षण माहे फेब्रुवारी -२०२३ ते जानेवारी-२०२४ अखेर या कालावधीमध्ये करण्यात आले. सदर लेखा परीक्षण कालावधीमध्ये आज अखेर वेळोवेळी दिलेल्या अर्धसमास पत्राद्वारे उपस्थित केलेल्या आक्षेपांची त्रुटी पुर्तता करून अनुपालन सादर केले आहेत.

(अ) दिनांक ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील मा. महालेखापाल कार्यालयाकडील निरीक्षण अहवाल (Inspection Report) मधील ९ (नऊ) परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणे.

Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section १९ (२) नुसार महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अभिलेख्यांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) लेखापरीक्षण मा महालेखापाल कार्यालयाकडून करण्यात येते. त्यानुसार सन २००७-०८ ते ३१.१०.२०२० अखेर वेळोवेळी करण्यात आलेल्या लेखापरीक्षणानुसार निरीक्षण अहवाल (Inspection Report) मंडळास सादर करण्यात आले आहेत. सदर अहवालात उपस्थित केलेल्या परिच्छेदांचे अनुपालन वेळोवेळी करण्यात आले आहे.सद्या मंडळाकडील दि. ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील अभिलेखांचे चाचणी निरीक्षण (A test check of the records) दिनांक २४.०२.२०२२ ते १४.०३.२०२२ या कालावधीत पूर्ण केले आहे. व त्याचा निरिक्षण अहवाल (Inspection Report) IR NO. २०२१२२०१३ महालेखापाल कार्यालयाने त्यांच्या दिनांक १४.०४.२०२२ च्या पत्रान्वये मंडळास सादर केला आहे. सदर निरीक्षण अहवालामध्ये खालील तक्त्यात नमुद ९ परीच्छेद उपस्थित करण्यात आले असून त्यांचे अनुपालन तयार केले असून मा. महालेखापाल कार्यालयास सदर ९ परीच्छेदांचे अनुपालन अहवाल सादर करणेस मंडळाच्या मान्यतेस सविनय सादर.

अ.क्र.	परीच्छेद
१	Avoidable expenditure due to double payments made towards financial assistance under Covid -१९ Rs ६२.०१ Lakhs
२	Distribution of benefits in kind of amounting to Rs.३४७ Cr. To registered BOC workers to incontraventions to directions of Central Govt. under section ६० of the BOCW Act, १९९६.
३	Irregularities in the Contract agreement and implementation of Contract of Safety kits and Essential kits
४	Duplicate registrations in beneficiaries of safety kits and essential kits
५	Obtaining estimated rates of Safety Kits for supply, transportation and distribution to eligible/ registered Construction Workers..
६	Bank Guarantee from Private Bank instead of Nationalized Bank in contravention to Contract Conditions
७	Non availability of mechanism for Identification of unregistered establishments

८	Delay in submission of Annual Accounts for २०२०-२१.
९	Cess Collection Data -Observation thereof

(ब) सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीत कार्यक्षमता (निष्पादन) लेखापरीक्षणात (Performance Audit) उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्रांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ (२) अन्वये इमारत आणि महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे मा. महालेखापाल कार्यालयाकडून लेखापरीक्षण करण्यात येते. Comptroller and Auditor General's (DPC) Act १९७१ मधील section २३ नुसार CAG कडील कार्यक्षमता लेखापरीक्षाण करण्यात येते. त्यानुसार, मंडळाच्या सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षाच्या कालावधीतील कार्यक्षमता लेखा परीक्षण माहे फेब्रुवारी - २०२३ ते जानेवारी-२०२४ अखेर या कालावधीमध्ये करण्यात आले. सदर लेखा परीक्षण कालावधीमध्ये लेखापरीक्षण पथकाने सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षांच्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करून आज अखेर वेळोवेळी उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्र/ परीच्छेदांचे अनुपालन मा. महालेखापाल कार्यालयास सादर केले आहे. सदर अनुपालनांच्या मान्यतेनुसार (Acceptance) काही परिच्छेद वगळून उर्वरीत अंतिम परीच्छेंदांचा कार्यक्षमता अहवाल (Performance Report) यथावकाश प्रसिध्द करण्यात येतो.

सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षांच्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्र/ परीच्छेदांचा गोषवारा सोबतच्या विवरणपत्रात जोडण्यात आला आहे. तरी प्रस्तुत अर्धसमासपत्र/ परीच्छेदांचे अनुपालन मंडळाचे मान्यतेस्तव सविनय सादर.

(क) शासनाकडून प्राप्त सन २०१७-२२ कालावधीच्या मंडळ कार्यक्षमता (निष्पादन) लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांना दिलेल्या अनुपालनास मान्यता देणे.

उपरोक्त विषय क्र. १७ (ब) मध्ये नमुदप्रमाणे, मंडळाच्या सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या पाच वर्षाचे माहे फेब्रुवारी -२०२३ ते जानेवारी-२०२४ या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या कार्यक्षमता लेखा परीक्षणाचा अहवाल मा. महालेखापाल कार्यालयाकडून कामगार विभाग, मंत्रालय यांना दिनांक १७.०४.२०२४ रोजी सादर करण्यात आला आहे. त्यानुसार शासन पत्र दिनांक २६.०४.२०२४ अन्वये सदर अहवालातील मंडळाशी संबंधित मुद्दयांच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सविस्तर अहवाल सादर करण्याविषयी मंडळास कळविण्यात आले आहे.

प्रस्तुत सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कार्यक्षमता लेखापरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट एकुण ६ प्रकरणे खालीलप्रमाणे-

पान क्र. ८५ पैकी १०१

अ. क्र.	प्रकरण
१	Introduction
२	Consistency of the Rules and Institutional Mechanism
३	Registration of workers and establishments
४	Assessment and Collection of Cess
५	Health and Safety of Workers and Inspection of Establishments
६	Administration of Funds and Implementation of Welfare Schemes

उपरोक्त ६ प्रकरणांपैकी प्रकरण क्र. १ प्रस्तावणा असून त्यावर भाष्य अपेक्षित नाही. प्रकरण क्र. ५ हे मा. कामगार आयुक्त कार्यालयाकडील कार्यासन-३० संबंधित असल्याने त्यावरील कार्यवाहीसाठी सदर प्रकरण मा. कामगार आयुक्त कार्यालयाकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. उर्वरित प्रकरण क्र. २,३,४ व ६ मंडळाशी संबंधित असून सदर प्रकरणांमध्ये लेखा परीक्षण कालावधीत उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्राचे अनुषंगाने मंडळाने केलेल्या अनुपालनाची तपासणी करून काही आक्षेप कायम ठेवले आहेत व सदर आक्षेपांच्या अनुषंगाने यापुर्वी सादर केलेले अनुपालन व त्याशी संबंधित अदययावत माहिती/ अभिलेख इत्यादिंचे आधारे सुधारीत अनुपालन तयार केले आहेत. सदर सुधारीत अनुपालन मंडळाच्या मान्यतेने शासनामार्फत मा. महालेखाकार कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

ठराव क्र. ६० (३१)/२०२४:-

१. **मंडळाकडील दिनांक ०१.११.२०२० ते ३१.०१.२०२२ या कालावधीतील मा. महालेखापाल कार्यालयाकडील निरीक्षण अहवाल (Inspection Report) IR NO. २०२१२२०१३ मधील ९ परिच्छेदांना दिलेल्या अनुपालनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
२. **सन २०१७-१८ ते सन २०२१-२२ या कालावधीत कार्यक्षमता (निष्पादन)लेखापरीक्षणात (Performance Audit) उपस्थित केलेल्या अर्धसमासपत्रांना दिलेल्या अनुपालनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३. **शासनाकडून प्राप्त सन २०१७-२२ कालावधीच्या मंडळ कार्यक्षमता (निष्पादन) लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांना दिलेल्या अनुपालनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ. मुंबई

विषय क्र.३२ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक करण्यात आलेल्या कार्यवाहीस मंजुरी देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील जमा उपकर निधीपैकी अतिरिक्त निधीची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक उपसमितीद्वारे गुंतवणूक करण्याचे निर्देश आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील पत्र दिनांक ०५.०७.२०२१ अन्वये गुंतवणुक उपसमितीचे खालीलप्रमाणे पुर्नगठन करण्यात आले आहे.

अ.क्र.	गुंतवणुक उप समिती	पद
१	मा. मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई	अध्यक्ष
२	मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
३	उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
४.	सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई	सदस्य

२. उपरोक्त नमुदप्रमाणे गुंतवणूक उपसमितीने मंडळाकडील अतिरीक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी वेळोवेळी बैठकांचे आयोजन करून कामकाज पुर्ण केले आहे. त्यानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये मंडळाकडील अतिरीक्त निधी रू ९०५० कोटी राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये गुंतवणूक केलेच्या कार्यवाहीस मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेश व वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ व १३.०३.२०२० मधील मार्गदर्शक सुचनानुसार, मंडळाकडील शासनमान्य गुंतवणूक उपसमितीने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये सन २०२२-२३ मध्ये एक वर्षाचे कालावधीसाठी गुंतवणूक केलेल्या व ज्यांची परिपक्वता सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये आहे अशा ९% मुदतबंद ठेव पावत्यांच्या परिपक्वता रक्कमेपैकी वेळोवेळी मंडळाकडील आर्थिक प्रदानांकरीता आवश्यक रक्कम कपात करून उर्वरीत अतिरीक्त निधी एकुण रू. ९०५० कोटी गुंतवणूर्कीकरीता बैठकांचे आयोजन केले व त्याद्वारे सर्व संबंधित राष्ट्रीयकृत बँकाकडून ऑनलाईन व्हीडीओ कॉन्फरन्सींगव्दारे एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकारातील मुदतबंद ठेव पावतीमधील गुंतवणूकीकरीता खुल्या स्पर्धात्मक व्याजदर बोलीने केलेल्या प्रक्रीयेत खालील नमुद राष्ट्रीयकृत बँकाकडून

प्राप्त झालेल्या सर्वोच्च व्याजदराने पुर्नगुंतवणूक करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अ.क्र.	बँकेचे नाव	शाखेचे नाव	गुंतवणूक दिनांक	परिपक्वता दिनांक	गुंतवणुक रक्कम (रु.कोटीत)	व्याजदर द.सा.द. शे	परिपक्वतेनंतर प्राप्त होणारी रक्कम
१	कॅनरा बँक	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	१७.०४.२०२३	१७.०४.२०२४	८००	७.६६%	८६३.०६
२	युनियन बँक ऑफ इंडिया	घाटकोपर (पश्चिम), मुंबई	११.०५.२०२३	११.०५.२०२४	८५०	७.७३%	९१७.६३
३	बँक ऑफ इंडिया	ताडदेव शाखा मुंबई.	१८.०५.२०२३	१८.०५.२०२४	११००	७.७०%	११८७.१७
४	स्टेट बँक ऑफ इंडिया	बीकेसी, मुंबई	२५.०५.२०२३	२५.०५.२०२४	१२००	७.७०%	१२९५.१०
५	कॅनरा बँक,	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	१०.०७.२०२३	१०.०७.२०२४	६००	७.६७%	६४७.३६
६	स्टेट बँक ऑफ इंडिया	बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई.	०६.०९.२०२३	०६.०९.२०२४	११००	७.७३%	११८७.५२
७	स्टेट बँक ऑफ इंडिया	बीकेसी, मुंबई	१२.१०.२०२३	१२.१०.२०२४	१०००	७.७६%	१०७९.८८
८	बँक ऑफ महाराष्ट्र	नॉर्थ झोन, झोनल ऑफिस वांद्रे,	०१.१२.२०२३	०१.१२.२०२४	४००	७.७७%	४३१.९९
९	युनियन बँक ऑफ इंडिया	घाटकोपर (पश्चिम), मुंबई	१६.०१.२०२४	१६.०१.२०२५	१५००	७.८७%	१६२१.५७
१०	युनियन बँक ऑफ इंडिया	मुख्य शाखा सांगली	२९.०१.२०२४	२९.०१.२०२५	५००	७.९३%	५४०.८४
	एकुण				९०५०		९७७२.१२

वरीलप्रमाणे, गुंतवणूक उपसमितीने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये मंडळाकडील अतिरिक्त निधी रू ९०५० कोटी प्राप्त महत्तम व्याजदराने राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणूक कार्यवाहीस मंडळाची मान्यता घेणे प्रस्तावित आहे.

पान क्र. ८८ पैकी १०१

ठराव क्र. ६० (३२)/२०२४ :-

सन २०२३-२४ मध्ये गुंतवणूक उपसमितीने मंडळाकडील अतिरिक्त निधी रू ९०५० कोटीची राष्ट्रीयकृत बँकेच्या मुदतबंद ठेव पावतीमध्ये एक वर्षाच्या कालावधीसाठी Non Callable प्रकाराने केलेल्या गुंतवणूक कार्यवाहीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.३३ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील उपकर जमा व योजनानिहाय खर्चास मंजुरी देणेबाबत.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार यांचे संदर्भात रोजगार व सेवाशर्ती तसेच त्यांची सुरक्षा, आरोग्य,कल्याण विषयक व इतर संबंधित बाबीसाठी तरतूदी करण्याच्या उद्देशाने करण्यात आलेल्या इमारत व इतर बांधकाम (रोजगार व सेवाशर्ती नियमन)अधिनियम,१९९६ या केंद्रीय अधिनियमांतील तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने इमारत व इतर बांधकाम नियम २००७ तयार केलेले आहेत. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम ,१९९६ च्या कलम ३(१)अनुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र.एसओ २८९९, दिनांक २६ सप्टेंबर १९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मुल्याच्या (जमिनीचे मुल्य वगळून) १% दराने उपकर गोळा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार मंडळाकडील बँक खात्यामध्ये उपकर जमा होत आहे. तसेच नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी मंडळाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ दिला जातो.

सद्यस्थितीत सन २०२३-२४ मध्ये, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळाने माहे मार्च, २०२४ अखेर केलेल्या जमा उपकर व योजनानिहाय खर्चाचा गोषवारा खालीलप्रमाणे -

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

सन २०२३-२४ (रक्कम रु.कोटीत)

अनु.क्र	महिना	जमा	योजनानिहाय खर्च										
		उपकर	मध्यान्ह भोजन	अत्यावश्यक संच	सुरक्षा संच	आरोग्य तपासणी	नोंदीत बांधकाम कामगारांनाऑनलाइन पद्धतीने लाभ वाटप (DBT)	जिल्हा सुविधा केंद्र उभारणी	प्रचार प्रसिध्दी	अटल बांधकाम कामगार आवास योजना	गृहपयोगी संच	प्रशासकीय खर्च	एकूण
१	एप्रिल - २०२३	२५७.०२	१६६.२	४६.५४	६८.९२	४.८४	२६.५७	०	०	०	०	१.७९	३१४.९
२	मे – २०२३	२०८.३८	३८६	२६.६८	२५.१६	३४.८२	६१.७२	०	०	०	०	३.५९	५३७.९
३	जुन - २०२३	३३९.४८	३५२.६	१४.५९	१५.७५	१८.२९	४५.५८	०.०७	१.१२	३.१८	०	३.१८	४५४.३
४	जुलै-२०२३	२३७.४८	४६५.९	२१.३२	२१.१२	७४.०९	३३.५२	०	१८.२४	०	०	०.५८	६३४.८०
५	ऑगस्ट-२०२३	१९१.६६	१०८.३	३३.५२	३३.२१	४५.९४	२७.९६	०	११.५	०	०	१०.९१	२७१.४
६	सप्टेंबर-२०२३	३५१.९२	१६६.५	४०.३७	४०.०१	४५.७५	३०.५७	०	१८.५२	०.४४	०	९५.०७	४३७.२
७	ऑक्टोबर-२०२३	२४३.५७	१५९.४	४७.४२	४६.९९	५०.४	२९.८९	०	१७.९४	०	०	५१.०१	४०३
८	नोव्हेंबर-२०२३	१८२.११	२१०.१	२२.३५	२२.१६	२४.६५	४०.९	०	२०.७१	०	०	७.८९	३४८.७
९	डिसेंबर- २०२३	२७७.७२	४२.९६	६२.४२	६१.८५	६८.०७	९४.६१	०	४.५८	५.४४	०	५७.५३	३९७.५
१०	जानेवारी-२०२४	२७०.१४	०	२६.४१	२६.१८	५७.०७	९४.५९	०.४८	५.८२	०	०	४१.४	२५२
११	फेब्रुवारी- २०२४	२८७.५९	०	५२.०५	५१.५८	२८.८५	९२.५४	०.००५	०.२८	०	०	३१.६८	२५७

पान क्र. ९० पैकी १०१

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई													
सन २०२३-२४ (रक्कम रु.कोटीत)													
अनु.क्र	महिना	जमा	योजनातिरिक्त खर्च										
		उपकर	मध्यान्ह भोजन	अत्यावश्यक संच	सुरक्षा संच	आरोग्य तपासणी	नोंदीत बांधकाम कामगारांनाऑनलाइन पद्धतीने लाभ वाटप (DBT)	जिल्हा सुविधा केंद्र उभारणी	प्रचार प्रसिध्दी	अटल बांधकाम कामगार आवास योजना	गृहपयोगी संच	प्रशासकीय खर्च	एकूण
१२	मार्च -२०२४	३३८.३६	०	१२३.५	१२२.४७	१३२.२	२३.९७	०	५.२१	०.६४	२२९.७३	८४.२५	७२३
	एकूण	३१९३.४३	२०५७.८२	५१७.२०	५३५.४०	५८५.००	६०२.४२	०.५६	१०३.९२	९.७०	२२९.७३	३८८.८८	५०३०.६३

ठराव क्र. ६० (३३)/२०२४ :-

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील माहे **मार्च - २०२४ अखेर, उपकर जमा रू. ३१९३.४३ कोटी व विविध योजनेवरील व प्रशासकीय एकुण खर्च रू. ५०३०.६३ कोटी (प्रशासकीय खर्च रू ३८८.८८ कोटी + योजना खर्च रू ४६४१.७५ कोटी) यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र. ३४ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांचेकडून आर्थिक वर्ष २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ करीता कामगार कल्याण मंडळ, प्रभादेवी यांनी निधी व सभासद वर्गणी मिळणेबाबत विचारविनिमय करणे.

मंडळ सचिव यांनी सादर केले की, कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांचेकडून राबवण्यात येणाऱ्या योजना व उपक्रमांचा लाभ बांधकाम कामगारांना देण्याबाबतचा ठराव दिनांक २४.०१.२०१९ व दिनांक १४.०३.२०१९ रोजीच्या बैठकीत पारीत करण्यात आला होता तसेच दिनांक ०४.०९.२०१९ व दिनांक ०४.०३.२०२१ रोजीच्या बैठकीतील पारीत ठरावानुसार १० लाख बांधकाम कामगारांपोटी रू. १११/- याप्रमाणे वर्गणी कामगार कल्याण मंडळाकडे जमा करण्यात आली होती. व संबंधित वर्षामध्ये बांधकाम कामगारांनी घेतलेल्या लाभाबाबतचा सविस्तर तपशिल मंडळास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार कामगार कल्याण मंडळाने लाभार्थ्यीबाबत सादर केलेला अहवाल खालीलप्रमाणे -

एप्रिल २०२१ ते मार्च २०२२

अ.क्र.	विभागाचे नाव	कार्यक्रम (आरोग्य तपासणी शिबीर, कोव्हीड प्रतिबंधक जनजागृती, व्यसनमुक्ती कार्यशाळा इ. कार्यक्रम मधील सहभाग कामगार/ का. कुटूंबिय संख्या)	उपक्रम (शिवणवर्ग ७५ व २५ टक्के तत्वावरील उपक्रम)	महाकल्याण कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम	योजना (दूर पल्याच्या सहली)	एकूण
१	नायगांव, मुंबई	१४६८२	००	००	००	१४६८२
२	अकोला	१५१८	११७	३४	००	१६६९
३	ठाणे	१००६८	००	००	००	१००६८
४	नागपूर	५८९८	१६९	६९	००	६१३६
५	नाशिक	३८८३	०२	१५७	००	४०४२
६	औरंगाबाद	६८६५	३४५	००	००	७२१०
७	पुणे	१३५४	००	६३	१४०	१५५७
८	कौशल्य विकास प्रशिक्षणाकरीता ऑनलाईन नोंदणी	००	००	७८२	००	७८२
	एकूण	**४४२६८**	**६३३**	**११०५**	**१४०**	**४६१४६**

पान क्र. ९२ पैकी १०१

२. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या दिनांक ०२.०२.२०२४ च्या पत्रान्वये सन २०२१-२२ वर्षाची रक्कम रू.११.१० कोटी, सन २०२२-२३ या वर्षाची रक्कम रू.११.१० कोटी व आर्थिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षाची रक्कम रू.११.१० कोटी अशी एकूण ३३.३० कोटी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास अदा करणेबाबत मंडळास कळविले होते त्यानुषंगाने याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात आला होता त्यावर शासनाने उपस्थित केलेल्या मुद्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे.

मंडळ मुख्यालयात सन २०१७-१८ ते २०२१-२२ या पाच वर्षाचे Performance Audit सुरू असून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास वर्ग करण्यात आलेल्या निधीबाबत मा. महालेखापाल यांनी लेखापरीक्षण अहवालात खालीलप्रमाणे आक्षेप उपस्थित केले आहेत.

१. As against a total of १० lakh workers for whom the fees/contributions were released in २०२०-२१ and २०२१-२२, only ६४७०४ workers had taken the benefit of the schemes/ programs. Please state why inflated number of registered beneficiaries were considered while forwarding the amounts of MLWB ?

२. Whether willingness of the registered workers to participate in the programs of the MLWB was obtained before releasing the amounts may be please stated.

३. The MBOCW itself implementing a number of on-going schemes from its own funds, the necessity of allowing schemes of MLWB for registered beneficiaries of the Board may please be justified to Audit.

४. Why the employer's contribution was paid to MLWB may please be stated. Whether the employers of registered establishments has denied to make their contribution for this scheme? Documentary evidence in this regard may please be shown to audit.

५. Documentary evidence of registered beneficiaries of MBOCW who had participated in the schemes/programs of the MLWB may please obtained from them giving their registration numbers and acknowledgment from them as having participated in the schemes. As only ६४७०४ members had participated in the schemes/ programs of MLWB, the remaining amount (१९३५२९६ X १११= २१.४८ crore) needs to be called back from MLWB

३. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांना वर्ग करण्यात आलेला निधीच्या अनुषंगाने लाभ वितरीत करण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण कमी असणे, मा. महालेखापाल यांच्या निरीक्षणात सदर निधीबाबत आक्षेप घेतल्यामुळे त्यांना निधी वर्ग करण्यात आलेला नाही तसेच मंडळाच्या दिनांक ०१.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२०२० व २०२०-२१ या दोन आर्थिक वर्षाचे अखर्चित निधीचा वर्षनिहाय अहवाल त्वरीत सादर करणेबाबत कळविले आहे. त्याबाबत अहवाल अद्यापी अप्राप्त आहे.

सविस्तर चर्चेअंती कामगार कल्याण मंडळाकडे यापुर्वी महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याण मंडळाने वर्ग केलेल्या एकुण निधीचा बांधकाम कामगारांसाठी लाभ दिलेल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावेत व अखर्चित रक्कम मंडळाकडे जमा करण्यात यावी. मा. महालेखापाल कार्यालयाने आक्षेपीत केलेल्या मुद्यांची पुर्तता करण्यात यावी तसेच निधीचा लाभ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार घेतील याबाबत कामगार कल्याण मंडळाने दक्षता घ्यावी व नोंदणीच्या तपशिलाआधारे वार्षिक रू. ५.०० कोटीच्या मर्यादेत अनुदान वर्ग करण्यास शासनास प्रस्ताव सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्र. ६० (३४)/२०२४ :-

मंडळाकडील निधीचा लाभ नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांनाच होण्यासाठी कामगार कल्याण मंडळाकडे नोंदीत असणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणीचा तपशिल मंडळाकडे सादर करण्यात यावा व नोंदणीच्या तपशिलाआधारे वार्षिक रू. ५.०० कोटीच्या मर्यादेत अनुदान वर्ग करण्यास शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.३५ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर आरोग्य तपासणी केंद्र व हॉस्पीटल उभारणी करणेबाबत.

मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मे. एचएससीसी (इंडिया) लि. या मिनी रत्न (भारत सरकार) संस्थेकडून मंडळास प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. एचएससीसी ISO : ९००१ :२०१५ प्रमाणित संस्था आहे. तसेच आरोग्य क्षेत्रातील नियोजन, पायाभूत सुविधा उभारणी इत्यादी कार्यक्षेत्रात कार्यरत आहे.मंडळामार्फत बांधकाम कामगारांची वार्षिक आरोग्य तपासणी एचएलएल या केंद्र पुरस्कृत उपक्रमाच्या मार्फत करण्यात येत आहे. त्यामध्ये २३ चाचण्याचा समावेश आहे. तथापि रोगाच्या / निदानाच्या आवश्यकतेनुसार हॉस्पिटलमध्ये जाण्यास होणारी टाळाटाळ, कामाचे स्वरुप , आर्थिक क्षमता याबाबी लक्षात घेता बांधकाम कामगारांच्या सर्व समावेशक उपचाराकरीता " चाचणी, निदान, उपचार, सुधार " ही संपूर्ण प्रणाली एकछत्री पध्दतीने राबविणे आवश्यक असल्याने सद्यस्थितीत मंडळामार्फत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी आरोग्य तपासणी ते उपचार योजना राबवण्यात येत आहे. त्यामध्ये बांधकाम कामगार यथास्थिती पती/ पत्नी व १० वर्षावरील २ अपत्य यांचा समावेश आहे. सदर योजनेमध्ये आरोग्य तपासणी, औषधोपचार , प्रगतपृष्ठीकरण चाचणी (Confirmatory Test) रुग्णालय भरती यांचा समावेश आहे. नोंदीत सक्रीय बांधकाम कामगाराच्या आरोग्य तपासणी अंती अहवाल असामान्य आल्यास व आवश्यकता असल्यास मे.एचएलएल यांचेमार्फत मंडळ मान्यतेने सुचीबदध् केलेल्या हॉस्पिटलमध्ये लाभार्थ्याच्या सहमतीने लाभार्थास भरती करण्यात येते. उपचारावर झालेल्या खर्चाच्या रु.२ लक्षच्या मर्यादेमध्ये रुग्णालयास नियुक्त संस्थेकडून अदायगी करण्यात येवून सदर रक्कमेची प्रतीपुर्ती मंडळाकडून जिल्हा व विभागीय कार्यालयाच्या शिफारसी अंती नियुक्त संस्थेस करण्यात येते. तपासणी ते उपचार योजनेचा कालावधी ५वर्ष (दिनांक ०८.०१.२०२९ पर्यत) आहे.

उपरोक्त कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर बांधकाम कामगारांच्या आरोग्य सुविधेकरीता मंडळाची स्वत:ची पायाभूत सुविधा निर्माण व्हावी. या करीता मे.एचएससीसी (इंडिया) लि. या संस्थेने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

१. असंसर्गजन्य रोगांच्याबाबतीत सार्वजनिक/ खाजगी भागीदारीबाबत निती आयोगाच्या मार्गदर्शक तत्वातील अनु.क्र.५C मध्ये जर इमारतीचे बांधकाम, वित्तीयबाबी, चालन व व्यवस्थापन कराराच्या कालावधीत नियुक्त संस्थेमार्फत करण्यात येणार असल्यास सदर कराराचा कालावधी ३०+ वर्ष राहिल असे नमुद असल्याने मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत हॉस्पिटल व व्यवसायीक

आरोग्य केंद्र यांची उभारणी, चालन, व्यवस्थापन व हस्तांतरण (BOMT) या तत्वावर ३० वर्षाच्या कालावधीकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर कालावधी दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९ असा राहिल. (प्रत संलग्न) मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत हॉस्पिटल व आरोग्य केंद्रांचे निर्माण कार्य करण्यात येणार असल्याने व त्याकरीता काही कालावधी लागणार असल्याने दिनांक ०८.०१.२०२९ पर्यंत मे.एचएससीसी (इंडिया) लि. हि संस्था मे.एचएलएल लि. यांचेसह संयुक्तपणे तपासणी ते उपचार योजना राबविल व तद्नंतर दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९ या कालावधीत तपासणी ते उपचार योजना केवळ मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राबविण्यात येईल.

२. तपासणी ते उपचार या योजनेच्या अंमलबजावणीकरीता मे.एचएलएल लि. या संस्थेस विहीत केलेला कालावधी संपुष्टात येईपर्यंत संयुक्तपणे मे.एचएससीसी (इंडिया) लि. व एचएलएल तपासणी ते उपचार योजनेची अंमलबजावणी करतील. तद्नंतर म्हणजे दिनांक ९.१.२०२९ पासून दिनांक ८.१.२०५९ पर्यंत मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत अंमजबजावणी करण्यात येईल.

३. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राज्यातील जिल्हयात एकूण ३४ हॉस्पिटलचे निर्माण कार्य करण्यात येईल त्यापैकी २८ हॉस्पिटलमध्ये ५०+ बेडची व्यवस्था असेल, उर्वरित ५ हॉस्पिटल हे ७५+ बेडचे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल असेल व १ एक हॉस्पिटल हे १००+ बेडचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असेल. त्यामध्ये असंघटित कामगार व नोंदित बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबियांवर विद्यमान आजार व व्यवसायामुळे उदभवनारे आजार यावर उपचार करण्यात येतील. तथापि केवळ नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता तपासणी ते उपचार योजने अंतर्गत उपचाराची प्रतीपुर्ती मंडळामार्फत करण्यात येईल व असंघटित कामगारांकरीता उपचार प्रतीपुर्ती केंद्र / राज्य शासनाच्या आरोग्य योजनेनुसार करुन घेण्याची जबाबदारी मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांची असेल. नोंदीत बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबिय वगळता इतर कामगारांच्या उपचारापोटी रक्कमेची प्रतीपुर्ती मंडळ करणार नाही. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत उभारण्यात येणाऱ्या हॉस्पिटलमध्ये निकडीच्या प्रसंगी सामान्य नागरीकांवर देखिल उपचार केले जातील. (सुचीबध्द करावयाच्या हॉस्पिटलच्या संख्येचा तक्ता सोबत संलग्न)

४. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राज्यात २८ दुय्यम दर्जाची प्रत्येकी ५०+ बेडची क्षमता असलेली हॉस्पिटल, ५ मल्टीस्पेशालिटी प्रत्येकी ७५+ बेडची क्षमता असलेली हॉस्पिटल व १००+ बेडची क्षमता असलेले १ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल स्थापन करण्यात येईल म्हणजेच एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत

एकूण १८७५+ बेडची क्षमता असलेले ३४ हॉस्पिटल तपासणी ते उपचार या योजनेच्या अंमलबजावणीकरीता स्थापन करण्यात येईल.

५. मे.एचएससीसी (इंडिया) लि. मंडळास ३० वर्ष कराराचा कालावधी संपुष्टात आल्यावर उपरोक्त नमुद केले नुसार १८७५+ बेडची क्षमता असलेले ३४ हॉस्पिटल व ३६ व्यवसायीक आरोग्य केंद्र तेथील साधन सामग्रीसह मंडळास सुर्पुद करेल. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत हॉस्पिटल व आरोग्य केंद्रांचे निर्माण कार्य करण्यात येणार असल्याने व त्याकरीता काही कालावधी लागणार असल्याने दिनांक ०८.०१.२०२९ पर्यंत मे.एचएससीसी (इंडिया) लि. हि संस्था मे.एचएलएल लि. यांचेसह संयुक्तपणे तपासणी ते उपचार योजना राबविल.

६. मंडळ मे.एचएससीसी (इंडिया) लि. संस्थेसोबत शासनाची मान्यता मिळाल्यापासून दिनांक ०८.०१.२०५९ या कालावधीकरीता करारनामा करेल व तद्नंतर उभयपक्षांच्या सहमतीने सदर करार पुढील ३० वर्षांसाठी वाढविण्यात येईल. दिनांक ०९.०१.२०२९ ते दिनांक ०८.०१.२०५९ या कालावधीत सदर योजनेच्या (तपासणी ते उपचार) अंमलबजावणीचे संपूर्ण अधिकार केवळ मे. एचएससीसी (इंडिया) लि. यांचेकडे राहतील.

७. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये व्यावसायिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यात येतील. सदर केंद्र संस्थेमार्फत स्थापन करण्यात येणाऱ्या केंद्रामध्ये विविध हदय, फुफुस, किडणी इत्यादी आजाराचे निदानासाठी आवश्यक नविनतम साधन सामग्री व तंत्रज्ञानासह सज्ज असतील व तेथे डॉक्टर व पॅरामॅडीक कर्मचारी उपलब्ध असतील. बांधकाम कामगारांच्या आरोग्य तपासणी घरोघरी,बांधकामाच्या ठिकाणी आयोजित शिबीर, वैद्यकीय शिबीर तसेच थेट व्यवसायिक आरोग्य केंद्रामध्ये देखील करण्यात येईल. सदर केंद्र रोगनियमन कार्यक्रमामध्ये आरोग्य योजना राबविण्यासाठी देखील काम करेल. सदर आरोग्य केंद्राकरीता १ व्यावसायिक आरोग्य व्यवस्थापनाबाबतचा अनुभव असलेला डॉक्टर नियुक्त करण्यात येईल. याचप्रमाणे विभागाकरीता व राज्याकरीता देखील व्यावसायिक आरोग्य केंद्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

८. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत उपरोक्त नमुद केल्यानुसार हॉस्पिटल बांधण्याकरीता जागेची निवड करण्यात येईल. NABH नियमानुसार सदर हॉस्पिटलच्या बांधकामाचा खर्च,साधन सामग्री व साहयभुत सामुग्री, डॉक्टर पॅरामॅडीक व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीचा खर्च व हॉस्पिटलच्या चालनाचा खर्च एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत करण्यात येईल. मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत मंडळाकरीता बांधण्यात आलेल्या जिल्हयाच्या स्तरावरील हॉस्पिटलमध्ये General Medicine, General Surgery, Orthopedic, Gynecology, Pediatric, ENT, Ophthalmology,

Diabetology, Cardiology, Nephrology, Gastroenterology, Pathology, Radiology यांचा समावेश असेल.

९. विभागीय स्तरावरील मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत मंडळाकरीता बांधण्यात आलेल्या हॉस्पिटलमध्ये उपरोक्त नमुद विभागांव्यतिरिक्त Pulmonology, Intervention Cardiology, Cardiovascular Surgery, Uro Surgery, Neurology, Hematology, Medical Oncology, Onco surgery, Transfusion Medicine यांचा समावेश असेल व राज्यस्तरावरील हॉस्पिटलमध्ये उपरोक्त सर्व विभागांव्यतिरिक्त Respiratory Medicine, Nuclear Medicine यांचा समावेश असेल.

१०.राज्यस्तरावरील मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत मंडळाकरीता बांधण्यात आलेल्या हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची समिती असेल जी कामगार व त्यांचे कुटुंबियांवर करावयाचे उपचार, आरोग्य धोरण व उपचारास मंजुरी प्रदान करेल. सदर समितीमध्ये ५ विभागीय स्तरावरील हॉस्पिटलच्या वैद्यकीय अधिक्षकांचा समावेश असेल व त्यांचे अध्यक्ष पद राज्यस्तरावरील हॉस्पिटलच्या अधीक्षकांकडे असेल. सदर संस्थेमार्फत नोंदित बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरीता तपासणी ते उपचार योजनेच्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार CGHS च्या दरानुसार उपचार करण्यात येतील. प्रगत पृष्टीकरण चाचणी व वेद्यकीय उपचार देखील CGHS च्या दरानुसार करण्यात येतील व औषधोपचाराचे दर जनऔषधीच्या दरानुसार राहतील. तसेच सदर योजनेचा लाभ सद्यस्थितीतील तपासणी ते उपचार योजनेमध्ये ज्याप्रमाणे नोंदीत सक्रीय बांधकाम कामगार (यथास्थिती पती / पत्नी) व १० वर्षावरील २ अपत्यांना लागू राहिल तसेच नोंदीत सक्रीय बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन १० वर्षाखालील अपत्यांना अपघात व आजारपणाकरीता रुग्णालयभरती व औषधोपचारास योजनेचा लाभ अनुज्ञेय राहिल. प्राथमिक आरोग्य तपासणी चाचणी अनुज्ञेय राहणार नाही. दिनांक ०७.०८.२०२३ व दिनांक ०९.०१.२०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमुद अटीशर्ती मे. एचएससीसी (इंडिया) लि. यांना लागू राहतील.

११.मे.एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत उभारण्यात येणारे हॉस्पिटल उभारताना सर्व नियमांचे पालन करण्यात येईल. तसेच संगणक प्रणाली, मोबाईल ॲपलिकेशन, HMIS व डॅशबोर्ड तयार करण्यात येईल व त्याचा खर्च संस्थेमार्फत करण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे मे. एचएससीसी (इंडिया) लि. यांचेमार्फत प्रस्ताव मंडळास सादर करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत मे.एचएलएल लि. यांचेमार्फत तपासणी ते उपचार योजनेकरीता प्रत्येक जिल्हयात ३ हॉस्पिटल सुचीबदध् करण्यात आले आहेत / येत आहेत. सदर हॉस्पिटल खाजगी असून मंडळामार्फत मे. एचएलएल लि. यांना तपासणी ते उपचार

आरोग्य योजनेच्या शासन निर्णयात नमुद केल्यानुसार CGHS दराप्रमाणे देयक अदा करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्हयाची लोकसंख्या व खाजगी हॉस्पिटलमधील रुग्णांचे प्रमाण पाहता बांधकाम कामगार / त्यांचे कुटुंबिय यांना वेळेवर बेड उपलब्ध न होण्याची शक्यता असू शकते. त्यामुळे केवळ बांधकाम कामगारांकरीता सर्मपित रुग्णालय अधिक उपयुक्त राहिल याशिवाय सदर प्रस्तावात नमुद केल्यानुसार ३० वर्षाच्या कालावधीनंतर सदर हॉस्पिटल व संबंधित साधन सामग्री यावर मंडळाचा अधिकार राहणार असल्याचे व आवश्यक असल्यास कराराचा कालावधी पुढील ३० वर्षाकरीता वाढवण्याची तरतुद नमुद आहे.

ठराव क्र. ६० (३५)/२०२४ :-

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर तपासणी ते उपचार योजना राबविण्याबाबत मे. एचएससीसी (इंडिया) लि. यांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

विषय क्र.३६ :- मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळेचे विषय

विषय क्र. ०१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तु संच पुरविण्याच्या लक्षांकात वाढ करणे.

मंडळ सचिवांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कामाचे स्थलांतरीत स्वरूप पाहता कामाच्या ठिकाणी त्यांना निवारा व भोजनाच्या मूलभूत सोयी सुविधांकरीता अडचणी येतात त्यामुळे त्यांना दैनंदिन भोजन तयार करण्यास सहायय व्हावे म्हणून मंडळामार्फत नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांकरीता शासन मान्यतेने माहे जानेवारी २०२४ पासून गृहपयोगी वस्तू संच योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना संपूर्ण आयुष्य कालावधीमध्ये एका कुटूंबास एकच गृहपयोगी वस्तू संच वितरीत करण्यात येतो. सद्यस्थितीत मंडळाच्या वतीने गट क्र. ०१ नागपूर व छत्रपती संभाजीनगर विभागाकरीता व गट क्र. ०२ मुंबई, पुणे, नाशिक व अमरावती विभागाकरीता १०.०० लक्ष नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता संच पुरविण्याबाबत पुरवठा आदेश देण्यात आला आहे.

तथापि, मंडळाकडे १६,१३,५६१ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रीय आहे. त्यामुळे सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने व करारनाम्यातील अटीनुसार आवश्यकतेप्रमाणे अतिरीक्त ६,१३,५६१ लक्ष गृहपयोगी संच पुरवठा करण्यासाठी सर्वानुमते मंडळाच्या मान्यतेने शासनास प्रस्ताव सादर करण्याचे ठरले सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव क्र. ६० (३६) (१)/२०२४ :-

मंडळाकडे सद्यस्थितीत १६,१३,५६१ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रीय असल्याने सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने व करारनाम्यातील अटीनुसार आवश्यकतेप्रमाणे अतिरीक्त ६,१३,५६१ लक्ष गृहपयोगी संच पुरवठा करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

पान क्र. १०० पैकी १०१

विषय क्र. ०२) नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यांना नामांकित शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळणाऱ्या पालकांस अर्थसहाय्य मंजुर करणेबाबत.

मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता शैक्षणिक सहाय्य योजना, आरोग्य विषयक योजना, आर्थिक सहाय्य योजना व सामाजिक सुरक्षा योजना अशा विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

२. आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये शिकत असलेल्या पाल्यांकरीता वसतीगृह व अभ्यास साहित्याकरीता अर्थससहाय्याचा समावेश आहे सबब सदर विभागाच्या धर्तीवर नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेत असलेल्या पाल्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्याचा प्रस्ताव मंडळाच्या विचाराधिन होता.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे सर्वानुमते ठराव पारीत करण्यात आला.

ठराव क्र. ६० (३६) (२)/२०२४ :-

आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या धर्तीवर नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगारांच्या नामांकित शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असलेल्या पाल्यांना अर्थसहाय्य वितरीत करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

2025-26

माहिती

Record. - GR file.

आय. ए. कुंदन, भा.प्र.से.
प्रधान सचिव (कामगार)

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी : ०२२-२२०२ ७४३३ / २२८२ २१०५
ई-मेल : sec.labour@maharashtra.gov.in

दिनांक : १० मार्च,२०२५

अ.शा. पत्र क्र. इबांका-०३२५/प्र.क्र.२८/कामगार-७

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची "कामगार उपकर संकलन प्रणाली (Labour Cess Collection Portal)" कार्यान्वित करणेबाबत.

श्री. अरिबम आर. शर्मा,

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे.बांधकाम कामगारांकरीता कल्याणकारी योजना राबविण्याकरीता मंडळास निधीची आवश्यकता लागेल ही बाब विचारात घेवून, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ लागू केला आहे.सदर अधिनियमातील कलम (३) (१) अन्वये दिनांक २६ सप्टेंबर, १९९६ रोजी अधिसूचना जारी केली असून, त्यानुसार इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील प्रत्येक बांधकाम मुल्याच्या (जमिन मूल्य वगळून) १% उपकर हा मंडळाकडे जमा करावयाचा आहे.

२. इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ मधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना दिनांक ०४ ऑगस्ट,२००७ रोजी करण्यात आलेली आहे.शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल,२००८ अन्वये राज्यात दिनांक ०१ जानेवारी, २००८ पासून उपकर वसूल करून मंडळाकडे जमा करण्याच्या सूचना सर्व विभागांना देण्यात आल्या आहेत.

३. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम (८) अन्वये,मंडळाकडे उपकर जमा न केल्यास दरमहा २% व्याज जमा करावे लागते.तसेच चुकवलेल्या उपकराच्या मर्यादेमध्ये दंड भरण्याची तरतूद सदर कायद्याच्या कलम (९) मध्ये आहे.सदर चुकविलेला उपकर, व्याज व दंड हा जमिन

महसूल ग्रहीत धरून वसूल करण्याचीही तरतूद कायद्याच्या कलम (१०) मध्ये आहे.सदर कायद्याखाली उपकर जमा करणे तसेच, सदर वसूलीबाबत बांधिल असलेल्यांनी चुकीचा माहीती सादर केल्यास कायद्याच्या कलम (१२) अंतर्गत सहा महिन्यापर्यंत कारावास अथवा एक हजारापर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षेस पात्र राहील अशी तरतूद आहे.

४. सदरचा उपकर वसूल केल्यानंतर मंडळाच्या बँक खात्यावर भरण्याची कार्यवाही ही विविध यंत्रणांकडून सुरू आहे.त्याकरीता कामगार विभाग व मंडळामार्फत वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.सदरची प्रक्रिया ही पुर्णत: असंगणकीय स्वरूपाची (Manual Procedure) असल्याने,संकलित होणा-या उपकराचे प्रभावी संनियंत्रण व समायोजन होत नव्हते.

५. सदरची बाब विचाराच घेवून, मंडळामार्फत **"कामगार उपकर संकलन प्रणाली (Labour Cess Collection Portal)"** विकसित करण्यात आली आहे.सदर प्रणालीवर प्रत्येक यंत्रणेने नोंदणी करणे (On Board) आवश्यक आहे.याकरीता पुर्णवेळ स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला असून, संपर्काकरीता मो.क्र. (+९१) ९६५३१९८४६५ व ई-मेल cessbocw@gmail.com हा आहे. आपल्या नियंत्रणाखालील यंत्रणेस सदर प्रणालीवर नोंदणी होण्याच्या सूचना आपल्यास्तरावरून देणें आवश्यक आहे.सदरच्या प्रणाली हाताळण्याचे प्रशिक्षण व पुर्णवेळ सहकार्य कक्षामार्फत करण्यात येईल.

६. सदर प्रणालीचे अनावरण मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्याचे प्रस्तावित असल्याने,आपल्या अधिनस्त कामगार उपकर वसूल करीत असलेल्या यंत्रणेस सदरच्या प्रणालीवर तातडीने नोंदणीकृत होण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

आपली स्नेहांकीत,

(आय.ए.कुंदन)

प्रति,

.श्री. अरिबम आर. शर्मा,भा.प्र.से.
आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

शासन निर्णय क्रमांक:- इबांका-०३२५/प्र.क्र.४५/कामगार - ७

मंत्रालय मुंबई - ४०० ०३२

दिनांक: २८ मार्च, २०२५.

संदर्भ:-

१. केंद्रिय श्रम व रोजगार मंत्रालयाचे पत्र क्रमांक झेड-२००१२/०९/२०१८-बी.एल., दिनांक २५ सप्टेंबर,२०१८.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांची बैठक क्र. ६२, दिनांक २६ मार्च, २०२५ मधील ठराव क्र.०२

३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्रमांक ६९५/२०२५/पेन्शन-२०२५/प्र.क्र.१०७/योजना-०६, दिनांक २७ मार्च,२०२५.

प्रस्तावना : -

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ अस्तित्वात आले आहेत. सदर नियमांच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

वयाची १८ वर्षे पुर्ण झालेल्या ते वयाच्या ६० वर्षापर्यंतच्या बांधकाम कामगाराने मागील एक वर्षात किमान ९० दिवस काम केले असल्यास, मंडळाकडे नोंदित करून घेतले जाते व त्याच्या नोंदणीचे दरवर्षी त्यास नुतनीकरण करावे लागते. संबधित बांधकाम कामगारास त्याच्या सक्रिय (जिवीत) नोंदणी कालावधीत मंडळाच्या विविध योजनेचे लाभ देण्यात येतात.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम (२२) (ब) मध्ये वयाची ६० वर्षे पुर्ण झालेल्या बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन देण्याची तरतूद आहे. याबाबत केंद्र शासनाने संदर्भाधीन क्र. १ अन्वये आदर्श कल्याणकारी योजनांची मार्गदर्शक तत्वे विषद केली आहेत. त्याअनुषंगाने मंडळाच्या दिनांक २६.०३.२०२५ रोजीच्या ६२ व्या बैठकीत मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन लागू करण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आला असून याबाबत

मा.मंत्री (कामगार) यांनी महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पियअधिवेशनामध्ये विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमध्ये प्रस्तुत प्रकरणासंदर्भातील निवेदन सादर केले आहे. त्यानुषंगाने मंडळाने त्यांच्या संदर्भाधीन क्र. ०३ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

वयाची ६० वर्षे पुर्ण झाल्यानंतर बांधकाम कामगाराची मंडळाकडे नोंदणी होत नाही व त्याच्या पुर्वीच्या नोंदणीचे नुतणीकरणही होत नाही. त्यामुळे मंडळाकडून मिळणाऱ्या विविध योजनांपासून कामगार वंचित राहतो. अशावेळी त्यांच्या वृद्धापकाळात त्यांचे जीवन सुखकर होण्याकरीता हातभार लावण्याच्या दृष्टीने, बांधकाम कामगांराना निवृत्तीवेतन लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदित बांधकाम कामगारांनी त्यांच्या वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना निवृत्तीवेतन लागू करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. पात्रतेचे निकष :-

(अ) वयाची ६० वर्षे पुर्ण केलेली व मंडळाकडे नोंदित असलेले सर्व बांधकाम कामगार सदर योजनेअंतर्गत पात्र राहतील. तसेच त्याच्या कुटुंबातील पती व पत्नी दोघेही बांधकाम कामगार असतील तर ते स्वतंत्रपणे पात्र राहतील.

(ब) पती/पत्नी च्या मृत्यूनंतर संबधित बांधकाम कामगाराचे पती/पत्नी निवृत्तीवेतनाकरिता पात्र राहतील. तथापि, पती/पत्नी सदर योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळत असेल तर संबधितास दुबार निवृत्तीवेतनाचा लाभ मिळणार नाही.

(क) केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील आदर्श कल्याणकारी योजनांच्या मार्गदर्शक तत्वानुसार, कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ (Employees State Insurance Act, १९४८) व कर्मचा-यांचे प्रदाता निधी आणि विविध तरतूदी कायदा, १९५२ (The Employees Provident Fund and Miscellaneous Provision Act, १९५२) अंतर्गत लाभ प्राप्त करणारे बांधकाम कामगार निवृत्तीवेतनास पात्र राहणार नाहीत.

३. वित्तीय निकष :-

(अ) पात्र बांधकाम कामगारांना त्यांच्या मंडळाकडील नोंदणीच्या कालावधीनुसार निवृत्तीवेतन अदा करण्यात येईल.

(ब) मंडळाकडे नोंदणी असलेल्या वर्षानुसार निवृत्तीवेतनाचे प्रमाण खालीलप्रमाणे राहील :-

अ.क्र.	मंडळाकडे नोंदणीची एकूण वर्षे	दरवर्षी मिळणारे निवृत्तीवेतन
१	१० वर्षे	५०% (रू.६,०००/-)

२	१५ वर्षे	७५%(रू.९,०००/-)
३	२० वर्षे	१००% (रू.१२,०००/-)

(क) सदर योजनेअंतर्गत होणारा खर्च मंडळाकडे जमा होणा-या कामगार उपकरामधून भागविण्यात येईल.

(ड) मंडळाकडे जमा होणा-या कामगार उपकराचा आढावा घेवून, सदर निवृत्तीवेतनामध्ये कमी अथवा वाढ करणे, अटी व शर्तींमध्ये बदल करणे याबाबत निर्णय मंडळ मान्यतेअंती शासन स्तरावर घेण्यात येईल.

४. निवृत्तीवेतनाकरिता मंजूर करण्याची कार्यपद्धती :-

(अ) सदर योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या बांधकाम कामगाराने https://mahabocw.in/ या संकेतस्थळावरील अर्ज विनामूल्य प्राप्त (Download) करून घ्यावा. (अर्जाचा नमूना "प्रपत्र-अ" प्रमाणे)

(ब) सदरचा अर्ज पूर्णपणे भरून बांधकाम कामगाराने त्याचे आधार कार्ड ज्या जिल्ह्यामधील आहे त्या जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राचे प्रभारी (कामगार उपायुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी) यांच्याकडे जमा करावा.

(क) संबधित प्रभारी, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र यांनी सदर अर्जाची छानणी करून **"निवृत्तीवेतन शिफारस प्रमाणपत्र"** (प्रपत्र-ब) सह प्रस्ताव मंडळ मान्यतेस सादर करावा. एकापेक्षा जास्त जिल्ह्यामध्ये नोंदणी/नुतनीकरणाचा कालावधी असल्यास संबधित जिह्यामधून **"वर्षनिहाय नोंदणी प्रमाणपत्र"** (प्रपत्र-क) संबधित प्रभारी, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र यांनी प्राप्त करून घ्यावे.

(ड) मंडळ स्तरावर सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेअंती संबधित बांधकाम कामगारास **"निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र"** देण्यात येईल. (प्रपत्र-ड)

(इ) निवृत्तीवेतन क्रमांक प्रमाणपत्र दिल्याचा दिनांक हा संबधित बांधकाम कामगाराचा निवृत्तीवेतन दिनांक समजण्यात येईल व त्यानुसार वर्ष गणना करण्यात येईल.

(ई) दरवर्षी बांधकाम कामगारास त्याच्या हयातीचा पुरावा मंडळाकडे सादर करावा लागेल जेणेकरून, त्या वर्षीचे निवृत्तीवेतन त्याच्या खात्यात जमा करता येईल.

(क) बांधकाम कामगारास त्याचे बँक खाते बदलावयाचे असल्यास तसा अर्ज त्यास प्रभारी, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(ख) बांधकाम कामगाराचा मृत्यू झाल्यास, त्याचा/तीचा वारसदार पती/पत्नीने वारस नोंदीचा अर्ज प्रभारी, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामार्फत मंडळास करावा लागेल.

(ग) सदर निवृत्तीवेतन क्रमांकाची नोंद एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) या प्रणालीवर घेण्यात येईल व संबधित बांधकाम कामगाराच्या खात्यावर निवृत्तीवेतन जमा करण्यात येईल.

(घ) सदर योजनेबाबत आवश्यकतेनुसार सविस्तर कार्यपद्धती निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

५. सदरची योजना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई मार्फत राबविण्यात येईल. त्याचप्रमाणे सदर योजना राबविण्याबाबतचा कोणताही आर्थिक भार शासनावर राहणार नाही. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर योजना अंमलबजावणीबाबत आवश्यक ती उचित कार्यवाही मंडळ स्तरावरुन करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३२८१९२३१४४७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=856b31c793b12e4f22cb247c5cff7f3358867f2482aa2234f6131bf8940dbd2e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB0650282E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2025.03.28 19:24:22 +05'30'

(दिपक पोकळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा , विधानमंडळ, मुंबई.
४. सर्व विधीमंडळ सदस्य
५. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव, मुंबई.
११. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१२. कामगार आयुक्त , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रलय, मुंबई.
१४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्लॉट क्र. सी २२, ब्लॉक - ई,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.

संकेत स्थळ : www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्स क्र. : 022-2657 2631
ई-मेल : bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र./253/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२ दिनांक :- 05 FEB 2025

प्रति,

१. अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त
कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/ नाशिक, छ.संभाजीनगर

२. कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार अधिकारी, जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)

विषय:- एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर प्राप्त होणा-या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीवर सर्वकष सूचना देणेबाबत.

संदर्भ:- १. मंडळाचा पुरवठा आदेश पत्र क्रमांक मइवइबाकमं/IWBMS/४५४/२०१९, दिनांक ०८ मार्च,२०१९.

२. मंडळाचे पत्र क्रमांक इवइबाकाकमं/IWBMS/२१७०/२०१९,दिनांक २८ नोव्हेंबर,२०१९.

३. मंडळाचे पत्र क्रमांक इवइबाकाकमं/IWBMS/२३८५/२०२०,दिनांक ०२ जानेवारी,२०२०.

४. मंडळाचे पत्र क्रमांक इवइबाकाकमं/कार्यपद्धती/८४१/२०२०,दिनांक २३ जुलै,२०२०.

५. मंडळाचे पत्र क्रमांक क.यो/२०२२/प्र.क्र.७/संकिर्ण-२,दिनांक १२ एप्रिल,२०२२.

६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रमांक इबांका-११२२/प्र.क्र.१८९/काम ७, दिनांक ०९ नोव्हेंबर,२०२२.

७. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रमांक इबांका-०४२३/प्र.क्र.५८/कामगार-७, दिनांक १२ सप्टेंबर,२०२३.

८. मंडळाचे पत्र क्रमांक १८८५/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०२, दिनांक २० आक्टोंबर,२०२३.

९. मंडळाचे पत्र क्रमांक १९९४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०२, दिनांक ०३ नोव्हेंबर,२०२३.

१०. मंडळाचे पत्र क्रमांक २११४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०२, दिनांक २२ नोव्हेंबर,२०२३.

११. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाची अधिसूचना क्रमांक:-इबांका-०५२३/प्र.क्र.७६/कामगार-७, दिनांक ३० नोव्हेंबर,२०२३.

१२. मंडळाचे कार्यारंभ आदेश क्रमांक ३०२९/२०२४/कासुकें-२०२३/प्र.क्र.०१/योजना-०१, दिनांक १५ मार्च,२०२४.

१३. मंडळाचे पत्र क्रमांक १३५०/२०२४/प्रशास-२०२४/प्र.क्र.५०/आस्थापना-०१, दिनांक १७ आक्टोंबर,२०२४.

१४. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२४

१५. मंडळाचे आदेश क्रमांक १४६३/२०२४/न्याप्र-२०२४/प्र.क्र.६१७/समन्वय-१, दिनांक ०८ नोव्हेंबर,२०२४

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमामधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणा-या कामगारांची नोंदणी / नुतनीकरण मंडळाअंतर्गत करण्यात येत असून, त्यांना विविध योजनेंचे लाभ वितरीत करण्यात येतात.याकरीता संदर्भाधीन क्र. (०१) ते (०५) अन्वये एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) विकसित करण्यात आली आहे.सदर प्रणालीकरीता https://mahabocw.in/ हे संकेतस्थळ निर्माण करण्यात आले आहे.

३. सदर प्रणालीद्वारे राबविण्यात येणा-या नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप प्रक्रियेमध्ये कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर काही ठराविक अर्ज शोधून (Search)

त्यावर कार्यवाही करणे, एकाच मोबाईल नंबरवर (Master Mobile OTP) अनेक अर्जाच्या नोंदी होणे,Filter ची सुविधा वापरून ठराविक योजनांच्या अर्जावर कार्यवाही करणे अशा प्रकारच्या बाबी घडत होत्या. बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतनीकरणातील तांत्रिक अडचणी कमी करून नोंदणी व नुतनीकरणामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.वास्तविकत: बांधकाम कामगारांचे प्राप्त होणारे अर्ज हे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय संगणकीय प्रणालीद्वारे प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) निकाली काढणे आवश्यक आहे.या सर्व बाबींचा विचार करून, शासनाच्या संदर्भीय क्र. (०६) येथील पत्रामधील निर्देश विचारात घेवून, सविस्तर सूचना देण्यात आल्या होत्या.तसेच, संदर्भीय क्र. (०७) ते (१०) अन्वये वेळोवेळी आवश्यकतेनुसार सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

४. केंद्र शासनांच्या इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार संदर्भाधीन क्र. (११) अन्वये राज्य शासनाने विविध योजना अधिसूचित केल्या आहेत.सदर अधिसूचनेतील नियम क्र.(३) (ब) मध्ये तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र निर्माण करण्याची तरतूद आहे.

५. मागील दोन वर्षाच्या कालावधीमध्ये बांधकाम कामगारांच्या नोंदणीचे प्रमाण वाढत चालले असून, जिल्हास्तरावर निर्माण केलेली कार्यालय व मनुष्यबळ अपुरे पडू लागले होते.बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप प्रक्रियेमध्ये अधिकची पारदर्शकता व सुलभता आणण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्र. (१२) अन्वये प्रत्येक तालुकाच्या ठीकाणी तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र निर्माण करण्यात आली आहेत.

६. दरम्यान,महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ च्या आदर्श आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर संदर्भाधीन क्र. (१३) अन्वये, बांधकाम कामगारांच्या नोंदणी / नुतनीकरण / लाभ वाटप बाबतची एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) बंद ठेवण्यात आली होती.यासंदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल याचिका क्र. ३३५९७/२०२४ मध्ये सदरची ऑनलाईन प्रणाली सुरू करण्याचे निर्देश संदर्भाधीन क्र. (१४) अन्वये मा.न्यायालयाने दिले होते. त्या अनुषंगाने, संदर्भाधीन क्र. (१५) अन्वये सदरची ऑनलाईन प्रणाली सुरू करण्यात आली होती.दिनांक ०८ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ०३ फेब्रुवारी,२०२५ अखेर सदर प्रणालीमार्फत १,४८,०६०नोंदणी,१,०५,८३६

नुतनीकरण व २,५८,६८५ लाभ वाटप असे एकूण ५,१२,५८१ अर्ज ऑनलाईन पद्धतीने हाताळण्यात आले आहेत.

७. बांधकाम कामगारांसाठी निर्माण करण्यात आलेली एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) ही ऑनलाईन असून, जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र व तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता निर्माण करण्यात आली आहे.योग्य बांधकाम कामगारांची नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप करण्याकरीता सदरच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये अधिकची सुलभता, सुसत्रता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सुधारीत सूचना देण्यात येत आहेत :-

८. **<u>नोंदणी व नुतणीकरणासाठी अर्ज सादर करणे</u>**

(अ) बांधकाम कामगार ऑनलाईन पद्धतीने https://mahabocw.in/ या संकेतस्थळावर नोंदणी / नुतनीकरण करीता अर्ज सादर करतील.

(ब) अर्ज सादर करतेवेळी आधार कार्ड व ज्यादिवशी अर्ज सादर केला आहे त्या दिनांकापासून मागील एक वर्षात ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केले असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील. **<u>प्रपत्र - अ</u>** नुसार नोंदणीकरीता आवश्यक कागदपत्रे राहतील.

(क) नोंदणीकरीता ९० दिवसाचे प्रमाणपत्र हे खाजगी बांधकाम व्यावसायिकाचे प्रमांणपत्र /शासकीय प्राधिकरणाचे प्रमाणपत्र / नाका कामगार पुस्तिका ग्राह्य धरण्यात यावी.

(ड) ज्या दिनांकास नोंदणी मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून नोंदणीचा कालावधी एक वर्षापर्यंत राहील.

(इ) बांधकाम कामगाराची नोंदणी मुदत संपण्यापुर्वी एक महिना अगोदरपासून ऑनलाईन पद्धतीने https://mahabocw.in/ या संकेतस्थळावर नुतनीकरणाकरीता अर्ज सादर करू शकेल.

(ई) नुतनीकरणाकरीता अर्ज सादर करतेवेळी ज्यादिवशी अर्ज सादर केला आहे त्या दिनांकापासून मागील एक वर्षात ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केले असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील. **<u>प्रपत्र - ब</u>** नुसार नुतनीकरणाकरीता आवश्यक कागदपत्रे राहतील.

(च) नुतनीकरणाकरीता ९० दिवसाचे प्रमाणपत्र हे खाजगी बांधकाम व्यावसायिकाचे प्रमाणपत्र /शासकीय प्राधिकरणाचे प्रमाणपत्र / नाका कामगार पुस्तिका ग्राह्य धरण्यात यावी.

(झ) नुतनीकरणाकरीता ९० दिवसाचे प्रमाणपत्र हे केवळ मागील एक वर्षामधील असणे आवश्यक आहे त्यापुर्वीच्या वर्षामधील ९० दिवसाचे प्रमाणपत्र असण्याची आवश्यकता नाही.

(ज) ज्या दिनांकास नुतनीकरण मंजूर करण्यात येईल त्या दिनांकापासून नुतनीकरणाचा कालावधी एक वर्षापर्यंत राहील.

(झ) नोंदणी / नुतनीकरणाची प्रक्रिया **प्रपत्र-क** नुसार राहील.

(क) बांधकाम कामगारास ऑनलाईन पद्धतीने नोंदणी / नुतनीकरणा करीता अर्ज सादर करतेवेळी मुळ कागपत्रांच्या तपासणीकरीता / ऑनलाईन फोटो देण्याकरीता /बायोमेट्रीक करीता त्यांच्या सोईनुसार दिनांकाची निवड करावी लागेल.

(ख) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रावर मुळ कागदपत्रांच्या तपासणीकरीता हजर राहील व ऑनलाईन फोटो /बायोमेट्रीक घेण्यात येईल.

(ग) ज्या तालुक्यामधील ९० दिवसाचे प्रमाणपत्र असेल तेच तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र निवडणे बांधकाम कामगारास निवडणे अनिवार्य राहील, अन्यथा इतर सुविधा केंद्रावर त्यांच्या कागदपत्राची पडताळणी होणार नाही व अर्ज रद्द करण्यात येईल.

(घ) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार सुविधा केंद्रावर हजर न राहील्यास त्यांचा अर्ज रद्द होईल व त्यांना पुनश्च: अर्ज करावा लागेल.

९. **लाभासाठी अर्ज सादर करणे**

(अ) बांधकाम कामगार ऑनलाईन पद्धतीने https://mahabocw.in/ या संकेतस्थळावर लाभाकरीता करीता अर्ज सादर करतील.

(ब) अर्ज सादर करतेवेळी प्रत्येक योजनेनिहाय आवश्यक असणारी कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील. योजनानिहाय आवश्यक कागदपत्रांचा तपशिल **प्रपत्र - ड** नुसार राहतील.

(क) बांधकाम कामगारास ऑनलाईन पद्धतीने लाभाकरीता करीता अर्ज सादर करतेवेळी मुळ कागपत्रांच्या तपासणीकरीता त्यांच्या सोईनुसार दिनांकाची निवड करावी लागेल.

(ड) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रावर मुळ कागदपत्रांच्या तपासणीकरीता हजर राहील व ऑनलाईन फोटो /बायोमेट्रीक घेण्यात येईल.

(इ) लाभाच्या अर्जाची प्रक्रिया **प्रपत्र-इ** नुसार राहील.

(ई) ज्या तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रामध्ये बांधकाम कामगारची नोंदणी असेल त्याच सुविधा केंद्रावर त्यांच्या कागदपत्राची पडताळणी होईल.

(च) निवडलेल्या दिनांकास बांधकाम कामगार सुविधा केंद्रावर हजर न राहील्यास त्यांचा अर्ज रद्द होईल व त्यांना पुनश्च: अर्ज करावा लागेल.

१०. **नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी.**

(अ) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रास ऑनलाईन पद्धतीने सादर होणा-या नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप यांचे अर्ज प्राथमिक छानणीकरीता प्रथम लिपिक लॉग-ईन आय.डी. मध्ये येतील.

(ब) संबधित बांधकाम कामगार / वारस यांनी तपासणीकरीता निवडलेल्या दिवशी सर्व मुळ कागदपत्रांसह संबधित तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रात प्रत्यक्ष उपस्थित राहील.

(क) प्रत्येक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रा करीता तीन नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी. निर्माण करण्यात आले असून, सर्व तीनही लॉग-ईन आय.डी. मध्ये नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटपाचे अर्ज दिसतील. प्रत्येक लॉग-ईन आय.डी. द्वारे ५० अर्ज तपासणी होतील. यानुसार एका तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रामध्ये १५० अर्ज तपासणीकरीता निश्चित करण्यात आले आहेत.प्रत्येक तालुका इमारत कामगार सुविधा केंद्रामध्ये येणा-या अर्जांचा ओघ विचारात घेवून, सदरची क्षमता कमी अथवा जास्त करण्यात येईल.

(ड) सर्व तीनही लॉग-ईन आय.डी. मध्ये संबधित दिवसाकरीता तपासणीकरीता निश्चित केलेले सर्व अर्ज उपलब्ध असतील. तीनही

लॉग-ईन आय.डी. मध्ये संबधित दिवसाकरीता तपासणीकरीता निश्चित केलेले अर्ज शोधण्याची सुविधा (Search) उपलब्ध करून देण्यात आली असून,तपासणीकरीता आलेल्या बांधकाम कामगार/वारस यांना क्रमाने टोकन वाटप करण्यात यावेत व शोधण्याची सुविधा (Search) वापरून कार्यवाही करण्यात यावी.

(इ) बांधकाम कामगार/वारस यांनी सादर केलेली मुळ कागदपत्रे योग्य असल्याची खातरजमा झाल्यानंतर संबधित लिपिकाने "सर्व मुळ कागदपत्रे योग्य" हा शेरा नमूद करावा. तद्नंतर संबधित बांधकाम कामगार/वारस यांचा फोटो (Online Photo Capturing) व त्यांच्या बोटाचे ठसे (शक्यतो अंगठा अथवा कोणतेही एक बोट) बायोमॅट्रीक पद्धतीने संगणक प्रणालीमध्ये नोंदविण्यात यावेत.

(ई) बांधकाम कामगार/वारस यांनी सादर केलेली मुळ कागदपत्रे अपूर्ण असल्यास कोणती मुळ कागदपत्रे नाहीत हे स्पष्ट नमूद करून अर्ज परत करावा व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" हा शेरा नमूद करावा.

(च) बांधकाम कामगार/वारस यांनी सादर केलेली मुळ कागदपत्रे चुकीची/बनावट /संशयास्पद आढळून आल्यास संबधित लिपिकाने सदरची बाब तातडीने तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राचे प्रमुख यांच्या निदर्शनास आणून द्यावी व अशाप्रकरणी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

(छ) "सर्व मुळ कागदपत्रे योग्य" व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" या दोन शे-या व्यतिरीक्त अन्य कोणतेही शेरे लिपिक यांनी नमूद करू नयेत.

(ज) "सर्व मुळ कागदपत्रे योग्य" व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" या दोन शे-यांचे रबर स्टॅम्प बनवून प्रत्येक लॉन-ईन आय.डी धारक लिपिकास त्यांचे नाव नमूद करून देण्यात यावेत. बांधकाम कामगार/वारस यांच्या मुळ कागदपत्र तपासणीअंती संबधित लॉन-ईन आय.डी धारक लिपिकाने उपरोक्त दोनपैकी एका शे-याचा रबर स्टॅम्प नमूद करून त्यांचा अर्ज परत करावा. रबर स्टॅम्प नमूना **प्रपत्र-ई** मध्ये जोडला आहे.

(झ) "सर्व मुळ कागदपत्रे योग्य"व "---- हे मुळ कागदपत्र अपूर्ण" यापैकी एक शेरा ऑनलाईन पद्धतीने नमूद करून अर्ज पुढील कार्यवाहीस्तव नोंदणी अधिका-यास सादर करावा.

(ट) ऑनलाईन पद्धतीने सादर होणा-या अर्जाची तपासणी करताना सोबत जोडलेल्या **प्रपत्र - ड** नुसार योजनानिहाय मुळ कागदपत्रांची तपासणी करावी. याव्यतिरीक्त अन्य कोणत्याही कागदपत्रांची मागणी करण्यात येवू नये.

(ठ) बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) असल्याशिवाय ऑनलाईन पद्धतीने लाभाचा अर्ज संगणक प्रणालीमध्ये स्वीकृत होत नाही.तथापि, सदरचा अर्ज निकाली निघेपर्यंत सदरच्या बांधकाम कामगाराचा नोंदणी कालावधी संपुष्टात येवू शकतो.सबब,बांधकाम कामगारांची नोंदणी जिवीत (सक्रिय) नाही या कारणास्तव अर्ज रद्द करण्यात येवू नये.तथापि, योजनेनुसार निश्चित केलेल्या मुळ कागपत्रांची छानणी करून पात्र अर्ज मंजूर करण्यात यावेत.प्राथम्यक्रमानुसार (First Come First Serve) सदरचे अर्ज छानणी करण्यात येतील व आवश्यक त्या शे-यानुसार अर्ज नोंदणी अधिका-यांकडे पाठविण्यात येतील.

११. **तालुका नोंदणी अधिकारी लॉग-ईन आय.डी.**

(अ) जिल्हा कामगार सुविधा केंद्रानिहाय देण्यात आलेले लॉग-ईन आय.डी. यापूर्वीच बंद करण्यात आले असून, तालुकानिहाय लॉग-ईन आय.डी. यापूर्वीच जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या प्रमुखांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

(ब) प्राप्त होणा-या नोंदणी, नुतनीकरण व लाभांच्या अर्जांचे तालुकानिहाय विभागणी करण्यात आली असून, संबधित तालुका लॉग-ईन आय.डी. मध्ये सदरचे नोंदणी, नुतनीकरण व लाभाचे अर्ज दिसतील.

(क) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राच्या नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी. मधून शेरा नोंद होवून, अर्ज संबधित तालुक्याच्या तालुका लॉग-ईन आय.डी. मध्ये दिसतील.

(ड) जिल्हा कामगार सुविधा केंद्राच्या प्रमुखांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेले नोंदणी अधिकारी व संबधित तालुक्यामधील अर्जांचा ओघ विचारात घेवून, तालुका लॉग-ईन आय.डी. निहाय नोंदणी अधिका-यांची नियुक्ती करावी.

(इ) नोंदणी अधिका-यास अर्जाबाबत स्वीकृत (Accept) अथवा नाकारणे (Reject) हे दोनच पर्याय देण्यात आले आहेत.त्यानुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

१२. **लाभ वाटप अर्जाकरीता जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रासाठी मूळ कागदपत्रे पडताळणीकरीता यापूर्वी घेण्यात आलेल्या दिनांकाबात करावयाची कार्यवाही**

(अ) लाभ वाटप अर्जाकरीता यापूर्वी बांधकाम कामगारांनी कागदपत्रे पडताळणीकरीता घेतलेले दिनांक हे जिल्हास्तरावरील होते व त्यांना सन २०२६ पर्यतचे दिनांक मिळाले होते.त्यांना तालुकास्तरावर नजीकचे दिनांक उपलब्ध करून देण्याकरीता पूर्वीचे दिनांक आता रद्द होतील.

(ब) बांधकाम कामगारांनी त्यांच्या पुर्वीच्या घेतलेल्या दिनांकाचा Acknowledgement क्रमांक ऑनलाईन प्रणालीमध्ये नमूद करून, तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राचा त्यांच्या सोईनुसार दिनांक पुनश्च: घ्यावा.

१३. **जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्राची जबाबदारी**

(अ) यापूर्वी निर्माण करण्यात आलेली जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र हे जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठीकाणी असून, प्रत्येक केंद्रामध्ये पाच डाटा ऐंट्री ऑपरेटर आहेत.

(ब) सदरचे केंद्र हे जिल्हा मुख्यालय असेल्या तालुक्याकरीता अतिरिक्त तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र म्हणून कार्यान्वित करण्यात येईल. सदरच्या केंद्रामधील पाच पैकी तीन लिपिक लॉग-ईन आय.डी. द्वारे प्रत्येकी ५० याप्रमाणे एकूण १५० अर्ज हाताळण्यात येतील.

(क) जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामधील उर्वरीत दोन डाटा ऐंट्री ऑपरेटर करीता स्वतंत्र तपशिल बदल लॉग-ईन आय.डी. बनविण्यात येतील.

(ड) सदरचे लॉग-ईन आय.डी. हे बांधकाम कामगारांच्या तपशिलामध्ये बदल करण्याकरीता वापरण्यात येतील.

(इ) बांधकाम कामगारास त्यांच्या तपशिलामध्ये बदल करावयाचा असल्यास त्यांना जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रावर उपस्थित राहून बदलाचा तपशिल सादर करावा लागेल.

(ई) बांधकाम कामगारांना त्याच्या तपशिल बदलामध्ये स्व:ताचे नाव, फोटो, जन्म दिनांक, आधार क्रमांक यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.त्यास मोबाईल क्रमांक बदलता येईल.कुटुंब सदस्यामध्ये पती/पत्नीचे नाव, दोन मुलांचे नाव , आई व वडील यांचा अंतर्भाव करण्याची मुभा राहील. मात्र एकदा अंतर्भूत केलेल्या सदस्याचे नाव वगळून अन्य सदस्याचे नाव अंतर्भूत करता येणार नाही.त्यास कुटुंबाच्या सदस्याचे आधार क्रमांक, जन्म दिनांक अंतर्भूत करता येतील मात्र आधार क्रमांक, जन्म दिनांक बदल करता येणार नाही.

(छ) जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामधील तपशिल बदल लॉग-ईन आय.डी. मध्ये याची नोंद घ्यावी व त्याचवेळी बांधकाम कामगारांचे फोटो (Online Photo Capturing) व त्यांच्या बोटाचे ठसे (शक्यतो अंगठा अथवा कोणतेही एक बोट) बायोमॅट्रीक पद्धतीने संगणक प्रणालीमध्ये नोंदविण्यात यावेत.

(च) बांधकाम कामगांचा तपशिल बदल अंतिम मान्यतेकरीता संबधित तालुक्याच्या नोंदणी अधिका-याकडे जाईल.

(छ) बांधकाम कामगारांच्या तपशिलामध्ये बदल करून मंडळाच्या विविध योजनांचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेण्यास आळा घालणे आवश्यक आहे. अशी बाब आढळून आल्यास,जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामधील तपशिल बदल लॉग-ईन आय.डी. हाताळणारे डाटा ऐंट्री ऑपरेटर, संबधित बदलास मान्यता देणारे तालुका नोंदणी अधिकारी व संबधित बांधकाम कामगार यास जबाबदार राहतील.

१४. <u>प्रलंबित नोंदणी/नुतनीकरण/लाभांच्या अर्जावर करावयाची कार्यवाही</u>

(अ) तालुका इमारत कामगार सुविधा केंद्राच्या नोंदणी / नुतणीकरण / लाभ वाटप लिपिक लॉग-ईन आय.डी. मध्ये प्राप्त होणारे अर्ज दैनंदिन स्वरूपात निपटारा होणार असल्यामुळे सदर लिपिक लॉग-ईन आय.डी. मध्ये कोणतेही अर्ज प्रलंबित राहणार नाहीत.

(ब) सद्यस्थितीत नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटपाचे अर्ज तालुका नोंदणी अधिका-यांच्या लॉग-ईन आय.डी. मध्ये प्रलंबित आहेत.

(क) तालुका नोंदणी अधिका-यांनी त्यांच्या लॉग-ईन आय.डी. मध्ये प्रलंबित असलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही करावी व सर्व प्रलंबित अर्जांचा दिनांक ३१ मार्च,२०२५ पूर्वी निपटारा करावा.

(ड) नोंदणी/नुतनीकरणाकरीता तसेच, योजनानिहाय निश्चित केलेल्या कागदपत्रांशिवाय अन्य कागदपत्रांची मागणी करण्यात येवू नयेत व अनावश्यकपणे त्रुट्या दाखवून अर्ज नामंजूर करण्यात येवू नयेत.तथापि, सादर झालेली कागदपत्रे चुकीची/बनावट /संशयास्पद आढळून आल्यास तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

१५. <u>मंडळ स्तरावर समन्वय कक्ष -</u>

(अ) उपरोक्त प्रमाणे कामकाजाचे समन्वय करण्याकरीता खालीलप्रमाणे समन्वय कक्ष गठीत करण्यात येत आहे -

(i) श्रीम. राजश्री पाटील, जिल्हा कार्यकारी अधिकारी - कक्ष प्रमुख

(ii) श्री. विनीत तायडे, लेखा अधिकारी - समन्वयक

(iii) श्री. गंगाधर तावडे, प्रकल्प संचालक
- एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) प्रतिनिधी

(iv) श्री. अभिजित सिंग, प्रकल्प संचालक
- तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र कक्ष प्रतिनिधी

(अ) उपरोक्त कामाकरीता bocwdbtmonitoring@gmail.com हा पुर्णवेळ (Dedicated) ई-मेल आय.डी निर्माण करण्यात येत असून,सर्व जिल्हा कामगार सुविधा केंद्र यांनी यासंदर्भामधील कामाकरीता केवळ या ई-मेल आय.डी. वर संदर्भ करावा.

(ब) उपरोक्त कामाकरीता हा (+९१) ७४०००१२२६० हा मंडळाचा पुर्णवेळ (Dedicated) व्हॉट्सअप क्रमांक निर्माण करण्यात येत असून,सर्व जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्र, तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र यांनी यासंदर्भामधील कामाकरीता केवळ या व्हॉट्सअप क्रमांक वर संदर्भ करावा.

१६. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत विकसित केलेल्या एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर

प्रलंबित असलेल्या व यापुढे प्राप्त होणा-या सर्व नोंदणी/नुतनीकरण/लाभ वाटप अर्जावर उपरोक्त सूचनांनुसार कार्यवाही करावी. तसेच, प्रलंबित अर्जाचा नियमोचित निपटारा करून, यापुढे दैनंदिन स्वरूपात अर्जांचा निपटारा होईल याची दक्षता घेण्यात यावी.

04/02/2024

(विवेक कुमार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

प्रत ,

१. मा.मंत्री (कामगार) तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
२. मा.प्रधान सचिव (कामगार), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.
३. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
४. उप सचिव (कामगार-७) , उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मुंबई.
५. एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) कक्ष.
६. तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र कक्ष.
७. Arceus Infotech Pvt. Ltd.
८. ITI Ltd.
९. Arceus Universal Infotech Pvt. Ltd.
१०. Just Universal Pvt. Ltd.

मुळ अ(१)(ब)(२०१८) नुसार क

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

---

५ वा मजला, एमएमटीसी हाऊस, प्लॉट नं. सी २२, ब्लॉक ई , वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई४०० ०५१ .

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी क्र. ०२२-२६५७२६३१/३२
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र समिती-२०२३/नि.समिती/ प्र.क्र. १८/मंडळ-०१/L३१ दिनांक : 21 APR 2025

कार्यालयीन आदेश

विषय- महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्याबाबत..

वाचा- १.शासन निर्णय क्र.मवबाविवि क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक दि.१९.०६.२०१४

२. महिला व बाल विकास विभागाचे पत्र क्र.न्यायप्र.२०२३/प्र.क्र.२१/का-१५ दि.२६.०६.२०२३

३.उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१४१/काम-९ दि.२७.०६.२०२३

४.क़ामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.काआ/आस्था/११-२०२२/महिला समिती/इबाका/कार्या-२/१००३० दि.१०.०८.२०२३

५.श्रीम.सरिता संजय कदम, राष्ट्रीय महिला समाज संस्था,चेंबूर यांचे पत्र दि.२६.०३.२०२५

शासकीय/निमशासकीय कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांच्या कार्यालयातील महिला अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली महिलांवरील लैगिंक छळास प्रतिबंध व त्या संबंधातील प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्याकरिता समिती गठीत करण्याचे दि.१९ जून २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्देश दिलेले असून मा.सर्वोच्च न्यायालयाने Civil Appeal No.२४८२ of २०१४ ऑटोलियानें फर्नांडिस विरुध्द गोवा सरकार या न्यायालयीन प्रकरणात कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैगिंक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात यावे तसेच त्या पोर्टलवर समितीच्या सदस्यांची सविस्तर माहिती देण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या कार्यालयातर्गत कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैगिंक छळास प्रतिबंध करण्यासाठी आणि

त्यानुषंगाने कार्यवाहीकरण्याकरिता खालीलप्रमाणे तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र	अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम	पद
१	श्रीम.राजश्री पाटील,जिल्हा कार्यकारी अधिकारी	अध्यक्ष
२	श्रीम.मनिषा तु.कदम,सहाय्यक कामगार आयुक्त,मुंबई	सदस्य
३	श्रीम.वर्षा हाडके,सरकारी कामगार अधिकारी,मुंबई	सदस्य
४	श्रीम.मृणाल हु.मेश्राम,अधिक्षक, कार्यासन-१२,मुंबई	सदस्य
५	श्रीम.सरिता संजय कदम	अशासकीय सदस्य
६	श्री.बाबासो जाधव,लेखा अधिकारी	सदस्य
७	श्रीम.आकांक्षा पेडणेकर ,उप. जिल्हा कार्यकारी अधिकारी	सदस्य सचिव

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

अ) महिलाच्या लैगिंक छळाच्या तक्रारीची दखल घेणे

ब) तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेवून शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरिता शिफारस करणे.

क) या संबंधी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल विभागास सादर करणे.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

(विवेक शं.कुमार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई

प्रति,
संबंधित अधिकारी/कर्मचारी/अ.शा.सदस्य

प्रत माहितीसाठी
१.उपसचिव (कामगार-९),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय,मुंबई
२.अवर सचिव (कामगार -७),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय,मुंबई

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

एमएमटीसी हाऊस, ५ वा मजला
प्लॉट नं. सी २२, ब्लॉक - ई,
वांद्रे कुर्ला संकुल,
वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१.

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र/३४७ /२०२५/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/योजना-०२ दिनांक : 27 FEB 2025

प्रति,

१. अप्पर कामगार आयुक्त/कामगार उप आयुकत
कोकण/पुणे/नागपूर/अमरावती/नाशिक/छ. संभाजीनगर
२. कामगार उप आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/जिल्हा कामगार अधिकारी/
जिल्हा कामगार सुविधा केंद्र (सर्व)// तालुका कामगार सुविधा केंद्र (सर्व)

विषय :- एकात्मिक कल्याणकारी मंडळ संगणकीय प्रणाली (IWBMS) वर प्राप्त होणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी/नूतणीकरण/लाभ वाटप अर्जावर करावयाच्या कार्यवाहीवर सर्वकष सूचना देणेबाबत.

संदर्भ :- १.मंडळाचे पत्र क्र.१८८५/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. २०.१०.२०२३
२. मंडळाचे पत्र क्र. १९९४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. ०३.११.२०२३.
३. मंडळाचे पत्र क्र. २११४/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. २२.११.२०२३.
४. मंडळाचे पत्र क्र. २४११-अ/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. ०१.०१.२०२४
५. मंडळाचे पत्र क्र. २५३/२०२३/संप्रणा-२०२३/प्र.क्र.१/यो-०२, दि. ०५.०२.२०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्ये मंडळाच्या संदर्भाधिन क्र ५ रोजीच्या पत्रांन्वये सर्व जिल्हा कामगार सुविधा केंद्राअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या नोंदणी/नूतणीकरण/लाभ वाटप करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्वकष सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हा इमारत कामगार सुविधा केंद्रामार्फत नोंदणी/ नुतणीकरण व लाभ वाटपाचे कामकाज सुरू आहे.

२. बांधकाम कामगार नोंदणी/नुतणीकरणा- करिता ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी ज्या दिवशी अर्ज सादर केला आहे त्या दिनांकापासून मागील १ वर्षात ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केले असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. सदरचे प्रमाणपत्र खाजगी कंत्राटदाराचे सादर केले जाते. असे खाजगी कंत्राटदार कोणत्याही शासकीय आस्थापनेखाली नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तथापि, असे खाजगी कंत्राटदार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत नसल्याचे कारण देऊन नोंदणी अधिकारी अर्ज रद्द करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

३. सबब, आपणास कळविण्यात येते की, ९० दिवसाचे खाजगी कंत्राटदाराचे प्रमाणपत्र तपासतेवेळी सदरचा कंत्राटदार कोणत्याही शासकीय आस्थापनेकडे नोंदणीकृत आहे का याबाबतची खातरजमा करावी तथापि, कंत्राटदाराची मंडळाकडे नोंदणी नाही याकारणास्तव नोंदणी/नुतणीकरण अर्ज रद्द करू नये.

(विवेक कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

महाराष्ट्र शासन

कामगार विभाग

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ ,मुंबई

अर्थसंकल्पीय अंदाज

२०२५-२६

Budget Estimates

2025-26

अर्थसंकल्पीय अंदाज
२०२५-२६

भाग एक-
महसूल व जमा यांचे तपशीलवार
अर्थसंकल्पीय अंदाज

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ ,मुंबई

मंडळाचे सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८ (१) नुसार मंडळाची स्थापना करणेबाबत तरतूद आहे. राज्य शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) नियम, २००७ नियमावली तयार केली. शासन अधिसूचनेनुसार सन २००७ मध्ये मंडळाची स्थापना करण्यात आली. दि. १ मे २०११ रोजी त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज सन २०११ पासून सुरु करण्यात आले. सन २०१२-१३ पासून मंडळाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक बनविण्यात येत आहे.

२. मंडळाचे अंदाजपत्रक अधिनियमातील कलम २५ च्या तरतुदीनुसार, मंडळाच्या मान्यतेअंती राज्य व केंद्र शासनास माहितीकरीता सादर करण्यात येत आहे.

३. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ नूसार मंडळाच्या प्रत्येक वर्षाच्या लेख्यांचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्याकडून लेखापरिक्षण करणे अनिवार्य आहे त्यानूसार मंडळाचे सन २००७-०८ ते माहे जानेवारी २०२२ पर्यंतचे लेखापरिक्षण (IR) व सन २००७-०८ ते २०२१-२२ या वर्षाचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांसकडून पुर्ण करण्यात आले आहे.

४. मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप करण्यासाठी मंडळ व शासन स्तरावरून अनेक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

अ) मंडळाने जुलै २०२० पासून बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरू केली आहे. ऑनलाईन प्रक्रिया चालू झाल्यामुळे नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाची प्रक्रियेत सुलभता व पारदर्शकता आली आहे.

ब) बांधकाम कामाच्या व्याख्येमध्ये बांधकामाशी संबंधित २१ कामे अंतर्भूत करण्याबाबतची अधिसूचना उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत दि.१८.०८.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आली. त्यामुळे बांधकामाशी संबंधित सर्व कामावरील बांधकाम कामगारांची नोंदणी करणे शक्य होत आहे.

क) बांधकाम क्षेत्रातील नोंदीत बांधकाम कामगार संघटनाची नोंदणी व लाभ वाटपाकरीता मदत घेण्याचा निर्णय दि. १५.०९.२०१७ रोजी कामगार विभागाने घेतला आहे.

. शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. ०९.११.२०२२ अन्वये, बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण शुल्काची रक्कम रू १ प्रति नोंदणी अशी सुधारीत करण्यात आली आहे.

सन २०११-१२ पासून मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांचा वर्षनिहाय तपशील व सन २०२५-२६ मध्ये अपेक्षित नोंदणी संख्या

अनु.क्र.	आर्थिक वर्ष	नोंदित जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांची संख्या	नोंदित जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगाराची प्रगत एकुण संख्या
१	२०११-१२	३७५१७	३७५१७
२	२०१२-१३	६५९४६	१०३४६३
३	२०१३-१४	६२८७८	१६६३४१
४	२०१४-१५	१७६५७९	३४२९२०
५	२०१५-१६	१२१२२५	४६४१४५
६	२०१६-१७	९७७४५	५६१८९०
७	२०१७-१८	३५५११८	९१७००८
८	२०१८-१९	६६२०८८	१५७९०९६
९	२०१९-२०	७५५९१२	२३३५००८
१०	२०२०-२१	७९१२०	२४१४१२८
११	२०२१-२२	८३१४५३	३२४५५८१
१२	२०२२-२३	१२२६७८९	४४७२३७०
१३	२०२३-२४	१२११८७१	५६८४२४१
१४	२०२४-२५ (चे सुधारित अंदाज)	२७०००००	८३८४२४१
१५	**२०२५-२६ (अंदाजित)**	३०००००	**११३८४२४१**

५. मंडळाच्या सन २०२५-२६ च्या जमेचे अंदाज

अ. जमा उपकर

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३ (१) नुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एसओ २८९९, दि.२६.०९.१९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मूल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून) १% दराने उपकर जमा करण्याचे अधिसूचित केले आहे. केंद्र शासनाच्या सदर अधिसूचनेस अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे परिपत्रक क्र.बीसीए/१२००७/प्र.क्र.७८८/ कार्यासन-७ दि.२१.०४.२००८ अन्वये, निर्गमित सूचनेनुसार दि.०१.०१.२००८ पासून राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियोक्त्याकडून उपकर जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

उपकर स्वरूपात मंडळाकडे सन २००७-०८ पासून जमा वर्ष निहाय रक्कमेचा तपशील व सन २०२५-२६ च्या उपकर जमेचे अंदाज

(रूपये कोटीत)

अनु क्र.	आर्थिक वर्ष	उपकराची प्रत्यक्ष जमा रक्कम	उपकराची प्रगत जमा रक्कम
१	२००७-०८	०.७७	०.७७
२	२००८-०९	०.५८	१.३५
३	२००९-१०	९.१८	१०.५३
४	२०१०-११	८७.५८	९८.११
५	२०११-१२	४२५.२९	५२३.४
६	२०१२-१३	७७७.०९	१३००.४९
७	२०१३-१४	७२८.९	२०२९.३९
८	२०१४-१५	८३६.५	२८६५.८९
९	२०१५-१६	११८०.२१	४०४६.१
१०	२०१६-१७	१०६१.८८	५१०७.९८
११	२०१७-१८	११४५.९९	६२५३.९७
१२	२०१८-१९	१३६२.३२	७६१६.२९
१३	२०१९-२०	१५११.३४	९१२७.६३
१४	२०२०-२१	१४६४.७१	१०५९२.३४
१५	२०२१-२२	२३१०.१३	१२९०२.४७
१६	२०२२-२३	२४८४.०१	१५३८६.४८
१७	२०२३-२४	३१९३.४३	१८५७९.९१
१८	२०२४-२५ (चे सुधारित अंदाज)	३४००.०५	२१९७९.९६
१९	**२०२५-२६(अंदाजित)**	**६०००.००**	**२७९७९.९६**

ब) बांधकाम कामगार नोंदणी शुल्क

शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. ०९.११.२०२२ अन्वये, बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण शुल्काची रक्कम रू १ प्रति नोंदणी अशी सुधारीत करण्यात आली आहे.

कामगार नोंदणी फी स्वरूपात सन २०११-१२ पासून मंडळाकडे जमा रक्कमेचा वर्ष निहाय तपशील व सन २०२५-२६ चे अंदाजित जमा

(रूपये लाखात)

अनु.क्र.	आर्थिक वर्ष	नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या	प्रत्यक्ष जमा नोंदणी शुल्क	प्रगत जमा नोंदणी शुल्क
१	२०११-१२	३७५१७	८.४५	८.४५
२	२०१२-१३	६५९४६	२०.६	२९.०५
३	२०१३-१४	६२८७८	२०.६७	४९.७२
४	२०१४-१५	१७६५७९	४३.८९	९३.६१
५	२०१५-१६	१२१२२५	३०.३१	१२३.९२
६	२०१६-१७	९७७४५	२१.५६	१४५.४८
७	२०१७-१८	३५५११८	८३.८	२२९.२८
८	२०१८-१९	६६२०८८	१९०.००	४१९.२८
९	२०१९-२०	७५५९१२	१९०.००	६०९.२८
१०	२०२०-२१	७९१२०	१४०.९६	७५०.२४
११	२०२१-२२	८३१४५३	२४१.२२	९९१.४६
१२	२०२२-२३	१२२६७८९	१६६.११	११५७.५७
१३	२०२३-२४	१२११८७१	१४.२५	११७१.८२
१४	२०२४-२५ (चे सुधारित अंदाज)	२७०००००	२५.३३	११९७.१५
१५	**२०२५-२६(अंदाजित)**	३०००००	३०.००	१२२७.१५

क) नोंदित बांधकाम कामगारांची नुतनीकरण शुल्क

सन २०११-१२ या वर्षापासून मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येत आहे. सुरुवातीस नोंदित बांधकाम कामगाराकडून प्रति महा रू.५ याप्रमाणे नुतनीकरण शुल्क जमा करण्यात येत होती. उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत दि.१५.०१.२०१८ रोजी निर्गमित अधिसूचनेद्वारे नोंदित बांधकाम कामगाराची नुतनीकरण शुल्क दरमहा रू.०५ ऐवजी रू.०१/- एवढी कमी करण्यात आली आहे. शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. ०९.११.२०२२ अन्वये,

बांधकाम कामगारांची नुतनीकरण शुल्काची रक्कम रू १ प्रति नुतनीकरण प्रति वर्ष अशी सुधारीत करण्यात आली आहे.

सन २०११-१२ पासून मंडळाकडे जमा मासिक वर्गणीचा वर्षनिहाय तपशील व सन २०२५-२६ मधील अपेक्षित नुतनीकरण शुल्काची रक्कम.

(रूपये लाखात)

अनु.क्र.	आर्थिक वर्ष	नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या	नुतनीकरण वर्गणीची रक्कम	प्रत्यक्ष नुतनीकरण नोंदणी शुल्क
१	२०११-१२	३७५१७	२०.२७	२०.२७
२	२०१२-१३	६५९४६	४९.४४	६९.७१
३	२०१३-१४	६२८७८	४९.६	११९.३१
४	२०१४-१५	१७६५७९	१०५.३५	२२४.६६
५	२०१५-१६	१२१२२५	७२.७३	२९७.३९
६	२०१६-१७	९७७४५	५१.७४	३४९.१३
७	२०१७-१८	३५५११८	१०६	४५५.१३
८	२०१८-१९	६६२०८८	४१०	८६५.१३
९	२०१९-२०	७५५९१२	४०३	१२६८.१३
१०	२०२०-२१	९३७४२	१९.७६	१२८७.८९
११	२०२१-२२	२५०१९२	११९.७७	१४०७.६६
१२	२०२२-२३	२४३२८७	७४.७७	१४८२.४३
१३	२०२३-२४	५४८३०२	५.०३	१४८७.४६
	२०२४-२५ (चे सुधारित अंदाज)	१२५००००	१२.५०	१४९९.९६
१४	**२०२५-२६ (अंदाजित)**	**१५००००० **	**१५.००**	**१५१४.९६**

ड) मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीवरील व्याज

मंडळाकडे जमा होणारा उपकर, नोंदणी शुल्क, नोंदित बांधकाम कामगारांच्या मासिक वर्गणी व मंडळाच्या अतिरीक्त निधीच्या गुंतवणूकीवरील व्याजापोटी जमा निधी मधून नोंदीत बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय वार्बीवर खर्च करण्यात येतो व अतिरिक्त निधीच्या गुंतवूणकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल रिट पिटिशन नं. W.P. (c) ३१८/२०१६ Contempt Petition No.५२ of २०१३ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०७.०२.२०१२ व दि.०२.०८.२०१७ रोजीच्या आदेशास अनुसरून महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या दि. २२.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील अतिरीक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयकृत बँकेत

करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशाप्रमाणे मंडळाच्या अतिरीक्त निधीची गुंतवणूक मंडळाने नियुक्त केलेल्या गुंतवणूक उपसमितीच्या मान्यतेने राष्ट्रीयकृत बँकांमध्ये करण्यात येत आहे.

मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीवर व्याजापोटी प्राप्त रक्कमेचा वर्षनिहाय तपशील व सन २०२५-२६ मधील गुंतवणूकीवरील अपेक्षित व्याज रक्कमेचा तपशील.

(रुपये कोटीत)

अनु.क्र.	आर्थिक वर्ष	गुंतवणूक रक्कम	प्राप्त व्याज रक्कम
१	२०११-१२	३४५	२१.५७
२	२०१२-१३	१३२३.५	७६.८७
३	२०१३-१४	२०५१.९८	१५६.७४
४	२०१४-१५	२५९३.३	२१७.५४
५	२०१५-१६	३८९६.३९	३४६.३४
६	२०१६-१७	३०८२.४९	२६१.५९
७	२०१७-१८	६५८४.७८	३४२.८८
८	२०१८-१९	८१४०.००	६३४.३९
९	२०१९-२०	९०१०.००	५७८.३८
१०	२०२०-२१	९६००.००	४१७.६०
११	२०२१-२२	११३५०.००	४४३.४९
१२	२०२२-२३	१०८००.००	६८३.४१
१३	२०२३-२४	९०५०.००	७२२.१५
१४	२०२४-२५ (चे सुधारित अंदाज)	७७००.००	६१५.२४
१५	**२०२५-२६(अंदाजित)**	८५००.००	७००.००

इ) अटल आहार योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजनापोटी बांधकाम कामगार हिश्याची जमा रक्कम:-

शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. २३.१०.२०२३ अन्वये सदरची योजना दि. ०१.११.२०२३ पासून बंद करण्यात आली आहे.

ई. मंडळाची इतर जमा

मंडळाच्या इतर जमा रक्कमेमध्ये माहिती अधिकार कायद्या अंतर्गत प्राप्त होणाऱ्या फी ची रक्कम, मासिक वर्तमानपत्र (रद्दी विक्री), निर्लेखनद्वारे वस्तूची विल्हेवाट व इतर जमा रक्कमेचा समावेश आहे.

फ. केंद्र शासन व राज्य शासनाकडून अर्थसहाय्य/ अनुदान

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास आजपावेतो केंद्र शासन किंवा राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य अथवा अनुदान प्राप्त झालेले नाही.

*** मंडळाकडे मागील ३ वर्षातील प्रत्यक्ष जमा, चालू वित्तीय वर्षातील सुधारीत अंदाज व सन २०२५-२६ या वर्षाच्या जमेचे अंदाज ***

(रूपये लाखात)

अ. क्र.	जमेची बाब	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५ (मूळ अंदाज)	२०२४-२५ (सुधारीत अंदाज)	२०२५-२६ (प्रस्तावित जमा)
अ.	बांधकाम उपकर	२४८४०१.९७	३१९३४३.००	३७०००.००	३४०००४.६७	६००००.००
ब.	बँकेतील मुदत ठेव व बचत रक्कमे वरील व्याज	६४३४६.८७	७३०९४.२७	७७२००.००	७३२०२.२८	७०८७८.९०
क.	बांधकाम कामगार नोंदणी फी	१६६.११	१४.२५	१६.००	२५.३३	३०.००
ड.	बांधकाम कामगार नुतनीकरण शुल्क	७४.७७	५.०३	५.६०	११.१०	१५.००
ई.	इतर जमा	१.००	१.००	०.०२	०.०२	०.०१
	एकूण	**३१२९९०.७२**	**३९२४५७.५५**	**४४७२२१.६२**	**४१३२४३.४०**	**६७०९२३.९१**

अर्थसंकल्पीय अंदाज
२०२५-२६

भाग दोन-
खर्चाचे तपशीलवार
अर्थसंकल्पीय अंदाज

६. मंडळाच्या सन २०२५-२६ च्या खर्चाचे अंदाज

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणारा निधी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम २४ (२) (३) नुसार मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवर खर्च करण्यात येतो.

अ) मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च

मंडळामार्फत सद्यस्थितीत ३९ विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली आहे.

➢ **सन २०११-१२ पासून मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपावर खर्चाचा वर्ष निहाय तपशील**

(रूपये कोटीत)

अनु.क्र.	आर्थिक वर्ष	लाभ वाटपावरील खर्च	लाभ वाटपावरील प्रगत खर्च
१	२०११-१२	०.००२६	०
२	२०१२-१३	०.५९	०.५९
३	२०१३-१४	३८.३९	३८.९८
४	२०१४-१५	६०.७५	९९.७३
५	२०१५-१६	३५.३४	१३५.०७
६	२०१६-१७	१५.२८	१५०.३५
७	२०१७-१८	६०.५२	२१०.८७
८	२०१८-१९	३७६.०१	५८६.८८
९	२०१९-२०	१०३४.७६	१६२१.६४
१०	२०२०-२१	१४२२.९४	३०४४.५८
११	२०२१-२२	१६४५.१०	४६८९.६८
१२	२०२२-२३	३९२२.५८	८६१२.२६
१३	२०२३-२४	४६६५.४९	१३२७७.७६
१४	२०२४-२५ (चे सुधारित अंदाज)	५१४२.५०	१८४४९.१९
१५	**२०२५-२६(अंदाजित)**	**६६१८.१०**	**२५०६७.२९**

➢ **मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनावरील सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च, सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज व सन २०२५-२६ मधील प्रस्तावित खर्चाचे अंदाज**

(अ). विविध कल्याणकारी योजनांवरील अपेक्षित खर्च (रूपये लाखात)

अ.क्र	लेखा शीर्ष क्र.	विविध कल्याणकारी योजना	सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च	सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज	सन २०२५-२६ मुळ अंदाज
	E	**शैक्षणिक सहाय्य योजना**			
१	E०१	इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु. ५०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य.	५५३६.७	७०७५.८७	८०००.००
२	E०२	इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु. १०,०००/- एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य.	२३४३.८	२५८९.००	३०००.००
३	E०३	इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. १०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.	५५७२.००	६८७५.९०	७६००.००
४	E०४	प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु २०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य.	९६३९.६	१२०२९.४०	१३५००.००
५	E०५	वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.१,००,०००/- व अभियंत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.६०,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य.	१६८६७	२४३८८.००	२७०००.००
६	E०६	पदविका शिक्षणकरिता प्रती शैक्षणिक वर्षी रू.२०,००० आणि पदव्युत्तर पदवीका शिक्षणकरिता मप्रति शैक्षणिक वर्षी रु. २५,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य.	४९८८.७५	६३६३.५०	७०००.००
७	E०७	संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती.	१३२.७७	१९१.४७	२५०.००
	H	**आरोग्य सहाय्य योजना**			

८	H०१	नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारास नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. २०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.	१५२३.३५	११३२.२०	१३००.००
९	H०२	लाभार्थी कामगार व त्याच्या कुटूंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१,००,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य.	२७५.४९	३१४.५९	३५०.००
१०	H०३	नोंदीत लाभार्थी कामगार अथवा त्याच्या पती/ पत्नीने एका मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रू.१,००,०००/- मुदत ठेव.	१.००	०.००	१.००
११	H०४	नोंदित लाभार्थी कामगारास ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु.२,००,०००/-एवढे आर्थिक सहाय्य.	१६०.००	३५३.००	४००.००
१२	H०५	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करणेबाबत	०.००	०.००	१.००
१३	H०६	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांकरीता व्यसनमुक्ती केंद्रांतर्गत उपचाराकरीता नोंदीत बांधकाम कामगारास रू.६०००/- इतके अर्थसहाय्य.	०.००	०.००	१.००
१४	H०७	नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचा अपघातात हात किंवा पाय निकामी झाल्यास कृत्रिम अंग जोडण्यासाठी अर्थसहाय्य देणे.	०.००	०.००	१.००
F		**आर्थिक सहाय्य योजना**			
१५	F०१	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.	९०.००	१०५.००	१२०.००
१६	F०२	नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू.२ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत.	२१२४.००	३६९२.००	५०००.००

१७	F०३	नोंदीत बांधकाम कामागारांच्या घर खरेदी किंवा घर बांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रू.२.०० लक्ष मंडळामार्फत देणेबाबत	८.६३	८.००	१०.००
१८	F०४	अटल बांधकाम कामगार आवास योजनेत (शहरी) पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान देणे प्रस्तावित आहे.	९२६.००	१८०६.००	३०००.००
१९	F०५	अटल बांधकाम कामगार आवास योजनेत (ग्रामीण) आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान देणे प्रस्तावित आहे.	४३०.५०	४३४.२०	१०००.००
२०	F०६	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. १०,०००/- एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत.	१७९.००	१६३.९०	७५०.००
२१	F०७	नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराचे विधुर पतीस प्रतीवर्षी रु. २४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य.	५६९.७६	४५९.६०	७५०.००
२२	F०८	अपघाती नैसर्गिक मृत्यू झालेल्या नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचे शव शववाहिनीद्वारे मूळ गावी पाठविण्यासाठी एस. टी. महामंडळाच्या आगार प्रमुखाने प्रति किलोमीटर अंतरासाठी प्रमाणित केलेल्या दराप्रमाणे अर्थसहाय्य देणे.	०.०७	०.००	१.००
S		**सामाजिक सहाय्य योजना**			
२३	S०१	नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी रु. ३०,०००/- अर्थसहाय्य.	२२५४.२०	१६३९.१	३३००.००
२४	S०२	बांधकाम कामगारांसाठी जेवण किंवा पोषण आहार यांचा पुरवठा करणे.	२०५७८४.१९	०.००	१.००
२५	S०४	नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरीता	२.५०	१.००	१.००

		प्रतिकुटुंब रू. ५०००/- अर्थसहाय्य देणेबाबत.			
२६	S०५	जिवित नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना लागु करणेबाबत.	०.११	०.०५	०.०५
२७	S०६	जिवित नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागु करणेबाबत.	०.००३	०.००१३	१.००
२८	S०७	जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना पूर्व शिक्षण (RPL) ओळख योजना लागू करणे.	०.००	०.००	६०००.००
२९	S०८	नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षेसाठी सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणेबाबत	५३५४०.५६	४१७२०.१७	७५०००.००
३०	S०९	नोंदीत बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणेबाबत	५१७२२.५६	४२१६५.०९	७५०००.००
३१	S१०	नोंदणी अभियान, लाभवाटप कार्यक्रम व योजनेची प्रसार व प्रसिध्दी	१०४०६.९३	१९५५७.०३	५०००.००
		मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांची सर्वसमावेशक माहिती पुस्तिका छपाई	२९३८.२०	३९३८.१९	१.००
		एकुण	१३३४५.१३	२३४९५.२२	५००१.००
३२	S११	बांधकाम ठिकाणी नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी ते उपचार योजना	५८५००.६६	१२९२६९.६५	१३०००.००
३३	S१२	कामगार कल्याण मंडळाचे उपक्रम व कार्यक्रमाचा लाभ बांधकाम कामगारांना देणे.	०.००	०.००	१.००
३४	S१३	नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरिता रू. ५१०००/- एवढे अर्थसहाय्य देणे.	४१५४.९७	४४३९.०८	१०२००.००
३५	S१४	गृहपयोगी वस्तु संच वाटप	२२९७३.४२	१८७५९०.२७	२००००.००
३६	S१५	इमारत बांधकाम कामगारांसाठी शेड (कामगार नाका) बांधणे	१.१८	१.७७	५०००.००
३७	S१६	जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे (DBWFC)	२९०१.५६	४८४९.७२	५१७०.००

३८	S१७	तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र (TBWFC) स्थापन करणे	०.००	११०९७.३४	१२५००.००
३९	S१८	मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा कार्यान्वित करणे.	०.००	०.००	६००.००
अ. विविध कल्याणकारी योजनांवरील अपेक्षित खर्च			**४६६५४९.४६**	**५१४२५०.०९**	**६६०८१०.०५**

अ. क्र.	लेखाशीर्ष क्र. व योजनेचे नाव	सन २०२५-२६ मुळ अंदाज
१	P०१ बांधकाम कामगारांसाठी निवृत्ती वेतन योजना	१०००.००
प्रस्तावित योजनावरील अपेक्षित खर्च		**१०००.००**
विविध कल्याणकारी योजनांवरील अपेक्षित एकूण खर्च (अ+ब)		**६६१८१०.०५**

७. मंडळाचा प्रशासकीय बाबींवरील खर्च

अ. **प्रशासकीय बाबीवरील खर्च :** मंडळामार्फत करण्यात येत असलेल्या प्रशासकीय खर्चामध्ये एकात्मिक कल्याणकारी मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS), जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेवरील खर्च (WFC), बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते, प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे वेतन, भत्ते प्रवास खर्च, मंडळाच्या बैठकांचा खर्च, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांचे लेखापरीक्षण फी, कार्यालयीन भाडे, मंडळावर नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्थांचे सल्लागार शुल्क, दूरध्वनी खर्च, भाडयाच्या वाहनावरील खर्च व अन्य प्रशासकीय खर्चाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे.

ब. **इतर बाबीवरील खर्च :** उपकर जमा करणा-या प्राधिकरणांना उपकर जमा करण्यासाठी देय १% प्रशासकीय खर्चाची तरतूद, नजर चुकीने/ अनावधानाने मंडळाच्या खाती जमा रक्कमांच्या परताव्याच्या रक्कमाकरिता तरतूद, लॉकर खर्च, बॅक शुल्क इत्यादी खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे.

➢ **मंडळाचे मुख्यालय व जिल्हा कार्यालयातील बाब निहाय प्रशासकीय खर्चाचे अंदाज**

(रूपये लाखात)

अनु. क्र.	खर्चाची बाब	सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च	सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज	सन २०२५-२६ मुळ अंदाज
A०१	वेतन व भत्ते	९८.०९	९४.५९	१०५.००
A०२	मजुरी व कार्यालयीन स्वच्छता	२८.३१	१९.९८	२२.००
A०६	कार्यालयीन दूरध्वनी, इंटरनेट चार्जेस, मोबाईल व वीज देयके	४०.९५	५२.९८	६०.००
A१०	बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी कर्मचारी, सुरक्षा रक्षकांचे वेतन व सेवा निवृत्ती अधिका-यांचे पारिश्रमिकावरील खर्च	१२४४.२५	१६७१.०६	१८४०.००
A११	प्रवास खर्च	१.५२	१.५३	१.७५
A१३	कार्यालयीन स्टेशनरी व छपाई	८०.२६	७१.७०	८०.००
A१४	मुख्यालय व जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे भाडे, पट्टी व कर	७५९.६१	७१८.९८	८००.००
A१७	संगणक व इतर यंत्रसामुग्री खरेदी व देखभाल दुरूस्ती	२२.६९	२२.१०	२५.००
A१९	मंडळ सदस्यांचे मानधन, मंडळ बैठका व अन्य बैठकांचा खर्च	०.३९	०.१०	०.११
A२४	पेट्रोल, तेल व वंगण खर्च	१५.३५	८.०५	९.००
A२८	सल्लागारांचे व्यावसायिक शुल्क	१८३.०९	३२४.३४	३६०.००
A३३	पोस्टल स्टॅम्प / तिकीट	२.८५	३.२३	३.५०
A३४	मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयचे वाहन भाडे खर्च	२९७.४९	२३३.१९	२५०.००
A२६	मंडळाच्या निविदा सुचनांच्या जाहिरातीवरील खर्च	४.५१	१.७५	२.००
A३०	मा. महालेखापाल व सनदी लेखापरिक्षण शुल्क	४.६५	४.१५	१०.००
	विधी सल्लागार फी	४.११	१.९३	२०.००
A५०	इतर खर्च	१.८४	४.४४	५.००
	बँक शुल्क व लॉकर खर्च	१.२६	०.०२	०.०२
	कॉम्पक्टर खरेदी	२७७३५.८६	४७७३.११	७०००.००
	डॅश बोर्ड विकसित करणे	१२१.८२	०.००	०.००
	सेस कलेक्टिंग एजन्सी	१४९०.२७	१३३३.७९	४५२.७०
	प्रशासकीय खर्च एकूण	**३४९८४.३६**	**११०४६.०८**	**११०४६.०८**

क) अधिनियमातील तरतूदीनुसार उपकर परतावा

(रूपये लाखात)

अ. क्र.	खर्चाची बाब	सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च	सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज	सन २०२५-२६ मुळ अंदाज
C०१	उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद.	६.८४	५.९६	६.००
C०२.	चुकीने/अनावधानाने मंडळाच्या खाती जमा, उपकराच्या सुधारित परिगणनेनुसार करावयाचा परतावा.	९१२.५२	४०५.२०	१००.००
	एकूण उपकर परतावा (क)	**९१९.३६**	**४११.१६**	**१०६.००**

मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवरील मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष खर्च, सन २०२४-२५ चे सुधारित अंदाज व सन २०२५-२६ या वर्षाच्या मूळ अंदाजित खर्चाचा तपशील

(रूपये लाखात)

खर्चाचा तपशिल	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५ (मूळ अंदाज)	२०२४-२५ (सुधारीत अंदाज)	२०२५-२६ मूळ अंदाज)
विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च	३९२४०६.७२	४६६४४८.५१	४३१५५६.०५	५१४२५०.०९	६६०८१०.०५
प्रस्तावित योजना	०.००	०.००	०.००	०.००	१०००.००
प्रशासकीय खर्च	६३०३.१५	५६२०.०४	६१८०.५०	३२२१.८३	३५५६.३६
इतर खर्च- प्रशासकिय खर्च	२३.५३	२९३६४.३२	८७३७.४६	६११९.१९	७४८९.७२
उपकर परतावा	३९.७१	९१२.५२	५००.००	४०५.२०	१००.००
कल्याणकारी योजनावरील खर्चाशी प्रशासकीय खर्चाची टक्केवारी (%)	१.५८	६.८४	३०.००	५.९६	६.००
एकूण	**३९८७७४.६९**	**५०२३५२.२३**	**४४७००४.०१**	**५२४००२.२७**	**६७२९६२.१३**

सन २०२५-२६ मधील अपेक्षित जमा व खर्चाचा गोषवारा

(रूपये लाखात)

अ.क्र	बाब (जमा)	अपेक्षित जमा	बाब (खर्च)	अपेक्षित खर्च
१	उपकर	६००००.००	विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च	६६०८१०.०५
२	बँकेतील मुदतठेवीवरील व्याज	७०८७८.९०	प्रस्तावित योजना	१०००.००
३	नोंदणी फी	३०.००	प्रशासकिय खर्च	३५५६.३६
४	मासिक वर्गणी	१५.००	नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा	६.००
५	इतर जमा	०.०१	उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद	१००.००
	एकूण जमा	**६७०९२३.९१**	**एकूण खर्च**	**६६५४७२.४१**

+55cr

लेखा अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई